# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/२०१७** **दिनांक ०८.१२.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक ०८.१२.२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. असे इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४३७८/ २०१७, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक ०८.१२.२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्या
०६. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्री.धनंजय निकम,
उपजिल्हाधिकारी व प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर- सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य यांनी दूध्वनीद्वारे तसेच मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग- सदस्य यांनी ई-मेलद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०८.१२.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा मला खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी फॅक्सव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०८ डिसेंबर, २०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

**विषय नं.०१** **दिनांक १४.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०२३** दिनांक १४.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.९४०-**

सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, श्री शिवकृपानंद महाराज यांचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी ५०,००० भक्तांचा कार्यक्रम करणेचा मानस व्यक्त केला व अशा प्रकारची शिबीरे आयोजित करण्यासाठी त्यांनी अंदाजे रु.१५ ते २० लाख मात्र खर्च येतो, असे नमुद केले. तसेच सदरहू कार्यक्रम मोकळया जागेत करावयाचा असल्यामुळे मार्च महिन्यामधील वेळ मिळावा, अशी सभेस विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत दि.२३ ते ३० एप्रिल, २०१८ या कालावधीमध्ये श्री शिवकृपानंद महाराज यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. मात्र सदर कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती (सेवा संस्था)

ट्रस्ट यांनी स्वत: करावे. त्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी फक्त रु.१५,००,०००/- एवढा खर्च संस्थानने सहन करावा, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, श्री शिवकृपानंद महाराज यांचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी ५०,००० भक्तांचा कार्यक्रम करणेचा मानस व्यक्त केला व अशा प्रकारची शिबीरे आयोजित करण्यासाठी त्यांनी अंदाजे रु.१५ ते २० लाख मात्र खर्च येतो, असे नमुद केले. तसेच सदरहू कार्यक्रम मोकळया जागेत करावयाचा असल्यामुळे मार्च महिन्यामधील वेळ मिळावा, अशी सभेस विनंती केली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत दि.२३ ते ३० एप्रिल, २०१८ या कालावधीमध्ये श्री शिवकृपानंद महाराज यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. मात्र सदर कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांनी स्वत: करावे. त्यासाठी संस्थानमार्फत फक्त रु.१५,००,०००/- मात्र मानधन देण्यात यावे व या कार्यक्रमासाठी सर्व आवश्यक व्यवस्था व इतर खर्च योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांनी करावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**(२) निर्णय क्र.९४१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजनाकामी मानधनाव्यतिरिक्त कार्यक्रमाच्या अनुशंगाने इतर बाबींसाठी अंदाजे रु.५,९९,७६०/- मात्र खर्च येत असून हा खर्च खुपच जास्त आहे. याकरीता "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजन करणेकामी श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांना पुर्वी ठरलेल्या रु.९,००,०००/- मात्र मानधनामध्ये इतर बाबींसाठी जादा रु.२,००,०००/- मात्र रक्कम देण्यात यावी व या कार्यक्रमाची संस्थानकडून करावयाच्या बाबींसह इतर सर्व व्यवस्था त्यांनी करावी, असे त्यांना कळविणेत यावे. या रकमेमध्ये कार्यक्रम सादर करणेस ते तयार असतील तर सदरहू कार्यक्रम श्री रामनवमी उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२४ मार्च, २०१८ रोजी आयोजित करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजनाकामी मानधनाव्यतिरिक्त कार्यक्रमाच्या अनुशंगाने मानधन रु.९ लाख मात्र व इतर बाबींसाठी अंदाजे रु.५,९९,७६०/- मात्र असा एकूण अंदाजे रु.१४,९९,७६०/- मात्र खर्च येत असून हा खर्च खुपच जास्त आहे. याकरीता "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजन करणेकामी श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांना पुर्वी ठरलेल्या रु.९,००,०००/- मात्र मानधनामध्ये इतर अनुषंगीकबाबींसाठी रु.२,००,०००/- मात्र वाढवून एकूण रू.११,००,०००/- मात्र मानधन देण्यात यावे व या कार्यक्रमासाठीची इतर अनुषंगीक सर्व व्यवस्था श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांनी करावी, असे त्यांना कळविणेत यावे. या रकमेमध्ये कार्यक्रम सादर करणेस ते तयार असतील तर सदरहू कार्यक्रम श्री रामनवमी उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२४ मार्च, २०१८ रोजी आयोजित करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**(३) निर्णय क्र.९५८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सुविधेसाठी असलेल्या सर्व निवासस्थानांच्या प्रस्तावित "निवासस्थान वितरण" नियमावलीचे अवलोकन करणेत आले व त्यामधील अट क्र.३ मध्ये एका व्यक्तीस खोली देता येणार नाही, अशी सुधारणा करणेत येऊन, सदरहू नियमावली अंतीम करणेत आली. तसेच अंतीम करण्यात आलेली "निवासस्थान वितरण" नियमावली साईभक्तांच्या माहितीसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी व फ्लेक्स बोर्ड तयार करुन ते सर्व निवासस्थानांमध्ये दर्शनी भागात लावण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

**<u>वरील निर्णयामध्ये खालीलप्रमाणे मसुदा समाविष्ट करणेत यावा-</u>**

**श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची निवासाअभावी गैरसोय होऊ नये, याकरीता प्रायोगिक तत्वावर साईबाबा भक्तनिवास या निवासस्थानांमध्ये एका व्यक्तिस खोली उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच सहा महिने कालावधीनंतर याबाबतचा**

**आढावा घेण्यात येऊन, सविस्तर प्रस्ताव फेरविचारार्थ व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

**(४) निर्णय क्र.९६४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा १९६१ चे तरतूदीनुसार दिनांक ३१.०३.२०१८ अखेर एकूण रु.११५/- कोटी मात्र शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नामधून काही रक्कम शिर्डी नगरपंचायती हद्दीतील रस्त्यांच्या कामांसाठी व काही रक्कम संस्थानसाठी शेती महामंडळाची जमीन खरेदी करणेसाठी वापरणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(V) व ११ अन्वये संपुर्ण करमुक्त आहे. कलम ११ (२) मधील तरतूदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि, ते शक्य न झाल्यास उर्वरित शिल्लक अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येते व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११(५) अन्वये विहीत पध्दतीने गुंतवणूक करावी लागते. त्यास अनुसरुन आयकर विवरणपत्र दाखल करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ अखेर आर्थिक वर्षातील अखर्चित रु.२३०,६८,३९,५०६/- मात्र रकमेचा विनियोग दि.३१.०३.२०२० अखेर पुढील ५ वर्षात संस्थानच्या उद्दीष्टांकरीता खर्च करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(५) निर्णय क्र.९६६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईलिला व साई अर्पणसेवा हि द्वैमासिके निर्धारित वेळेत प्रसिध्द व्हावीत, याकरीता साईलिला द्वैमासिकाचे संपादकीय कामकाजकामी श्री.विद्याधर ताठे, पुणे व साई अर्पणसेवा द्वैमासिकाचे संपादकीय कामकाजकामी श्री.भगवान दातार, पुणे यांची कंत्राटी पध्दतीने प्रति माह एकत्रित रु.२५,०००/- मात्र मानधनावर दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी, असे ठरले.(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईलिला व साई अर्पणसेवा हि द्वैमासिके निर्धारित वेळेत प्रसिध्द व्हावीत, याकरीता सदरहू द्वैमासिकांचे संपादकीय कामकाजासाठी स्वतंत्र दोन संपादकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. परंतु संस्थानच्या मंजुर आकृतीबंधामध्ये कार्यकारी संपादकाचे एकच पद असल्यामुळे श्री साईलिला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादकपदी श्री.विद्याधर ताठे, पुणे यांची व साई अर्पणसेवा द्वैमासिकाचे कामकाजासाठी श्री.भगवान दातार, पुणे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी प्रति माह एकत्रित रु.२५,०००/- मात्र मानधनावर दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी. तसेच सदरहू द्वैमासिक अंक निर्धारीत वेळेत प्रसिध्द झाला तरच त्या कालावधीचे मानधन अनुज्ञेय राहील, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ आस्थापना)

---

**(६) निर्णय क्र.९८१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार प्रसिध्दी अधिकारी, व कनिष्ठ अभियंता, बांधकाम या पदांसाठीच्याथेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) आलेल्या सर्व उमेदवारांना सदर पद भरती प्रक्रीया रद्द झालेबाबत कळविणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच ०३ कनिष्ठ अभियंता, बांधकाम ही पदे यापुर्वी मान्यता दिलेल्या मानधनावर बाहययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेणेत यावे व ०१ प्रसिध्दी अधिकारी पद भरणेऐवजी त्याकामी पी.आर. एजन्सीची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आस्थापना)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार कनिष्ठ अभियंता, बांधकाम या पदांसाठीच्या थेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) आलेल्या सर्व उमेदवारांना सदर पद भरती प्रक्रीया रद्द झालेबाबत कळविणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच ०३ कनिष्ठ अभियंता, बांधकाम ही पदे यापुर्वी मान्यता दिलेल्या मानधनावर बाहययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेणेत यावे व प्रसिध्दी अधिकारी पद भरणेकामी यापुर्वी दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन २३ अर्ज प्राप्त झालेले असून त्यापैकी १० अर्ज पात्र व १३ अर्ज अपात्र ठरलेले आहेत. सदर १० पात्र उमेदवारांची लेखी व तोंडी परिक्षा घेऊन, त्यामधून कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी एकत्रित रु.२५,०००/- मात्र मानधनावर प्रसिध्दी अधिकारीची नियुक्ती करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(७) निर्णय क्र.१००४(९)-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला तूपाची तातडीने गरज असल्यामुळे मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांनी दरपत्रकासोबत सादर केलेला नमुना NABL लॅबकडून तपासणी करुन घेऊन त्याचा रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे असल्यास त्यांना १५०० क्विंटल तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश त्वरीत देण्यात यावा. तसेच त्यांच्या प्लॅन्टचे Vendor Audit ची तारीख निश्चित करणे, पुढील पुरवठा आदेश देणे व मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव यांना सुधारीत नियमावलीतील तरतुदीनुसार ५० टक्के तूप पुरवठा आदेश देणे या सर्व बाबींबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना असे ठरले की, गाईचे तुप पुरवठा करणाऱ्या मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांच्या प्लॅंटचे संस्थान अधिकाऱ्यांसह व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी इन्सपेक्शन करावे व त्यानंतर उर्वरित पुरवठा आदेश देण्यात यावा.

दरम्यानचे कालावधीत खराब तुपाचा पुरवठा झालेबाबत, स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांना नोटीस देण्यात आलेली होती. या नोटीसीच्या खुलाशासाठी ते या चर्चेच्या वेळी सभेमध्ये उपस्थित होते, त्यांनी सभेस विनंती केली की, मला पुर्ववत पुरवठा आदेश देण्यात यावा. यावर सभेने त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही, परंतु त्यांचा काळया यादीमध्ये समावेश करणेची अट शिथील करणेत येऊन, यापुढील गाईचे तुप खरेदीकामीच्या ई-निविदा प्रकियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी, असे समितीने ठरविले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला तूपाची तातडीने गरज असल्यामुळे मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांनी दरपत्रकासोबत सादर केलेला नमुना NABL लॅबकडून तपासणी करुन घेऊन त्याचा रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे असल्यास त्यांना १५०० क्विंटल तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश त्वरीत देण्यात यावा. तसेच त्यांच्या प्लॅन्टचे Vendor Audit ची तारीख निश्चित करणे, पुढील पुरवठा आदेश देणे व मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव यांना सुधारीत नियमावलीतील तरतुदीनुसार ५० टक्के तूप पुरवठा आदेश देणे या सर्व बाबींबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना असे ठरले की, गाईचे तुप पुरवठा करणाऱ्या मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांच्या प्लॅंटचे संस्थान अधिकाऱ्यांसह व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी इन्सपेक्शन करावे व त्यानंतर ५० टक्के पुरवठयामधील उर्वरित पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच शासनाच्या सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव यांना १५०० क्विंटल पैकी ५० टक्के गाईचे शुध्द तूप निम्नतम दरधारकाचे दरामध्ये पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत यावा.**

दरम्यानचे कालावधीत खराब तुपाचा पुरवठा झालेबाबत, स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांना नोटीस देण्यात आलेली होती. या नोटीसीच्या खुलाशासाठी ते या चर्चेच्या वेळी सभेमध्ये उपस्थित होते, त्यांनी सभेस विनंती केली की, मला पुर्ववत पुरवठा आदेश देण्यात यावा. यावर सभेने त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही, परंतु त्यांचा काळया यादीमध्ये समावेश करणेची अट शिथील करणेत येऊन, यापुढील गाईचे तुप खरेदीकामीच्या ई-निविदा प्रकियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी, असे समितीने ठरविले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**(८) निर्णय क्र.१००८ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन खुप जुनी झालेली असल्यामुळे ती बऱ्याचवेळा फुटते/ लिकेज होते व पाणी पुरवठा करणेस अडचण निर्माण होते. याकरीता कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टप्पा-०१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) टप्पा-०२ (निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे) असे वर्गीकरण करणेत येऊन, त्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा व त्याप्रमाणे टप्पा-०१ व टप्पा-०२ अशी स्वतंत्रपणे मान्यता देण्यासाठी शासनास विनंती करावी. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन खुप जुनी झालेली असल्यामुळे ती बऱ्याचवेळा फुटते/ लिकेज होते व पाणी पुरवठा करणेस अडचण निर्माण होते. याकरीता कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टप्पा-०१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) टप्पा-०२ (निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगाव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंतची पाईपलाईन टाकणे) असे वर्गीकरण करणेत येऊन, त्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करावा. तसेच सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा व त्याप्रमाणे टप्पा-०१ व टप्पा-०२ अशी स्वतंत्रपणे मान्यता देण्यासाठी शासनास विनंती करावी.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **श्री साईसत्यव्रत पुजा व भक्त अभिषेक पुजेकरीता आवश्यक श्रीफळ ई-निविदेद्वारे खरेदी करणे व श्री साईसत्यव्रत पुजेचे दर निश्चित होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८५१ नुसार असे ठरले की, मंदिर परिसरामध्ये फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ यास बंदी केल्यास, अनेकांचा रोजगार बंद होईल, परंतु, फुले, गुच्छ वगैरे विक्री करणारे विक्रेते शिर्डी बाहेरील असून त्यामधील बरेचशे गुन्हेगार प्रवृत्तीचे आहेत. ते साईभक्तांना त्रास देतात, जबरदस्तीने फुले, गुच्छ वगैरे विकत घेण्यास भाग पाडतात. या बाबींचा तसेच शिर्डी ग्रामस्थांनी दिलेल्या लेखी पत्राचा विचार करता, मंदिर परिसरामध्ये फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ स्विकारणेस बंदी करणेत यावी. त्याचप्रमाणे साईभक्तांच्या श्रद्धेप्रमाणे फुलांचे हार स्विकारणेत यावे, परंतु शिर्डी नगरपंचायतीने फुलांच्या हारांची, त्यांच्या आकारानुसार दुकानदारांना किंमत ठरवून द्यावी. यावेळी अशीही चर्चा झाली की, श्रीसाईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीमार्फत संस्थान परिसरामध्ये विक्री करणेत असलेला पेढा कमी दर्जाचा व खराब असतो, त्यामुळे संस्थानच्या नावाची बदनामी होत आहे. याकरीता श्रीसाईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटी यांना पेढा व प्रसाद विक्रीकामी एफ.डी.ए.ची मानके अनिवार्य करणेत यावीत.

प्रस्तावः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७चे सभेतील निर्णय क्र.८५१ चे निर्णयानुसार साईभक्तांनी आणलेली फुले, गुच्छ, बुके याबरोबर श्रीफळ स्विकारणेस बंदी करण्यात आल्याने-

१) श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता लागणारे श्रीफळ खरेदी विभागामार्फत ई-निविदाद्वारे खरेदी करणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

२) तसेच श्रीसाईसत्यव्रत पूजेच्या दरामध्ये वाढ करुन रु.१००/- ऐवजी रु.२००/-प्रति तिकीट करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**<u>विभागाचा अभिप्रायः-</u>**

१) सध्या श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता लागणारे श्रीफळ साईभक्तांमार्फत जमा होणारे श्रीफळ वापरण्याची प्रथा होती. आता साईभक्तांकडील श्रीफळ येण्याचे प्रमाण दिवसें-दिवस कमी होत असल्याने सत्यनारायण पूजेसाठी व भक्त अभिषेक पूजेसाठी श्रीफळ उपलब्ध होत नाही. श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता करीता लागणारे श्रीफळ खरेदी करावे लागणार आहे. तरी याबाबत मान्यता मिळणेस विनंती.

**अ)** याकामी प्रति महिना सरासरी एकूण ५००० पूजा होत आहेत. त्यामध्ये श्रावण महिना, उत्सव, पौर्णिमा, सुट्ट्यांचे काळात अशा विशेष कालावधीत ७०००-७५०० पूजा देखील होत असल्याचा अनुभव आहे. तरी

पुढील वर्षात माहे-जानेवारी-२०१८ ते माहे-मार्च- २०१९ या वर्षात होणा-या श्रीसाईसत्यव्रत पूजाकरीता खालीलप्रमाणे खरेदी करणेकामी ई-निविदाद्वारे खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

कालावधी-माहे-जानेवारी-२०१७ ते माहे-मार्च-२०१९अखेर

| अ.क्र | तपशील | अंदाजे दर | एकूण अंदाजे खरेदी | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | सत्यनारायण पूजेकरीता पाणी असलेले श्रीफळ | रु.१८/- | ६६००० नग | ११,८८,०००/- |
| ०२ | भक्त अभिषेक पूजेकरीता पाणी असलेले श्रीफळ | रु.१८/- | १८००० नग | ३,२४,०००/- |

**ब)** माहे-जानेवारी पासुन ई-निविदा प्रक्रीयेद्वारे श्रीफळ खरेदीस वेळ लागणार असल्याने सध्या श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता आवश्यक श्रीफळ स्थानिक दुकानदार यांचेकडुन माहे-नोव्हेंबर ते माहे-डिसेंबर अखेर अंदाजे १५०००नग श्रीफळ खरेदी करणेस मान्यता असावी. याकरीता अंदाजे रक्कम रु.२,७०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर खरेदी स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन मागवुन न्युनतम दर धारकाकडुन आवश्यक असणारे श्रीफळ खरेदी करणेस व यासाठी होणारा खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

२) तसेच श्रीसाईसत्यव्रत पूजेचे दर वाढविणेबाबत निर्णय होणेस विनंती. यापुर्वी दि.०६.०३.२०१०रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.२६ नुसार श्रीसाईसत्यव्रत पूजेच्या दर दि.०१.०४.२०१० पासुन रु.५०/- ऐवजी रु.१००/- करण्यात आलेले आहे. त्यावेळी पूजा साहित्याचा व प्रशासकीय खर्च असा एकूण रु.१९२/- एवढा होता. आता सध्या संस्थानमार्फत सदर पूजेकरीता एकूण रु.५३६/- एवढा खर्च होत आहे. तरी सदर खर्च जादा असल्याने श्रीसाईसत्यव्रत पूजेचे दर वाढवुन रु.२००/- एवढा करण्याबाबत निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.१(अ) प्रमाणे माहे-जानेवारी-२०१८ ते माहे-मार्च-२०१९ अखेर ई-निविदाद्वारे खरेदी विभागामार्फत श्रीफळ खरेदी करणेस व त्याकामीचे खर्चास मान्यता मिळणेस व अ.क्र.१ (ब) नुसार माहे-नोव्हेंबर-२०१७ ते माहे-डिसेंबर-२०१७ अखेर तातडीने श्रीफळ खरेदी करणेकामी स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन मागवुन श्रीफळ खरेदी करणेस व त्याकामीचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती याबरोबर अ.क्र.२) नुसार सध्याचा महागाईचा विचार करता श्रीसाईसत्यव्रत पूजेच्या दरामध्ये वाढ होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे-जानेवारी-२०१८ ते माहे-मार्च-२०१९ अखेर या कालावधीसाठी श्री साईसत्यव्रत पुजा व भक्त अभिषेक पुजेकरीता आवश्यक असलेले श्रीफळ ई-निविदाद्वारे खरेदी करणेस व त्याकामीचे खर्चास तसेच माहे-नोव्हेंबर-२०१७ ते माहे-डिसेंबर-२०१७ अखेर याकालावधी आवश्यक असलेले श्रीफळ स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईसत्यव्रत पुजा व भक्त अभिषेक पुजेचे दर वाढविणेबाबत चर्चा सुरु असताना असे निदर्शनास आले की, सदरहू पुजा साहित्यांसाठी येणाऱ्या खर्चामध्ये पुजा साहित्यांचा खर्च नाममात्र असून प्रशासकीय खर्च जास्त आहे. त्यामुळे तुर्त श्री साईसत्यव्रत पुजा व भक्त अभिषेक पुजेचे दर वाढवू नयेत. सदरहू पुजा केल्यानंतर भक्तास समाधान मिळेल, यावर लक्ष देण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच, संस्थानचे पाणी पुरवठा तलावावर नारळांची झाडे लावण्यात यावी, त्यामुळे भविष्यामध्ये नारळ खरेदी करणेची आवश्यकता भासणार नाही, अशा सुचना करण्यात आल्या.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये भोपाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या पादुका दर्शन सोहळयाची दिनांक बदलून मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना–** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येत आहे.
मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७ ला अनुसरून प्राथमिक चर्चा करणेकामी दि.२९/०८/२०१७ रोजी शिर्डी येथील संस्थानचे लेडींबागेतील "०" नंबर सभागृह येथे मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे मा.श्री. बिपीनदादा कोल्हे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. सदरहू बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या पादुका दर्शन प्रस्तावांबाबत ज्या आयोजकांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा भारतातील आयोजकांना दि.२२/०९/२०१७ व विदेशातील आयोजकांना दि.२३/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे बोलविण्यात यावे तसेच त्यावेळेस विश्वस्त मा.श्री. जयकर सो. व मा. श्री.भोसले सो. यांनाही निमंत्रीत करण्यात यावे असे ठरलेले होते.

त्यानंतर दि.०१/०९/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी (विश्वस्त मा.श्री. वाकचौरे सो. व मा. श्री. कोल्हे सो. यांचेशी दूरध्वनीद्वारे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने) नोव्हेबर-डिंसेबर-जानेवारी महिन्यातील पादुका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम निश्चित करणेसाठी अनुक्रमे तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यातील मोठया शहरातील प्रस्तावधारकांना मंगळवार दि.०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे निर्देश श्री. मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री राजतिलक बागवे, प्र. अधिक्षक शताब्दी कक्ष यांना देण्यात आले होते.

त्यानुसार दि.०५/०९/२०१७ रोजी विश्वस्त मा. श्री. भाऊसोहब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा. उपकार्यकारी अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे उपस्थितीत बैठक पार पडली. बैठकीतील चर्चेनुसार छाननी समिती यांनी तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेबर, डिंसेबर-२०१७ व जानेवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजन होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस केली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन तामिळनाडू, पॉडेचेरी, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यांत माहे-नोव्हेबर, डिसेंबर-२०१७ व जानेवारी, फ्रेबुवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलीयाकामी प्रस्तावित केलेल्या ठिकाणी व सभेत प्राप्त झालेल्या अर्जांवरही चर्चा होऊन वेळापत्रक तयार करण्यात आले होते. त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५५ खालील प्रमाणे आहे.

"...*शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाल येथे दि.१६ व १७ डिसेंबर२०१७ रोजी पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे..*"

तथापि शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाल यांनी दि.२१/११/२०१७ रोजीचे ई-मेल पत्राद्वारे भोपाल येथे दि.१६ व १७ डिसेंबर२०१७ रोजी श्रींचे पादुका दर्शन सोहळयाची आयोजन करण्याची संधी दिलेली आहे. परंतू शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांचे मुख्य कार्यकर्ते गुजरात निवडणूकीसाठी व्यस्त असल्याने ते पादुका दर्शनाचे नियोजनासाठी वेळ देऊ शकत नाही त्यामुळे प्रशासकीय कार्य आणि पादुका दर्शन कार्यक्रमांचे नियोजनाचे अनुषंगाने उचित व्यवस्थेची तयारी करण्यास असमर्थ आहेत. तरी माहे-डिसेंबर महिन्यामध्ये भोपाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रींचा पादुका दर्शन सोहळा हा सन-२०१८ मध्ये दि.११/०१/२०१८ ते १२/०१/२०१८ रोजी भोपाळ येथे आयोजन करणेस विनंती केलेली आहे.

**प्रस्तावः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार संस्थानमार्फत भोपाळ येथे दि.१७ व १८ डिसेंबर२०१७ रोजी श्रींचे पादुका दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे यापूर्वी त्यांना कळविण्यात आलेले होते. तदनंतर शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांनी सदरहू दिनांक

बदलणेसाठी विनंती केलेली होती. त्यानुसार त्यांना दि.१६ व १७ डिसेंबर२०१७ रोजी श्रींचे पादुका दर्शनासाठी उपलब्ध करून दयावयाचे ठरलेले आहे.

आता शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांनी त्यांचे मुख्य कार्यकर्ते गुजरात निवडणूकीसाठी व्यस्त असल्याने ते पादुका दर्शनाचे नियोजनासाठी वेळ देऊ शकत नाही त्यामुळे प्रशासकीय कार्य आणि पादुका दर्शन कार्यक्रमांचे नियोजनाचे अनुषंगाने उचित व्यवस्थेची तयारी करण्यास असमर्थ आहेत. दि.११/०१/२०१८ ते १२/०१/२०१८ रोजी श्रींचे पादुका दर्शनासाठी मिळणेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** माहे-जानेवारी या महिन्यामध्ये दि.०४ ते ०९/०१/२०१८ गुजरात राज्यात, दि.१८/०१/२०१८ रोजी नागपूर येथे व दि.२५/०१/२०१८ ते १०/०२/२०१८ या कालावधीमध्ये महाराष्ट्र ज्यातील विदर्भात श्रींचे पादुका साई भक्तांसाठी उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत घेण्यात आलेला आहे.

तसेच शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांनी त्यांच्या कार्यक्रमात दोन वेळा बदल केला असून, त्यांनी मागितलेल्या सोईच्या दिनांकानुसार श्रींचा पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांना माहे-जानेवारी महिन्यामध्ये श्रींचे पादुका उपलब्ध करता येणार नाहीत. तसेच माहे-डिसेंबर दि.१६/१२/२०१७ ते १७/१२/२०१७ रोजी भोपाळ येथे आयोजित करण्यात आलेला श्रींचा पादुका दर्शन सोहळा रद्दबादल होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर.

**निर्णय क्र.१०२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जानेवारी व फेब्रुवारी- २०१८ मधील श्रींच्या पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रम अंतीम झालेले असल्यामुळे शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांना मार्च- २०१८ नंतर श्रींच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देता येईल. याबाबत शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात दि.२३.१२.२०१७ रोजी श्री.रुपकुमार व श्रीमती सुनाली राठोड यांचा साई भजन संध्या कार्यक्रम आयोजीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये योजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

३) मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे प्रस्ताव स्वतंत्रपणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावेत अशी चर्चा झाली.

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३४ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२३/१२/२०१७ रोजी, समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांनी सुचविलेले रुपकुमार व सोनाली राठोड यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेत यावा व त्यांना रु.२,८०,०००/- + प्रवास खर्च मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना**:- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव**:- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे प्रस्ताव स्वतंत्रपणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावेत अशी चर्चा झाली.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे प्रस्ताव स्वतंत्रपणे सादर करण्यात आले होते. यामध्ये दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी सायं.७ ते १० या वेळेत आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमासाठी निर्णय क्र.९३४ अन्वये, "श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२३/१२/२०१७ रोजी, समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांनी सुचविलेले रुपकुमार व सोनाली राठोड यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेत यावा व त्यांना रु.२,८०,०००/- + प्रवास खर्च मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयास अनुसरुन श्री.रुपकुमार राठोड यांचेशी संपर्क साधला असता त्यांचे व्यवस्थापक श्री.जेनिश भट्ट यांनी दि.१७/११/२०१७ रोजीचे ई-मेलनुसार दि.२३/१२/२०१७ रोजीचे कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक कळविले आहे.

**A) "साईभजन संध्या" कार्यक्रमासाठी कळविण्यात आलेला खर्च** :-

| Sr.No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Musicians, backing vocals & Sound Engineers Fees (including 18% GST) | 3,54,000/- |
| 02 | Transport Charges<br>(a) 3 Innova Inclusive of all for 600 Kms. (Rs.24,600/-)<br>(b) 1 Fortuner Inclusive of all for 600 Kms. (Rs.19,650/-) | 44,250/- |
| | Total Amount (A) :- | 3,98,250/- |

याबरोबरच "साईभजन संध्या" कार्यक्रमाचे आयोजनासाठी संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबी कळविल्या आहेत. त्यासाठी संस्थानकडून होणा-या अतिरिक्त खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

B) "साईभजन संध्या" कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा अतिरिक्त खर्च :-

| Sr.No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Sound System Rent<br>* JBL Vertec 4888 Top 12 no.<br>* JBL 4880A Dual subs 8 no.<br>* Digidesign SC-48mixer with 48 Channels<br>* 15" Nexo PS-15 monitors 8 no.<br>* EV-ZX5 side fills no. 2<br>(Including 18% GST) | 1,47,500/- |
| 02 | 2 Skyfolding 6 x 6 x 30 feet and Transportation | 25,000/- |
| 03 | Stage Size should be at least 30 X 40 X 5 feet (Excluding LED, Wings (If any) & other Decorations)<br>(Note – Included in the Sansthan's tender published on 21/11/2017) | - |
| 04 | Center riser required 12 feet X 6 feet X 2 feet with thick carpet on stage | 2,000/- |
| 05 | Both sides of the stage should cover with Black/White masking cloth at least up to 20 feet each side | 15,000/- |
| 06 | Sound console and lights console should be at same place<br>(Note – Included int the Sansthan's tender published on 21/11/2017) | - |
| 07 | 02 Green room size 15 X 15 feet each with 6 Chairs, Table, Fan, Light & Mirror<br>(Note – Included int the Sansthan's tender published on 21/11/2017) | - |
| 08 | 6 covered chairs without armrest for musicians on stage<br>(Note – Included int the Sansthan's tender published on 21/11/2017) | - |
| 09 | Accommodation<br>a) 1 Suite for Mr. & Mrs. Roopkumar Rathod<br>b) 5 Deluxe rooms for other team members on twin sharing<br>(Rs.6,000/- x 5 Rooms) GST 18%<br>(Note – As per Hotel Sun-n-sand, Shirdi email dtd.23/12/2017) | <br>14,000/-<br>30,000/-<br>7,920/- |
| 10 | 2-3 Helper/Assistant required at the venue for loading & unloading the instruments and luggage and they should remain present till end of the performance (3 Helper/Assistant x Rs.415/-) | 1,245/- |
| | Total Amount (B) :- | 2,42,665/- |
| | Total Amount (A) :- | 3,98,250/- |
| | Grand Total (A+B) :- | 6,40,915/- |

सदर कार्यक्रमासाठी वरीलप्रमाणे एकुण रु.६,४०,९१५/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि मा.व्यवस्थापन समितीने दि.१४/११/२०१७ चे बैठकीत निर्णय क्र.९३४ अन्वये (रु.२,८०,०००/- मानधन + रु.४४,२५०/- प्रवास खर्च) अशा एकुण रु.३,२४,२५०/- मात्र इतक्या खर्चास मान्यता दिली आहे. यास्तव, अतिरिक्त होणारा खर्च रु.३,१६,६६५/- मात्र याबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात दि.२३/१२/२०१७ रोजी श्री.रुपकुमार व श्रीमती सोनाली राठोड यांचा साईभजन संध्या कार्यक्रम साईनगर मैदान येथील स्टेजवर आयोजित करणेबाबतचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात दि.२३.१२.२०१७ रोजी श्री.रुपकुमार व श्रीमती सुनाली राठोड यांचा कार्यक्रम आयोजित करणेसाठी रु.३,१६,६६५/- मात्र येणाऱ्या वाढीव खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली. सदरहू अतिरिक्त रक्कम मंजुर करुन ठेवणेत यावी व यापुर्वीच ठरलेप्रमाणे समिती सदस्य ॲडमोहन जयकर यांनी चर्चा करुन उपरोक्त खर्चामधून**

**काही रक्कम कमी होणेबाबत प्रयत्न करावेत. चर्चेअंती रक्कम कमी न झाल्यास मंजुर रकमेचा वापर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमामध्ये दि.२४ डिसेंबर,२०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचे कार्यक्रमाचे आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

३) मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यातील दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावेत असे ठरले आहे.

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३६ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२४/१२/२०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचा मराठी बाणा हा कार्यक्रम आयोजित करावयाचा मानस आहे परंतु या कार्यक्रमासाठीचा खर्च खुपच जास्त असल्यामुळे रु.१० लाख मात्र खर्चामध्ये (मानधनासह) कार्यक्रम सादर करणेस तयार आहेत का व मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे कार्यक्रमासाठी तयार करणेत आलेल्या स्टेजवर कार्यक्रम करणेस तयार आहेत का, याची विचारणा संबंधीतांना करणेत यावी व या एकत्रित खर्चामध्ये श्री.अशोक हांडे कार्यक्रम करणेस तयार असतील, तर त्यांचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा, असे ठरले."

**प्रस्तावना**:- श्री.अशोक हांडे, मुंबई यांनी त्यांचे दि.२४/०६/२०१७ व दि.०४/११/२०१७ रोजीचे ई-मेल द्वारे, चौरंग संस्थेचा "मराठी बाणा" हा कार्यक्रम मराठी संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविणारा संगीताचा एक भव्य उत्सव आहे. तसेच आमच्या ग्रुपमध्ये तंत्रज्ञांसह सुमारे १५० कलाकार असतात. अडीच तास चालणा-या या कार्यक्रमामध्ये १५ मिनिटांचा मध्यांतर आहे.

सदर कार्यक्रमासाठी श्री.अशोक हांडे यांनी रक्कम रु.१०,५०,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये दहा लाख पन्नास हजार मात्र) शुल्क असणार आहे. यामध्ये प्रयोगाचे मानधन, सेटींग व प्रवास खर्च यांचा समावेश असणार आहे. तसेच संस्थानला त्यावर १८% जीएसटी ची रक्कम आदा करावी लागणार आहे.

तसेच संस्थानकडून स्टेज (Size 80' x 44' and Height 5' as per our technical specifications & Layout), Trussing, Sky Folding, Generator Sets या बाबी पुरविल्या जाव्यात. कार्यक्रम निश्चितीसाठी एकुण रक्कमेच्या ५०% ॲडव्हान्स रक्कम द्यावी लागेल व उर्वरीत रक्कम कार्यक्रमाच्या १५ दिवस अगोदर द्यावी लागणार आहे. सदर कार्यक्रमाची व्हीडीओ शुटींग किंवा ऑडीओ रेकॉर्डीग करण्याची परवानगी असणार नाही. कार्यक्रमाचे फक्त फोटो काढता येणार आहेत, असे कळविले होते.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.९३६ अन्वये, "श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२४/१२/२०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचा मरठी बाणा हा कार्यक्रम आयोजित करावयाचा मानस आहे. परंतु या कार्यक्रमासाठीचा खर्च खुपच जास्त असल्यामुळे रु.१० लाख मात्र खर्चामध्ये (मानधनासह) कार्यक्रम सादर करणेस तयार आहेत का व मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे कार्यक्रमासाठी तयार करणेत आलेल्या स्टेजवर कार्यक्रम करणेस तयार आहेत का, याची विचारणा संबंधीतांना करणेत यावी व या एकत्रित खर्चामध्ये श्री.अशोक

हांडे कार्यक्रम करणेस तयार असतील, तर त्यांचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा, असे ठरले." त्यानुसार इकडील विभागामार्फत दि.३०/११/२०१७ रोजीचे पत्र ई-मेलद्वारे श्री.अशोक हांडे यांना कळविण्यात आले होते.

तथापि, दि.३०/११/२०१७ चे ई-मेलद्वारे श्री.अशोक हांडे यांनी संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबी कळविल्या आहेत. तसेच कार्यक्रम निश्चितीसाठी ५० टक्के रक्कम ॲडव्हान्स द्यावी लागेल. तसेच उर्वरीत रक्कम कार्यक्रमाच्या १५ दिवस अगोदर द्यावी लागेल असे कळविले आहे. तसेच दुध्वनीद्वारे मा.उपराष्ट्रपती महोदय यांच्या सभेच्यावेळी स्टेज व मंडप व्यवस्था कशी असणार याची माहिती घेऊन ई-मेलद्वारे Tussing – 80' x 40' व Skyfolding – 8' x 8' या गोष्टींची आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे.

**प्रस्ताव**:- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२४/१२/२०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचा मराठी बाणा हा कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात येऊन त्यावर निर्णय क्र.९३६ संमत झाला आहे व तसे श्री.अशोक हांडे यांना कळविण्यात आले आहे.

आता श्री.अशोक हांडे यांनी दि३०/११/२०१७ रोजीचे ई-मेलनुसार दि.२४/१२/२०१७ रोजी "मराठी बाणा" या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यास तयार असून त्यासाठी अटी व शर्तीवर खालीलप्रमाणे सुधारीत प्रस्ताव सादर केला आहे.

**A) "मराठी बाणा" कार्यक्रमासाठी श्री.अशोक हांडे, मुंबई यांनी कळविलेला कलाकार मानधन व इतर खर्च :-**

| Sr.No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Show Remuneration | 10,00,000/- |
| | GST (18%) | 1,80,000/- |
| | Total Amount (A) :- | 11,80,000/- |

याबरोबरच श्री.अशोक हांडे यांनी "मराठी बाणा" कार्यक्रमाचे आयोजनासाठी संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबी कळविल्या आहेत. त्यासाठी संस्थानकडून होणा-या अतिरिक्त खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**B) "मराठी बाणा" कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा अंदाजित अतिरिक्त खर्च :-**

| Sr.No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Stage – Size 80' x 40' as per our design<br>(Note – Included in the Sansthan's tender published on 21/11/2017) | --- |
| 02 | Green Rooms – (Size – 15' x 20') – Minimum 07<br>(Note – 2 Green Rooms included in the Sansthan's tender published on 21/11/2017) Rent – Rs.8,000/- Per Green Room x 5 | 40,000/- |
| 03 | Electricity supply only by Generators –<br>Total 05 Generators silent of 125 KW capacity<br>(Rent – Rs.8,000/- per day, Diesel Exemption – Per hour 12 Litres.) | 1,00,000/- |
| 04 | Accommodation – 150 Artistes (50 Rooms x Rs.200/- x 2 Days) | 20,000/- |
| 05 | 02 Gents and 02 Ladies toilets behind the stage (portable)<br>(Rent Rs.400/- per mobile toilet per day) | 3,200/- |
| 06 | Local transportation from Hotel to Venue (Sansthan's Vehicle) | 10,000/- |
| | Total :- | 1,73,200/- |
| | GST (18%) | 31,176/- |
| | Total Amount (B) :- | 2,04,376/- |

| | | |
|---|---|---|
| | Total Amount (A) :- | 11,80,000/- |
| | Grand Total (A+B) :- | 13,84,376/- |

श्री.अशोक हांडे यांचा “मराठी बाणा” या कार्यक्रमासाठी वरीलप्रमाणे एकुण रु.१३,८४,३७६/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि मा.व्यवस्थापन समितीने दि.१४/११/२०१७ रोजीचे बैठकीत निर्णय क्र.९३६ अन्वये रक्कम रु.१० लाख मात्र खर्चास (मानधनासह) मान्यता दिली आहे. यास्तव खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

अ) संस्थानचा अतिरिक्त होणारा खर्च रु.३,८४,३७६/- मात्र याबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक आहे.

ब) संस्थानमार्फत कार्यक्रमासाठी आलेल्या कलाकारांची मोफत जेवणाची व्यवस्था करणे.

क) श्री.अशोक हांडे यांनी कळविलेनुसार सदरहू कार्यक्रमासाठी मानधनाच्या ५० टक्के ॲडव्हान्स मागितला असून, तसेच उर्वरीत रक्कम कार्यक्रमाच्या १५ दिवस अगोदर द्यावी लागेल असे नमूद केले आहे.परंतु कोणत्याही कार्यक्रमासाठी ॲडव्हान्स रक्कम देण्याची तरतूद नाही.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात दि.२४/१२/२०१७ रोजी चौरंग संस्थेचा “मराठी बाणा” या कार्यक्रमाचे आयोजनाबाबतचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२४ डिसेंबर, २०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचा मराठी बाणा हा कार्यक्रम आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे येणाऱ्या रु.३,८४,३७६/- मात्र वाढीव खर्चास व त्यांचेकडील कलाकारांची मोफत प्रसादभोजनाची संस्थानमार्फत व्यवस्था करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी श्री.अशोक हांडे यांना ॲडव्हान्स रक्कम देण्यात येऊ नये व अशा मोठया स्वरुपाच्या कार्यक्रमांची जास्तीत-जास्त साईभक्त व स्थानिक नागरीकांना माहिती मिळावी, यासाठी शिर्डी व शिर्डी परिसरामध्ये फिरती ॲनॉन्समेंट करुन प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०६** **अधिनियम- २००४ मधील तरतूदीन्वये व्यवस्थापकीय निधीच्या रकमेचा करण्यात येत असलेल्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ दिनांक २३ ऑगष्ट २००४ च्या अधिसुचनेनुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन शासन नियुक्त मा.व्यवस्थापन समितीमार्फत सुरु आहे. या अधिनियमातील व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या संबंधी २२(२) व (३) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

कलम २२(२) व्यवस्थापन निधीत, शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास ती विचारात घेऊन, विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येइल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटलेतर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निर्देश देता येईल

कलम २२(३) व्यवस्थापन निधीचा राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनासाठी उपयोग करता येईल-

(क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य आणि छाननी समितीचा अध्यक्ष आणि कलम १७ च्या खंड(त्र) अन्वये घटीत करण्यात आलेलया उपसमितीचे बाहेरील सदस्य याना मानधन, फी व भत्ते देणे;

(ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे.

(ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिका-याने किंवा कर्मचा-याने कायदेशीररित्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेमार्फत शिर्डी येथे येणा-या भक्तांना श्री साईबाबांचे दर्शन, पुजा, भोजन, निवास याबाबत सर्वकष सेवा-सुविधा सातत्याने पुरविण्यात येतात. या सर्वकष सुविधा सहजतेने उपलब्ध होत असल्यामुळे श्रध्देने मोठ्या प्रमाणावर साईभक्त देशातून व परदेशातून श्रींच्या दर्शनासाठी येत असतात. दर्शनासाठी येणारे साईभक्त हे केंद्रस्थान धरुन दर्शन, पुजा, निवास, भोजन इत्यादी

सर्वकष सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता संस्थानच्या उत्पन्नाचा मोठा भाग त्यावर खर्च करणे क्रमप्राप्त आहे व त्याप्रमाणे खर्च होत आहे.

तसेच संस्थान गरजू व गरीब रुग्णांसाठी अत्यल्प दरात रुग्णसेवा पुरवित आहे. त्यासाठी श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल येथे अत्याधुनिक यंत्रसामुग्री व प्रशिक्षित डॉक्टराच्या सहाय्याने विविध रोगांवर उपचार केले जातात. त्यामुळे शिर्डी परिसरातील तसेच राज्यातील ग्रामीण भागातील रुग्णांची चांगल्याप्रकारे सोय झालेली आहे.

तसेच संस्थान गरजू व गरीब रुग्णांसाठी अत्यल्प दरात रुग्णसेवा पुरवित आहे.त्यासाठी श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल येथे अत्याधुनिक यंत्रसामुग्री व प्रशिक्षित डॉक्टराच्या सहाय्याने विविध रोगांवर उपचार केले जातात. त्यामुळे शिर्डी परिसरातील तसेच राज्यातील ग्रामीण भागातील रुग्णांची चांगल्याप्रकारे सोय झालेली आहे.

तसेच सामाजिक बांधीलकी म्हणून संस्थानने शिर्डी येथे इंग्लिश मिडीअम स्कूल, आय.टी.आय आणि कनिष्ठ महाविदयालय या शैक्षणिक संस्था अल्पशी फी घेऊन व श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर ही संस्था मुलींसाठी कोणत्याही प्रकारची फी न आकारता चालवीत आहे. त्यामुळे या परिसरातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाची चांगल्या प्रकारे सोय झालेली आहे. उपरोक्त शैक्षणिक संस्थामध्ये सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. विशेष म्हणजे, उपरोक्त सर्व शैक्षणिक संस्था या विनाअनुदानित तत्वावर सुरु असुन कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत शासनाकडून तसेच सेवाभावी संस्थाकडून न स्विकारता चालू आहे.

सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात (मागील ३ वर्षाचे) व्यवथापकीय निधी व त्यातून झालेला खर्च तसेच शैक्षणिक संकुल व रुग्णालये यावर झालेला खर्च खालीलप्रमाणे –

**(अ) व्यवस्थापन निधीमधून झालेला खर्च -**

| अ.नं. | वर्ष | स्थूल उत्पन्न | स्थूल उत्पन्नाचे १०% | लगतच्या पुढील वर्षात झालेला खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-२०१५ | ४७४८९४०४११/- | ४७४८९४०४१/- | ४०४८६७१४७/- | ८.५२५% |
| २ | २०१५-२०१६ | ४७०९१६९०६६/- | ४७०९१६९०६/- | ४३२४५२२५६/- | ९.१८३% |
| ३ | २०१६-२०१७ | ४७३९७९८३४२/- | ४७३९७९८३४/- | आर्थिक वर्ष २०१७-१८ सुरु आहे. | |

(स्थूल उत्पन्नाच्या १०% रक्कम ही लगतच्या पुढील वर्षात खर्च करण्यात येत असते. त्यामुळे सन २०१६-१७ ची रक्कम सन २०१७-१८ खर्च होणार आहे.)

**(ब) शैक्षणिक संकुलावर झालेला खर्च** ( रुपये कोटीमध्ये )

| अ क्र | आर्थिक वर्ष | कर्मचारी वेतन | कंत्राटी कर्मचारी | इतर अनुषंगीक खर्च | एकूण खर्च | फी व्दारे मिळणारे उत्पन्न | उत्पन्नापेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-२०१५ | ६.५२ | ०.३८ | १.७२ | ८.६२ | १.५३ | ७.०९ |
| २ | २०१५-२०१६ | ६.४७ | ०.५० | २.१७ | ९.१४ | १.६७ | ७.४७ |
| ३ | २०१६-२०१७ | ७.५५ | ०.६१ | २.९३ | ११.०९ | १.७७ | ९.३२ |

**(क) रुग्णालयांवर झालेला खर्च** ( रुपये कोटीमध्ये)

| अ क्र | आर्थिक वर्ष | कर्मचारी वेतन | कंत्राटी कर्मचारी | इतर अनुषंगीक खर्च | एकूण खर्च | फी व्दारे मिळणारे उत्पन्न | उत्पन्नापेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-२०१५ | ३२.७८ | ८.१९ | ३८.६१ | ७९.५८ | ६०.३१ | १९.२७ |
| २ | २०१५-२०१६ | ३५.२० | ९.१८ | ३०.३७ | ७४.७५ | ५०.५२ | २४.२३ |
| ३ | २०१६-२०१७ | ३५.३६ | ९.७९ | २७.४० | ७२.५५ | ४९.६६ | २२.८९ |

उपरोक्त अ+ब+क हे उपक्रम एकत्रित केल्यास व्यवस्थापकीय निधीचा खर्च १० टक्क्यांपेक्षा जास्त होणार आहे..

संस्थानने उपरोक्त शैक्षणिक संस्था व रुग्णालये इ. समाजाच्या प्रती एक बांधिलकी म्हणून विना-अनुदानित तत्वावर सुरु केलेले असुन ग्रामीण भागातील विदयार्थ्यांकडून अल्पशी फी घेऊन त्यांच्या शिक्षणा साठी संस्थान एक प्रकारे मदतच करीत आहे. तसेच विविध रुग्णांनाही अल्पशा दरात रुग्णसेवा पूर्वित असुन वेळेत उपचार होत असल्यामुळे रुग्णांना पूणे, मुंबई सारख्या महागडया शहरात जाण्याची आवश्यकता राहीलेली नाही. पर्यायाने वेळेत वैद्यकीय उपचार मिळत असून त्यांच्या खर्चातही बचत होत आहे.

परंतु, उपरोक्त सर्व (भक्तांसाठी, रुग्णांसाठी व विद्यार्थ्यासाठी इ.सर्व) उपक्रमांसाठी पुरविण्यात येणा-या सेवांकरीता संस्थानच्या उत्पन्नाचा मोठा भाग खर्च होत असून, तो अधिनियम-२००४ मधील कलम क्र.२२(२) या तरतुदीपेक्षा जास्त होत आहे.

त्यामुळे, रुग्णालये व शैक्षणिक संस्था हे संस्थानचे अंगीकृत उपक्रम असून, यासाठी संस्थानला विशेष स्वरुपाची देणगी मिळत आहे. त्यामुळे उपरोक्त दोन्ही उपक्रमांचा खर्च त्यामधून करण्यात येत असल्याने, रुग्णालये व शैक्षणिक संस्था यांच्यासाठी करण्यात आलेला खर्च व्यवस्थापकीय निधीचा विनियोग यामध्ये न दाखविता स्वंतत्ररित्या दाखविण्यात येत आहे. फक्त हे दोन उपक्रम वगळता, इतर कर्मचा-यांवरील खर्च व्यवस्थापन निधीमधून करण्यात येत आहे. तसेच यापुढेही संस्थानतर्फे प्रस्तावित उपक्रमही भक्ताभिमुख असल्यामुळे, त्यामध्ये उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असणार आहे. त्यामुळे त्या उपक्रमांवर होणा-या खर्चासाठी स्वंतत्र Earmarked Fund स्थापन करण्यास व त्या फंडामधून संस्थानचे सध्याचे व भविष्यकालीन विस्तारीत व नविन उपक्रमांचा खर्च करण्यास परवानगी मिळण्यासाठी व तशी कायद्यामध्ये सुधारणा होणेकामी सदरचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठविणेस मान्यता मिळण्यासाठी, मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिनियम- २००४ मधील तरतूदीन्वये व्यवस्थापकीय निधीच्या रकमेचा करण्यात येत असलेल्या विनियोगाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच याप्रमाणे कायद्यामध्ये सुधारणा होणेकामी सदरहू प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०७** **आर्थिक वर्ष सन २०१६-१७ चे विशेष अंतर्गत लेखापरिक्षणाचे बील अदा न करणेबाबत विधी व न्याय विभागाकडून प्राप्त मार्गदर्शनाबाबत, सन २०१७-१८ च्या अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती रद्द करणे व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्तीकरीता संस्थान दप्तरी उपलब्ध प्रस्ताव विधी व न्याय विभागास पाठविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये आर्थिक व्यवहारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यावर सक्षम अंतर्गत नियंत्रण राहण्याचे दृष्टिने तसेच आर्थिक व्यवहारांसंबधीत केंद्र व राज्यशासनाकडून विविध आर्थिक, आयकर, सेवाकर व्हॅट, GST इ.विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नवनविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर पडत असतो. आर्थिक व्यवहार विहीत वेळेत व अचुकतेने होण्याच्या दृष्टीने व झालेल्या चुकांची दुरुस्ती तात्काळ होऊन त्याप्रमाणे पुढील आर्थिक व्यवहार होण्याच्या दृष्टीने पुर्व लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांची विहीत पध्दतीने नेमणुक करण्यात येते. व अधिनियम २००४ कलम १७ (२) (ग) अन्वये राज्य शासनामार्फत वैधानिक लेखापरिक्षक यांची नियुक्ती करण्यात येऊन संस्थानच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवले जाते त्यास अनुसरुन आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन मे.एमएपीएसव्ही अॅन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, नासिक यांची मा.त्रिसदस्सीय व्य.स निर्णय क्र.३१०/ दि.१९.०५.२०१६ अन्वये न्युनतम फी वर रु.१,१४,०००/- नियुक्ती करण्यात आली होती. दि.०१.०४.२०१६ ते दि.३०.०६.२०१६ कालावधीचा लेखापरिक्षण अहवाल त्यांनी दि.०६.०९.२०१६ रोजी संस्थानला सादर केला त्याची दि.२२.१२.२०१६ रोजीचे मा.व्य.सचे सभेमध्ये नोंद घेण्यात आली आहे. व याच सभेमध्ये निर्णय क्र.९६६ मा.विश्वस्तांनी सभेत सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या मध्ये अ.क्र.९ अन्वये "सध्याच्या व्यवस्थापन समितीचे कार्यकालामध्ये दि.०१.०४.२०१६ पासुन विशेष अंतर्गत लेखापरिक्षण सुरु करणेत यावे "असा ठराव संमत झाला.

सदर ठरावास अनुसरुन संस्थानचे संकेत स्थळावर दि.९/०१/२०१७ ते दि.१४/०१/२०१७ या कालावधीत नामांकित लेखापरिक्षण संस्थाकडून फी सह माहिती मागविण्यात आली होती. विहीत वेळेत प्राप्त झालेली सिलबंद पाकिटे दि.१७.०२.२०१७ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उघडण्यात येऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला व पैकी निम्नतम दर देणा-या मे.ए.एन.जे.अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणेयांना कार्यादेश देण्याची शिफारस करण्यात आली होती.

मा.व्य.स निर्णय क्र. १३६(६) अन्वये "सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना अशी चर्चा झाली की, आर्थिक वर्ष २०१६-१७ चे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेण्याचा मुळ उद्देश लेखाविषयक त्रुटी/ अनियमितता निदर्शनास आणून, वैधानिक लेखापरिक्षणात येणाऱ्या आक्षेपांचे प्रमाण कमी करणे हा आहे. तसेच वैधानिक लेखापरिक्षण अहवाल विधानमंडळ या सर्वोच्च सभागृहापुढे सादर करण्यात येतो,सदर कामकाज इतर चार्टर्ड अकौटंटस संस्थेमार्फत चालू आहे. तथापी संपुर्ण आर्थिक वर्षातील व्यवहारांचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरीता उपरोक्त नुमूद केलेल्या निम्नतम दरांचा विचार न करता आर्थिक व्यवहारांची संख्या, कामाचा व्याप, आवश्यक तज्ञ मनुष्यबळ वसंस्थानमध्येविकासीकरणाच्या टप्प्यात असलेल्या ERP संगणक प्रणालीतील आर्थिक व्यवहार तपासणी याकरीता स्वतः सनदी लेखापाल श्री. सुनिल अभ्यंकर यांनी मार्गदर्शन करण्याचीदर्शविलेली तयारी, याबाबींचा विचार करता, मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांचे नाव प्रस्तावित केले गेले. त्यांनी या कामाकरीता नमुद केलेल्या रु.१२,००,०००/- फी मध्ये ५०% कपात करुन संपुर्ण संस्थानचे सर्व विभाग, रुग्णालय इ. सह सर्व आर्थिक व्यवहारांचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरीता वार्षिक रु.६,००,०००/- अधिक त्यावर लागु असलेला सेवाकर व फक्त शिर्डी येथे लेखापरिक्षण कालावधीत संस्थानचे व्दारावती भक्तनिवासस्थान येथे निवास, श्री साईप्रसादालय येथे भोजन ही विनामुल्य व्यवस्था या अटींवर सदरहू कामकाज करणेस तयारी दर्शविली. याकरीता मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता विशेष अंतर्गत लेखापरिक्षण(Special Internal Audit) करण्याकरीताविशेष अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात यावी "असे ठरले.

सदर निर्णयास अनुसरुन मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची दि.०४.०३.२०१७ रोजीचे कार्यादेशाव्दारे नियुक्ती करण्यात आली त्यांनी तत्काळ विशेष लेखापरिक्षण कामकाजास सुरुवात करुन दि. ०२ जून,२०१७ रोजी विशेष लेखापरिक्षण अहवाल संस्थानला सादर केला. त्या सोबत बिल क्र. ०२११-A/ २०१६-१७ रु.६,००,०००/- सादर केले. सदर बिल अदा करण्याची कार्यवाही चालू असतानाच, दि.२७.०६.२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समिती सदस्या (शिर्डी नगरपंचायत नगराध्यक्षा) सौ.योगिता अभय शेळके पाटील, यांनी "सदर नियुक्तीबाबत इतरविविध लेखापरिक्षण संस्थानी निम्नतम दर दिलेले असतानाही मे. सुनिल अभ्यंकर ॲन्ड असोसिएटस चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांनाच का काम दिले गेले याचे आकलन होत नाही. निम्नतमदरापेक्षा जास्त दरपत्रक असणा-या एखाद्या संस्थेस अशा प्रकारचे काम देण्यास माझा विरोध आहे व राहील याची नोंद घ्यावी. "असे पत्र दिले होते.

यावर दि.२९.०६.२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष लेखापरिक्षक नियुक्तीस विधी व न्याय विभाग, मा.प्रधान सचिवयांचे मार्गदर्शन घ्यावे असे सुचविले. त्यास अनुसरुन दि.२६.०७.२०१७ मे. सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांचे आर्थिक वर्ष २०१६-१७ कालावधीचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षणाचे बील आदा करणेबाबत व पुढील आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती बाबत मार्गदर्शन होणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे कडे सादर करण्यात आला होता.

मा.विधी व न्याय विभाग यांचेकडून दि०८.११.२०१७ रोजी सासंवि-२०१७ /१२९४/ प्र.क्र. १३४ / का.१६/ दि.०८.११.२०१७ पत्र प्राप्त झाले आहे. ते खालीलप्रमाणेः-

१. श्री साईबाबा संस्थानच्या सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी त्रिसदस्सीय व्यवस्थापन समितीने रु.१,१४,०००/- इतक्या फीच्या दरावर अन्य अंतर्गत लेखापरिक्षक संस्थेची नियुक्ती केली होती. सदर संस्थेचे काम चालु असतानाच पुन्हायाच काळासाठी व्यवस्थापन समितीने मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौ.पुणे या संस्थेची रु.६,००,०००/- इतक्या फी दरावर दि.०४.०३.२०१७ रोजी नियुक्ती केली म्हणजेच आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी दोन स्वत्रंत्र संस्थांची समांतरपणे नियुक्ती करण्यात आली आहे.

२. त्रिसदस्सीय व्यवस्थापन समितीने नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक संस्थेच्या कामावर/ क्षमतेबाबत व्यवस्थापन समितीला अविश्वास वाटत असल्यास सदर संस्थेची नियुक्ती रद्द न करता समांतर पध्दतीने निम्नतम दर सादर केलेल्या लेखापरिक्षक संस्थेला डावलून निम्नतम दरापेक्षा कित्येक पटीने अधिक दर दिलेलया मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौ., पुणे या संस्थेची पुनश्च अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

३. एकाच वित्तीय वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी दोन स्वतंत्र अंतर्गत लेखापरिक्षक संस्था नियुक्त करुन, त्यांचे देयक अदा करण्याचे कोणतेही प्रयोजन दिसुन येत नाही. निम्नतम दर सादर करणा-या अन्य

लेखापरिक्षक संस्थांना डावलून रु.६,००,०००/- +सेवाकर + राहण्याची व भोजनाची मोफत व्यवस्था, असे मानधन निश्चीत करुन मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौ.पुणे या संस्थेला नियुक्त केल्याने श्री साईबाबा संस्थानवर अनावश्यकपणे आर्थिक भार येऊन संस्थानच्या निधीचा अपव्यय होऊन अनियमितता होणार असल्याने मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौ. पुणे या संस्थेचे देयक अदा करता येणार नाही.

४. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निर्देश देईल. अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील, अशी तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुद विचारात घेता श्री साईबाबा संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीप्रमाणेच अंतर्गत लेखा परिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती शासन मान्यतेनेच करणे आवश्यक आहे. सबब, याप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात यावी.

अशा प्रकारे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण बील अदा करण्याबाबत विधी व न्याय विभागाकडून दि.८.११.२०१७ रोजी आलेल्या पत्रानुसारः-

१. आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता विशेष लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आलेल्या मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौ. पुणे यांचे बील रु.६,००,०००/- अदा न करणेबाबत.

२. आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता त्यांना देण्यात आलेला अंतर्गत लेखापरिक्षण आदेश रद्द करणेबाबत, व

३. वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक कार्यपध्दतीप्रमाणेच आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती होणेकामी उत्सुक असलेल्या लेखापरिक्षकांनी आज अखेर पाठविलेले प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे अंतर्गत लेखपरिक्षक नियुक्तीकरीता पाठविणेबाबत निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१०२९** **उपरोक्त प्रस्तावावर खालीप्रमाणे साधक बाधक चर्चा झाली.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही राज्यातील सर्वात मोठी विश्वस्तव्यवस्था आहे. त्यामुळे याठिकाणी अवलंबविण्यात येणारी कार्यपध्दती इतरही धार्मिक विश्वस्तव्यवस्था वापरीत असतात.**

**संस्थानच्या कार्यपध्दतीमध्ये असलेले दोष वेळीच निदर्शनास आणून त्याचे निराकरण करण्यासाठी प्रभावी अंतर्गत लेखापरिक्षण हाच एकमेव मार्ग आहे.**

**समितीने विशेष अंतर्गत लेखापरिक्षक सन २०१६-१७ व अंतर्गत लेखापरिक्षक सन २०१७-१८ म्हणून मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौ., पुणे यांची नियुक्ती न्युनतम दरधारक नसतानाही केली आहे. त्याचे कारण न्युनतम दरधारकाचे दर व संस्थानच्या कामाचे व्यापानुसार अंतर्गत लेखापरिक्षणासाठी लागणारे प्रशिक्षीत अनुभवी लेखापरिक्षक व मनुष्यदिन यांचा विचार करता, गुणवत्तापुर्ण लेखापरिक्षण निम्नतम दरधारकाने सादर केलेल्या दरामध्ये होणे शक्य नाही, असे समितीचे मत झाले. त्यामुळे मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौ., पुणे यांची नियुक्ती त्यांनी स्वत: लेखापरिक्षणास येण्याचे समितीसमोर मान्य केल्यामुळे केलेली आहे.**

**मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौ., पुणे यांनी सन २०१६-१७ या वर्षाचे केलेले विशेष अंतर्गत लेखापरिक्षणाचा अहवाल, कामाची व्याप्ती (Scope of work) व त्या तुलनेने त्यांना देय असलेले मानधन लेखापरिक्षणाचे तत्व व नियमानुसार वाजवी आहे काय, याबाबत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक श्री.एम.एम.चितळे यांचे अभिप्राय घेऊन, सदरहू प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच शासनाचे आदेशानुसार सन २०१७-१८ या वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूकीसाठी संस्थानकडे यापुर्वी प्राप्त सर्व प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०८** **मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद यांचे विरुध्द व कंपनीचे संचालकांविरुध्द सिव्हील दावा किंवा लवाद दाखल करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९४५ अन्वये संस्थानचे नियोजीत साईगार्डन प्रकल्पांतर्गत सिव्हील वर्क कामाचे ठेकेदार मे. के.आर.आर. इंन्फ्रा प्रा. लि. हैद्राबाद यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसुल करणेकामी लवाद दाखल करणेत यावे असे ठरले. प्रस्तुत ठरावानुसार ॲडव्होकेट श्री

एस.डी.कुलकर्णी यांना मे. के.आर.आर. इंन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि यांचेशी झालेला पत्रव्यवहार व करारनामा व इतर कागदपत्र दाखवले त्यावर ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांनी दि १३/०२/२०१५ रोजीचे पत्राने लेखी कायदेशीर मत खालील प्रमाणे दिले आहे.

मी यापुर्वी अनेकवेळा अरबिट्रेशन क्लॉज कोणत्याही करारात ठेवू नका असे संस्थानला व संस्थानच्या अधिका-यांना सांगीतले आहे, माझ्या मते अरबिट्रेशन क्लॉजचा करारभंग करणा-या कॉन्ट्रॅक्टरला फायदा होते. अरबिट्रेटर पुढे चौकशी चालू असतांना मोठे प्रमाणात खर्च होतो अरबिट्रेटरची फी पण भरपूर असते, अरबिट्रेशन क्लॉज मुळे विनाकारण त्रास होते, अरबिट्रेटरचे निर्णयानंतर सुध्दा सिव्हील कोर्टात रेफरन्स अरबिट्रेशन क्लॉज नुसार होवू शकतो.

माझे स्पष्ट मत आहे की, अरबिट्रेशन क्लॉज कोणत्याही करारात ठेवणे संस्थानच्या हिताचे नाही. वादाचे निराकरण संस्थानचे मुख्यकार्यालय येथे आहे, त्याकोर्टात होणे जास्त सोईचे व हिताचे आहे. प्रस्तुतचे प्रकरणात संबंधीत ठेकेदार आता बराच कालावधी लोटलेनंतर अरबिट्रेटरची मागणी करत आहे. ठेकेदाराची मागणी क्लॉज नं. १२.४ नुसार आता मुदतीत नाही. मी के.आर.आर. यांचे दि ०५/०१/२०१५ चे पत्र पाहिले त्या पत्रात ज्या गोष्टी त्यांनी कथीत केल्या आहेत त्यावरुन त्यांना संबंधीत प्रकरण प्रलंबीत करावयाचे आहे. संबंधीत ठेकेदारांनी ज्या तक्रारी खुप मोठ्या विलंबानंतर केलेल्या आहेत. त्या मुदतीत नाही म्हणून के.आर.आर. यांना स्पष्ट नोटीस देवून सिव्हील कोर्टात जाणे योग्य होईल, अर्थात संबंधीत ठेकेदार अरबिट्रेशन क्लॉजचा गैरवापर करुन प्रकरण प्रलंबीत करणेचा प्रयत्न करील संबंधीत तारीख ०५/०१/२०१५ चे पत्र अत्यंत चानाक्षपणे ठेकेदाराने दिले आहे. त्यास सुस्पष्ट उत्तर संस्थानने द्यावे.

मी संबंधीत खुलासा माझे समोर आलेल्या कागदपत्रानुसार तसेच झालेल्या कराराचे अवलोकन करुन दिलेला आहे. यापुर्वी नोटीसा पण संस्थानमार्फत संबंधीतांना पाठविलेल्या आहेत."

ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांचे लेखी मार्गदर्शनावर दि १०/१२/२०१५ रोजी फेर टिपणी सादर करुन मे. के.आर.आर. यांचे विरुध्द लवाद दाखल न करता सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेस मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.क्र. एसएसएस वशी-विधी/५७२४/२०१५ दि.१५/०१/२०१६ अन्वये ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांना दावा तयार करुन देणेबाबत विनंती केली होती त्यांनी दि. २२/०४/२०१६ रोजीचे पत्राने दावा तयार करुन दिला आहे. ॲडव्होकेट श्री एस.डी. कुलकर्णी यांनी दिलेल्या पत्रात खालील प्रमाणे नमुद केले आहे.

" प्रस्तुतचे दाव्यात सर्व संचालकांना सामील करणे आवश्यक आहे, संबंधीत कंपनी कशा आवस्थेत आहे, त्यांचेकडे काय प्रॉपर्टी आहे, याची माहिती मिळत नाही. मुळ करार ३०,९५,२७,६६६/- या रक्कमेचा आहे आर्किटेक्ट माथून कापरे या कंपनीने आरबीट्रेशन क्लॉज नुसार व त्यांना असलेल्या अधिकारानुसार रु. २,११,०५,७४८/- एवढी रक्कम नुकसान भरपाईची दाखवीलेली आहे. करारानुसार व परिस्थीती नुसार रु. ०८,७१,२५,७४८/- एवढी रक्कम दाव्यात मागीतलेली आहे. कायद्यानुसार जास्तीत जास्त स्टॅम्प रु. ३,००,०००/- चा दाव्या लागतो, दाव्याचे कामी स्टॅम्पची रक्कम रु. ३,००,०००/- तसेच एकुण ९ प्रतिवादी यांचे प्रोसेसचा खर्च, टायपींग, झेरॉक्स हा वेगळा असेल या केसचे कामी शेड्युल प्रमाणे वकील फी सुमारे रु. ५,००,०००/- चे आसपास होते तरी संबंधीत नोट प्रमाणे पुढील कारवाई करवाई व्हावी" अशी विनंती ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांनी केली आहे

**तरी खालील मुद्यावर निर्णय होणेसाठी सादर.**

१) मे. के.आर.आर. इंन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे एकुण ९ लोकां विरुध्द लवाद दाखल करणे ऐवजी मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात सिव्हील दावा दाखल करणेस मान्यता.

२) दावा दाखल करणेकामी मा. कोर्टात जमा करावयाची स्टॅम्प ड्युटीची रक्कम रु. ३,००,०००/- चे खर्चास मान्यता.

३) सदर दाव्यास प्रोसेस फी रक्कम रुपये १०,०००/- रोखीने खर्च करणेस मान्यता.

४) सदर दाव्याचे कामकाज पहाणे कामी ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांची वकील फी सुमारे रु.५,००,०००/- चे आसपास अदा करणेस मान्यता.

**निर्णय क्र.१०३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद यांचे व कंपनीचे संचालकांविरुध्द मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात संस्थान वकिलामार्फत सिव्हील दावा दाखल करणेत यावा, असे ठरले. तसेच सदर दाव्याची प्रोसेस फी रु.१०,०००/- व स्टॅम्प ड्युटीसाठी रु.३,००,०००/- त्याचप्रमाणे वकील फी साठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.विधी अधिकारी)

---

**विषय नं.०९** **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष महोदय, यांनी दि.१० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे राऊंडमध्ये दिलेल्या सुचनांनुसार सबंधीत विभागांना निर्देश देणेत आलेले आहेत. सदर परिपत्रकामध्ये अ.क्र.१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्रीसाईबाबां विषयी स्वतंत्र अध्यासन (Chair) तयार करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत.

मा.अध्यक्ष महोदय, यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात, श्री साईबाबां विषयी स्वतंत्र अध्यासन (Chair) सुरु करणेबाबत इकडील कार्यालयाकडील दि.०१.०१.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसर मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना दि.०१ फेब्रुवारी, २०१७, दि.०७ फेब्रुवारी, २०१७ व दि.०३ जुलै, २०१७ रोजी पत्र देऊन माहिती व अभिप्राय मागविण्यात आलेला होता.

त्यानुसार प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचेकडील संदर्भ क्रमांक– एटी/ अध्यासन/ १२५७ दि.२७.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्याकरिता संस्थेकडून १ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होण्याकरिता तत्कालीन कुलगुरु डॉ.अशोक कोळस्कर यांच्या कार्यकाळात प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव संस्थानमार्फत शासनास सादर करण्यात आला होता. तदनंतर शासनाने याबाबत अधिकची माहिती या विभागाकडे मागितली असता वेळोवेळी सदर माहिती शासनास सादर करण्यात आलेली आहे. परंतू अद्यापी संस्थेमार्फत तसेच शासनामार्फत कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.१८४/ २६०५१० दि.२६ मे, २०१० अन्वये विद्यापीठामध्ये एखादे नवीन अध्यासन निर्माण करावयाचे झाल्यास सदर अध्यासनाच्या खर्चापोटी पुरेसे व्याज उपलब्ध होईल एवढा म्हणजे किमान १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. शासनाकडून अथवा आपल्या संस्थानकडून श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्याकरिता रु.१ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करता येणे शक्य आहे" असे कळविलेले आहे.

सदरचा प्रस्ताव हा आर्थिक स्वरुपाचा व धोरणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन समितीचीचे सभेत सादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ अन्वये "श्री साईबाबांच्या समाधी शताब्दीचे औचित्य साधून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे श्री साईबाबा अध्यासन सुरु करावे, असे समितीचे एकमत झाले. परंतू त्यासाठी रु.१ कोटी मात्र रक्कम निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे डिपॉझीट स्वरुपात जमा करावयाची आहे. सदर डिपॉझीट रिफंडेबल आहे किंवा कसे, याबाबत माहिती घेऊन, तसा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा" असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ नुसार इकडील जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/ आस्था/३६६३/२०१७ दि.०७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना पत्र देऊन श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेकामी रु.१ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन दिल्यास सदरचा निधी हा रिफंडेबल राहील अगर कसे याबाबत विचारणा करण्यात आलेली होती.

त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचेकडील संदर्भ क्रमांक एटी/अध्यासन/१६८३ दि.०८.११.२०१७ रोजीचे पत्रान्वये "सदर जमा झालेल्या डिपॉझिटच्या व्याजावर अध्यासन निर्माण करुन अध्यासनाचा खर्च करावयाचा असल्याने सदर डिपॉझिट रिफंडेबल नाही, याची नोंद घेण्यात यावी" असे कळविलेले आहे.

तरी उपरोक्त बाबींचे अवलोकन होऊन, पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेसाठी भरावयाची रु.१ करोड डिपॉझिट रक्कम रिफंडेबल नाही, याची नोंद घेण्यात आली व शासन मान्यतेने सदरहू रक्कम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यापीठामध्ये डिपॉझीट म्हणून भरुन श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेसाठी पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात महारक्तदान शिबीरासाठी विभागामार्फत करावयाची कार्यवाही व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र. –** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २०/०८/२०१७ रोजीचे निर्णय क्र. ६८२ परिशिष्ट- अ **प्रास्ताविक-** महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर,२०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपूर्ण जगभरात विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्यादवारे साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची शंभरावी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरी न करता शंभराव्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असुन हे संपुर्ण वर्ष उत्सावी वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे. हा उत्सव फक्त संस्थानपुरता मर्यादित नसुन जगभरातल्या समस्त साईभक्तांचा उत्सव आहे. प्रत्येक साईभक्ताच्या उपास्य दैवताच्या स्मरणाची ही महापर्वणी आहे. आपण सर्व साईच्या १०० व्या पुण्यतिथीचे साक्षीदारच नव्हे तर ती साजरी करणारे त्यांचे अनुयायी आहेत. हे आपणा सर्वांचे महदभाग्य आहे.

श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षे दि.०१ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहुन श्री साईबाबा महासमाधीशताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल.या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

दि.३०/१२/२०१७ रोजी वार शनिवार श्री साईनाथ रक्तपेढीमार्फत साईनगर मैदान येथे सकाळी ८ ते सायंकाळी ८ वाजता भव्य महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. शिबीरानिमीत्त वेगवेगळया विभागांनी खालील दर्शविलेल्या कामांची पुर्तता करण्यात यावी.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १४/११/२०१७ रोजी विषय नं. १००५ निर्णय क्र. ९३८

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** दि. ३०/१२/२०१७ रोजी आयोजीत होणा-या महारक्तदान शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.नं. | विभाग | विभागांमार्फत करावयाचे कामाचा तपशिल | विभागांमार्फत करणेत येणारा अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | १) रक्तदान शिबीरासाठी मंडप साधारण २६००० स्वे. फुट, २) रक्तदानासाठी प्रत्येक रक्तपेढीसाठी क्युबिकल पार्टिशियन सहित साधारण ३० नग, साईज१२" X १५", तसेच रक्तदात्यांसाठी वेटिंग रुम करुन मिळाव्यात. ३) ब्लड डोनेशन टेबल-६० नग ३ फुट उंचीचे व त्याच साईजच्या गादया ६० नग, ४) ऑफिस टेबल साधारण ५० नग. ५) खुर्च्या ५०० , ६) स्टॅंड फॅन -५० नग ७) वॉश बेसीन -३० नग ८) विदयुतचे पॉवर पॉईंट -५० ९) लाईटस -५० १०) बेडशीटस ७५ नग ११) प्रत्येक रक्तपेढीच्या नावासहीत अंदाजे एकुण ३० प्लेक्स बोर्ड साधारण साईज २"X ३". (रक्तपेढी निश्चीत झालेनंतर यादी देणेत येईल.) १२) स्वागत कमानी -२ १३) शिबीराच्या ठिकाणी ३ प्लेक्स बोर्ड साईज ११"X ६" १४) टी-पॉय -३० नग १५) संपुर्ण मंडपामध्ये कारपेट व्यवस्था करणेत यावी. | १०,००,०००/- |
| ०२ | विद्युत विभाग | शिबीर स्थळी मंडपामध्ये आवश्यकतेनुसार इलेक्ट्रीक पॉईंट व्यवस्था करणेत यावी. | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | मेकॅनिकल विभाग | शिबीर स्थळी रक्तदाते व कर्मचा-यांसाठी मोफत आरो पाण्याची व्यवस्था करणेत यावी.तसेच १०० आरो जार (२० लिटर) ची व्यवस्था करावी. | ५,०००/- |
| ०४ | जनसंपर्क कार्यालय, श्री साईबाबा हॉस्पीटल/ श्री साईनाथ रक्तपेढी श्री साईनाथ रुग्णालय | वृत्तपत्र व वृत्तवाहिणीवर रक्तदान शिबीराची प्रसिदधी करुन रक्तदात्यांना सहभागी होणेकामी आवाहन करणे. तसेच रक्तदानशिबीर संयोजक, शिर्डी व परिसरातील महाविदयालये, साईदर्शनासाठी येणारी साईपालखी मंडळे यांना आवाहन पत्र देणे. तसेच रक्तदात्यांना रक्तदान केलेनंतर अंदाजे ३००० सर्टिफिकेट तसेच शिबीराच्या माहितीचे पॉम्पलेट अंदाजे साधारण १०,००० नग छापणेची व्यवस्था करणे. | ४०,०००/- |
| ०५ | कॅंटीन विभाग | शिबीरामध्ये रक्तदान करणा-या रक्तदात्यांसाठी व कर्मचा-यांसाठी मोफत आवश्यकतेनुसार दिवसभरात वेळोवेळी १००० कप चहा व १००० कप कॉफी व ३००० बिस्कीट पुडे व्यवस्था करणेत यावी. | २५,०००/- |
| ०६ | ध्वनीक्षेपण विभाग | शिबीर स्थळी ध्वनीक्षेपण विभागामार्फत साऊंड सिस्टीम सकाळी ८ ते सायं. ८ वा. या वेळेत करणेत यावी. | २५,०००/- |
| ०७ | सीसीटीव्ही विभाग | शिबीर स्थळी सीसीटीव्ही विभागाकडुन सकाळी ८ ते सायं. ८ वा. या वेळेत चित्रीकरणसाठी फोटोग्राफर व व्हिडीओ शुटिंग व्यवस्था करणेत यावी. | ३०,०००/- |
| ०८ | वाहन विभाग | मागणी प्रमाणे रक्तदान शिबीरात सहभागी होणा-या रक्तपेढीच्या प्रतिनिधींना ने-आण करणेकामी सकाळी ८ ते सायं. ८ वा. यावेळेत १ बस व १ वातानुकुलीत चार चाकी गाडीची व्यवस्था करणेत यावी. | - |
| ०९ | साईआश्रम –१/ साई भक्तनिवासस्थान | शिबीराकामी येणा-या २५ रक्तपेढयांचे प्रत्येकी १ डॉक्टर व इतर ४ ते ५ कर्मचारी अशी एकुण १५० लोकांची रहाण्याची व्यवस्था साईआश्रम – १ व साईभक्तनिवासस्थान (५०० रुम) या दोन्ही ठिकाणी आवश्यकतेनुसार विभागुन १५ ए.सी रुम्स व ४० नॉन एसी रुमची मोफत व्यवस्था करणेत यावी. | २०,०००/- |
| १० | श्री साईप्रसादालय | रक्तदान शिबीरात सहभागी होणा-या २५ रक्तपेढयांच्या १५० प्रतिनिधींची जेवणाची व नाष्टाची व्यवस्था मोफत साईप्रसादालय येथील व्हि.आय.पी. कक्षात करणेत यावी. | १२,०००/- |
| ११ | जनसंपर्क कार्यालय | रक्तदान शिबीरात सहभागी होणा-या २५ रक्तपेढयांच्या १५० लोकांची मोफत व्हि.आय.पी. दर्शनाची व्यवस्था करणेत यावी. | ३,०००/- |
| १२ | कामगार विभाग | १) संस्थान मधील इतर विभागांचे अधिक्षक / वरिष्ठ लिपिक यांना सुपरवायझर म्हणुन सकाळी ०७ ते ०३ व दुपारी १२ ते ०८ प्रत्येक शिफ्टसाठी १० कर्मचारी प्रमाणे एकुण २० कर्मचारी उपलब्ध करण्यात यावेत.<br>२) सकाळी ६ ते २ व दुपारी २ ते १० दोन्ही शिप्टसाठी साधारण ६ सुरक्षारक्षक व नाईट शिप्टसाठी २ असे एकुण ८ सुरक्षारक्षक तीन शिप्टसाठी उपलब्ध करणेत यावेत.<br>३) सकाळी ६ ते २ व दुपारी २ ते १० या शिप्टसाठी अंदाजे २५ एका शिप्टसाठी असे एकुण ५० आयटीआय विदयार्थी व ६ सुपरवायजर शिक्षक उपलब्ध करणेत यावेत.<br>४) सकाळी ६ ते २, व दुपारी २ ते १० या शिप्टसाठी अंदाजे २५ एका शिप्टसाठी असे एकुण ५० साईसेवक उपलब्ध करणेत यावेत.<br>५) सकाळी ७ ते ३, व दुपारी १२ ते ०८ या शिप्टसाठी अंदाजे | ३०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १० एका शिफ्टसाठी असे एकुण २० कुशल परिचारक/ परिचारीका तथा अकुशल आया/ वार्डबॉय उपलब्ध करणेत यावेत. | |
| १३ | मध्यवर्ती औषध भांडार | शिबीरासाठी लागणारे औषधे, गोळया, एनर्जी ड्रिंक व ग्लुकोज डी साधारण (२५०० ते ३०००) मध्यवर्ती औषध भांडार यांचेकडुन उपलब्ध करणेत यावेत. | ७०,०००/- |
| १४ | बगीचा विभाग | शिबीरासाठी बगीचा विभागाकडुन ६० कुंडया व २० बुके तसेच डेकोरेशनसाठी फुलसजावट करणेत यावी. | ८,०००/- |
| १५ | मंदीर विभाग | शिबीराच्या उदघाटनप्रसंगी सकाळी ०८.०० वाजता पुजारी, पुजा साहित्यासह उपलब्ध करावेत. | ३,०००/- |
| १६ | प्रकाशने विभाग | शिबीरासाठी रक्तदात्यांना देणेसाठी १ दैनंदिनी डायरी (सन २०१८ दैनंदिनी प्रति नग रु. ८६/-) साधारण ३००० नगची मोफत आपले विभागाकडुन पुरविण्यात यावे. | २,५८,०००/- |
| १७ | आय.टी.विभाग | सर्व साईप्रतिनिधी मंदीर यांना शिबीराचे दि३०/१२/२०१७ रोजीच्या रक्तदान शिबीराबाबतचे आवाहन पत्र पाठविणे. तसेच २९ डिसेंबर या दिवशी साईआश्रम -१ येथील रुम ब्लॉक करणेत याव्यात. | - |
| १८ | उदीप्रसाद विभाग | शिबीरस्थळी रक्तदात्यांना तसेच शिबीरात सहभागी होणा-या रक्तपेढयांच्या डॉक्टर्स व कर्मचा-यांना प्रसाद म्हणुन उदीप्रसाद पाकिट साधारण ३००० पॅकेटची व्यवस्था करणेत यावी. | - |
| १९ | श्री साईनाथ रुग्णालय | शिबीरासाठी ऐनवेळी लागणा-या अनुषंगीक किरकोळ खर्चास मान्यता मिळावी. | २१,०००/- |
| | | **एकुण खर्च** | **१५,५०,०००/-** |

तरी वर नमुद केलेल्या एकुण रक्कम रुपये १५,५०,०००/- पैकी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १४/११/२०१७ रोजी विषय नं.१००५ निर्णय क्र. ९३८ अन्वये अ.क्र.०७ नुसार मंडप व इतर व्यवस्था (बांधकाम विभाग) करणेकामी अंदाजे रु. १०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती. सदर खर्च वगळता रु. ५,५०,०००/- मात्र इतके वाढीव खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१०३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात महारक्तदान शिबीराचे आयोजनासाठी मंजुर रकमेपेक्षा अतिरिक्त येणाऱ्या अंदाजे रु.५,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतची निविदा प्रक्रिया उपसमितीच्या सभेचे मान्यतेने अंतीम करणेत येऊन, संबंधीतांनाकार्यादेश देण्यात यावा व या प्रक्रियेस व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच जास्तीत जास्त रक्तदात्यांना या महारक्तदान शिबीराची माहिती मिळावी, याकरीता विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी. त्यासाठी दर्शन रांगेमध्ये या शिबीराच्या माहितीचे फलक वाढवावेत व श्रींचे लाईव्ह दर्शन दिसणाऱ्या टी.व्ही.वर या शिबीराच्या जाहिरातीची पट्टी प्रसिध्द करणेत यावी तसेच शिर्डी आकाशवाणी केंद्र यावरही माहिती प्रसिध्द करणेत यावी, अशा सुचना करणेत आल्या. या क्षेत्रातील तज्ञ व समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी महारक्तदान शिबीरासाठी खालील रक्तपेढयांची निवड केली.**

| अ.नं. | रक्तपेढीचे नाव | अ.नं. | रक्तपेढीचे नाव |
|---|---|---|---|
| १ | जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर | १६ | एम.एस. रिजनल हॉस्पिटल रक्तपेढी, सुपर स्पेशालिटी, शालिमार, नाशिक |
| २ | जिल्हा रुग्णालय नाशिक रक्तपेढी, नाशिक | १७ | हिंदुस्तान एरोनॅटिक्स लि. रक्तपेढी, निफाड, नाशिक |
| ३ | दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद | १८ | नाशिक मिलीटरी रक्तपेढी, नाशिक |
| ४ | जनकल्याण रक्तपेढी, जालना | १९ | पुना सिरॉलॉजीकल इन्स्टीटयुट रक्तपेढी, पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जनकल्याण रक्तपेढी, पुणे | २० | सहयाद्री हॉस्पिटल रक्तपेढी, पुणे |
| ६ | आनंदरुषीजी रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर | २१ | जनकल्याण रक्तपेढी, नाशिक |
| ७ | अर्पण रक्तपेढी, संगमनेर | २२ | केईएम हॉस्पिटल रक्तपेढी, मुंबई |
| ८ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट रक्तपेढी, लोणी | २३ | सेंट जॉर्ज हॉस्पिटल ॲण्ड सिजरल रक्तपेढी, मुंबई |
| ९ | विखे पाटील मेडीकल फाऊंडेशन रक्तपेढी, अहमदनगर | २४ | आर.एन. कुपर म्युनिसीपल जनरल हॉस्पिटल रक्तपेढी, मुंबई |
| १० | रोटरी ब्लड बँक, राहुरी | २५ | सर जे.जे. ग्रुप हॉस्पिटल रक्तपेढी, भायखळा, मुंबई |
| ११ | संजीवनी रक्तपेढी, कोपरगाव | २६ | एटीएमजी म्युनिसीपल हॉस्पिटल रक्तपेढी, सायन |
| १२ | ससुन हॉस्पिटल रक्तपेढी, पुणे | २७ | टाटा मेमोरीयल हॉस्पिटल रक्तपेढी, मुंबई |
| १३ | केईएम हॉस्पिटल रक्तपेढी, पुणे | २८ | के.बी. भाभा म्युनिसीपल जनरल हॉस्पिटल रक्तपेढी, मुंबई |
| १४ | एमजीएम हॉस्पिटल रक्तपेढी, औरंगाबाद | २९ | मीनाताई ठाकरे (प्रबोधन) रक्तपेढी, मुंबई |
| १५ | वानवडी आर्मस फोर्स मेडीकल कॉलेज रक्तपेढी, पुणे | | |

**उपरोक्त रक्तपेढयांना महारक्तदान शिबीरासाठी आमंत्रित करणेत यावे. यामधील काही रक्तपेढयांनी या शिबीरामध्ये सहभागी होण्यास असमर्थता दर्शविल्यास त्यांचे ऐवजी प्रशासकीय स्तरावरुन महाराष्ट्रातील इतर रक्तपेढयांना आमंत्रित करणेत यावे व ज्या रक्तपेढया शिबीरास उपस्थित राहतील त्यांना, संख्येनुसार रक्त संकलनासाठी २ ते ४ बेडस् उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच शिबीराच्या ठिकाणी शासनाकडील Organ Donation साठीचे विहीत नमुने उपलब्ध करुन देण्यात यावे व जे रक्तदाते सदरहू फार्म भरुन देतील, त्यांचे संकलन करुन, शासनाच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले व त्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चास, त्याचप्रमाणे या शिबीराचे प्रसंगी ऐनवेळी येणाऱ्या अनुषंगीकखर्चासही मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.११** **साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार श्री.संदिप शिक्रे ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत सादरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) –पोटकलम (२) खंड (ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्यालीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम (१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम (१) खंड (झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय : दिनांक २७/०३/२०१७ निर्णय क्र.२५८

दिनांक २५/०९/२०१७ निर्णय क्र.८३१(०५)

**प्रस्तावना**: श्री साईबाबांचे समाधीचे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांना विरंगुळा मिळणेबरोबरच श्री साईबाबांचे जीवन, त्यांचचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबत माहीती देणेचे दृष्टीने संस्थाननमार्फत मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं. १९८,१९९,२०० व २०१ चे जागेत साई नॉलेज पार्क अंतर्गत तारांगण, वॅक्स म्युझियमसह साईसृष्टी प्रकल्प प्रस्तावीत आहे. सदर या प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांची नेमणूक करणेसाठी इकडील जा.क्र.३६८३/ २०१७ दि.०९/१०/२०१७ रोजीचे पत्राने त्यांना Letter of Intent (LOI) देणेत आले असुन सल्लागार यांना प्रकल्पातचे सादरीकरण करणेसाठी दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेपुढे बोलाविण्यात आले होते. मात्र वेळेअभावी सादरीकरण होवू शकले नाही. सल्लागार यांनी दि.२४/१०/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे पाठविलेले सादरीकरण मा.व्यवस्थापन समितीचे सर्व सन्मा्ननीय सदस्यांना इकडील जा.क्र.३९९६/ २०१७ दि.०१/११/२०१७ अन्वये पाठविण्यात आले आहे.

**प्रस्ताव**: तरी सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांचेमार्फत साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सादरीकरण पाहून त्यावर निर्णय होणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१०३३** **आजचे सभेत साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार श्री.संदिप शिक्रे ॲण्ड असो., मुंबई यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेसमोर त्यांनी या प्रकल्पाचे सादरीकरण सादर केले व समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, या सादरीकरणामध्ये समितीने केलेल्या सुचनांचा अंतर्भाव करुन त्याच्या साफ्ट प्रती सर्व समिती सदस्यांना मेलद्वारे पाठविण्यात याव्यात. तसेच सदरहू प्रकल्प बीओटी तत्वावर उभारावयाचा असल्याने, सल्लागाराने निविदेचा मसुदा त्वरीत तयार करुन मान्यतेसाठी सादर करावा, अशा सुचना केल्या.** (कार्यवाही-कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१२** **संस्थानचे चैन्नई व बंगळूरु येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मुदतवाढीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे जिवन-कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच साईभक्तांसाठी सोई-सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उदात्त हेतुने चेन्नई व बंगळूर येथे संस्थानमार्फत सन २०११ सालापासून माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत. सदरहू ठिकाणी संस्थानमार्फत प्रकाशीत होणारे पुस्तके व फोटोंची विक्री तसेच रोख देणगी, ऑनलाईन दर्शन-आरती पास वितरण व रुम बुकींग इ. कामे केली जातात. सदरहू ठिकाणी प्रकाशने विभागाचे नियंत्रणाखाली कंत्राटदारामार्फत एकत्रित मानधनावर खालील कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अं.क्र | कंत्राटी कर्मचा-याचे नाव व पदनाम | माहिती केंद्र ठिकाण | नेमणूक केल्याचे वर्ष | एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.व्ही.कन्नन, कार्यालय प्रमुख | चेन्नई | दि.०३/११/२०११ ते दि.०२/११/२०१२ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१२ ते दि.०२/११/२०१३ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१३ ते दि. ०२/११/२०१४ | रु.१०,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१५ ते दि.०२/११/२०१६ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१६ ते दि.०२/११/२०१७ | रु.१५,०००/- |
| ०२ | श्री.एस.कृष्णमूर्ती, कार्यालय प्रमुख | बंगळूरु | दि.०३/११/२०११ ते दि.०२/११/२०१२ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१२ ते दि.०२/११/२०१३ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१३ ते दि.०२/११/२०१४ | रु.१०,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१५ ते दि.०२/११/२०१६ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१६ ते दि.०२/११/२०१७ | रु.१५,०००/- |

उपरोक्त कर्मचा-यांना वेळोवेळी प्रत्येकी एका वर्षासाठी मुदतवाढ देणेत आलेली आहे. सदरहू कर्मचा-यांना दि.१२ जानेवारी, २०१७ रोजीचे आदेशाने देणेत आलेली मूदतवाढ दि.०२/११/२०१७ रोजी संपत असल्याने त्यांनी अनुक्रमे दि.१२/१०/२०१७ व दि.११/१०/२०१७ रोजीचे विनंती अर्जाने संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. संबधीतांचे अर्जावर, प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी संबधीतांचे

काम समाधानकारक असून, त्यांची मुदत दि.०२/११/२०१७ अखेर संपत असून, संबधीतांचे मागणीअर्जाचा विचार करता त्यांना संस्थान नियमानुसार मुदतवाढ देणेस हरकत नाही, असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

तरी संस्थानचे चेन्नई व बंगळूरु येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेले उपरोक्त कंत्राटी कर्मचा-यांना मुदतवाढ संपत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे चैन्नई व बंगळूरु येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांची मुदत संपुष्टात येत असलेच्या तारखेपासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी आहे त्याच अटी/ शर्ती व मानधनावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१३** **द्वारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी. टयुबसेट व बल्ब खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** २१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**मागणी:-** संस्थानचे धर्मशाळा (२०० रुम) परिसरातील व्दारावती भक्तनिवास इमारतीतील रुम व पॅसेजमध्ये प्रकाशव्यवस्थेसाठी बाथरुम, टॉयलेट, वॉश बेसिन व रुम पॅसेजमध्ये १४ वॅट सी.एफ.एल.टयुब व रुममध्ये ४० वॅट, टयुबसेट लावलेले आहेत. संस्थानला आय.एस.ओ.सर्टिफिकेट प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी नेमण्यात आलेले मा.श्री.सी.केशवमुर्ती साई एन्टरप्राईजेस, बंगलोर, ISO 9001 : 2008 ऑडीटर यांनी दि.१४-०९-२०१७ रोजीचे परिक्षण अहवालामध्ये व्दारावती भक्तनिवास यांनी या इमारतीत एल.ई.डी.बल्ब बसविणेविषयी सुचविले आहे. त्यानुसार व्दारावती भक्तनिवास विभागाने व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये प्रकाश व्यवस्थेकरीता एल.ई.डी.बल्ब बसविणेस कळविले आहे. एल.ई.डी.बल्ब होल्डर मध्ये ओपन पध्दतीने लावलेस चोरीस जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तेव्हा रुममध्ये एल.ई.डी.बल्ब ऐवजी २० वॅटची एल.ई.डी.टयुब बसविल्यास योग्य होईल असे मत आहे. व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये रुम, पॅसेज व जिन्यामध्ये एकुण ६५० टयुब पट्टया लावलेल्या आहेत. तसेच रुमचे बाथरुम, टॉयलेट, वॉश बेसिन व रुम पॅसेजमध्ये एकुण १४ वॅट १८१० नग सी.एफ.एल.टयुब बंदिस्त बल्कहेड मध्ये लावलेल्या आहेत. त्यांचे जागी लावणेस एल.ई.डी.टयुब सेट व बल्ब संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाचे सबस्टोअरला शिल्लक नसल्याने सदरचे मटेरियल खरेदी करणे गरजेचे आहे. तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एल.ई.डी.टयुबसेट, साईज :- २० वॅट,<br>कंपनी :- एचपीएल / क्रॉम्प्टन / फिलिप्स | ६५० नग | रु. ४५०/- | रु. २,९२,५००/- |
| ०२) | एल.ई.डी.बल्ब, साईज :- ९ वॅट,<br>कंपनी :- एचपीएल / क्रॉम्प्टन / फिलिप्स | १८१० नग | रु. १००/- | रु. १,८१,०००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४,७३,५००/-** |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे आय.एस.ओ.सर्टिफिकेटसाठी आवश्यक म्हणून व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी.टयुबसेट व बल्ब खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,७३,५००/- मात्र इतका खर्च येणे अपेक्षित असून सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीमधील रुममध्ये बसविणेकामी एल.ई.डी. टयुबसेट व बल्ब खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.४,७३,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **साईनगर कडील साईध्यान १ आणि २ या स्टाफ क्वार्टरचे रिवायरींग कामाचे अंतिम बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामधील अधिकारी तसेच कर्मचारी यांचे निवासव्यवस्थे करीता सन १९८७ साली म्हणजेच २७ वर्षापूर्वी साईनगरकडे साईध्यान ०१ आणि ०२ ह्या तळमजल्यावरील चार मजली इमारत बांधण्यात आलेल्या आहे. ह्या इमारती बांधण्यात आल्या त्यावेळेस सदरील इमारतींमध्ये त्या वेळेच्या पध्दतीनुसार जुन्या पद्धतीची वायरींग करण्यात आलेली आहे सदरची वायरींग ही २७ वर्षात बरीच जुनी झाल्याने ती वेळोवेळी दुरुस्त करण्यात आलेली आहे. तसेच या वायरींगचे इन्सुलेशन कव्हर खराब होण्यास सुरुवात झालेली असून इन्सुलेशन क्षमता कमी झाल्याने शॉर्टसर्कीट होण्याचा धोका संभवतो . सदरची वायरींगची वेळोवेळी दुरुस्ती केल्यामुळे वायरींगमध्ये ब-याच ठिकाणी जॉईंटस आलेले आहेत. यामुळे वायरींगमध्ये शॉर्टसर्कीट होऊन अपघात होण्याचा धोका संभवतो. शिवाय जॉईंटसमध्ये लिकेज होऊन भिंतीमध्ये करंट उतरु शकतो व प्राणहानी होण्याचा धोका संभवतो.

या कारणास्तव साईनगरकडील साईध्यान ०१ आणि ०२ ह्या इमारतींमधील संपूर्ण रुमचे विद्युतीकरणाचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्युतिकरण कामामध्ये जुनी वायरींग पूर्ण काढून नविन केसिंग केपींग वायरींग तसेच नवीन मॉडयुलर पध्दतीचे स्वीचेस व कनसिल्ड स्वीचबोर्ड बसवुन रिवायरींग काम करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर केलेला होता.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८-०२-२०१५ रोजीचे सभेतील विषय क्र.२८ निर्णय क्र.५६ अन्वये तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची C.A.NO.4249 OF 2015 IN CAST NO.12275 OF 2015 PIL NO.18 OF 2011 अन्वये साईनगर कडील साईध्यान ०१ आणि ०२ या स्टाफ क्वार्टरचे रिवायरींगचे काम विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागवून करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळालेली होती. त्यानुसार सदरचे रिवायरींगचे काम करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

ई-निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर प्राप्त झालेल्या ई-निविदा उघडण्यात येऊन मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०२-०२-२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.०३ निर्णय क्र.०३ (०८) अन्वये साईनगर कडील साईध्यान ०१ आणि ०२ या स्टाफ क्वार्टरचे रिवायरींगचे करणेकामी मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे ई-निविदेतील दिलेले न्युनतम दर रु. ३९,६०,५८५.१७ मान्य करण्यात आलेले होते. त्यानुसार मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/विद्युत/६६०/२०१६ दि.१३-०५-२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता.

सदरचे काम पूर्ण केल्यानंतर मेआदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी रक्कम रु.३५,४५,४२०.७९ इतक्या रकमेचे फायनल बील सादर केलेले होते. परंतू घेण्यात आलेल्या मोजमापानुसार प्रत्यक्षात एकुण देय रक्कम रु. २८,७३,५५८/- झालेली आहे. तसेच मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचा सदरच्या कामाचा कालावधी हा सहा महिन्याचा म्हणजेच दिनांक १२-११-२०१६ पर्यंत होता. परंतू मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी सदरचे काम हे दि.३०-०३-२०१७ रोजी पूर्ण केलेले असल्यामुळे सदर कामास २० आठवडयांचा विलंब लागलेला आहे. त्यानुसार विलंब झालेल्या दंडाची रक्कम प्रती आठवडा रु. १,०००/- प्रमाणे एकुण २० आठवडयांची रक्कम रु. २०,०००/- ची वजावट मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे फायनल बीलातून करण्यात आलेली आहे. तसेच (०१). सामान्य प्रशासन विभाग कार्यासन १० अ यांचे दिनांक ०७-११-२०१७ च्या पत्रान्वये मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी भविष्य निर्वाह निधीची पूर्तता केलेली आहे. (०२). त्याचप्रमाणे मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी कामगारांचा विमा उतरविलेला आहे

**मागणी:-** उपरोक्त प्रमाणे मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे साईनगर कडील साईध्यान ०१ आणि ०२ या स्टाफ क्वार्टरचे रिवायरींगचे कामाची फायनल बीलाची रक्कम रु. २८,७३,५५८/- होत असून त्यामधून टॅक्सेस, सिक्युरिटी डिपॉझिट, विलंब झालेल्या दंडाची रक्कम तसेच मागील रनिंग बीलाची वजावट होऊन राहिलेली उर्वरीत रक्कम मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना लेखाशाखा विभागामार्फत अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कडील साईध्यान १ आणि २ या स्टाफ क्वार्टरचे रिवायरींग कामाच्या बीलामधून टॅक्सेस, सिक्युरिटी डिपॉझिट, विलंब झालेल्या दंडाची रक्कम तसेच मागील रनिंग बीलाची वजावट होऊन राहिलेली उर्वरीत रक्कम मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५ शांतिनिवास इमारत दर्शनरांगेच्या पहिल्या माळयावरील हॉलकरीता इमर्जन्सी एक्झीट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद :** कलम 14(2)(घ)- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयासाठी आवश्यक ते तातडीचे दुरूस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना**: उपरोक्त संदर्भीय मंजुर टिपणी अन्वये "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव 2018" चे निमित्ताने साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असलेने गर्दीमध्ये काही अनुचीत प्रकार होऊ नये या कामी दर्शन रांगेचे हॉलकरीता इमर्जन्सी एक्झीट गेट तयार करणेकामी मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार मा. कर्नल सुपनेकर साहेब, संचालक आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे, मा. श्री निकम साहेब, उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, यांचे समावेत शांतीनिवास व भक्तनिवास इमारत पाहणी केली असता, शांतीनिवास इमारत तळ मजला, भक्तनिवास इमारत तळमजला या ठिकाणी इमर्जन्सी गेट आहेत. भक्तनिवास इमारत पहील्या मजल्यावर दोन्ही बाजुने जीने असलेने तेथे अतिरीक्त इमर्जन्सी गेटची आवश्यकता नाही. मात्र उपलब्ध जागे नुसार मा. कर्नल सुपनेकर, यांनी शांतीनिवास इमारत पहील्या मजल्याकरीता सोबतचे ड्रॉइंग प्रमाणे इमर्जन्सी एक्झीट करीता शांतीनिवस पहिला माळा ते अभिषेक हॉल असा ओव्हर ब्रीज करणेकरीता जागा सुचविली. त्यानुसार सदर ठिकाणी ओव्हर ब्रीज करणेकरीता स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून स्ट्रक्चर ड्रॉईंग तयार करुन घेणेत आलेले आहे.

**मागणी:** उपरोक्त ड्रॉईंग नुसार प्रस्तावित ठिकाणी इमर्जन्सी एक्झीट करीता ओव्हर ब्रीज करणेकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी | दर (मटेरीअल+ लेबर+ उभारणी सह) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S Sq. Pipe , Size – 50 x 50 x 3.6 mm | 600 kg. | 110/- | 66,000/- |
| 2. | M.S Rectangular Pipe Size – 80 x 40 x 3.2 mm | 120 kg. | 110/- | 13,200/- |
| 3. | M.S Channel, Size – 125 x 125 x 5 mm | 750 kg. | 100/- | 75,000/- |
| 4. | M.S Chequr Plate, Size -8' x 4' – 6 mm | 4 No. | 9100/- | 36,400/- |
| 5. | M.S Sheet, Size -10 mm | 150 kg. | 80/- | 12,000/- |
| 6. | Polycarbonate Sheet Multi Wall (With Rubber EPDM, Aluminum Angle/ Channel, Silicon) | 30 sq. m | 1900/- | 57,000/- |
| 7. | 4 m 16 bolts , Anchor fastener | Lumsum | - | 2,000/- |
| | | | एकुण रक्कम रूपये : | 2,61,600/- |

**(अक्षरी रक्कम दोन लाख एकासष्ठ हजार सहाशे मात्र)**

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील इमर्जन्सी एक्झीट करीता लोखंडी ओव्हर ब्रीज बनविणेकरीता रक्कम रूपये 2,61,600/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा ओव्हर ब्रीज परिसरातील फॅब्रीकेटर्स/वर्कशॉपधारक यांचे कडुन दरपत्रके मागवुन बसवुन घेता यईल

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत-** तरी शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील हॉलकरीता इमर्जन्सी एक्झीट करीता ओव्हर ब्रीज तयार करून घेणेकामी परिसरातील फॅब्रिकेटर्स यांचे कडून दरपत्रके मागविणेस व या कामी येणा-या रक्कम रूपये 2,61,600/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख, एकसष्ठ हजार, सहाशे) मात्र खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील हॉलसाठी इमर्जन्सी एक्झीट करणेकरीता ओव्हर ब्रीज तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,६१,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६ श्री साईप्रसादालयात दैनंदिन वापराकरीता उपकरणे व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम व तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२घ) नुसार भक्तांना सोईसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रास्तविक:-** शताब्दी महोत्सव कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होणार असल्याने सध्याचे उपलब्ध वापरातील साहित्य अपुरे पडणार असल्याने उपरोक्त विषयानुसार तसेच संदर्भीय मंजूर टिपणीनुसार श्री साईप्रसादालय विभागाने खालीलप्रमाणे स्टे.स्टील फर्निचर साहित्य / उपकरणे खरेदी करणेकामी इकडील विभागास कळविले आहे.

| **अ.नं.** | **वस्तुंचे नांव.** | **खरेदी करावयाचे नग.** |
|---|---|---|
| 1) | स्टेनलेस स्टील प्रसाद भोजन वाढणेची गाडी (४ भांडी) | १० नग. |
| 2) | स्टेनलेस स्टील पाणी वाढणेची गाडी. | १० नग. |
| 3) | स्टेनलेस स्टील ताटे वाहणेची गाडी. | १० नग. |
| 4) | स्टेनलेस स्टील भाताची जाळी. | ०६ नग. |
| 5) | स्टेनलेस स्टील बेनमेरी काऊंटर (६ भांडी असलेले) | १२ नग. |
| 6) | स्टेनलेस स्टील जेवणाचे टेबल ४सीट असलेले. | १०० नग. |
| 7) | स्टेनलेस स्टील भात ठेवणेसाठी ट्रॉली. | ०३ नग. |

**मागणी:-** श्री साईप्रसादालय विभागाचे आवश्यक साहित्य खरेदी करीता अपेक्षित खर्चाचे अंदाजाकरीता साहित्य बनविण्याचे कंपनीशी संपर्क करुन त्यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आले होते. त्यांचेकडून प्राप्त दरपत्रक सरासरीनुसार आवश्यक साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty. (Num.) | Rate Rs. | Total Amount. |
|---|---|---|---|---|
| 01 | SS 304 Food Service Trolley.<br>4 Vessels. Size 900 x 1025 x 900 mm.<br>Vessel dia. - 330 x 325ht. | 10 | 40,808.00 | 4,08,080.00 |
| 02 | SS 304 water service trolley<br>size 530 x 1050 x 900 ht. | 10 | 44,543.00 | 4,45,430.00 |
| 03 | S.S.304 Plate collecting Trolley<br>Size:-1620 x 810 x 825 mm.<br>Tray size - 1320 x 725 x 280 x 2 mm thick. | 10 | 55,090.00 | 5,50,900.00 |
| 04 | S.S.304 Rice Tray Trolley<br>Size - 1500 x 1125 x 450 ht.<br>Top plate 1.2 mm mat finish and cover 1.6 mm thick perforated with sheet cover radius. | 06 | 52,920.00 | 3,17,520.00 |
| 05 | SS 304 Bainmarie (Six pot)<br>Size1000 x 675 x 840 mm. | 12 | 54,567.00 | 6,54,808.00 |
| 06 | S.S.304 Dining Table (4 Seated)<br>Size - 2200 x 750 x 780 mm.<br>Seat- 330 with casting backing with polishing. | 100 | 35,190.00 | 35,19,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 07 | S.S. 304 Rice Strainer<br>Size - 500 x 450 mm. Frame cover with S.S. 304 - 1.6 mm thick perforated sheet. | 03 | 21,705.00 | 66,115.00 |
| | | Total Amount Rs. | | 59,60,849.00 |

(Amount in Word Fifty Nine Lack Sixty Thousand Eight Hundred And Forty Nine Only)

उपरोक्तप्रमाणे तीन पुरवठाधारक यांचेकडून प्राप्त दर सरासरीनुसार प्रसादालयाकरीता आवश्यक साहित्य खरेदीकामी रक्कम रुपये ५९,६०,८४९/- मात्रचे दरात २० टक्के दर कमी केल्यास रक्कम रूपये ४७,६८,६७९/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय :-** श्रींचे समाधी शताब्दी वर्ष सुरु असल्याने साईभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता श्री साईप्रसादालय विभागाचे मागणीनुसार उपरोक्त तपशिलाप्रमाणे स्टेनलेस स्टील फर्निचर्स, उपकरणे खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रूपये ४७,६८,६७९/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरची खरेदी ई-निविदा प्रक्रियेव्दारे करता येईल.

तरी

१. श्री साईप्रसादालय विभागाचे मागणीनुसार शताब्दी काळात होणा-या गर्दीत प्रसाद भोजन व्यवस्थेत अडचण येवू नये याकरीता दैनंदीन वापराकरीता उपकरणे व साहित्य ई निविदा प्रक्रियेद्वारे खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये ४७,६८,६७९/- मात्रचे खर्चास

तसेच प्राप्त निविदा खरेदी समितीचे समक्ष उघडून पुढील कार्यवाही करणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१०३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील दैनंदिन वापराकरीता प्रस्तावात नमुद केलेली उपकरणे व इतर साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४७,६८,६७९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यावेळी अशीही चर्चा झाली की, श्री साईप्रसादालयामध्ये प्रस्तावीत साहित्य नवीन खरेदी केल्यानंतर जुने साहित्य आनंदवन आश्रम, चंद्रपुर यांना वापरासाठी देणेत यावे.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे सन २०१८-२०१९ या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेंसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद: (1) कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीरचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) 21(1) (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना**: संस्थानच्या सर्व परिसरात व इमारतीमध्ये भक्तांना पिण्याचे थंड पाण्यासाठी ठिकठिकाणी वॉटर कुलर बसविण्यात आलेले आहे. हे वॉटरकुलर विविध ठिकाणी भक्तांच्या सोईकरीता कार्यरत आहेत. काही वेळा वॉटर कुलरमध्ये काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुसऱ्या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने वॉटरकुलर बंद ठेवावे लागतात. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर ते बसवून कुलर यंत्रणा कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. तसेच सदर यंत्रणा बंद राहील्यास भक्तांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये व्यत्यय येतो.

मेकॅनिकल विभागात ए.सी. मेन्टेनन्स करीता संस्थानचे 2 कायम कर्मचारी आहे. त्यांचेकडून दैनंदिन कामाचे नियोजन, स्टॉक नोंद, नविन कामे तसेच CAMC दिलेल्या मशीनरीचे दुरुस्ती देखभालीची कामे करुन घेणे इत्यादी कामे करण्यात येतात. तसेच सदर कामी 6 कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यापैकी श्री साईबाबा हॉस्पीटल सेंट्रल ए.सी. प्लांन्टचे ऑपरेटींगकामी तीन शिफ्टसाठी तीन कर्मचारी व एक कर्मचारी सुट्या सोडविणेकामी लावण्यात येतात. उर्वरित दोन कर्मचाऱ्यांकडून दर्शन रांगेतील एअर कुलरला पाणी भरणे व सदर कुलरचे मेन्टेनन्स् तसेच अनुषंगीक कामे करुन घेण्यात येतात.

संस्थानमधील सर्व ठिकाणचे ए.सी. व अनुषंगीक मशीनरींचे मेन्टेनन्स् साठी सबंधीत तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या पुरेशी नसल्याने कामात अडचणी येतात. मशीनरींची दुरुस्ती व देखभाल वेळेवर न झाल्याने परिणामी अतिरीक्त मेन्टेनन्स् खर्च होत आहे, म्हणून या सर्व मशीनरींची वाढती व्याप्ती लक्षात घेता संस्थान परिसरातील सर्वच वॉटर कुलरचे (91 नग) वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) प्रत्येक वर्षी देण्यात येत आहेत. मागील वर्षी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक 01/11/2016 ते 31/10/2017 या कालावधीकरीता रक्कम रुपये 3,38,460/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/10/2017 रोजी संपलेला आहे. तसेच साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या ठिकाणी श्री साईभक्ताचे सुविधेकरीता 91 नग वॉटर कुलर मे. कुलब्रीज, पुणे यांचे कडुन बसवुन घेणेत आले होते. या वॉटरकुलरची वॉरंटी कालावधी संपलेला असलेने या वॉटर कुलर सह इतर 89 नग असे एकुण 180 नग वॉटर कुलरची पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलरचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| Sr. No. | Description | 2018-2019 Appro. Amount Rs. |
|---|---|---|
| 01) | Compressive Annual Maintenance Contract of All Water Cooler in Sansthan Campus (As per the list attached) (91 + 89 Nos = 180 Nos) | 6,05,000/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व वॉटर कुलरचे सन 2018-2019 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता अंदाजे रक्कम रुपये 6,05,000/- (अक्षरी रुपये सहा लाख पाच हजार) मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**मान्यता** : मा.व्यवस्थापन समितीची

**विभागाचे स्पष्ट मत**: संस्थान परिसरातील सर्व वॉटर कुलर कार्यरत राहणे आवश्यक असलेने सर्व वॉटर कुलरचे सन 2018- 2019 या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेआवश्यक आहे. सन 2017- 2018 या करीता व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस उपलोउ करून कंत्राटदारांकडून ईनिविदा मागवून CAMC देता येईल, तरी 180 नग वॉटर कुलरकरीता CAMC देणेकामी ई-निविदामागविणेस व या कामी अपेक्षित खर्च रक्कम रूपये 6,05,000/- (अक्षरी रुपये सहा लाख, पाच हजार) मात्रचे खर्चास मान्यते करीता, मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१०३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान परिसरामधील १८० नग वॉटर कुलरचे सन २०१८-२०१९ या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,०५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **विविध विभागातील वापरुन निकामी झालेले तसेच कालबाहय संगणके व संगणकीय साहित्य (E-Scrap) विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम** 2004 **मधील तरतुद:-** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक :-**माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांना आवश्यकतेनुसार संगणक, प्रिंटर, युपीएस इत्यादी संगणकीय साहित्य पुरविण्यात येते. माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विभागांना पुरविण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहित्याच्या नोंदी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या डेडस्टॉक रजिस्टरला घेतल्या जातात. तसेच इतर विभागाही प्रासंगीक आवश्यकतेपोटी संगणके किंवा संगणकीय साहित्य खरेदी करतात. सदर संगणके व संगणकीय साहित्यांच्या नोंद संबंधीत विभागांच्या डेडस्टॉक रजिस्टरला घेण्यात येतात सदरील सर्व साहित्यांचे दुरुस्ती व देखभालीचे काम माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत पाहिले जाते.

उपरोक्तप्रमाणे विविध विभागांमध्ये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत अथवा संबंधीत विभागामार्फत कार्यान्वीत करण्यात आलेले संगणके व संगणकीय साहित्यापैकी काही साहित्य वापरुन निकामी तसेच

कालबाहय झालेले आहे, सदरचे साहित्य दुरुस्ती करणे योग्यही राहीलेले नाही. सबब सदरचे साहित्य विहित पध्दतीने विकणे आवश्यक आहे.

सदरचे साहित्याची प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे विक्री करणेपेक्षा अशा प्रकारचे सर्व साहित्य एकत्रितपणे विक्री करणेकरीता सदर साहित्यांची तपशिलवार माहिती जा.नं.2220/2016 दि.13/09/2016 रोजीचे परिपत्रकाव्दारे विविध विभागांकडुन संकलीत करण्यात आालेली आहे. सर्व विभागांनी अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडुन विक्री करावयाचे साहित्याची पडताळणी करुन घसारा किमंतीसह तपशिलवार माहिती इकडील विभागास कळविलेली आहे.

विविध विभागांकडुन वापरुन निकामी झालेल्या तसेच कालबाहय झालेल्या संगणके व संगणकीय साहित्यांची माहिती इकडील विभागास कळविलेली असुन ती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | संगणक | युपीएस | प्रिंटरर्स | इनव्हेटर | झेरॉक्स | फॅक्स | मोडेम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅन्टीन विभाग | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- |
| ०२ | कनीष्ठ महाविद्यालय | -- | ०२ | ०४ | ०२ | ०२ | ०१ | ०२ |
| ०३ | आयटीआय | २६ | -- | ०७ | -- | -- | -- | -- |
| ०४ | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७० | १०० | २० | -- | -- | -- | -- |
| ०५ | श्री साईनाथ रुग्णालय | ०१ | -- | ०२ | -- | -- | -- | -- |
| ०६ | पाणी पुरवठा विभाग | ०२ | -- | ०१ | -- | -- | -- | -- |
| ०७ | माहिती तंत्रज्ञान विभाग | २३ | २१ | ०९ | -- | -- | -- | -- |
| **एकूण** | | **१२३** | **१२३** | **४४** | **०२** | **०२** | **०१** | **०२** |

उपरोक्त तक्त्यात नुमुद केलेले निकामी संगणके व संगणकीय साहित्य यांची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

Department: CANTEEN

| SR NO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COM/5001 | Lenovo Computer Set | 1 | 30500 | 1.28 | 1.28 | 26-May-2006 |
| 2 | COM/5002 | PRINTER Hp Laser Jet 3020 | 1 | 13000 | 0.55 | 0.55 | 26-May-2006 |

Department: SHRI SAIBABA JUNIOR COLLEGE

| SR NO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COM/4002 | WIPRO LASER 1140 PRINTER | 1 | 12500 | 0.06 | 0.06 | 5-Nov-2002 |
| 2 | COM/4003 | HP LASERJET 420 | 1 | 3700 | 0.02 | 0.02 | 5-Nov-2002 |
| 3 | COM/4005 | PRINTER EPSON LQ2180 | 1 | 36400 | 0.17 | 0.17 | 30-Dec-2002 |
| 4 | COM/4008 | ACCESS MAKE 5.0 KVA ONLINE UPS | 1 | 62500 | 0.73 | 0.73 | 6-Mar-2004 |
| 5 | COM/4016 | US ROBOTIC MODEM | 2 | 12200 | 0.02 | 0.04 | 24-May-2000 |
| 6 | COM/4027 | INVERTOR SUKAM 1400 WATT | 1 | 9200 | 15.07 | 15.07 | 6-Aug-2009 |
| 7 | COM/4028 | INVERTOR MICTOTECH 850 WATT | 1 | 5700 | 9.34 | 9.34 | 6-Aug-2009 |
| 8 | MCN/4009 | ZEROX DIGITAL PHOTO | 1 | 153301 | 13428.98 | 13428.98 | 8-Jan-2008 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | MCN/4011 | RICOH DIGITAL COPIER XEROX | 1 | 153140 | 86.23 | 86.23 | 3-May-2006 |
| 10 | PRN/4007 | DOT MATRIX EPSON PRINTER | 1 | 30318 | 13.91 | 13.91 | 12-Feb-2008 |
| 11 | TEL/287 | PANOSONIC FAX | 1 | 7748 | 1206.61 | 1206.61 | 12-Nov-2009 |
| 12 | UPS/2006 | UPS KVA ONLINE | 1 | 75000 | 0.14 | 0.14 | 6-Mar-2001 |

Department: SHRI SAIBABA INDUSTRIAL TRAINING INSTITUTE

| SR NO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COM/506 | COMPUTER SET LG MAKE | 6 | 102000 | 1.71 | 10.26 | 28-Aug-2005 |
| 2 | COM/519 | COMPUTER SET COMPAQ | 3 | 10500 | 4.40 | 13.20 | 3-Jul-2007 |
| 3 | COM/521 | COMPUTER SET | 7 | 145600 | 15.27 | 106.89 | 26-Apr-2007 |
| 4 | COM/527 | HCL COMPUTER | 9 | 212580 | 22.28 | 200.52 | 31-May-2007 |
| 5 | COM/528 | WIPRO COMPUTER SET | 1 | 32189 | 0.38 | 0.38 | 25-Apr-2004 |
| 6 | COM/513 | EPSON 2180 DOT MATRIX PRINTER | 1 | 31000 | 315.58 | 315.58 | 1-Jan-1999 |
| 7 | PRN/505 | HP LASERJET M1005 | 2 | 24400 | 6.40 | 12.80 | 3-May-2007 |
| 8 | PRN/506 | EPSON 2180 DOT MATRIX PRINTER | 4 | 126957 | 13.31 | 53.24 | 9-May-2007 |

Department :SHRI SAIBABA HOSPITAL

| SRNO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COMP/508 | LENOVO ibm THINK CENTER | 70 | 3125500 | 327.73 | 22941.10 | 12-Apr-2006 |
| 2 | COMP/503 | APC BLACK ES 650 VA UPS | 100 | 350000 | 36.70 | 3670.00 | 28-Apr-2006 |
| 3 | COMP/514 | HP LASERJET 3055 | 2 | 41800 | 7.67 | 15.34 | 13-Feb-2007 |
| 4 | COMP/502 | HP LASERJET 1020 | 6 | 70800 | 7.42 | 44.52 | 12-Apr-2006 |
| 5 | COMP/513 | HP PHOTOSMART AIO 4188 | 2 | 14901 | 2.73 | 5.46 | 13-Feb-2007 |
| 6 | COMP/519 | HP lj 3392 | 1 | 42328 | 7.76 | 7.76 | 13-Feb-2007 |
| 7 | COMP/515 | HP PHOTOSMART 3108 | 1 | 13303 | 2.44 | 2.44 | 13-Feb-2007 |
| 8 | COMP/504 | EPSON LQ 1150+ | 3 | 52350 | 5.49 | 16.47 | 28-Apr-2006 |
| 9 | COMP/517 | EPSON LQ 300 | 4 | 26098 | 6.38 | 25.52 | 13-Feb-2007 |
| 10 | COMP/522 | EPSON LQ 300 | 1 | 8372 | 13.71 | 13.71 | 28-Apr-2009 |

Department : SHRI SAINATH HOSPITAL

| SR NO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MCH/0224 | COMPUTER SET P-III | 1 | 50000 | 0.08 | 0.08 | 20-Mar-2000 |
| 2 | EQP/0195 | EPSON LQ 2180 | 2 | 126006 | 2.64 | 5.28 | 29-Aug-2005 |

Department: WATER SUPPLY

| SR NO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MCH/2443 | COMPUTER SET | 1 | 19000 | 0.29 | 0.29 | 7-Feb-2002 |
| 2 | MCH/2460 | HP LASERJET | 1 | 15600 | 0.46 | 0.46 | 16-Oct-2002 |
| 3 | MCH/2470 | COMPUTER SET | 1 | 20350 | 1.49 | 1.49 | 14-Feb-2004 |

Department : INFORMATION TECHNOLOGY

| SR NO | ID NO | DESCRIPTION | QTY | Rate | Cost after Dep. | Tot Amt. after Dep. | Purch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COM/9903 | ZENITH P-IV 1.7GHz, MB- 845GL | 2 | 26000 | 0.07 | 0.14 | 18-Sep-2003 |
| 2 | COM/9907 | ZENITH P-IV 2.4GHz INTEL 845 WDI-E MB | 1 | 34850 | 0.16 | 0.16 | 5-Dec-2003 |
| 3 | COM/9911 | ZENITH P-IV 2.5 GHz | 2 | 25500 | 0.12 | 0.24 | 13-Jan-2004 |
| 4 | COM/9923 | COMPAQ MODEL SR1705IL | 1 | 24000 | 1.76 | 1.76 | 7-Oct-2006 |
| 5 | COM/9927 | COMPAQ MODEL SG123IL | 1 | 22885 | 1.68 | 1.68 | 1-Feb-2007 |
| 6 | COM/9928 | COMPAQ 1236IL AMD-64 WITH | 1 | 20800 | 2.18 | 2.18 | 3-May-2007 |
| 7 | COM/9930 | HCL MAKE 15" CRT, 80 GB,512 MB RAM | 1 | 24951 | 4.76 | 4.76 | 25-Nov-2007 |
| 8 | COM/9948 | COMPAQ 19"LCD LIGHT SCRIBE DVD | 1 | 23500 | 15.40 | 15.40 | 7-Aug-2009 |
| 9 | MCN/129 | INTEL PIV 2.8 GHZ 256 MB RAM DDR | 1 | 30000 | 0.20 | 0.20 | 15-May-2004 |
| 10 | NET/9925 | WIPRO P-IV 2.4 4 | 9 | 32189 | 0.37 | 3.33 | 28-Jan-2005 |
| 11 | NET/9926 | WIPRO P-IV 2.8 - HT | 3 | 40300 | 0.47 | 1.41 | 28-Jan-2005 |
| 12 | MCN/209 | PRINTER EPSON LQ-300 | 1 | 8100 | 0.02 | 0.02 | 16-Feb-2005 |
| 13 | PRN/9918 | EPSON LQ-300+ | 4 | 9000 | 1.65 | 6.60 | 5-Nov-2007 |
| 14 | PRN/9923 | EPSON LQ-300+ | 1 | 8375 | 2.28 | 2.28 | 10-May-2008 |
| 15 | PRN/9928 | EPSON LQ 300+ | 2 | 8485 | 4.04 | 8.08 | 29-Dec-2008 |
| 16 | PRN/9932 | EPSON LQ 300+ | 1 | 8050 | 5.49 | 5.49 | 10-Jul-2009 |
| 17 | NET/9904 | APC BLACK UPS-ES-500 | 4 | 2875 | 0.03 | 0.12 | 28-Jan-2005 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | UPS/2003 | LAN SMART 525/725 VA UPS OK | 1 | 5100 | 0.05 | 0.05 | 12-May-2000 |
| 19 | UPS/2005 | UPS 500-VA PUNCA MAKE | 1 | 5900 | 0.06 | 0.06 | 5-Jun-2000 |
| 20 | UPS/2009 | CHAMPION UPS 600 VA | 2 | 3000 | 0.01 | 0.02 | 14-Dec-2002 |
| 21 | UPS/9901 | APC MAKE UPS 500 VA WHITE | 4 | 2755 | 0.01 | 0.02 | 17-Mar-2003 |
| 22 | UPS/9902 | APC MAKE UPS 500 VA WHITE | 5 | 2750 | 0.01 | 0.04 | 30-May-2003 |
| 23 | UPS/9905 | APC MAKE | 2 | 2975 | 0.04 | 0.08 | 30-Apr-2004 |
| 24 | UPS/9909 | CHAMPION UPS 600VA WU07111145 | 1 | 2100 | 0.55 | 0.55 | 18-Jul-2008 |
| 25 | UPS/9914 | UPS MICROSTAR 600VA | 1 | 1800 | 1.18 | 1.18 | 28-Jul-2009 |

उपरोक्त साहित्यांची विक्री दि.01/08/2011 रोजीचे शासन आदेशात दिलेल्यानिर्देशाप्रमाणे (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन निविदा मागवुन करणेकरीता मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता, येईल असे नम्र मत आहे.

**मागणी :-** प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे संस्थानचे विविधी विभागातील निकामी संगणके व संगणकीय साहित्याची विक्री करणेकामी दि.01/08/2011 रोजीचे शासन आदेशात दिलेल्या निर्देशाप्रमाणे (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन निविदा मागवुन करणेकरीता मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे विविध विभागातील निकामी संगणके व संगणकीय साहित्याची विक्री करणेकामी दि.01/08/2011 रोजीचे शासन आदेशात दिलेल्या निर्देशाप्रमाणे (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन निविदा मागवुन करणेकरीता मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१०४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विविध विभागातील वापरुन निकामी झालेले तसेच कालबाहय प्रस्तावित संगणके व संगणकीय साहित्याची (E-Scrap) विक्री करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ अ व ब-** **माहे जुलै व ऑगस्ट, २०१७ मधील जमा- खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जुलै-२०१७ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून जुलै-२०१७ या महिन्याचा जमा-खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे -

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| जुलै-२०१७ | ४४,४९,६६,७२५/- | २३,१४,०५,३२५/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जुलै-२०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**ब)** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे ऑगस्ट-२०१७ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून ऑगस्ट-२०१७ या महिन्याचा जमा-खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे -

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| ऑगस्ट-२०१७ | ५७,०२,५७,७०१/- | १४,८५,५०,२९९/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे ऑगस्ट-२०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.१०४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुलै व ऑगस्ट, २०१७ मधील जमा-खर्च तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२०** **शताब्दी महोत्सव शुभारंभ व उद्घाटन कार्यक्रमानिमित्त उपस्थित मान्यवरांचे व पादुका दर्शन गोवा येथे देण्यात आलेल्या लाडू/ बूंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करत आहे. त्यासअनुसरुन दि.०१/१०/२०१७ रोजी समाधी शताब्दी महोत्सव शुभारंभ व उदघाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरचा कार्यक्रम भारतीय गणराज्याचे महामहिम राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंदजी साहेब व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, राज्यातील मान्यवर नेते, संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत संस्थानचे लेंडीबागेत पार पडला आहे. सदरचे दिवशी मान्यवरांना संस्थानमार्फत प्रसाद म्हणुन देण्याचे ठरले होते, त्यानुसार लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत एकुण २०० गोल्डन कलरचे बॉक्स् पॅकींग करुन राष्ट्रपती भवनास देण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| प्रसाद वाटप बॉक्स संख्या | बॉक्समधील एकुण लाडुची संख्या (०२ नग प्रती बॉक्स) | एकुण लाडु पाकीटाची संख्या | ०१ पाकीटाची किंमत | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| २०० | ४०० | १३३ पाकीटे | २५/- | **३,३२५/-** |

तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग, अ.नगर यांनी सदर लाडु तयार करणेकामी वापरात येणा-या कच्च्या मालाचा नमुना तपासणीकामी देण्यात आलेला आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| अ.नं. | मालाचा तपशिल | दिलेला माल | प्रती किलोचे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | बुंदी लाडु | ०२ कि.ग्रॅ. | १६०/- | ३२०/- |
| ०२ | बेसन | ०२ कि.ग्रॅ. | ८२/- | १६४/- |
| ०३ | गावरान (गायीचे) तुप | १.६०० कि.ग्रॅ. | ३९६/- | ६३३/- |
| | **एकुण** | -- | --- | **१,११७/-** |

उपरोक्तप्रमाणे राष्ट्रपती दौ-यांसाठी १३३ लाडु प्रसाद पाकीटे रक्कम रु.३,३२५/- व अन्न व औषध प्रशासन, अ.नगर यांना तपासणीकामी देण्यात आलेला कच्चा माल यांची रक्कम रु.१,११७/- तर मा.उपजिल्हाधिकारी श्री निकम साहेब यांच्या परवानगीने राष्ट्रपती दौ-याकरीता (बंदोबस्ता करीता) आलेल्या शासकीय अधिकारी यांचेकरीता ५० पाकीटे X रु.२५ =१,२५०/- असा **एकुण ५,६९२/-** मात्रचा प्रसाद विनामुल्य देण्यात आलेला असल्यामुळे सदरच्या खर्चाची नोंद संस्थानचे अन्नदान खाती होणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे दि.२५/०९/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८४९ नुसार दि.१३/१०/२०१७ रोजी पणजी, गोवा येथे होणा-या श्रीसाई पादुका दर्शन सोहळयाचे आयोजक साईसेवा ट्रस्ट, गोवा यांच्या मागणीप्रमाणे लाडु प्रसाद पाकीटांऐवजी १,५०,००० बुंदी प्रसाद पाकीटे उपलब्ध करुन देण्यात यावीत, परंतु सदरहु प्रसाद पाकीटे शिर्डी येथुन घेऊन जाणेची पुर्ण व्यवस्था आयोजकांनी करावी. असा निर्णय संमत झाला आहे.

त्यानुसार लाडु प्रसाद निर्मिती विभागाकडुन श्रीसाई पादुका दर्शन, गोवा यांचेकरीता खालीलप्रमाणे लाडू/बुंदी प्रसाद पाकीटे विनामुल्य देण्यात आलेली आहेत. विनामुल्य देण्यात आलेलेली प्रसाद पाकिटे व त्यासाठी आलेल्या खर्चाची नोंद मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत घेणे गरजेचे वाटते.

त्यामध्ये ५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसाद पाकीट तयार करणेसाठी (सर्व खर्चासह) रु.९.१८ इतका खर्च झालेला आहे.

| दिनांक | लाडु प्रसाद पाकीटे | बुंदी प्रसाद पाकीटे | रिकामी प्रसाद पाकीटे | एकुण खर्च (लाडू + बुंदी खर्च) |
|---|---|---|---|---|
| १२/१०/२०१७ | १५० | १०,००० | १,००,००० पाकीटे | १,३६,३०९/- |
| १३/१०/२०१७ | १०० | ५०,००० | ---- | ४,६१,५००/- |
| **एकुण** | **२५०** | **६०,०००** | **१,००,०००** | **५,९७,८०९/-** |

श्री साई पादुका दर्शन सोहळयाकरीता २५० लाडु प्रसाद पाकीटे व ६०००० बुंदी प्रसाद पाकीटे आयोजकांचे ताब्यात दिलेली असुन, त्यासाठी एकुण रु.५,९७,८०९/- इतकी रक्कमेचा खर्च झालेला आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-तरी उपरोक्तप्रमाणे महामहिम राष्ट्रपती यांना संस्थानतर्फे सत्काराकामी देण्यात आलेल्या लाडू प्रसाद लाडू पाकिटांचा खर्चरु.५,६९२/- (अक्षरी रुपये पाच हजार सहाशे ब्यान्नव मात्र) व साई पादुका दर्शन सोहळा, गोवा याकरीता व्यवस्थापन मंडळाने मंजुरी दिलेली असुन प्रत्यक्ष झालेला खर्च रु.५,९७,८०९/- (अक्षरी रुपये पाच लाख सत्यान्नव हजार आठशे नऊ मात्र) चे खर्चास मान्यता मिळुन, सदरचा खर्च संस्थान खाती नोंद होऊन अन्नदान खाती खर्ची टाकणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर .

**निर्णय क्र.१०४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या रु.५,९७,८०९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक,लाडू प्रसाद निर्मीती विभाग)

---

**विषय नं.२१** **श्री साईप्रसादालयातील कायम/ कंत्राटी कर्मचारी यांना ॲप्रोन/ कॅप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन-२००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२-घ) भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**मा.व्यवस्थापन समिती ठराव:-**दि.२६.०७.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५३९

**प्रस्ताविक:-** श्री साईभक्तांचे सोईसाठी एकाच वेळेस ३५०० बैठक क्षमता असलेले भव्य दिव्य असे श्री साई प्रसादालय सुरु केलेले आहे. श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. त्याशिवाय साईभक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकिटांची अत्यल्प दरात विक्री करणेत येते. प्रसादभोजन, अन्नपाकिटे तयार करणेकामी अत्याधुनिक देशी/विदेशी बनावटीच्या मशिनरी व उपकरणे वापरण्यात येतात.

दि.२६/०७/२०१३ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५३९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत एवढया मोठया प्रमाणात अन्नदानाचे प्रसादभोजन पुरविणेचे कार्य चालते त्याद्वारे साईभक्तांना चांगल्या प्रतीची सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचा लाभ जगभरातील साईभक्त घेत असतात.व संस्थान व्यवस्थेबद्दल समाधान व आनंद व्यक्त करतात.तथापी सेवा पुरवितांना त्यामध्ये सेवाभाव, कार्यरत्परता व गुणवत्ता राखणे जरुरीचे असल्याने त्याचा दर्जा राखणेसाठी कर्तव्यामध्ये सातत्य ठेवणे गरजचे असते. त्यानुसार श्री साई प्रसादालयास देणगीदार साईभक्त श्री केशु मुर्ती C/0 साई एंटरप्राईजेस,बेंगलोर यांचेमार्फत ISO यांचे मानंकन नुतणीकरण आणि प्रसादालयातील कायम /कंत्राटी कर्मचारी यांना कॅप/ॲप्रन व वर्गवारीनुसार युनिफार्म बाबत मान्यता घेण्यात आलेली होती.

संदर्भियनुसार खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने कोटेशन मागवून आर.के.कलेक्शन,नाशिक यांचेकडून दि२६/०८/२०१४ रोजी प्रसादालयातील कायम/ कंत्राटी कर्मचारी यांना २२५० नग ॲप्रन व कॅप प्रती नंग १८७ प्रमाणे खरेदी करणेत येऊन त्याकामी रक्कम रु.४,२०,५२५/- खर्च आलेला होता. सदर ॲप्रोन,टोपी खरेदी करुन तीन वर्षे झालेली असून कर्मचा-याजवळील टोपी ॲप्रोन सततचे वापरामुळे खराब,तेलकट,जिर्ण झालेले आहे. त्यामुळे प्रसादालयातील कर्मचा-यांना ॲप्रोन,टोपी हा गणवेशाच भाग असल्यने देणे गरजचे आहे.

**मागणी:-** साईभक्तांना चांगल्या प्रतीची सुविधा पुरविणेकामी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व ISO 22000:2005 चे ऑडीट करणेकामी प्रसादालयातील प्रत्येक (कायम/कंत्राटी) कर्मचा-यांना ॲप्रोन, टोपी देणे गरजेचे असल्याने खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ख्रेरदी करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व नियम २०११ नूसार व ISO 22000:2005 चे ऑडीट करणेकामी प्रसादालयातील प्रत्येक कर्मचा-याला (कायम/कंत्राटी) ॲप्रन,कॅप खरेदी विभागामार्फत खरेदी करता यईल.

श्री साई प्रसादालयामध्ये सध्यस्थितीत अन्नपदार्थाशी निगडीत २७५ कायम व २९७ कंत्राटी असे एकुण ५७२ कर्मचारी काम करीत असून भविष्यात त्यामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने एकुण ७५० कर्मचा-याकरीता प्रत्येकी २ जोड व एक जोड राखीव म्हणून स्टॉकमध्ये ठेवणेसाठी असे एकुण ३ जोड ॲप्रन टोपी खरेदी करणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशिल | संख्या | प्रती नग अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ॲप्रन | २२५० | २५० | ५,६२,५००/- |
| ०२ | टोपी | २२५० | | |
| | | | एकुण रक्कम = | ५,६२,५००/- |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु ५,६२,५००/- + Gst एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी ॲप्रन व टोपी विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व येणा-या अंदाजे खर्चास मान्यता असावी.

तरी वरीलप्रमाणे साई प्रसादालयातील कायम/कंत्राटी कर्मचा-यांना ॲप्रन/टोपी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेबातचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईप्रसादालयातील कायम व कंत्राटी कर्मचारी यांना ॲप्रोन/ कॅप खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,६२,५००/- + जीएसटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणे व करारनामा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) प्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,असे नमूद आहे.

**प्रस्ताव–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणे व करारनामा करणेबाबत..

**प्रस्तावना –** मा.अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.४/३ मधील साईउद्यान इमारतीतील १५९९.४१ चौ.फूट जागा शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता यापूर्वी खालील तक्त्यात नमूद केलेल्या कालावधीसाठी वापरास देणेत आलेली आहे.

| अ.नं. | मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेचा दिनांक व ठराव | करारनामा केलेचा कालावधी |
|---|---|---|
| १ | दि.१३/१२/२००३ निर्णय क्रं.५९० | दि.१८/१२/२००३ ते दि.१७/११/२००४ |
| २ | दि.२७/१२/२००४ निर्णय क्रं.१६६ | दि.१८/११/२००४ ते दि.१७/१०/२००५ |
| ३ | दि.१४/१२/२००५ निर्णय क्रं.७७० | दि.१८/१०/२००५ ते दि.१७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्रं.२३९ | दि.१८/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ |
| ५ | दि.२४/०९/२०११ निर्णय क्रं.७३४ | दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२ |
| ६ | दि.२६/०२/२०१३ निर्णय क्रं.१७९, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.९४२२/०१३ मधील दि.१३/०८/२०१३ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ |

| | | |
|---|---|---|
| ७ | दि.०५/०६/२०१४ निर्णय क्रं.४३२,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२९/ २०१४ मधील दि.२२/१२/२०१४ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ |
| ८ | दि.३०/११/२०१६ निर्णय क्रं.७६५ | दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५<br>दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६<br>दि.१७/१०/२०१६ ते दि.१६/१०/२०१७ |

पोस्ट ऑफीसच्या वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत दि.१६/१०/२०१७ रोजी संपत असल्याने मा.अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामी व लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करणेकामी विनंती केलेली आहे.

पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेली जागा यापूर्वी एक-एक वर्षे या कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्यान्वये वापरास दिलेली आहे. परिणामी सदर जागेचा वापर सलग एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचा होत असल्या कारणाने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील मुदतवाढीकामी शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे,असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय-** पोस्ट ऑफीस यांना मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची स.नं.३/४ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पैकी साईउद्यान इमारतीमध्ये दोन हॉल (१५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ या एक वर्षे कालावधीसाठी FRAC प्रमाणे दरमहा रक्कम रु.१२,३८५/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरणेस शासनाच्या पूर्वपरवानगीने मुदतवाढ देता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईउद्यान इमारतीमधील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या १५९९.४१ चौ.फूट जागेस दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ या एक वर्षे कालावधीसाठी रु.१२,३८५/- मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर महाराष्ट्र शासनाच्या पूर्वपरवानगीने मुदतवाढदेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२३ सन २०१७-१८ करीता सर्व विभागांसाठी कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे सर्व विभागास दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेकामी सर्व विभागांकडून आवश्यक माहिती मागविणेत आलेली होती. विहित मुदतीमध्ये विभागांकडुन आलेली कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरीची मागणी एकत्रित करणेत आलेली आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे ०१) दि.१०.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४९७, ०२) दि. ०२.०४.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२०५ व ०३) दि.२२.०८.२०१६ रोजीचे उपसमितीचे सभेतील निर्णयानुसार सन-२०१५-१६ करिता संगणकीय व वार्षिक जनरल स्टेशनरी खरेदीसाठी एकूण रक्कम रु.१५,९४,४०४/- (अक्षरी रुपये पंधरा लाख चौ-यांनो हजार चारशे चार) मात्रचे खर्चास मंजुरी दिलेली होती.

श्रींचे शताब्दी महोत्सव काळात भक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता सर्व विभागांनी केलेली एकत्रित मागणी मागील वर्षा पेक्षा जास्त असल्याने या वर्षी कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.६८,०३,६४३/-(अक्षरी रुपये आडुसष्ट लाख तीन हजार सहाशे त्रेचाळीस मात्र) पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

सर्व विभागांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तसेच भांडार शिल्लक स्टॉकचा आढावा घेवून प्रत्यक्षात खरेदी करावयाची संख्या निश्चित करणेत आलेली आहे, ती सोबतच्या परिशिष्ठाप्रमाणे यासोबत सादर केलेली आहे.

**मागणी व किंमत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापेक्षा अधिक दिसते त्याची कारणे पुढीलप्रमाणे –**

१) सदर मागणी मध्ये झेरॉक्स पेपरची किंमत एकुण रक्कम रु.३७,८५,६४०/- इतकी आहे. झेरॉक्स पेपर रिम यापुर्वी एक साईभक्तसंस्थानला देणगी म्हणुन देत असे, गतवर्षी त्यांनी सदर देणगी दिलेली नाही. यावर्षी

त्यांनी झेरॉक्स पेपर A4 - २१०० रिमदेणगी रूपानेदिलेले असल्यामुळे एकत्रित वार्षिक मागणीतुन सदरचे झेरॉकस पेपर रिम कमी केलेले आहेत. झेरॉक्स पेपरचा वापर सर्वच विभागात होत आहे.

२) यापुर्वी काही स्टेशनरीवर Vat/ Service Taxलागू नव्हता मात्र आता GSTदरामुळे प्रत्येक वस्तुंची किंमत वाढलेली दिसत आहे.

३) मागील वर्षी एकंदर मागणीतील भांडार शिल्लक जास्त असल्याने वार्षिक एकत्रित मागणीतुन सदरील शिल्लक नग/ संख्येची वजावट केल्यामुळे निश्चित मागणी कमी होती.

४) श्रींचे शताब्दी वर्षात संभाव्य गर्दीमुळे सर्व विभागांनी स्टेशनरीची मागणी जास्त केलेली आहे. त्यामुळे मागणी संख्या अधिक दिसते.

५) अंदाजे एकुण किंमत काढणेकामी संगणक जनरल स्टेशनरीचे तीन व संगणक स्टेशनरीचे दोन रिटेल विक्रेत्यांकडुन दरांची सरासरी काढुन एकुण किंमत विचारात घेतली आहे.

तरी परिशिष्ठाप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी कार्यालयीन जनरल व संगणकीय स्टेशनरीची खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६८,००,०००/- (अक्षरी रुपये आडुसष्ट लाख मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता संस्थानमधील सर्व विभागांसाठी आवश्यक असलेली कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, संस्थानमध्ये झेरॉक्स पेपरचा वापर जास्त दिसून येतो, याकरीता पेपरलेसवर भर द्यावा व त्याकामी संबंधीतकर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२४ प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत औ.प्र.संस्थेत "नळ कारागीर" (प्लंबर) या व्यवसायाचा अभ्यासक्रम ज्ञानदा इन्स्टीटयुट ऑफ फलो पाईपींग टेक्नॉलॉजी पुणे यांच्या देखरेखीत सुरु करणे बाबत, तसेच या प्रस्तावासोबत राज्य व केन्द्र शासनाचे इतर उपक्रमातील "नळ कारागीर" अभ्यासक्रमाबाबत माहिती घेणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-** सन-२००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४(भाग.१४)मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश केलेले विनीयम मधील १७ (२-ढ) मध्ये "सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील" अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती ठराव-** दिनांक.१५/०६/२०१७ रोजीच्या सभेत आयत्यावेळेचा विषय नं.२४ निर्णय क्र.५१८ प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत संस्थानचे औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नळ कारागिर हा अभ्यासक्रम ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे यांचे देखरेखी खाली सूरू करणेत यावा व या संस्थेस रॉयल्टी देणेऐवजी सदरहू अभ्यासक्रमास शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान त्यांना देण्यात यावे,या बाबतचा मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करण्यात यावा

**प्रस्ताव-** ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे या संस्थेमार्फत आणि प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत "नळ कारागीर" (प्लंबर) या व्यवसायाचे प्रशिक्षण सुरु करणेबाबत, दि.२४/१०/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीमध्ये वरील निर्णयाबाबत प्रस्ताव सभेसमोर ठेवतांना प्लंबर अभ्यासक्रमाचे पुर्णवेळ अभ्यासक्रमांची व इतर आवश्यक माहितीही सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.त्यानुसार खालीलप्रमाणे केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळया योजनेअंतर्गत असलेल्या "नळ कारागीर"(प्लंबर) अभ्यासक्रमाची माहीती सोबत प्रपत्र "अ" व प्रपत्र "ब" मध्ये दिली आहे

१) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) नवी दिल्ली अंतर्गत अंशकालीन अनुदानित व्यवसाय (मिळणारे संपुर्णअनुदान ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे,यांना अदा करावे लागतील) (तपशिल प्रपत्र "अ")

२) महाराष्ट्र स्टेट स्किल डेव्हलपमेंट सोसायटी अंतर्गत (MSSDS) अंशकालीन अनुदानीत व्यवसाय (सदर योजनेचे अभ्यासकेंद्र मंजुरीची प्रक्रिया आपल्या संस्थेत सुरू आहे)(तपशिल प्रपत्र "ब"मध्ये अ.क्र.१वर )

३) कौशल्य विकास मंत्रालय (MSDE) नवी दिल्ली अंतर्गत ०१ वर्ष पुर्ण वेळ कायम विनाअनुदानीत व्यवसाय (तपशिल प्रपत्र "ब"मध्ये अ.क्र.२ वर)

४) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ मुंबई अंतर्गत अंशकालीन कायम विनाअनुदानीत व्यवसाय (तपशिल प्रपत्र "ब"मध्ये अ.क्र.३ वर)

**पर्याय क्र.१-** ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे यांच्याद्वारा प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना नवी दिल्ली अंतर्गत ५७६तास कालावधीचा प्लंबर (जनरल) Code-PSC-Q0104 हा PMKVY चा पूर्णवेळ/अंशकालीन व्यवसाय असून विदयार्थी संख्या २०ते३० आहे.यात हा व्यवसाय प्रत्यक्ष होणा-या तासीकेनुसार व विदयार्थीसंख्ये नूसार तसेच विदयार्थी जॉबला लागण्याच्या संख्येनूसार अनूदानीत आहे.हा अभ्यासक्रम सूरू करणेसाठी भाडवली खर्च रुपये-३,२०,०००/- व आवर्ती खर्च वार्षिक रुपये-२,३०,०००/-तसेच हा अभ्यासक्रम ज्या PMKVYअधिकृत एजंसी मार्फत सुरू करावा लागणार त्या ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे यांना या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारे संपूर्ण अनूदान पाच तूकडीसाठी एकून रुपये- २४,९६,९६०/-तसेच संबधीत संस्थेच्या निवासी समन्वयकासाठी व अन्य प्रतिनिधीच्या आपल्या संस्थेला दिल्या जाणा-या भेटीपोटी एकून रुपये-.८,१०,०००/-या प्रमाणे निव्वळ एकून रुपये-.३३,०६,९६०/-अदा करावे लागतील.

**पर्याय क्र.२-** महाराष्ट्र स्टेट स्किल डेव्हलपमेंट सोसायटी अंतर्गत (MSSDS) अनुदानित ५००तास कालावधीचा १)असिस्टंट प्लंबर Code- CON-705, २) प्लंबर Code- CON-715 चा पूर्णवेळ/अंशकालीन व्यवसाय असून विदयार्थी संख्या २५ आहे.यात हा व्यवसाय प्रत्यक्ष होणा-या तासीके नुसार व विदयार्थी संख्येनूसार तसेच विदयार्थी जॉबला लागण्याच्या संख्येनूसार अनुदानित आहे.हा अभ्यासक्रम सूरू करणेसाठी भाडवली खर्च रुपये-.३,२०,०००/- व आवर्ती खर्च वार्षिक रुपये- २,३०,०००/- येणार आहे. एकावर्षासाठी शासन नियमा नुसार रुपये-.3,००,००० ते ४,५०,०००/- फी प्रशिक्षणार्थ्यानकडून प्राप्त होईल व प्रशिक्षणार्थ्याना पास झाल्यावर NSDC कडून अंतिम प्रमाणपत्र प्राप्तहोईल.M.S.S.D.S. या कोर्ससाठी मा.व्यवस्थापन समितीने मंजुरी दिलेली आहे. अभ्यासकेंद्र म्हणून नोंदणी झालेली असुन शासनाच्या अंतिम मंजुरीसाठी साहित्य उपलब्ध करण्यात येत आहे.या केंद्राअंतर्गत वसतीगृह उभारण्यास मान्यता आहे. सदर अभ्यासकेंद्र अंतर्गत वसतीगृह उभारण्यास मान्यता आहे.सदर अभ्यासक्रम अंतर्गत प्लंबर हा व्यवसाय समावेश करुन चालु करता येईल. त्यास शासनाचे अनुदान प्राप्त होईल त्यातला शेअर / भत्ता इतर संख्या / एजंन्सी यांना देण्याची आवश्यकता नाही.

**पर्याय क्र.३- एक वर्ष पुर्णवेळ नॅशनल ट्रेड सर्टीफिकेट अभ्यासक्रम विनाअनुदान तत्वावर-**

कौशल्य विकास मंत्रालय नवी दिल्ली अंतर्गत ०१ वर्ष कालावधीचा प्लंबर(CTS) हा आय.टि.आय.चा व्यवसाय(ट्रेड) पुर्ण वेळेसाठी असून विदयार्थीसंख्या २० आहे.यात हा व्यवसाय कायम विनाअनुदानित तत्वावर सुरुकरता येणार आहे.हा व्यवसाय सुरुकरणेसाठी भाडवली खर्च रु८,००,०००/- व आवर्ती खर्च वार्षिक २,४०,०००/- येणार आहे.एकावर्षासाठी शासन नियमा नुसार रु.५,००,०००/- तर संस्थान सवलतीनुसार एकून रु१,६८,०००/-फी प्रशिक्षणार्थ्यानकडून प्राप्त होईल व प्रशिक्षणार्थ्याना पास झाल्यावर नॅशनल ट्रेड सर्टीफिकेट प्राप्त होईल.

**पर्याय क्र.४-** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ ( MSVE ) मुंबई ५१.यांचे अंतर्गत सर्टीफिकेट कोर्स इन हाऊस पाईपींग व सर्टीफिकेट कोर्स इन प्लबींग-- हे प्रत्येकी सहा महिने १) C.C.In House Pipe Fitting २) C.C. In Plumbing (५००तास व ४००तास अनुक्रमे)उपलब्ध आहे.या साठी भांडवली खर्च रुपये- १,२०,०००/- व आवर्ती खर्च वार्षिक ५०,०००/- येणार आहे.

वरील पैकी पर्याय क्र.३ चा पुर्ण वेळ अभ्यासक्रम सुरू केल्यास त्यासाठी उभारला जाणारा भांडवली खर्चाच्या सेटअप मध्ये उर्वरीत तीन पर्यायापैकी एक किंवा सर्व अभ्यासक्रम वेळेचे नियोजन करून चालु करता येवू शकतील,मात्र सध्याच्या ट्रेड कार्यशाळे मध्ये आवश्यक ते फेरबदल करावे लागतील.त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभारणेसाठी अंदाजे ८,००,०००/- रूपये खर्च अपेक्षीत आहे.तसेच प्रत्येक योजनेतील कोर्ससाठी कंत्राटी ट्रेनर/निदेशक व कच्चा माल यासाठी वार्षिक २,४०,०००/-रुपये खर्च अपेक्षीत आहे.कर्मचारी नियमित भरल्यास ४,६०,०००/- वार्षिक वेतन खर्च लागेल.

**मागणी:- पर्याय क्र.१-** ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे यांचे देखरेखी खाली प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत अभ्यासक्रम सुरू करणे व चालविणे यापोटी अभ्यासक्रम खर्चाच्या प्रमाणात मोठा हिस्सा पाच बॅचेस साठी एकून रुपये-.३३,०६,९६०/- अदा करावा लागणार असल्याने सदर अभ्यासक्रम सुरु करणे व्यवहार्य ठरणार नाही.

**पर्याय क्र.२ व ३-** केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालय नवी दिल्ली अंतर्गत पुर्ण वेळ "नळ कारागीर"(प्लंबर) कायम विनाअनुदानित अभ्यासक्रम सुरू करुन त्यासेबत राज्य शासनाचा MSSDS योजनेतील शासन अनुदानित "नळ कारागीर"(प्लंबर)अभ्यासक्रम सुरू करावा.आपल्या संस्थेतील उत्तीर्ण प्रशिक्षनार्थ्याना नोकरी/व्यवसायाच्या संधीचे प्रमाण चांगले असल्यने हे अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविता येतील.

**पर्याय क्र.४-** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ ( MSVE ) मुंबई चे अभ्यासक्रम विनाअनुदानित व अल्पमुदती चे असल्याने तुर्तास सुरु करु नये.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान:-**प्रशासकीय मान्यतेअंती कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय:-**

**पर्याय क्र.१-** ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे यांचे देखरेखी खाली प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत अभ्यासक्रम सुरू करणे व चालविणे यापोटी अभ्यासक्रम खर्चाच्या प्रमाणात मोठा हिस्सा पाच बॅचेस साठी एकून रुपये-.३३,०६,९६०/- अदा करावा लागणार असल्याने सदर अभ्यासक्रम सुरु करणे व्यवहार्य ठरणार नाही.

**पर्याय क्र.२ व ३-** केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालय नवी दिल्ली अंतर्गत पुर्ण वेळ "नळ कारागीर" (प्लंबर) कायम विनाअनुदानित अभ्यासक्रम सुरू करुन त्यासेबत राज्य शासनाचा MSSDS योजनेतील शासन अनुदानित "नळ कारागीर" (प्लंबर) अभ्यासक्रम सुरू करावा. आपल्या संस्थेतील उत्तीर्ण प्रशिक्षनार्थ्याना नोकरी/व्यवसायाच्या संधीचे प्रमाण चांगले असल्याने हे अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविता येतील.

**पर्याय क्र.४-** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ (MSVE) मुंबईचे अभ्यासक्रम विनाअनुदानित व अल्पमुदतीचे असल्याने तुर्तास सुरु करु नये.

निर्णय क्र.१०४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बेरोजगार तरुणांना रोजगारीची संधी उपलब्ध करुन देणे या उदात्त हेतून श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी पुणे यांचे देखरेखी खाली प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत "नळ कारागीर" (प्लंबर) हा अभ्यासक्रम सुरू करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे एकत्रित रु.३३,०६,९६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या अभ्यासक्रमासाठी उत्तर अहमदनगर जिल्हयातील तरुणांना प्राधान्य देण्यात यावे व सदरहू अभ्यासक्रम सुरु करणेकामी ज्ञानदा इंस्टीटयुट ऑफ-फ्लो पाईपीग टेक्नॉलॉजी, पुणे यांना उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे व याकामी शासन मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय.)

---

विषय नं.२५ **रुग्णालय विभागाचे नविन प्रशासकिय इमारतीमध्ये कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने नविन १० नग संगणके महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र.3.3.2 पुनप्रत्ययी आदेश या नियमाच्या अधिन राहून खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमधील प्रशासकीय कामकाज चालणारे सर्व कार्यालये प्रशासकीय कामकाजांच्या सुरळीततेसाठी साईनाथ रुग्णालय येथील जुन्या प्रसादालय इमारतीमध्ये स्थलांतरीत करणेत आलेली आहेत. सदर ठिकाणी कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने काही कामे अद्यापही अपुरे असल्याने कामकाजात व्यत्यय येत असल्यामुळे विविध विभागांशी संबंधीत असलेली कामे त्वरीत पुर्ण करून देणे बाबत दि.07/09/2017 रोजीचे पत्रान्वये आदेशीत केलेले आहे.

सदरचे पत्रामधील मुद्दा क्र. "ड" बाबत करावयावची कार्यवाही ई.डी.पी. विभागाशी संबंधीत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.नं | विभाग | मागणी |
|---|---|---|
| 1. | साईनाथ रुग्णालय - प्र. अधिक्षककार्यालय | संगणकसंचप्रिंटरसह (3 पुर्णसेट) |
| 2. | एच.आर. विभाग | 2 नगसंगणकसंच |
| 3 | वित्तिभाग | 3 नगसंगणकसंच |
| 4. | पगारबिलकक्ष – वित्त विभाग | प्रिंटरस्कॅनरसह 2 नग UPS |

उपरोक्त तक्त्यात विभागांचे मागणीनुसार नमुद असलेले 8 नग संगणके व दि.11/11/2017 रोजीचे प्राप्त झालेल्या पत्रातील हॉस्पिटल परचेस विभागाचे मागणीनुसार 2 नगसंगणके असे एकुण 10 नग संगणके इकडील विभागास खरेदी करावे लागणार आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि. 19/09/2017 रोजी M/s. Cybernet IT Pvt.Ltd., Pune यांना देण्यात आलेल्या कार्यादेशान्वये 90 नग संगणके खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरचे 90 नग संगणके खरेदी करणेकामी कार्यादेशात एकुण रक्कम रु. 32,67,000/- + Tax मात्र इतका खर्च नमुद केलेला आहे.

मागणी– महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र. 3.3.2 पुनर्प्रत्ययी आदेश या नियमास आधिन राहून माहिती तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या कार्यादेशानूसार (नमुद Specification प्रमाणे) प्रती नग रक्कम रु. 36,300/- + Tax मात्र या दराने हॉस्पिटलकरीता 10 नग संगणके खरेदी करणेकामी रक्कम रु. 3,63,000/- + Tax मात्र इतका खर्च अपेक्षीत असून 10 नग संगणके (आहे त्याच दराने) M/s. Cybernet IT Pvt.Ltd., Pune यांचेकडून माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचे अभिप्राय/स्पष्ट् मत– तरी, महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र. 3.3.2 पुनर्प्रत्ययी आदेश या नियमाच्या आधिन राहून माहिती तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या कार्यादेशानूसार (नमुद Specification प्रमाणे) हॉस्पिटलकरीता दि. 07/09/2017 रोजीचे संस्थान रुग्णालये मंजूर टिपणीन्वये व दि. 11/11/2017 रोजीचे हॉस्पिटल परचेस विभागाचे मागणीनुसार, 10 नग संगणके (आहे त्याच दराने) M/s. Cybernet IT Pvt.Ltd., Pune यांचेकडून माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खरेदी करणेस व येणाऱ्या एकुण रक्कम रु. 3,63,000/- + Tax मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.१०४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र. 3.3.2 पुनर्प्रत्ययी आदेश या नियमाच्या अधिन राहून माहिती तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या कार्यादेशानूसार (नमुद Specification प्रमाणे) श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता १० नग संगणके (आहे त्याच मंजुर दराने) M/s. Cybernet IT Pvt.Ltd., Pune यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या एकुण रु.३,६३,०००/- + Tax मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **खाते चौकशी अधिकारी, श्री.जे.एल. देशपांडे सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचे दि.१८.०७.२०१७ व दि.२५.०९.२०१७ रोजीचे मानधन अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ तरतुद –**

१) कलम २ खंड (झ) विनियम याचा अर्थ या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम असा आहे. कलम १५ पोट कलम २ समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी या विनियमाद्वारे ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटी व शर्तीवर नेमण्यात येतील.

**सेवानियमातील तरतुद-** शिस्त आणि अपिल विनियम २०१३ मधील विनियम ८ उपविनियम (१) शक्यतो विनियमात किंवा विनियम ९ मध्ये नमुद केलेल्या पद्धतीने चौकशी केल्याशिवाय मोठ्या दंडात्मक कारवाया लादण्याचे आदेश पारीत केले जाणार नाहीत.

विनियम ८ उपविनियम (२) जेव्हा संस्थानच्या कर्मचा-याविरुद्धच्या दुराचरण किंवा गैरवर्तन या आरोपासंबंधीच्या सत्याची चौकशी करण्यास कारणे आहेत असे शिस्तभंग प्राधिका-याचे मत असेल तर ते स्वतःसंबंधी चौकशी करतील किंवा या संबंधीच्यासत्याबद्दल चौकशी करण्यासाठी या विनियमाखाली चौकशी प्राधिका-यांची नियुक्ती करता येईल.

स्पष्टीकरण – जेव्हा सदर विनियमाखाली शिस्तभंग प्राधिकारी स्वतः चौकशी करतील तेव्हा चौकशी प्राधिका-याचा सदर विनियमात केलेला उल्लेख, जर संदर्भासाठी इतर कोणत्याही गोष्टीची आवश्यकता नसेल तर, म्हणजे शिस्तभंग प्राधिका-याचा उल्लेख असे समजले जाईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**

**१) दि. ०५/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०६ निर्णय क्र. १४८.**

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समितीने असा निर्णय घेतला की, चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रु. ५,०००/- मात्र प्रवास भत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहू चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात

यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस रु. ७,५००/- मात्र देण्यात यावेत. परंतु पुढे असेही ठरले की, त्यांना मानधनापोटी जास्तीत जास्त २० तारखांचे रु. ७,५००/- प्रमाणे एकंदर रु. १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. २० तारखांपेक्षा जास्त तारखा चौकशीकामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस त्यांना फक्त प्रवासभत्ता व आहारभत्ता व इतर खर्चापोटी रु. ५,०००/- मात्र देण्यात येतील. त्रिसदस्यीय समितीने पुढे असेही ठरवले की, चौकशी अधिकारी म्हणून उपरोक्तप्रमाणे मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक आहे काय, अशी विचारणा करावी आणि इच्छूक असल्यास संबंधितांकडून तसे लेखी संमती पत्र घेण्यात यावे.

त्याचप्रमाणे सहाय्यक तज्ञ म्हणून डॉ. अनिरुद्ध वि. धर्माधिकारी, ह्दयरोग तज्ञ, नाशिक यांची नेमणूक करण्यात यावी, असे दि. २६.०४.२०१५ चे सभेमध्ये निर्णय क्र. १४० अन्वये ठरवण्यात आलेले आहे. चौकशी अधिकारी यांची तज्ञ सहाय्यकाची जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हाच त्यांना पाचारण करावे व त्यांनी भाग घेतलेल्या चौकशीच्या प्रत्येक तज्ञ सहाय्यकास वरीलप्रमाणे प्रत्येक तारखेस रु. ५,०००/- मात्र प्रवास खर्च, आहार भत्ता व इतर खर्चापोटी व मानधन म्हणून रु.७,५००/- मात्र देण्यात यावे. डॉ.धर्माधिकारी, नाशिक यांना तसे कळवावे व त्यांनी सहमती दर्शविल्यास त्यांचे लेखी संमतीपत्र घ्यावे. जर ते अनुच्छूक असतील तर दुस-या तज्ञ सहाय्यकाची नेमणूक करण्यात यावी, असे एकमताने ठरले.

**२) दि. २८/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०७ निर्णय क्र.१५६–**

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. हरिष हुकूमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री. जे.एल.देशपांडे, पुणे यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी पत्र देऊन, त्यांना विचारणा करणेत यावी.

**३) दि. २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०५ निर्णय क्र.१९२ –**

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा. श्री.जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांनी केलेली विनंती मान्यकरणेत येऊन, सदरहूकामी त्यांना तात्काळ नेमणूक आदेश देण्यात यावा.

तसेच त्यांनी मागणी केलेल्या आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक / स्टेशनरी, या बाबी पुरविणेस व सदरहू चौकशीकामी येणा-या रु. ५०,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

**४) दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. १० निर्णय क्र.५१९ -**

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशीची व्याप्ती मोठी आहे. चौकशीचे कामकाज क्लिष्ट असुन दोघांची वेगवेगळी करावी लागते. मा. श्री.जे.एल.देशपांडे साहेब पुण्याहून येऊन या चौकशीकामी बहुमुल्य वेळ देतात. त्यांना २० तारखांचे रु. ५,०००/- + रु. ७,५००/- = रु. १२,५००/- मानधन प्रती चौकशी तारखेकरीता देण्यात येतात. पूर्वी देण्यात आलेली २० तारखेंची मर्यादा रद्द करुन २० तारखांनंतर ते चौकशी अहवाल सादर करेपर्यंत प्रती चौकशी तारखेस रु. १२,५००/- मानधन देणेबाबत उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खाते चौकशी अधिकारी, श्री. जे.एल.देशपांडे पुणे यांचे मानधनाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन त्रिसदस्यस समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पद्धतीने मान्यता घेण्यात आलेली होती. त्याची नोंद घेत असताना समितीने असे ठरवले की, मा. श्री.जे.एल.देशपांडे साहेब, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना डॉ बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशीकामी पुढील जास्तीत जास्त १० बैठकींमध्येच चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल सादर करावा, अशी विनंती करणेत यावी, असे ठरले.

**५) दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०९ निर्णय क्र.८५२–**

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा. श्री.जे.एल.देशपांडे, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधीश, पुणे यांचे विनंती पत्राचा विचार करता, त्यांना डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांच्या खाते चौकशीचे कामकाज पूर्ण करणेसाठी जास्तीत-जास्त १० बैठकींसाठी पूर्वीचेच अटी/ शर्ती व मानधनावर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.

तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील निलंबीत डॉक्टर्स / इतर स्टाफ यांची यादी सर्व मा. सदस्यांना देण्यात यावी, अशा सुचना दिल्या.

६) दि. २८/०४/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थान समिती सभेतील विषय नं. ३४ निर्णय क्र. ३११- प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खाते चौकशी अधिकारी मा.श्री.जे. एल. देशपांडे साहेब सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना यापुढे होणा-या प्रत्येक बैठकीसाठी प्रवास व इतर खर्च यासाठी रु. ५,०००/- मात्र रक्कम देणेत यावी, असे ठरले.

तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील निलंबीत डॉक्टर्स / इतर स्टाफ यांची यादी सर्व मा. सदस्यांना देण्यात यावी अशा सुचना दिल्या.

**प्रास्ताविक–** डॉ. हरिष हुकूमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ह्दयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलुन व इतर साहित्याचा वापर करणेकरता बेकायदेशीररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रुग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारांमध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. या अशा व इतर अनेक तक्रारी आल्याने त्यांची प्राथमिक चौकशी करुन त्यात ते दोघेही सकृतदर्शनी दोषी आढळून आल्याने त्यांना दि. ०८.११.२०१४ पासून तात्पुरते सेवा निलंबीत करुन त्यांची खाते चौकशी करणेचा निर्णय घेण्यात आला. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशीकामी खाते चौकशी अधिकारी नेमणेबाबत दि. ०५/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. १४८ नुसार समितीने असा निर्णय घेतला की, चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रु. ५,०००/- मात्र प्रवास भत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहू चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस जास्तीत जास्त रु. ७,५००/- मात्र देण्यात यावेत. परंतु पुढे असेही ठरले की, त्यांना मानधनापोटी जास्तीत जास्त २० तारखांचे रु. ७,५००/- प्रमाणे रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. २० तारखांपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यांना प्रवासभत्ता व आहारभत्ता व इतर खर्चापोटी रु. ५,०००/- मात्र देण्यात येतील. त्रिसदस्यीय समितीने पुढे असे ठरवले की, चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त सरकारी अधिकरी किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्त प्रमाणे मानधन व खर्च देण्यास संस्थान तयारआहे, असे सांगुन ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छूक असल्यास संबंधितांकडून तसे लेखी पत्र घेण्यात यावे असे ठरले.

त्यानंतर चौकशी अधिकारी यांना वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ ह्यदयरोग तज्ञ यांची सहाय्यक म्हणून नेमणूकीबाबत प्रस्ताव दि. २८/०५/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र. १५६ नुसार डॉ. हरिष हुकूमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री.जे.एल.देशपांडे, पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी पत्र देऊन त्यांना विचारणा करण्यात यावी.

श्री. जे.एल.देशपांडे यांचे दि ०५/०६/२०१५ रोजीचे संमतीपत्र व मानधन मागणीबाबतचा प्रस्ताव दि. २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र.१५६ नुसार, मा. श्री. जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांनी केलेली विनंती मान्यकरण्यात येऊन, सदरहूकामी त्यांना तात्काळ आदेश देण्यात यावा. तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक / स्टेशनरी, याबाबी पुरविणे व सदरहू चौकशीकामी येणा-या रु. ५०,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

श्री. जे.एल.देशपांडे, पुणे यांनी मानधनाचे संदर्भात २० तारखा अथवा जास्तीत जास्त रु. २,००,०००/- ही मर्यादा रद्द करणेबाबत दि. १२/०६/२०१६ रोजीच्या अर्जावर दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ५१९ प्रमाणे खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल.देशपांडे, पुणे यांचे मानधनाबाबतच्या तत्कालीन त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पद्धतीने मान्यता घेण्यात आली. त्यांची नोंद घेत असताना समितीने असे ठरविले की, मा. श्री. जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे चौकशीकामी जास्तीत-जास्त १० बैठकींमध्येच चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल सादर करावा, अशी विनंती करणेत यावी, असे ठरले. त्यानुसार त्यांना दि. ०८/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे. ६० बैठकींचे रु. ६,६५,०००/- मानधनव प्रवासभत्ता अदा करण्यात आलेला असुन आतापर्यंत चौकशीकामी ७१ तारखा झालेल्या आहेत.

श्री. जे.एल.देशपांडे यांनी दि १९/०२/२०१७ रोजीचे अर्जान्वये दि. ०८/०२/२०१७ चे पत्रास अनुसरुन, वैद्यकीय अधिका-यांचे चौकशीचे काम अंतिम टप्प्यात असुन डॉ. वर्मा यांचा जबाब नोंदविणेच काम झाले आहे. तर डॉ. बजाज यांचाजवाब नोंदविणेचे काम चालु असुन संस्थानचे वकीलांकडून उलटतपास ५ बैठकींमध्ये देखील पूर्ण झाला नाही. तो लवकर संपेल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून प्रकरण आदेशकामी नेमण्यात येईल. दरम्यान आमचे विनंतीप्रमाणे दि. ३०.११.२०१६ रोजीचे मा. कार्यकारणीचे ठरावाप्रमाणे जास्तीचे १० बैठकांचे मानधन व प्रवासभत्ता अनुदान मंजूर करण्यात आले होते. परंतु

ती मर्यादा बैठक क्र. ६३ दि. २२.०१.२०१७ रोजी संपली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे डॉ. बजाज यांचा जबाब नोंदविणे व युक्तीवाद ऐकणे कामी बैठका होतील तसेच चौकशीचे कामकाजात दाखल कागदपत्रांची संख्या बरीच जास्त असुन कागदपत्रांचे ०६ गठ्ठे झाले आहेत. तोंडी पुरावा कागदपत्रे बरीच आहेत. ते कागदपत्र तपासणे, जुळणी करुन वाचन करणे व अहवाल टंकलिखीत करणे ह्याकामी देखील शिर्डी येथे येणे आवश्यक आहे. वरील परिस्थितीत १० वाढीव बैठकांनंतर पुढील १० बैठकांचे मानधन व आदेश दाखल करेपर्यंत प्रवासभत्ता अनुदान मिळावे. वरील बाब शक्य नसेल तर नंतरचे वाढीव बैठकांनंतर चौकशी अहवाल दाखल करेपर्यंत प्रवासभत्ता अनुदान चालु ठेवावे. ह्यापुढे मानधनाकरीता वाढीव मागणी आमचेकडून होणार नाही. तथापि, प्रवासभत्ता अनुदान अहवाल सादर करेपर्यंत चालु ठेवण्यात यावा.

श्री.जे.एल.देशपांडे, सेवानिवृत्त जिल्हा सत्र न्यायाधीश यांना चौकशी अधिकारी म्हणून प्रती चौकशीकरीता मानधन रु. ७,५००/- व प्रवास खर्च व इतर खर्च रु. ५,०००/- असे एकूण रु. १२,५००/- देण्यात येत आहे. दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ५८२ नुसार १० बैठकींची मुदत संपलेली आहे. तरी त्यानंतर होणाऱ्या बैठकांकरीता अहवाल दाखल करेपर्यंत चौकशी अधिकारी यांना प्रत्येक बैठकीला मानधन न देता फक्त प्रवास व इतर खर्च रु. ५,०००/- देता येईल याबाबतचा प्रस्ताव दि. २८.०४.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

दि. २८.०४.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती विषय क्र. ३४ व निर्णय क्र.३७७ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना यापुढे होणाऱ्या प्रत्येक बैठकीसाठी प्रवास व इतर खर्च यासाठी रु. ५,०००/- मात्र रक्कम देणेत यावी, असे ठरले.

श्री.जे.एल.देशपांडे, सेवानिवृत्त जिल्हा सत्र न्यायाधीश यांना म्हणून प्रती चौकशीकरीता यापुढे होणाऱ्या प्रवास व इतर खर्च यासाठी रु. ५,०००/- प्रमाणे एकूण १६ तारखांचे रु. ८०,०००/- (रु. ऐंशी हजार) मात्र अदा करण्यात आलेले आहे.

खाते चौकशी सुरु करणेत आलेपासुन ते आतापर्यंत ७६ बैठकांचे श्री. देशपांडे यांना७,४७,७५०/- (रु. सात लाख सत्तेचाळीस हजार सातशे पन्नास) इतकी एकूण रक्कम अदा करणेत आलेली आहे.

आता, श्री.जे.एल.देशपांडे, सेवानिवृत्त जिल्हा सत्र न्यायाधीश यांना चौकशी अधिकारी यांनी दि १८.०७.२०१७ रोजीचा अर्ज सादर केलेला असुन, त्यात त्यांनी, "With reference to above subject I have to state that. I was appointed as Inquiry Officer to inquiry into the allegations in the charge-sheet Dt. 06.11.2014 served upon each of the CSE. Accordingly I conducted the inquiry, recorded the evidence.

It is learnt that, for next sixteen (16) days commencing from 14.01.2017 to 01.05.2017. Committee has allowed travelling expenses Rs. 5,000/- only and not the honorarium. In this regard it is most on the submitted that, I was required to spend lot of time and energy for recording the evidence, hearing of arguments as well as preparation of final report which runs 133 pages (Legal Paper). In view of this, I may be paid honorarium for these 16 days besides travelling expenses." असे म्हटलेले आहे.

दि. २८.०४.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती विषय क्र. ३४ निर्णय क्र. ३७७ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खातेचौकशी अधिकारी श्री. जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना यापुढे होणाऱ्या प्रत्येक बैठकीसाठी प्रवास व इतर खर्च यासाठी रु. ५,०००/- मात्र रक्कम देणेत यावी, असे ठरले. दि. २८.०४.२०१७ रोजीचे ठरावानुसार श्री. जे.एल.देशपांडे यांना १६ दिवसांचे बैठकीसाठी प्रवास व इतर खर्चापोटी रु. ५,०००/- प्रमाणे रु.८०,०००/- अदा करणेत आलेले असुन दि. १८.०७.२०१७ रोजीचा सादर केलेल्या अर्जानुसार त्यांना रु. ७,५००/- मानधन रक्कम रु. १,२०,०००/- ची मागणी केलेली आहे. तसेच दि. १८.०७.२०१७ रोजी शिर्डी येथे मुक्कामी येऊन अहवाल प्रत तयार करणे, दाखल करणे व रेकॉर्ड जमा करणेकामी जी शेवटची व्हिजीट झाली त्याचे देखील मानधन व प्रवासभत्ता देणेकामी दि. २८.०९.२०१७ रोजीचे अर्जात नमुद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** खाते चौकशी अधिकारी श्री. जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांनी दि १८.०७.२०१७ रोजीचे अर्जान्वये १६ बैठकांचे प्रवास व इतर खर्च रु. ५,०००/- या व्यतिरिक्त मानधन रु. ७,५००/- प्रमाणे रु. १,२०,०००/- व दि. १८.०७.२०१७ रोजी अहवाल व इतर कागदपत्रे

देणेकरीता शिर्डी मुक्कामी आल्याचे दिवसाचे मानधन व प्रवासभत्ता रु. १२,५००/- असे एकूण रु. १,३२,५००/- ची मागणी केलेली आहे. सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, खाते चौकशी अधिकारी श्री. जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचे मागणीनुसार, त्यांना १६ बैठकांचे मानधन व प्रवासभत्ता यांची एकूण रु.१,३२,५००/- मात्र रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत परिचारक/ परिचारीका यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांची पुन्हा ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद–** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्‍वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवाकर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतानासमितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावरकिंवाकंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापननिधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–**

१) मा व्यवस्थापन समिती दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७६२.

अ-०१ वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी ३७ व ११ महिने कालावधीसाठी २७ असे एकुण ६४ नेमणूक पत्र देण्यात मान्यता देण्यात आली.

ब-तसेच ६४ पैकी १४ उमेदवार हजर होणार नसल्याने, १४ रिक्त जागांवर मुलाखती घेतलेल्या पात्र उमेदवारांना नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७१०.

उपरोक्त परिचारीकांना बिंदू नामावलीप्रमाणे नेमणूका होईपर्यंत अथवा ११ महिने यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच मानधन व शर्ती/अटीवर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६१.

यावर सविस्तर चर्चा होऊन, १०० बिंदू नामावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोनही हॉस्पिटलमधील परिचारकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी. जाहीरातीनुसार पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारक/परिचारीकांना त्यांची मुदत संपलेपासून ६ महिने अथवा जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी/शर्तीवर दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या ०६ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक/ परिचारीका यांची मुदत संपलेपासून पुढे ०५ महिने अथवा जाहिरातीद्वारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी/शर्तीवर दरमहा रू. १००००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून जाहिरातीनुसार सर्व पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात यावी. लेखी परिक्षेमध्ये किमान ७०% गुण प्राप्त करणा-या उमेदवारास प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावे. प्रात्यक्षिक परिक्षेतून प्रत्येक प्रवर्गासाठी गुणांनुसार एका पदाकरिता पहिले ५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.

५) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४७७.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२५/१२/२०१० रोजीचे जाहिरातीस अनुसरून मुलाखतीद्वारे प्रवर्गानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे अहवालानुसार सध्या ११ महिने

कालावधीसाठी कार्यरत असलेल्या आवश्यक परिचारिका/ परिचारक यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदवाढ देण्यात यावी असे ठरले.

६) मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६६.

सध्या ११ महिने कालावधीकरीता कार्यारत असलेल्या २३ परिचारक/परिचारीका यांचेपैकी श्री चांगदेव पंढरीनाथकाळे यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असल्साने त्यांना पुढील मुदवाढ देऊ नये. तसेच श्रीमती सरीना आढाव, श्रीमती शुभदा गायकवाड, श्रीमती कुंभार यांचे काम असामाधानकारक आहे, असा वैद्यकिय अधिक्षक / वैद्यकीय संचालक यांनी अहवाल दिलेला असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देऊ नये. उर्वरित इतर १९ परिचारक/ परिचारीका यांना पुढील मुदवाढ देण्यात यावी.

सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/परिचारीका यांना प्रतिमहा रू. ११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

७) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४१६.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका/ परिचारक यांचेबाबत वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारक/ परिचारीका यांना उपरोक्त कॉलम नं ४ मध्ये संबंधितांचे नावापूढे दर्शविलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीकरीता, याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी/शतीनुसार तात्पुरती नेमणूकदेण्यात यावी, असे ठरले.

७) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र २७८.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

८) मा व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३३९.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक यांचेबाबत प्र वैद्यकिय अधिक्षक व प्र वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालाचा विचार करता, उपरोक्त तक्त्यातील अ नं ०१ ते ०७ व अ.नं ०९ ते १२ तसेच अ नं १४ ते १७ वरील परिचारक / परिचारीका यांना टप्पा-टप्पाने त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्या, असे ठरले.

९) मा व्यवस्थापन समिती दि. १६/०४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना त्यांचे नावापुढील स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

१०) मा व्यवस्थापन समिती दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र १६७.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूका देणेस मान्यता देण्यात आली.

११) मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९६०.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्रस्तावित परिचारक/परिचारीका यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या दिनांकापासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच संस्थान रूग्णालयामधील परिचारीका/परिचारक यांची रिक्त पदे मुलाखतीद्वारे कंत्राटी पध्दतीने भरणेत यावीत, अशा सुचना केल्या.

१२) मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६.

श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णरू क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता आवश्यक असलेल्या परिचारक/ परिचारीकांच्या ७५ जागांसाठी दि. २५/०६/२००८ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. जाहिरातीस अनुसरून दि.१७/०८/२००८ रोजी मुलाखतील घेणेत आल्या त्यांनंतर मा व्यवस्थापन समिती दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, अ) ०१ वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी ३७ व ११ महिने कालावधीसाठी २७ असे एकुण ६४ नेमणूक पत्र देण्यात मान्यता देण्यात आली. ब) तसेच ६४ पैकी १४ उमेदवार हजर होणार नसल्याने, १४ रिक्त जागांवर मुलाखती घेतलेल्या पात्र उमेदवारांना नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

बिंदुनामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या २७ उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

काही उमेदवार हजर न झाल्याने त्यांचे नेमणूक आदेश रद्द करून मुलाखत घेणेत आलेल्या प्रतिक्षा यादीतील ५ उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूका देणेत आलेल्या आहेत असे दिसते. तथापि प्रतिक्षायादी दप्तरी आढळून येत नाही.

११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक दिलेल्या २९ परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रसताव मा व्यवस्थापन समिती दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ७१० नुसार परिचारीकांना बिंदूनामावलीप्रमाणे नेमणूका होईर्प्यंत अथवा ११ महिने यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच मानधन व शर्तीवर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

उपरोक्त ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या परिचारीकांपैकी १४ परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रसताव मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६६१ नुसार १०० बिंदू नावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोनही हॉस्पिटलमधील परिचारकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी. जाहिरातीनुसार पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारक/ परिचारीकांना त्यांची मुदत संपलेपासून ६ महिने अथवा जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी/शर्तीवर दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांची ६ महिन्याची नेमणुकीची मुदत संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला त्यावर निर्णय क्र ८३ नुसार, सध्या ०६ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक/परिचारीका यांची मुदत संपलेपासून पुढे ०५ महिने अथवा जाहिरातीद्वारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी/शर्तीवर दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून जाहिरातीनुसार सर्व पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात यावी. लेखी परिक्षेमध्ये किमान ७०% गुण प्राप्त करणा-या उमेदवारास प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावे. प्रात्यक्षिक परिक्षेतून प्रत्येक प्रवर्गासाठी गुणांनुसार एका पदाकरिता पहिले ५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार ०५ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव दि. १२/०६/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ४७७ नुसार, दि. २५/१२/२०१० रोजीचे जाहिरातीस अनुसरून मुलाखतीद्वारे प्रवर्गानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे अहवालानुसार सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या आवश्यक परिचारीका / परिचारक यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदवाढ देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६६६ नुसार, सध्या ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या २३ परिचारक/परिचारीका यांचेपैकी श्री चांगदेव पंढरीनाथकाळे यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असल्साने त्यांना पुढील मुदवाढ देऊ नये. तसेच श्रीमती सरीना आढाव, श्रीमती शुभदा गायकवाड, श्रीमती कुंभार यांचे काम असामाधानकारक आहे, असा वैद्यकिय अधिक्षक /वैद्यकीय संचालक यांनी अहवाल दिलेला असल्याने त्यांना पुढील मुदवाढ देऊ नये. उर्वरित इतर १९ परिचारक / परिचारीका यांना पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/परिचारीका यांना प्रतिमहा रू. ११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ४१६ नुसार, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक यांचेबाबत वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारक / परिचारीका यांना उपरोक्त कॉलम नं ४ मध्ये संबंधितांचे नावापूढे दर्शविलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीकरीता, याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी/शतीनुसार तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र २७८ नुसार,चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१४ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ३३९ नुसार, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक यांचेबाबत प्र वैद्यकिय अधिक्षक व प्र वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालाचा विचार करता, उपरोक्त तक्त्यातील अ नं ०१ ते ०७ व अ.नं ०९ ते १२ तसेच अ नं १४ ते १७ वरील परिचारक / परिचारीका यांना टप्या-टप्याने त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्या, असे ठरले..

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १६/०४/२०१५ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १३३ नुसार, वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना त्यांचे नावापुढील स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १६७ नुसार, प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूका देणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ९६०, संस्थानचे रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्रस्तावित परिचारक/परिचारीका यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या दिनांकापासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच संस्थान रूग्णालयामधील परिचारीका/परिचारक यांची रिक्त पदे मुलाखतीद्वारे कंत्राटी पध्दतीने भरणेत यावीत, अशा सुचना केल्या.

मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावरील अ.नं. ०४ च्या कु कांचन विनायक शिंदे ह्या कामावरून गैरहजर असल्याचे प्र वैद्यकीय अधिक्षिका यांनी कळविल्याने त्यांचे व्यतिरीक्त इतर परिचारक / परिचारीकांना उपरोक्त निर्णय क्र ९६० नुसार, संस्थानचे रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या परिचारक/परिचारीका यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या दिनांकापासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या परिचारक / परिचारीका यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | नाव | नेमणूक तारीख | हजर तारीख | ११ महिने मुदवाढ संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | ३१/०१/२०१७ | १५/०१/२०१७ | १४/१२/२०१७ |
| २ | कु आशुमती संपत सदाफुले | ३१/०१/२०१७ | १७/०१/२०१७ | १६/१२/२०१७ |
| ३ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ३१/०१/२०१७ | १७/०१/२०१७ | १६/१२/२०१७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | ३१/०१/२०१७ | २१/०१/२०१७ | २०/१२/२०१७ |
| ५ | सौ आशा रमेश जगताप | २६/०४/२०१७ | १४/०२/२०१७ | १३/०१/२०१८ |
| ६ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | २६/०४/२०१७ | १६/०२/२०१७ | १५/०१/२०१८ |
| ७ | श्री राहुल प्रकाश आहोळ | २६/०४/२०१७ | २५/०२/२०१७ | २४/०१/२०१८ |
| ८ | कु प्राजक्ता दिपक जाधव | २६/०४/२०१७ | १८/०४/२०१७ | १७/०३/२०१८ |
| ९ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | २६/०४/२०१७ | २७/०४/२०१७ | २६/०३/२०१८ |
| १० | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | ०६/०५/२०१७ | ०७/०५/२०१७ | ०६/०४/२०१८ |
| ११ | कु कविता योसेफ पंडीत | १९/०७/२०१७ | १७/०७/२०१७ | १६/०६/२०१८ |

मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार, श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णरू क्र. १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देऊन सध्या त्यांना रू. १५,४००/- एकत्रित वेतन देण्यात येत आहे.

प्र.वैद्यकीय संचालक व प्र.वैद्यकीय अधिक्षीका यांनी अनुक्रमे दि. २६/१०/२०१७ व दि. २३/१०/२०१७ अन्वये उपरोक्त ११ महिने कालावधीसाठी कार्यरत परिचारक/परिचारीका यांचे ११ महिने नेमणूक कालावधीतील कामकाजाचा अहवाल खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

| अनं | नाव | अहवाल |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| २ | कु आशुमती संपत सदाफुले | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ३ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ४ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ५ | सौ आशा रमेश जगताप | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ६ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ७ | श्री राहुल प्रकाश आहोळ | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ८ | कु प्राजक्ता दिपक जाधव | संबंधित परिचारीका यांची दि. ०५.०६.२०१७ रोजी सिआरयु-१ विभागात नाईट ड्युटी असतांना त्यांचे वॉर्डमधील रूग्ण सौ घोडके शोभा यांचे सकाळी ६ वा. ब्लड सॅम्पल पाठविलेले नाही. तसेच दुसरे रूग्ण लक्कड रूषीकेश याला दि. ०५/०६/२०१७ रोजी सिआरयु-१विभागातून सिव्हीटीएस ओटी येथे पाठविले परंतु सदर रूग्णांच्या ब्लड फॉर्मवरती दुस-याच रूग्णांचे ब्लड सॅम्पल पाठविले याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून लेखी खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु त्यांचा लेखी खुलासा |

| | | |
|---|---|---|
| | | असमाधानकारक असल्याने उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षण म्हणून ठपका ठेवण्यात आलेला आहे. |
| ९ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १० | सौ रूथनिलेश श्रीवास्तव | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ११ | कु कविता योसेफ पंडीत | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयाकरीता सन २००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार परिचारक/ परिचारीका ची मंजुर पदसंख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | रूग्णालय | मंजुर पदे | | | भरलेली पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | एकुण | स्थायी | अस्थायी **(११ महिने)** | आऊटसोर्सिंग/ बाह्ययंत्रणेद्वारे | एकुण |
| १ | साईबाबा | १६० | ४० | २०० | १०३ | **०८** | ८३ | १९४ |
| २ | साईनाथ | १०२ | २५ | १२७ | ५१ | **०३** | ६१ | ११५ |
| | एकूण | २६२ | ६५ | ३२७ | १५४ | **११** | १४४ | ३०९ |

उपरोक्त परिचारक/परिचारीका यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे खालीलप्रमाणे रिट पिटीशन दाखल केलेले असुन त्यांचेवतीने ॲड अविनाश शेजवळ हे काम पहात असुन संस्थानचे वतीने ॲड नितीन भवर यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

| अ नं | परिचारक / परिचारीकांचे नाव | रिट पिटीशन क्र | मागणी |
|---|---|---|---|
| १ | कु प्राजक्ता दिपक जाधव | ६४२१/२०१६ | A] Call for record and proceedings.<br>B] Issue a writ of mandamus or any other appropriate writ, order or direction thereby directing the Respondent to pay the salary and arrears for the post of Staff Nurse meeting dated 20.11.2014 by the Managing Committee of Respondent No.1 within a stipulated period and for that purpose issue necessary writ, order of direction.<br>C] Issue a writ of mandamus or any other appropriate writ, order or directions thereby directing the Respondents to consider and decide the representation dated 17.05.2015 given by the petitioner for payment of salary and arrears of salary for the post of Staff Nurse (Annexed at Exhibit-F) within a stipulated period and for that purpose issue necessary writ, order or directions.<br>D] pending hearing and final disposal of present writ petition, issue an injuction in the nature of directions thereby directing the Respondents to pay |
| २ | कु कविता योसेफ पंडीत | ६४२२/२०१६ | |
| ३ | श्रीमती रूथ जॉन लोंढे (श्रीवास्तव) | ६४२३/२०१६ | |
| ४ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | ६४२४/२०१६ | |
| ५ | श्रीमती आशा दत्तात्रय कावळे | ६४२५/२०१६ | |
| ६ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ६४२६/२०१६ | |
| ७ | कु मनिषा स्टिफन आवारे | ६४२७/२०१६ | |
| ८ | श्री राहुल प्रकाश आहोळ | ६४२८/२०१६ | |
| ९ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | ६४२९/२०१६ | |
| १० | श्रीमती कांचन विनायक शिंदे | ६४३०/२०१६ | |
| ११ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | ६४३१/२०१६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | the salary to the petitioner in accordance with Decision No.1016 taken in meeting dated 20.11.2014 by the Managing Committee of Respondent No.1 and for that purpose issue necessary writ, order of directions.<br>E] Grant ad-interim relief in terms of prayer clause-(D)<br>F] Pass any and other just and equitable order in the interest of justice in favour of the petitioner. |

उपरोक्त अ.नं. १० श्रीमती कांचन विनायक शिंदे ह्या कामावरून गैरहजर असल्याने त्यांना दि. १८/१/२०१७ नंतर पुन्हा नेमणूक आदेश दिलेला नाही.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान-**

प्रति कर्मचारी एकत्रित मासिक वेतन रू. १५,४००/- याप्रमाणे एकुण रू. १,६९,४००/-.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या परिचारक / परिचारीकांचा नेमणूक कालावधी डिसेंबर २०१७ ते जुन २०१८ या कालावधीत टप्या-टप्प्याने संपुष्टात येत आहे.

अ.नं. ८ कु प्राजक्ता दिपक जाधव यांचे वर्तनुक व काम समाधानकारक असलेचे अहवालात नमुद नसल्याने त्यांचेबाबत तसेच इतर १० परिचारीका यांना पुन्हा नव्याने ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१०४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करुन त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता मंजुर आकृतीबंधाबाहेरील आवश्यक २४ परीचारीकांची पदावरील सेवा बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्स पध्दतीने) घेणेकामी शासन मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद-** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ – "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**मा व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-**

१) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५२५.

श्री साईबाबा हॉस्पिटल येथील न्युरो ओटीतील Recovery रूम, आर्थो ओटीमधील आर्थो Recovery व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करून, तेथे १० ते १२ बेडसचा आयसीसीयु वॉर्ड तयार

करणेस व याकामी येणा-या अंदाजे रू. ३,३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६२६.

श्री साईबाबा रूग्णालयातील नवीन Neuro ICU व SICU विभाग सुरू करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी आऊटसोर्स पध्दतीने घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत येऊन, नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेत यावी. मात्र तत्पुर्वी याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवही करणेत यावी, असे ठरले.

३) मा व्यवस्थापन समिती दि. ०६/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र २७७.

सध्या संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत श्री साईबाबा रूग्णालयातील प्रस्तावित न्युरो आयसीयू व एसआयसीयू साठी आवश्यक असलेले मनुष्यबळ घेणेकामीचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. याबाबतमा त्रिसदस्य समितीच्या दि. २८/१२/२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ६२६ अन्वयचे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३६.

संस्थान रूग्णालयांच्या मनुष्यबळ अहवालामध्ये अतिरिक्त कर्मचारी दर्शविणेत आलेले आहेत, यामुळे श्री साईबाबा रूग्णालयातील नव्याने सुरू करण्यात आलेल्या न्युरो आयसीयु व एसआयसीयुचे कामकाज रूग्णालयातील आहे त्याच कर्मचा-यांमधून करणेत यावे. फक्त ८ निवासी वैद्यकीय अधिकारी व ३० परिचारीका ही तांत्रिक पदे सध्याचे लेबर कंत्राटदारामार्फत तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी अथवा आकृतीबंधातील मंजूर पदांवर कायम नियुक्त्याहोईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत भरणेत यावे. तसेच स्थानिक विश्वस्तांनी कर्मचारी संख्या व प्रत्यक्ष काम याची पाहणी करावी, असे ठरले.

**प्रस्तावना**: मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५२५ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल येथील न्युरो ओटीतील Recovery रूम, आर्थो ओटीमधील आर्थो Recovery व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करून, तेथे १० ते १२ बेडसचा आयसीसीयु वॉर्ड तयार करणेस व याकामी येणा-या अंदाजे रू. ३,३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले. तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६२६ नुसार, श्री साईबाबा रूग्णालयातील नवीन Neuro ICU व SICU विभाग सुरू करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी आऊटसोर्स पध्दतीने घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत येऊन, नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेत यावी. मात्र तत्पुर्वी याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवही करणेत यावी, असे ठरले. निर्णय क्र ६२६ नुसार सिव्हील ॲप्लिकेशन नं ३७०७/२०१६ मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सादर करणेत आले होते त्यातील प्रेअर क्लॉज मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले होते.

"The applicant may please be permitted to carry out E-tender process for supply of manpower/ staff required for proposed Neuro ICU & SICU in Shri Saibaba Hospital and further permit the applicant to spend the amount required for carrying the above work.

The applicant may please be permitted to carry out E-tender process for supply of manpower/ staff required for proposed Neuro ICU & SICU in Shri Saibaba Hospital and further permit the applicant to spend the amount required for carrying the above work."

त्यावर दि. २३/०३/२०१६ रोजी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिला आहे.

"For the reasons stated in the application, the application is allowed in terms of prayer clause B and accordingly stands disposed of".

मा व्यवस्थापन समिती दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६२६ व मा मुं उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि २३/०३/२०१६ रोजीचा आदेश यानुसार कार्यवाही करणेकामी वेळ लागणार असल्याने व प्रस्तावती न्युरो आयसीयु व एसआयीयु विभाग तातडीने सुरू करणे गरजेचे असल्याने सध्या संस्थानला कुशल अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कर्मचारी घेणेचा प्रस्ताव मा व्यवस्थापन

समिती दि. ०६/०५/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र २७७ नुसार सध्या संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत श्री साईबाबा रूग्णालयातील प्रस्तावित न्युरो आयसीयू व एसआयसीयू साठी आवश्यक असलेले मनुष्यबळ घेणेकामीचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. याबाबतमा त्रिसदस्य समितीच्या दि. २८/१२/२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ६२६ अन्वये कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

तदनंतर, मा उच्च न्यायालयाचे दि. २३/०३/२०१६ रोजीचे आदेश वतत्कालीन मा त्रिसदस्य समितीच्या दि. २८/१२/२०१५रोजीच्या सभेतील निर्णयावर फेरचर्चा होऊन तातडीचीगरज म्हणून नियोजित न्युरोआयसीयु व एसआयसीयुसाठी आवश्यक्त असलेले निवासी वैद्यकीय अधिकारी-८, परिचारीका-३०, वॉर्डबॉय-८, आया-८, स्विपर-८ मनुष्यबळ आकृतीबंधातील शैक्षणिक पात्रतेनुसार संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ३६ नुसार, संस्थान रूग्णालयांच्या मनुष्यबळ अहवालामध्ये अतिरिक्त कर्मचारी दर्शविणेत आलेले आहेत, यामुळे श्री साईबाबा रूग्णालयातील नव्याने सुरू करण्यात आलेल्या न्युरो आयसीयु व एसआयसीयुचे कामकाज रूग्णालयातील आहे त्याच कर्मचा-यांमधून करणेत यावे. फक्त ८ निवासी वैद्यकीय अधिकारी व ३० परिचारीका ही तांत्रिक पदे सध्याचे लेबर कंत्राटदारामार्फत तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी अथवा आकृतीबंधातील मंजूर पदांवर कायम नियुक्त्या होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत भरणेत यावे. तसेच स्थानिक विश्वस्तांनी कर्मचारी संख्या व प्रत्यक्ष काम याची पाहणी करावी, असे ठरले.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील निवासी वैद्यकीय अधिकारी (आरएमओ) व ३० परिचारीका पदांची माहे नोव्हेंबर २०१७ मधील सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | पदनाम | मा डीन बी जे एम सी पुणे यांनी प्रस्तावीत केलेले पात्रता | मंजुर पदे | भरलेली पदे | | | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्थायी | ११ महिने | बाह्ययंत्रणे द्वारे | एकुण | |
| १ | निवासी वैद्यकीय अधिकारी | 1) Age not more than 45 yrs. Age relaxation of 5yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. 2) MBBS 3) Candidate having Clinical Experience or Publications will be given preference 4) MS-CIT 5) MMC /MCI Registration with renewal is mandatory | ४० | २३ | ०६ | ०० | २९ | ११ |
| २ | परिचारीका | 1) Age not more than 38 for open & 43 for Reserved category 2) B.Sc. Nursing /RGNM/ G.N.M with registered by the Indian Nursing Council/ Maharashtra Nursing Council 3) MS-CIT. | २०० | १०३ | ०८ | ८३ | १९४ | ०६ |

जा.नं.एसएसएस/वशी७ए/४८६८/२०१६ दि. २८/०३/२०१६ अन्वये १० आरएमओची बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंगने) सेवा घेणेकामी (ठेकेदारास) मंजुरी देणेत आलेली आहे.

सासंवि-१०३६/१७६०/प्र.क्र२१४/का.१६ दि. ३०/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संस्थानच्या आकृतीबंधामध्ये समन्वय अधिकारी हे पद मंजूर नसताना संस्थानने डॉ संजय पट्टीवार यांची समन्वय अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती ही नियमबाह्य असल्याने अशा प्रकारे आकृतीबंधाबाहेर जाऊन संस्थानस्तरावरच अधिकारी वा कर्मचा-यांच्या नियुक्त्या करू नयेत. भविष्यात अशा प्रकारे अनियमितता निदर्शनास आल्यास त्यासंदर्भात शासनस्तरावर गंभीर दखल घेण्यात येईल आणि अशा स्वरूपाच्या अनियमिततेबाबत कार्यकारी अधिकारी तसेच संस्थानच्या संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी. शासनस्तरावर झालेल्या अनियमिततेमुळे संस्थानला काही आर्थिक भुर्दंड सोसावा लागल्यास त्याचे दायित्व देखील कार्यकारी अधिकारी आणि संस्थानच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निश्चित करण्यात येईल. असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधात निवासी वैद्यकीय अधिका-यांची ४० पदे मंजुर असुन ११ पदे रिक्त आहेत. सदर ११ रिक्त पदावर निवासी वैद्यकीय अधिका-यांची सेवा कामगार विभागामार्फत बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) घेता येईल व परिचारीकांची २०० पदे मंजुर असुन ०६ पदे रिक्त आहेत. सदर ०६ परिचारीकांची सेवा कामगार विभागामार्फत बाह्ययंत्रनेद्वारे(आऊटसोर्सिंगने) घेता येईल.

तथापि एकुण ३० परिचारीकांची आवश्यकता असल्याने उर्वरित २४ परिचारीकांची सेवा बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) घेणेकामी विधी व न्याय विभाग यांची मान्यता घ्यावी लागेल.

सध्या बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) सेवा देत असलेल्या निवासी वैद्यकीय अधिकारी यांना मासिक रू. ४०,०००/- व परिचारीका यांना रू. १५,४००/- एकत्रित मासिक वेतन देण्यात येत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** आकृतीबंधाबाहेर जाऊन संस्थान स्तरावर स्टाफनर्स नेमणुक करता येत नसल्याने विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करावा लागेल.

**मागणी–** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये २४ परिचारीकांची सेवा बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) घेणेकामी विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करणे व त्यानुसार कार्यवाही करणे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधात निवासी वैद्यकीय अधिका-यांची ४० पदे मंजुर असुन ११ पदे रिक्त आहेत. सदर पदावर कामगार विभागामार्फत बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) सेवा घेता येईल.

परिचारीकांची २०० पदे मंजुर असुन ०६ पदे रिक्त आहेत. सदर ०६ परिचारीकांची कामगार विभागामार्फत बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) सेवा घेता येईल. तथापि एकुण ३० परिचारीकांची आवश्यकता असल्याने उर्वरित २४ परिचारीकांची सेवा बाह्ययंत्रनेद्वारे (आऊटसोर्सिंगने) घेणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१०५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता मंजुर असलेल्या आकृतीबंधाबाहेरील आवश्यक २४ परीचारीकांची पदावरील सेवा बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्स पध्दतीने) घेणेकामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक ०६.१२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०५१** दिनांक ०६.१२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१.** **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने छपाई करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकास कार्यादेश पारीत करणेबाबत.**

**अधिनियमः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

'श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील'

**प्रस्ताविकः-** मा.व्यवस्थापन समिती दि.०८.०९.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ७७३ अन्वये साठा संपत आलेली १८ पुस्तके पुर्नमुद्रणकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागणी करुन येणा-या अंदाजे रु.१,५९,३०,०००/- मान्यता देण्यात आलेली होती.

मंजूर प्रस्ताव ई-निविदा सूचना संस्थान संकेतस्थळावर, इकडील विभागातील प्रेसधारक यादीतील सर्व प्रिंटीग प्रेस यांना ईमेलव्दारे व शासकीय दराने दै. सार्वमत-अहमदनगर, दै. सामना-मुंबई, दै. दिव्य मराठी-औरंगाबाद व दै.पुढारी-पुणे येथील वर्तमानपत्रात प्रसिध्द देण्यात येऊन, अपलोडसाठी दि. २७.१०.२०१७ ते ०८.११.२०१७ पर्यंत असा १४ दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता. उक्त ई-निविदेसाठी परत दि.०९.११.२०१७ ते दि.१५.११.२०१७ अखेर ०७ दिवस जास्तीत जास्त निविदाकारांची स्पर्धा होणेकामी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मा. खरेदी समिती दि.२७.११.२०१७ रोजीची सभेतील ई-निविदेतील तांत्रिक बीड उघडून, निविदेतील अटी-शर्तीनुसार ०६ स्पर्धक निविदाकारांच्या पूर्वपात्रतेविषयक कागदपत्रांची छाननी केली असता, त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | पात्र /अपात्र |
|---|---|---|
| ०१ | मे. अक्षय एंटरप्रायझेस प्रा.लि., मुंबई | पात्र |
| ०२ | मे. संप्रती ऑफसेट, सोलापूर | अपात्र |
| ०३ | मे. सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि., मुंबई | पात्र |
| ०४ | मे. प्रवरा ऑफसेट, लोणी | पात्र |
| ०५ | मे. लोकमंगल प्रिंट अॅन्ड पॅक प्रा. लि., सोलापूर | पात्र |
| ०६ | मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर | पात्र |

**प्रस्तावः-** ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये ०५ पात्र निविदाकार यांचे मा. खरेदी समिती दि.०४.१२.२०१७ रोजीची सभेतील ई-निविदेतील व्यवसायिक बीड उघडलेबाबतचा निविदाकारांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | निट प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि., मुंबई | अक्षय एंटरप्रायझेस, मुंबई | प्रवरा ऑफसेट, मुंबई | लोकमंगल प्रिंट& पॅक प्रा लि., सोलापूर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सतचरित्र- कन्नड आवृत्ती क्र. १९ | ५०,००० | ५२.८० | **४७.००** | ६२.२० | ७४.५० | ५६.८० |
| ०२ | श्री साई सगुणोपासना- मराठी (पॉकेट साईज) आवृत्ती क्र.५५ | १,००,००० | ४.७० | **४.४१** | ५.५५ | ४.६० | ४.५० |
| ०३ | खापर्डे डायरी - हिंदी आवृत्ती क्र. ०९ | १०,००० | २३.४० | **१८.८०** | २१.८० | २५.०० | २६.४७ |
| ०४ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू (पॉकेट साईज) आवृत्ती क्र.०६ | १,००,००० | ४.३० | ३.२५ | ३.१० | २.८० | **२.६६** |
| ०५ | श्री साईनाथ रुद्रध्याय ११ वा अध्याय (पॉकेट साईज) – मराठी आवृत्ती क्र.१८ | १०,००० | ३.५० | ३.२९ | ६.९० | **२.७५** | ३.७४ |
| ०६ | श्री साईनाथ भजनमाला- मराठी आवृत्ती क्र. ०७ | १५०० | ४४.४० | ५१.५० | ६९.०० | ८०.०० | **४२.९०** |
| ०७ | मुलांचे बाबा- कन्नड आवृत्ती क्र. १६ | १०,००० | **७.००** | ७.५० | १०.५५ | ७.९५ | ९.०२ |
| ०८ | श्री साईनाथ सगुणोपासना- आरती कन्नड (पॉकेट साईज) आवृत्ती क्र.०१ | ५००० | १३.०० | **१२.३७** | २२.२५ | ४०.०० | १६.७७ |
| ०९ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू (पॉकेट साईज) भाष्य अनुवाद आवृत्ती क्र.०१ | ५००० | **४.८०** | ५.३० | १०.२५ | ६.०० | ५.१३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | खापर्डे डायरी – तेलगू<br>आवृत्ती क्र.०१ | ५००० | २५.०० | **२०.७८** | ३३.९० | ३२.०० | २७.६६ |
| ११ | प्रधान – इंग्रजी<br>आवृत्ती क्र. ०३ | ५००० | ०.०० | **८.३३** | १९.३५ | २०.०० | १०.५० |
| १२ | चार अध्याय-बंगाली<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. ०२ | ४००० | १६.०० | **६.५०** | १७.७५ | १३.०० | १२.११ |
| १३ | श्री साई सगुणोपासना -हिंदी<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. १० | ५०००० | ९.५० | **८.२२** | १२.९५ | १२.५० | ९.८२ |
| १४ | श्री साई सगुणोपासना - तेलगू<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. ०३ | ५०००० | १२.९० | **११.१५** | १४.९५ | १८.०० | १२.९९ |
| १५ | श्री साई सतचरित्र- हिंदी<br>आवृत्ती क्र. २८ वी | १,००,००० | ४६.३९ | **४२.५०** | ४८.२५ | ६३.०० | ४९.८० |
| १६ | श्री साई सतचरित्र- गुजराती<br>आवृत्ती क्र. १५ वी | ३०,००० | ४७.३४ | **४३.००** | ५१.९५ | ६१.०० | ४९.०० |
| १७ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी- मराठी<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. ४० वी | २,००,००० | ३.४० | २.४९ | ३.३५ | २.३९ | **२.३६** |
| १८ | श्री साई सतचरित्र- तेलगू<br>आवृत्ती क्र. २८ वी | ५०,००० | ५१.०० | **४६.५०** | ५७.५० | ७२.०० | ५२.६० |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** साठा संपत आलेले संस्थान प्रकाशित उपरोक्त तक्त्यातील १८ प्रकाशने (पुस्तके) पुर्नमुद्रण करणेकामी पुनर्मुद्रण विहित पध्द तीने छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदेतील तांत्रिक बीड (Technical Bid) मध्ये ०५ पात्र निविदाकार यांचे व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता, निम्नत्तम दर देऊ केलेल्या उक्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यात अधोरेखीत व गडद केलेले निम्नत्तम दर दर्शविण्यत आले असून, सदर निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना पुस्तके छपाई करुन पुरवठाकामाचे कार्यादेश पारित करणेसाठीचा विषय मा. उपव्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावित छपाईकामीच्या निम्नतम दरधारकांपैकी सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि., मुंबई हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या मुळ दरांवर सुट देणेस असमर्थतता दर्शविली. सभेने त्यांचेबरोबर छपाईबाबत चर्चा केली व संस्थान प्रकाशनांची विहीत वेळेत छपाई करुन पुरवठा करणेत यावा, याबाबत सुचना केल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साठा संपत आलेली प्रस्तावित संस्थान प्रकाशित प्रकाशने छपाई करुन घेणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनाकार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**०२. ऑनलाईन सर्व्हिसेस या वेबसाईटकरीता Primary 10 Mbps Link साठी राबविण्यात आलेल्या ई-निविदाप्रक्रियेअंतर्गत निम्नतम दरधारक निविदाधारक M/s Bharti Airtel Limited यांना चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणेस व त्यांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.25/02/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 48.

**प्रास्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार साईटेक प्रकल्प अंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या ऑनलाईन सर्व्हिसेस या वेबसाईटकरीता Primary 10 Mbps Internet Link पुरविणेसाठी पुरवठाधारकाची नेमणुक करणेकामी प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत खालील तपशिलाप्रमाणे 03 निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या असुन सदर ई-निविदांच्या तांत्रिक निविदा मा खरेदी समितीचे दि. ३०/०८/२०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत.

| अ.नं. | कंपनीचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| 01 | BHARAT SANCHAR NIGAM LIMITED | पात्र |

| | | |
|---|---|---|
| 02 | BHARTI AIRTEL LIMITED | पात्र |
| 03 | TATA TELESERVICES (MAH) LTD. | पात्र |

उपरोक्त उघडणेत आलेल्या तांत्रिक पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ईनिविदा मा. खरेदी समितीच्या दि. २७/११/२०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत. उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांचा तुलनात्मक दर तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| SI. No. | Description of Work / Item (s) | No. of Qty | Units | TATA TELESERVICES (MAH) LTD. | | BHARAT SANCHAR NIGAM LIMITED | | BHARTI AIRTEL LIMITED | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Bandwidth Charges/Annual Port Charges for 10 mbps Premium Uncompressed Internet lease line (1:1 Ratio, Full Duplex), for a period of Two Years, to be terminated in SSST, IT Dept. | | | | | | | | |
| 1.01 | One Time Installation Charges (OTC) | 1.00 | Lum Sum | 10000.00 | 10000.00 | 0.00 | 0.00 | 20000.00 | 20000.00 |
| 1.02 | First year Bandwidth Charges. (Without Tax) | 1.00 | Lum Sum | 270000.00 | 270000.00 | 280500.00 | 280500.00 | 180000.00 | 180000.00 |
| 1.03 | Socond year Width Charges (Without Tax) | 1.00 | Lum Sum | 270000.00 | 270000.00 | 280500.00 | 280500.00 | 180000.00 | 180000.00 |
| | | | | **Total** | 550000.00 | **Total** | 561000.00 | **Total** | **380000.00** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे Primary 10 Mbps Internet Link पुरविणेकामी M/s Bharti Airtel Limited यांनी देऊ केलेले दोन वर्षासाठीचे एकत्रित दर रक्कम रुपये ३,८०,०००/- + कर निम्नत्तम असल्याने त्यांना चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणेस व वाटा-घाटीअंती त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** Primary 10 Mbps Internet Link पुरविणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया अंतर्गत पात्र निविदाधारकांपैकी M/s Bharti Airtel Limited यांनी देऊ केलेले दोन वर्षासाठीचे एकत्रित दर रक्कम रुपये ३,८०,०००/- + कर निम्नत्तम असल्याने त्यांना याकामी चर्चा व वाटाघाटी साठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस व वाटा-घाटीअंती त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** Primary 10 Mbps Internet Link पुरविणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया अंतर्गत पात्र निविदाधारकांपैकी M/s Bharti Airtel Limited यांनी देऊ केलेले दोन वर्षासाठीचे एकत्रित दर रक्कम रुपये ३,८०,०००/- + कर निम्नत्तम असल्याने त्यांना चर्चा व वाटाघाटी साठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस व वाटा-घाटीअंती त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑनलाईन सर्व्हिसेस या वेबसाईटकरीता Primary 10 Mbps Link पुरविणेकामी M/s Bharti Airtel Limited यांचे दोन वर्षासाठीचे एकत्रित रु.३,८०,०००/- + कर मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**०३. श्री साईबाबा संस्थानचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-१८ साठी देणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्तावना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०८-२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३३ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे सर्व एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर व इतर यांचेकडून ईनिविदा मागविणेस तसेच मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२८-१०-२०१७ रोजी फ्री प्रेस जनरल, मुंबई व दि.२९-१०-२०१७ रोजी दै.पुढारी,पुणे व दै.प्रहार, मुंबई या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.३१-१०-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व ५६ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.३१-१०-२०१७ व दि.१३-११-२०१७ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०३ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.३०-१०-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.०१-११-२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २१-११-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. व तांत्रिक निविदा दि.२३-११-२०१७ अशी देण्यात आली होती.

ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. दि.२१-११-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये तीन ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.२७-११-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत निविदाधारकांसमक्ष उघडून निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी करण्यात आलेली आहे. निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी केल्यानंतर खालीलप्रमाणे तीनही निविदाधारक पात्र झालेले आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा संस्थानचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ साठी देणेकामी दि.२७-११-२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या पात्र तांत्रिक निविदाधारकांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| १ | मे.ओके एजन्सीज, मुलुंड, मुंबई | पात्र. |
| २ | मे.प्रेसिजन सर्व्हीस सेंटर, मुंबई | पात्र. |
| ३ | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई | पात्र. |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ साठी देणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ निविदा (कमर्शियल बीड) दि.०४-१२-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने ई-निविदेत दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.ओके एजन्सीज, मुलुंड, मुंबई | रु. १५,९२,२८६/- |
| २ | मे.प्रेसिजन सर्व्हीस सेंटर, मुंबई | रु. १४,७८,७०५/- |
| **३** | **मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई** | **रु. १३,८१,२२४/-** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा संस्थानचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ साठी देणेकामी दि.०४-१२-२०१७ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या कमर्शियल बीड नुसार मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचे दर न्युनतम येत असून त्यांचेशी मा.स्थानिक उप समितीचे सभेत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**श्री साईबाबा संस्थानमधील एअर सर्कीट ब्रेकरचे सन २०१७-१८ साठी वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी उपसमिती सभेसमोर चर्चेअंती एकत्रित रु.१३,५१,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमधील एअर सर्कीट ब्रेकरचे सन २०१७-१८ साठी वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचे चर्चेअंतीचे एकत्रित रु.१३,५१,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०४. **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-१८ साठी देणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्तावना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०८-२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३३ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भक्तनिवास, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम ए.सी. या वेगवेगळया परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर व इतर यांचेकडून ईनिविदा मागविणेस तसेच मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.३१-१०-२०१७ रोजी दै.नवकाळ,मुंबई, फ्री प्रेस जनरल, मुंबई व दै.पुढारी, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.३१-१०-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व ४९ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.०१-११-२०१७ व दि.१३-११-२०१७ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०३ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.३०-१०-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.०१-११-२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २१-११-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती व तांत्रिक निविदा दि.२३-११-२०१७ अशी देण्यात आली होती.

ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. दि.२१-११-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये तीन ई-

निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा दि.२७-११-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत निविदाधारकांसमक्ष उघडून निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी करण्यात आलेली आहे. निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी केल्यानंतर खालीलप्रमाणे तीनही निविदाधारक पात्र झालेले आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ साठी देणेकामी दि.२७-११-२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या पात्र तांत्रिक निविदाधारकांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| १ | मे.मधुनिल इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., नवी मुंबई | पात्र. |
| २ | मे.ट्रायडेन्ट सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे | पात्र. |
| ३ | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद | पात्र. |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ साठी देणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ निविदा (कमर्शियल बीड) दि.०४-१२-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने ई-निविदेत दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.मधुनिल इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., नवी मुंबई | रु. ४३,५५,०००.०० |
| २ | मे.ट्रायडेन्ट सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे | रु. ४०,१५,०००.०० |
| **३** | **मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद** | **रु. ३७,४६,४०६.९०** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ देणेकामी दि.०४-१२-२०१७ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या कमर्शियल बीड नुसार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे दर न्युनतम येत असून त्यांचेशी मा.स्थानिक उप समितीचे सभेत चर्चा/ वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१७-१८ साठी वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी उपसमिती सभेसमोर चर्चेअंती एकत्रित रु.३७,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१७-१८ साठी वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे चर्चेअंतीचे एकत्रित रु.३७,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०५. **फायर फायटरसाठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्तावना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-**मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०८-२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३४ अन्वये फायर फायटर साठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी येणा-या खर्चास व बाहेरील ठेकेदार/ पुरवठादार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ७,३५,५९३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२८-१०-२०१७ रोजी दै.पुढारी, मुंबई, व दै.पुण्यनगरी, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.२८-१०-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व ३९ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.३१-१०-२०१७ व दि.१३-११-२०१७ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०३ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.३०-१०-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.०१-११-२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २१-११-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. व तांत्रिक निविदा दि.२३-११-२०१७ अशी देण्यात आली होती.

ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. दि.२१-११-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये तीन ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा दि.२७-११-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत निविदाधारकांसमक्ष उघडून निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी करण्यात आलेली आहे. निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी केल्यानंतर खालीलप्रमाणे तीनही निविदाधारक पात्र झालेले आहे.

**मागणी:-**फायर फायटर साठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी दि.२७-११-२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या पात्र तांत्रिक निविदाधारकांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| १ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | पात्र. |
| २ | मे.हायटेक इलेक्ट्रीक इंजिनिअर्स, नाशिक | पात्र. |
| ३ | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कंपनी, अंबड, नाशिक | पात्र. |

उपरोक्तप्रमाणे फायर फायटर साठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ निविदा (कमर्शियल बीड) दि.०४-१२-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने ई-निविदेत दिलेले दर |
|---|---|---|
| **१** | **मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक** | **रु. ७,६७,३६०/-** |
| २ | मे.हायटेक इलेक्ट्रीक इंजिनिअर्स, नाशिक | रु. ८,१२,५००/- |
| ३ | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कंपनी, अंबड, नाशिक | रु. ७,८९,६५०/- |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** फायर फायटर साठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी दि.०४-१२-२०१७ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या कमर्शियल बीड नुसार मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे दर न्युनतम येत असून त्यांचेशी मास्थानिक उप समितीचे सभेत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**फायर फायटर साठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी उपसमिती सभेसमोर चर्चेअंती एकत्रित रु.७,५१,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर फायटर साठी ट्रॉली माऊंटेड ५० केव्हीए पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे चर्चेअंतीचे एकत्रित रु.७,५१,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०६. **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता Warmar Blanket खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील GICU/ ICCU/ CVTS O.T.-1 करीता प्रत्येकी ०१ नग व श्री साईनाथ रूग्णालयातील Surgical Ward या विभागाकरीता ०२ नग असे एकूण ०५ नग नवीन Warmar Blanket ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे. वॉर्डमध्ये काही औषधे दिल्यानंतर पेशंटला थंडी वाजून येते त्यावेळी पेशंटला उष्णतेची गरज असते अशा वेळी सदर मशीन व ब्लँकेटव्दारे रुग्णांच्या शरीराचे तापमान स्थिर ठेवले जाते. सदरहू विभागांमध्ये Warmar Blanket उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन ०५ नग Warmar Blanket ची मागणी केली आहे.

उपरोक्त विभागांसाठी ०५ नग Warmar Blanket खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून ई- मेलव्दारे अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांचे अंदाजे खर्चासाठीच्या दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी सरासरी रक्कम रु.५,०३,७८४/- (अक्षरी रू. पाच लाख तीन हजार सातशे चौ-याऐंशी मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१८७ अन्वये श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलमधील विविध वार्ड / विभागाकरीता ०५ नग नवीन Warmar Blanket विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,०३,७८४/- (अक्षरी रू. पाच लाख तीन हजार सातशे चौ-याऐंशी मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती व अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. सदरहू ऑनलाईन ई-निविदा दि.२४/०७/२०१७ ते दि.१०/०८/२०१७ या कालावधीत मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ०३ ई - निविदा प्राप्त झाल्या होत्या, परंतु खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे टिप्पणीन्वये प्रथम एक आठवडयाची म्हणजे दि.१४/०८/२०१७ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१५/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन देखील एकही ऑनलाईन निविदा प्राप्त झाली नाही, अशा प्रकारे सदरहू खरेदीकामी एकुण तीन ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

वरीलप्रमाणे जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या तीन ई-निविदा दि.३१/१०/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता करण्यात आलेला असून बायोमेडीकल इंजिनीअरींग विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून प्राप्त तीनही निविदाधारक तांत्रिक दृष्टया पात्र आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai |
| 02 | Shree Enterprises, Pune |
| 03 | South India Surgical Co. Ltd., Chennai |

वरीलप्रमाणे Warmar Blanket खरेदीकामी पात्र असलेल्या ०३ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.०३/११/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांचा थोडक्यात तपशिल पुढीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Supplier | No.of Qty. | Rate per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| **01** | **Shree Enterprises, Pune** | **05** | **95200.00** | **476000.00** |
| 02 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | 05 | 101070.00 | 505350.00 |
| 03 | South India Surgical Co. Ltd., Chennai | 05 | 156800.00 | 784000.00 |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Shree Enterprises, Pune यांचे दर निम्नत्तम येत असून त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु.४,७६,०००/- इतका खर्च येणार आहे.

तरी M/s.Shree Enterprises, Pune यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता Warmar Blanket खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. Shree Enterprises, Pune यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी उपसमिती सभेसमोर चर्चेअंती एकत्रित रु.४,६६,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता Warmar Blanket खरेदी करणेकामी M/s. Shree Enterprises, Pune यांचे चर्चेअंतीचे एकत्रित रु.४,६६,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**०७. श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Anaesthesia Machine with Ventilator खरेदी करुन जुने Boyles Anaesthesia Machine (L&T) परत (Buyback) करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाने दि.०२/०२/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये Anaesthesia Machine with Ventilator (Capable of Adult and Paediatric Ventilation) १ नगाची मागणी केलेली आहे. कॅथलॅब विभागामध्ये सध्या एक Boyles Anaesthesia Machine उपलब्ध असून ते सन २००५ मध्ये रक्कम रु.१,९०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनचा उपयोग भुल देण्याकरीता व शस्त्रक्रिया करताना कृत्रिम श्वासोच्छवास देण्याकरीता केला जातो. सदरहू मशिन व्यवस्थित कार्यान्वित आहे, परंतु ते व्हेन्टीलेटरसह नाही, त्यामुळे त्यांनी Anaesthesia Machine with Ventilator (Capable of Adult and Paediatric Ventilation) ची मागणी केलेली आहे. नविन मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चाची माहिती घेणेकरीता मे. ग्लोबल मेडीकेअर यांचेकडून सदर मागणी केलेल्या मशिन्सचे अंदाजे किंमतीचे दरपत्रक मागविले होते, त्यानुसार त्यांनी दिलेल्या दि.११/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये रक्कम रु.९,४५,०००/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लाख पंचेचाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.८०२४.६८ इतकी आहे. तसेच बायोमेडीकल विभागाने जुने L&T कंपनीचे मशिन बायबॅक करुन नविन Boyles Anaesthesia Machine with Ventilator मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यास अनुसरुन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाकरीता जुने L&T कंपनीचे Boyles Anaesthesia Machine परत (Buyback) करुन नविन Boyles Anaesthesia Machine with Ventilator विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.९,४५,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख पंचेचाळीस हजार मात्र) चे खर्चाचा प्रस्ताव दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यास निर्णय क्र.५०४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन पुरेश्या निविदा प्राप्त झाल्या नाहीत व खरेदीकामी तुलनात्मक दर मिळणेकामी कमीत-कमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.२५/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती व अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. सदरहू ऑनलाईन ई-निविदा दि.२४/०७/२०१७ ते दि.१०/०८/२०१७ या कालावधीत मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ०१ ई- निविदा प्राप्त झाली होती, त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे टिप्पणीन्वये प्रथम एक आठवडयाची म्हणजे दि.१४/०८/२०१७ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१५/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा मुदतवाढ देण्यात

आली होती, परंतु तरीदेखील एकही ऑनलाईन निविदा प्राप्त झाली नाही, अशा प्रकारे सदरहू खरेदीकामी एकुण एकच ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेली आहे.

जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेली ऑनलाईन एक ई-निविदा दि.३१/१०/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आलेला असून बायोमेडीकल इंजिनीअरींग विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून निविदाधारक तांत्रिक दृष्ट्या पात्र आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| **Sr.No.** | **Name of Supplier** |
|---|---|
| 01 | Excel Corporation, Nashik |

वरीलप्रमाणे खरेदीकामी पात्र ०१ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.०३/११/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेली असून त्यांनी देऊ केलेल्या दराचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Supplier | No.of Qty. | Rate per in Rs. |
|---|---|---|---|
| 01 | M/s.Excel Corporation, Nashik | 01 | 9,90,000.00 |
| | Buyback Value of old Machine | | 1,00,000.00 |
| | **Net Cost of New Machine** | | **8,90,000.00** |

वरीलप्रमाणे M/s.Excel Corporation, Nashik यांनी मशिनचे मुळ दर रु.९,९०,०००/- इतके दिलेले असून जुन्या मशिनची बायबॅक किंमत रु.१,००,०००/- इतकी दिलेली असून बायबॅक किंमत वजा जाता नविन मशिन खरेदीकामी रक्कम रु.८,९०,०००/- इतका खर्च येणार आहे.

तरी M/s. Excel Corporation, Nashik यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Anaesthesia Machine with Ventilator खरेदी करुन जुने Boyles Anaesthesia Machine (L&T) परत (Buyback) करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक M/s. Excel Corporation, Nashik आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी ई-मेलद्वारे ई-निविदेमध्ये दिलेल्या मुळ दरांवर २% सुट देऊ केली. ती स्विकारणेत आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Anaesthesia Machine with Ventilator खरेदी करुन जुने Boyles Anaesthesia Machine (L&T) परत (Buyback) करणेकामी M/s. Excel Corporation, Nashik यांचे चर्चेअंतीचे एकत्रित (रु.८,९०,०००/- या दरावर २% सुट) अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८. **श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामी ठेकेदारांकडून प्राप्त ई-निविदांचे उघडणेत आलेल्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम – मधिल संबंधित तरतूदी२००४-**

१. कलम १७ (२) खंड (झ) नुसार विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्यप्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी समिती करील.

२. कलम २१(२) (दोन) नुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी सहाय्य करणेची तरतूद आहे.

**प्रस्तावना**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ई-निविदा प्रक्रिया

राबविणेत आली. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करण्यात आला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.१८२ मधिल संस्थान मालकीचे जागेत Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचे प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावेत. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या एकूण रु.४.५ कोटी मात्रचे खर्चास व सदर कामासाठी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.

सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच प्रस्तावात नमूद केलेनुसार सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, तसे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेत यावे, असे ठरले."

याऐवजी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९ अन्वये खालीलप्रमाणे वाचण्यात यावेअसानिर्णय संमत करण्यात आला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा प्रत्येकी १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. याकामी संस्थानचे गट नं.१८२ मधील जागेमध्ये प्रथमत: संस्थानसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे व हा प्रकल्प यशस्वी झाल्यास शिर्डी नगपंचायतीचे मालकीच्या जागेमध्ये, त्यांचेसाठी संस्थानमार्फत १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत आली.

सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी सदरहू प्रकल्प उभारणी करतेवेळी त्यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५६ अन्वये सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९२ अन्वये मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवगत करणेत यावे, असे ठरले." त्यानुसार घनकचरा खत प्रकल्पासाठी लॅण्डफीलची व्यवस्था वगळून उर्वरीत कामांसाठी वर्तमानपत्रातील जाहिरातींव्दारे अशा प्रकारचे काम करणा-या ठेकेदारांकडून ईनिवीदा मागविणेत आल्या. दि.२१/११/२०१७ अखेर ई-निविदा अपलोड करण्याच्या अंतिम मुदतीत खालील ०३ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १ | Abhay Bio CNG Pvt. Ltd., Pune |
| २ | Enprotech Solutions, Pune |
| ३ | Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ई-निविदांचा तांत्रिक माहितीचा लिफाफा खरेदी समितीचे दि.२७/११/२०१७ रोजीचे सभेत उघडणेत आला आहे. तांत्रिक माहितीच्या तुलनात्मक तपशिलानुसार उपरोक्त ०३ पैकी Abhay Bio CNG Pvt. Ltd., Pune व Enprotech Solutions, Pune हे अपात्र झाले असून Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai हे ठेकेदार पात्र होत आहेत.

त्यामुळे दि.०४/१२/२०१७ रोजीच्या खरेदी समितीच्या सभेपुढे ठेकेदार Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांच्या निविदेचा वाणिज्यीक लिफाफा उघडणेत आला असुन त्यांनी सादर केलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **Design, Supply, Erection, Testing & Commissioning of 2 X10 TPD capacity Biomethanation Plant** | | | | |
| 1.1 | Mixed Solid Waste to **Biogas Plant** (Inclusive of Segregation Unit, Digester, Automation & Cloud based System, Process Cabin, Gas Balloon, Flare System, Set -up etc.) including civil Foundation required for installation of plant, including transportation, packing, forwarding and insurance etc. including all the applicable taxes and duties, including carryingout its operation and maintenance for a period of one year from the date of completion. etc. complete **(Capacity - 10 TPD)** | 2 | Nos. | 1,76,00,000/- | 3,52,00,000/- |
| 1.2 | **Bailing Machine** for recyclable including civil Foundation required for installation of plant, including transportation, packing, forwarding and insurance etc. including all the applicable taxes and duties,including all the applicable taxes and duties, including carryingout its operation and maintenance for a period of one year from the date of completion etc. complete **(Capacity- 5 TPD)** | 1 | Nos. | 20,21,000/- | 20,21,000/- |
| 1.3 | Providing and Laying **G.I. Pipe line** (3" dia. B Class) for biogas from 2 X 10 TPD Solid Waste processing Plant to Shri Sai Prasadalaya (approximate 1.5Km distance) as per the design based on generation of Biogas considering **10 Cum biogas per hour for one Burner** including Blower or Compressor & pressure vessel as per requirement etc. complete | 1500 | mtr. | 4,600/- | 69,00,000/- |
| | Total Amount for (1): | | | | 4,41,21,000/- |
| **2** | **Operation and Maintenance Cost-Considering Compost buyback by the Contractor** | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2.1 | Carrying out Operation and maintenance for 2 x 10 TPD Mixed solid waste processing plant along with bailing machine for the period of four years after expiry of initial O & M period of one years including labour, machinery, equipment's, chemicals and all applicable taxes etc. complete | 48 | Months | 5,75,000/- | 2,76,00,000/- |
| | Total Amount (2): | | | | 2,76,00,000/- |
| | **Total Amount :** | | | | **7,17,21,000/-** |

Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांनी सादर केलेल्या निवीदेतील दरानूसार १० TPD क्षमतेचे ०२ Biomethanation Plant, ५ TPD क्षमतेचे Bailing Machine तसेच मौजे निमगाव-को-हाळे गट नं. १८२ मधील नियोजीत बायोगॅस प्लांट ते श्री साईप्रसादालय किचन पर्यंत जी आय पाईप लाईन टाकणे व या प्रकल्पाचे एक वर्षाचे कालावधीसाठी देखभाल दुरुस्ती करणे या कामाकरीता निविदेमध्ये रक्कम रु.४,४१,२१,०००/- इतकी नमूद केली आहे. तसेच त्यापुढील चार वर्षांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.२,७६,००,०००/- इतकी रक्कम निविदेमध्ये नमूद केली आहे.

तरी उपरोक्त तपशिलानुसार ठेकेदार Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव जादा खर्चाचा असल्यामुळे, तो अंतीम निर्णयार्थ व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**त्यानुसार सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना, घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामीचे निम्नतम दरधारक ठेकेदार Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांचे प्रतिनिधी सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी समिती सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली व सभेसमोर सांगितले की, या घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायतीस शासनाकडून सवलत Gap Funding मिळू शकेल. तसेच या प्रकल्पामधून तयार होणारा गॅस प्रसादालयाचे उपयोगात येईल व निविदेमधील अटी/ शर्तीनुसार प्रकल्पामधून तयार होणारे खत त्यांना राहील.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामी Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांचे एकत्रित रु.७,१७,२१,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच या प्रकल्पास शासनाकडून शिर्डी नगरपंचायतीस Gap Funding मिळणेकामी ठेकेदाराने आवश्यक ते सहकार्य करावे व सदरहू Gap Funding संस्थानला वर्ग करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीसोबत MOU करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

०९. **श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी ठेकेदारांकडून प्राप्त ई-निविदांचे उघडणेत आलेल्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबासंस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :

अधिनियमकलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :**

०१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८८९

०२.मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३८

**प्रस्तावना:** सर्व्हे नं.१४८ पैकी मधील धर्मशाळा क्र.०१ व ०२ इमारतींमध्ये श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये सुरु करणेत आलेले आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांची दिवसेंदिवस संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे त्यामुळे मुलभुत सोयी-सुविधा फारच कमी पडत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत नि.क्र.८८९ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस् व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्सल्टंट श्री. बाल्टे, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांचेकडून घेण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी अंदाजपत्रकात आर. सी. सी. फ्रेम्ड स्ट्रक्चरमध्ये बांधकाम, प्लास्टर, व्हेट्रीफाईड टाईल फ्लोरींगव डॅडो (उंची ७') ॲल्युमिनिअम खिडक्या, ग्रेनाईट फ्रेमसह ॲल्युमिनिअम शटर, टॉयलेटमध्ये ग्रेनाईट फ्रेमसह पी.व्हि.सी. दरवाजे, जिप्सम प्लास्टर, आय. सी. यु. व कॉन्फरन्स हॉलसाठी फॉल्स सिलींग, जिन्याचे नुतनिकरण, आतिल भिंतीला लस्टर पेन्ट, बाहेरील बाजूने ॲपेक्स/ रिनोव्हो पेन्ट इत्यादी बाबींचा समावेश करुन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले होते.

| | | |
|---|---|---|
| ०१. | इमारत बांधकाम खर्च | : रु.४,५४,३५,७६७/- |
| ०२. | इलेक्ट्रीकल वर्क | : रु.४५,४३,५७७/- |
| ०३. | सोलर सिस्टम स्थलांतरीत करणे. | : रु.२,५०,०००/- |

वरीलप्रमाणे एकुण रु.५,०२,२९,३४४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेबाबतचा प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.३८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोंन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६७७ (०४) अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"*श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतमदरधारक क्लासिक असोशिएट, नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, चर्चेअंती त्यांनी सदरहू कामी रु४,२४,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी क्लासिक असोशिएट, नाशिक यांचे रु.४,२४,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस शिफारस होती.*

*परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना अशी चर्चा झाली की, श्रीसाईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी तयार करणेत आलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम खुपच जास्त असल्यामुळे सदरहूकामी बाजारभावापेक्षा जास्त दर प्राप्त झालेले आहेत, असे निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल याविषयाचे दि.११ऑगष्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकामध्ये "दिनांक२२ऑगस्ट, २०१७ पुर्वी स्विकृत करण्यात आलेल्या निविदा, मात्र कंत्राटा करिता कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत, अशा निविदा रद्द करणेबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी फेर ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले.*"

त्यानुसार याकामी दि. २५/०९/२०१७ रोजीच्या टिपणीव्दारे फेरनिविदा मागविणेत आल्या. दि. ०६/११/२०१७ अखेर ई-निविदा अपलोड करण्याच्या अंतिम मुदतीत खालील ०६ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १ | मे. एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपुर |
| २ | क्लासिक असोसिएट, नाशिक |
| ३ | आर. के. सावंत, नाशिक |
| ४ | श्री. दिलीप कारभारी जाधव, नाशिक |
| ५ | जे.के.कन्सट्रक्शन ॲण्ड कंपनी, |
| ६ | चंद्रगुप्त कन्सट्रक्शन, साकुरी, ता. राहाता |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ई-निविदांचा तांत्रिक माहितीचा लिफाफा खरेदी समितीचे दि.०९/११/२०१७ रोजीचे सभेत उघडणेत आला आहे. तांत्रिक माहितीच्या तुलनात्मक तपशिलानुसार उपरोक्त ०६ ठेकेदार पात्र आहेत. त्यानुसार दि.०४/१२ /२०१७ रोजीच्या खरेदी समितीच्या सभेपुढे ठेकेदारांचे निविदेचा वाणिज्यीक लिफाफा उघडणेत आला असुन त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव | निविदेत देऊ केलेल दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | में. एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपुर | रु. ४,०९,५३,२४९/- | |
| २ | क्लासिक असोसिएट, नाशिक | रु. ४,५३,५३,८३०/- | |
| ३ | आर. के. सावंत, नाशिक | रु. ३,९९,९७,१६२/- | निम्नतम |
| ४ | श्री. दिलीप कारभारी जाधव, नाशिक | रु. ४,९८,५८,७६६/- | |
| ५ | जे.के.कन्सट्रक्शन ॲण्ड कंपनी, | रु. ४,३३,४६,४०१/- | |
| ६ | चंद्रगुप्त कन्सट्रक्शन, साकुरी, ता. राहाता | रु. ४,९१,३१,१८६/- | |

उपरोक्त तपशिलानुसार ०६ निविदाधारकांपैकी आर. के. सावंत, नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी आर.के.सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.३,९९,९७,१६२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आर.के.सावंत, नाशिक हे सध्या मंदिर परिसरातील फ्लोअरींग नुतणीकरणाचे काम करत असून सदरहू फ्लोअरींग गुळगुळीत आहे व त्यांनी सदरहू फ्लोअरींगला ब्रशींग केलेले नाही, त्यामुळे अनंक साईभक्त या फ्लोअरींगवरुन पाय घसरुन पडतात, अशी तक्रार केली.**

**यावर चर्चा होऊन, संबंधीत ठेकेदाराने फ्लोअरींगचे केलेले काम समाधारक असल्याचे समिती सदस्यांनी नमुद केले. तसेच सर्व कामांचा दर्जा उत्कृष्ट राहील, याबाबत संबंधीत ठेकेदार व संबंधीत विभागाचे अधिकारी यांनी दक्षता घ्यावी, अशा सुचना करण्यात आल्या.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**१०. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामांसाठी ई-निविदेतील प्राप्त दरांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४मधील तरतुदः** अधिनियम कलम २१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

०१. नि. क्र.२५९ दि.२७०/३२०१/७

०२. नि.क्र.१००५ (०३) (२) दि.१४/११/२०१७

मा. शासन निर्णय :

०१. क्र. सासंवि-२००६/८७६/का.सोळा दि.०४/०९/२०१४ (अन्वये रु.८८ कोटी खर्चास मान्यता)

०२. क्र.सासंवि-२००६/८७६/प्र.क्र.१३१/का.१६ दि.०८/०६/२०१७ (अन्वये रु.३०.७५ कोटी खर्चास मान्यता)

प्रस्ताविक: शिर्डी नगरपंचायतीचे विनंती वरून शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्त्यांपैकी ०५ रस्त्यांची कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे / मुंबई यांचेमार्फत जुन, २०१२ मध्ये विकसीत करणेत आले आहे. सदर प्रकल्पातील उर्वरीत ०६ रस्त्यांपैकी रस्ता क्र.५ यारस्त्यांचे सुरुअसलेल्याकामासलगतच्या मालमत्ताधारकांनीघेतलेल्याहरकतींचे नगरपंचायतीकडून निवारण न झाल्याने व न्यायालयीन बाबींमुळे ठेकेदारयांनावाढीवमुदतीतही सदर कामपुर्णकरताआलेनाही. सदर रस्त्याचे एकुण १८०० मी.पैकी सुमारे ९०० मी. काम पुर्ण आहे. उर्वरीत सुमारे ९०० मी. अंतरातील खडीकरण काम पुर्ण असुन डांबरीकरण बाकी आहे. सदरचे काम पूर्ण करुन घेणेकामी ई-निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२५९ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

त्यानुसार रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामासाठी ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.०८/०६/२०१७ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी निम्नतम दराचे ठेकेदार मे. अमोल कन्स्ट्रक्शन ॲण्ड कंपनी, देवळाली प्रवरा यांना दि.०१/०९/२०१७ रोजी करार्यादेश देणेत आला होता. मात्र ठेकेदार यांनी त्यांचे निविदा दरावर अतिरीक्त जीएसटी रकमेची मागणी केली असल्याने, याकामी दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार फेर ई-निविदा मागविणेत आल्या असून, याकामी एकुण ०४ ई-निविदा अपलोड झाल्या असून, प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.२७/११/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडणेत आल्या. त्यांचे छाननी अहवालामध्ये चारही ठेकेदार पात्र होत असल्याने, दि. ०४/१२/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत ई-निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercal bid) घडणेत आला असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Bidder | Quted Amount | Remark |
|---|---|---|---|
| 01. | M/s. Amol Construction & Co., DevlaliPravara | 1,55,69,463.69 | |
| 02. | **M/s. S. K. Yewale, Sangamner** | **1,48,46,286.83** | **L-1** |
| 03. | Chandragupta Construction, Sakuri | 1,92,85,950.70 | |
| 04. | M/s. C. T. Dighe, Sangamner | 1,69,74,808.88 | |

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामासाठी प्राप्त झालेले दरामध्ये ठेकेदार M/s. S. K. Yewale, Sangamner यांनी देऊ केलेले दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे (रु.1,48,46,286.83) आहेत. तरी त्यांचे दर स्विकरणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करुन घेणेसाठी M/s. S. K. Yewale, Sangamner यांचे एकत्रित रु.१,४८,४६,२८६.८३ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**११. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी या संस्थेस संस्थान परिसरात पात्राणेगृह, क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, प्रसाद, नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थेडपेय विक्री स्टॉलसाठी जागा/ गाळे उपलब्ध होऊन मिळणेबाबत, त्यांचे दिनांक ०६.०९.२०१७ रोजीचे पत्र.**

**अधिनियमातील तरतूद**–श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव–** श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेस संस्थान मालकीच्या विविध ठिकाणच्या परिसरातील जागा/गाळे संस्थेला विविध प्रकारच्या व्यवसायासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत..

**प्रस्तावना -** मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडीनल जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१६२/२०१७ दि.०६/०९/२०१७ अन्वये संस्थान मालकीच्या विविध ठिकाणच्या परिसरातील जागा/गाळे पादत्राणेगृह,क्लोकरुम,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद,नॉव्हेल्टी,दूध व

दुधजन्य पदार्थ, थंडपेय विक्री स्टॉलसाठी भाडेतत्वावर उपलब्ध होवून मिळणेसाठी इकडेस विनंतीपत्र सादर केलेले आहे.

त्यास अनुसरुन इकडील दि.०७/१०/२०१७ व दि.३०/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये संबंधीत विभागांकडून सोसायटीने मागणी केलेली जागा/गाळे सोसायटीस भाडेतत्वावर देणेकामीचे अभिप्राय मागविणेत आले.त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी खालीलप्रमाणे इकडेस अभिप्राय सादर केलेले आहेत

| अ.नं. | सोसायटीने मागणी केलेले जागा/ गाळयाचे ठिकाण | जागा/गाळे वापराचे प्रयोजन | संबंधित विभागाचे नाव | उक्त सोसायटीस जागा/गाळे वापरासाठीचे विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम-०१ (H- विंगसमोर) | दुधजन्य पदार्थ,थंडपेय, व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर. | साईआश्रम-०१ (H- विंगसमोर) | साईआश्रम-१ या भक्तनिवास परिसरात ए ते जी या सात इमारत परिसरात सदर संस्थेस तीन गाळे भाडेतत्वावर दिलेले असुन पहाटे ०४ ते १२ या वेळेत सदर गाळयामध्ये निवासी परिसरात मोठया प्रमाणात साईभंक्ताची गर्दी असते. येथे सकाळचे वेळी एच ते एल या पाच इमारतीतील साईभक्तांना साबण, पिण्याचे पाणी, ब्रश, पेस्ट इ. आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध व्हावे या करीता तात्पुरत्या स्वरुपात एक स्टॉलची आवश्यकता आहे.तरी प्रशासकीय इमारतीचे (आर-ब्लॉक) दक्षिण बाजूस लांडू विक्री कांऊटर आहे. त्या शेजारील जागा संस्थान नियमाप्रमाणे प्रस्तावित केलेप्रमाणे सोसायटीचे मालकीचा एक स्टॉल वाढवावा. |
| २. | साईआश्रम-२ धर्मशाळा (श्री साईबाबा ज्यु.कॉलेजचे दक्षिण बाजूस) | दुधजन्य पदार्थ,थंडपेयविक्री स्टॉल | साईआश्रम धर्मशाळा | श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेजचे दक्षिण प्रवेशव्दारा जवळ दुधजन्य पदार्थ,थंडपेय, विक्री स्टॉलसाठी पार्किग परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन देता येईल. |
| ३. | व्दारावती भक्तनिवासस्थान | नॉव्हेल्टी स्टोअर | व्दारावती | नॉव्हेल्टी स्टोअर बरोबरच क्लोकरुम सुविधा उपलब्ध करुन देणेत यावी. |
| ४ | साईबाबा भक्तनिवासस्थान | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर | भक्तनिवासस्थान | भक्तनिवास - डी गाळा नं.२,३, व ४ यामध्ये यापुर्वी सोसायटी मार्फत नॉव्हेल्टी स्टोअर व प्रसाद स्टोअर चालविले जात होते.सद्यस्थितीमध्ये सदर गाळयाचा वापर लाडू विक्री कांऊटर, सा.भ.नि. गादी स्टोअर व कॅन्टीन विभाग या विभागीय कामासाठी होत आहे.तथापी पर्यायी व्यवस्था करुन सोसायटीस देता येईल. |
| ५. | श्री साईप्रसादालय | प्रसाद विक्री स्टोअर | श्री साईप्रसादालय | प्रसाद विक्री स्टॉलसाठी श्री साईप्रसादालय IN गेटजवळ एक स्टॉल करिता जागा दिलेली असुन सदर स्टॉल साईभक्तांस अपुरा पडत असल्यांने प्रसादालय परिसरात वाढीव जागा देणेस हरकत नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | साईप्रसाद निवासस्थान (सेवाधाम इमारतीमधील प.कडिल रुम नं.५४,५५ व ५६ मध्ये किंवा कानिफनाथ मंदिरासमोर सध्या असलेल्या सेवाधाम इमारतीचे रुममध्ये) | प्रसाद, नॉव्हेल्टी, थंडपेय व दुधजन्य पदार्थ. | साईप्रसाद निवास | सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील रुम नं.५४ हा संस्थान कर्मचारी श्री.नाना गुरुव यांना निवासाकरीता देण्यात आला आहे.रुम नं.५५ श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना (श्री.राजेद्र जगताप) यांचे कार्यालयासाठी देण्यात आला आहे. रुम नं. ५६ श्री साईनाथ कर्मचारी गृह तारण संस्थेसाठी देण्यात आला आहे. तसेच कानिफनाथ मंदिरासमोरील रुम नं.६८ व ६९ श्री साईबाबा कर्मचारी संघटना (श्री.रामराव शेळके) यांना देण्यात आले आहे.रुम नं.७० होमगार्ड कार्यालय व रुम नं.७१ एम.एस.ई.बी कार्यालयास देण्यात आले आहे. |
| ७. | मंदिर परिसर शनिमहाराज जवळील (पुर्वी शनिअप्पा यांचेकडे असलेला जागा/ गाळा) | तेल, रुईचा हार व प्रसाद विक्री | मंदिर विभाग | सदरची खोली सत्यनारायण महाप्रसादबनविणेकामी व प्रसाद सत्यनारायण हॉलपर्यत पोहच करणेकामी सोईचे असल्याने तसेच सत्यनारायण प्रसाद बनविणेकामी जवळपास कुठलेही जागा उपलब्ध नसल्याने जागा देता येणार नाही. |
| ८. | मंदिर विभाग (अब्दुलबाबा समाधीचे मागील बाजूस असलेला जागा/ गाळा ) | प्रसाद विक्री स्टॉल | मंदिर विभाग | अभिप्राय प्राप्त नाही. |
| ९. | शैक्षणिक संकुल | शालेय साहित्य अल्पदराने विक्री करणेसाठी | १.औ.प्र.संस्था, शिर्डी<br><br>२. इं.मि.स्कूल<br><br>३. कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | संस्थेच्या प्रांगणात एकही गाळा नाही. तथापि मोकळया जागेमध्ये गाळा सुरु करणेचे अनुषंगाने मुख्य गेटजवळ उपलब्ध जागेमध्ये सदर सोसायटीस जागा उपलब्ध करुन देता येईल.<br>शैक्षणिक संकुलाचे प्रवेशद्वार उत्तर बाजूचे भिंतीलगत पूर्व बाजूने स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल.<br>प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| १०. | श्री साईनाथ रुग्णालय (रुग्णालय परिसरातील कॅन्टीनसमोरील रिकामे जागेत) | जनरल स्टोअर,दुधजन्य पदार्थ,थंडपेय स्टोअर. | साईनाथ रुगणालय | श्री साईनाथ रुग्णालयात गाळा उपलब्ध नसुन चहा कॅन्टीन समोरच्या मोकळया जागेत सोसायटी स्टॉलसाठी जागा देता येईल. |
| ११ | साईनाथ मंगल कार्यालयाचे उत्तर पूर्व बाजूस | दुधजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल | लाडू व बर्फी निर्मिती विभाग | मंगल कार्यालयाचे आतमध्ये जागा उपलब्ध नाही. मात्र मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूस असणारी संरक्षक भिंत व मंगल कार्यालय यांच्यामध्ये लिंबाचे झाडाखाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | साधारणत: अंदाजे ८ फूट X १० फूटाची त्रिकोणी जागा उपलब्ध आहे. सदरील मोकळया जागेत साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी, शिर्डी यांना दुधजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल सुरु करण्यास इकडील विभागाची कोणतीही हरकत नाही. |

विभागाचा अभिप्राय **–अ)** (१) उपरोक्त अ.नं.६ साईप्रसाद निवासस्थान या इमारतीत सोसायटीस वापरास देणेसाठी सध्यस्थितीत गाळा/जागा उपलब्ध नाही. (२) उपरोक्त अ.नं.७ व ८ मंदिर परिसरात सुरक्षेच्या कारणास्तव यापूर्वी दिलेली जागा/गाळे खाली करुन घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे या बाबीचा पुन:श्च विचार करता येणार नाही.

**ब)** उपरोक्त अ.नं.१ साईआश्रम भाग-१, अ.नं.२ साईआश्रम-२ (धर्मशाळा),अ.नं.३ द्वारावती भक्तनिवास,अ.नं.५ साईप्रसादालय विभाग, अ.नं.१० साईनाथ रुग्णालय, अ.नं.११ साईनाथ मंगल कार्यालय परिसरात प्रत्येकी सुमारे १०X१० ची मोकळी जागा आणि अ.नं.९ शैक्षणिक संकुलात एकूण तीन ठिकाणी १०X१० आकाराची मोकळी जागा तसेच अ.नं.४ साईबाबा भक्तनिवासस्थान मधील तीन गाळयांचे मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडे निश्चिती करुन घेवून शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेने ११ महीन्यांचे कराराने सोसायटीस वापरास देता येतील.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.९६८ चे अनुषंगाने निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी या संस्थेकडे संस्थानचे किती गाळे वापरासाठी आहेत व आता त्यांची किती गाळयांची मागणी आहे, यासह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**१२. संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्यगटातील सहा रस्ते विकसन करणे कामाचे ठेकेदार टारमॅट लि. (पुर्वीची रोमन टारमॅट लि.)नवी मुंबई यांचे अंतिम बिलाबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम२१**(**२**)** अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे**.**

"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :** नि.क्र. ९७८ दि.१४/११/२०१७

**मा. शासन निर्णय :** क्र**.**१.सासंवि**-**२००६**/**८७६**/**का.सोळा दि**.**०४**/**०९**/**२०१४(रु.८८ कोटी)

२. सासंवि-२००६/८७६/प्र.क्र.१३१/का.१६ दि.०८/०६/२०१७ (रु.३०.७५कोटी )

**प्रस्ताविक:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०६ रस्ते संस्थान निधीतुन ठेकेदार रोमन टारमॅट लि**.,** नवीमुंबई यांचेमार्फत विकसित करणेत आलेले आहेत. ठेकेदार यांना देणेत आलेल्या एकूण सहा रस्त्यांपैकी शिर्डी नगरपंचायतीने कामासाठी हस्तांतरीत केलेल्या चार रस्त्यांचे उपलब्ध रुंदीत ठेकेदार यांनी मार्च २०१४ पर्यत काम पूर्ण केलेले आहे. भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या रस्त्यांचे भूसंपादन खर्चासह या प्रकल्पास येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे व रु.३०.७५ कोटी मात्रचे खर्चास दि.०८/०६/२०१७ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर प्रकल्पासाठी भूसंपादन खर्चासह आजपावेतो रु.७०**,**०७**,**८४**,**४९९/- मात्र इतका खर्च झालेला आहे. सदरहु प्रकल्पाचा तपशील खालीलप्रमाणे आहे**.**

| | |
|---|---|
| Name of Contractor: - | M/s. Tarmat Ltd. (M/s. Roman Tarmat Ltd). New Mumbai |
| Project Management consultant : - | Unison Project Management Pvt.Ltd. , Pune (Upto Jan.2015) |
| Resolution no. & date: - | Res.No.534 Date 04/07/2010 Rs.33,83,26,199/- |
| Work order-LOA No. & date: | 8498/2010 dated 19/07/2010 |
| Notice to proceed with the work No. & date: | 8837/2010 dated 06/08/2010 |
| Contract Value: - | Rs.33,83,26,199/-(10% below of Rs.37,59,17,999/-) |
| Date of commencement | 06/08/2010 |
| Time for completion: - | Fifteen Months |
| Scheduled date of completion | 06/11/2011 |
| Extended date of completion | March2012,May2013, December2013, April2014, June2014, 31st August 2015 |
| Final bill amount Rs. | Final bill -19,87,38,861/-<br>+ Price variation bill - 4,46,18,496/-<br>Total Amount =24,33,57,357/- |
| Paid Previous amount Rs. | R.A. bill no.9 -19,68,34,306/-<br>+ Price variation bil no.9 - 4,35,81,407/-<br>Total Amount = 24,04,15,713/- |
| Payable Amount Rs. | Final bill -19,04,555/-<br>+ Price variation bil- 10,37,089/-<br>Total Amount = 29,41,644/- |

ठेकेदार यांना देणेत आलेल्या खालील एकूण सहा रस्त्यांपैकी शिर्डी नगरपंचायतीने कामासाठी हस्तांतरीत केलेल्या चार रस्त्यांचे उपलब्ध रुंदीत ठेकेदार यांनी मार्च २०१४ पर्यंत काम पूर्ण केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| रस्ता क्र. | रस्त्याचे नांव / प्रकार | लांबी(मी.) | रुंदी(मी.) | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| ०६ | विकास योजनेतील १५ मि. रुंदीचा रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता ते आरक्षण क्र.३१ पोहच) | ५६५ | १५ | काम पूर्ण. |
| ०७ | विकास योजनेतील २४ मि. वळण रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते साई श्रध्दा हौसींग सोसायटी) | ४५० | २४ | काम पूर्ण. |
| ०८ | विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील १८ मि. रुंदीचा रस्ता | ४५० | १८ | काम पूर्ण. |
| ०३ | नांदुर्खी रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते नांदुर्खी शिव) कॉंक्रीटीकरण | १८७७ | १८ | सदर रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण असुन चेनेज क्र. १००० ते १२७५(डावी बाजू), चेनेज क्र.१००० ते १०८० (उजवी बाजू) व १६०० ते १८७७ या भागातील रस्त्याचे सुरु असलेल्या कामास लगतच्या मालमत्ताधारकांनी घेतलेल्या हरकतींचे नगरपंचायतीकडून वेळेत निवारण न झाल्याने दोन्ही बाजूचे रिटेनिंग वॉल, सर्व्हिस लेन व फुटपाथचे कामवगळता उर्वरीत काम पूर्णआहे. |
| ०५ | विकास योजनेतील १८ मीटर रुंद वळण रस्ता (आरक्षण क्र. ३१ ते | १८४० | १८ | एकूण १८४० मी. लांबीपैकी कनकुरी रस्ता ते नगर-मनमाड रस्ता या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाला क्र. ३४ पर्यन्त) - पश्चिम बाजू | | | दक्षिणेकडील भागातील ९०० मी. रस्त्याचे काम पूर्ण. उर्वरीत रस्त्याचे४६० मी. बी. बी. एम. चे काम पूर्ण झाले असुन राहिलेल्या ४८० मी.पैकी ३२० मी. भागात खडीकरण व १६० मी. भागात जी.एस. बी. चे काम झाले आहे. या रस्त्याचे सुरु असलेल्या कामास लगतच्या मालमत्ताधारकांनी घेतलेल्या हरकतींचे नगरपंचायतीकडून वेळेत निवारण न झाल्याने व न्यायालयीन बाबींमुळे ठेकेदार यांना वाढीव मुदतीतही सदर काम पुर्ण करता आले नाही. |
| ०९ | विकास योजनेतील १८ मिटर रुंदीचा रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते १८ मिटर रिंग रस्ता)-पुर्व बाजू | ८४० | १८ | लक्ष्मीनगर वसाहत १६५मी. व त्यालगत ३० मी. व चेनेज ८४० लगत २५ मी. भूसंपादनकरुन संस्थानकडे हस्तांतरीत करणेची कार्यवाही शिर्डीनगरपंचायती मार्फत वेळेत पूर्ण न झाल्याने सदर काम पुर्णकरता आले नाही. सदरचा भाग वगळता उर्वरीत रस्त्याचे काम पूर्ण. |
| ०९अ | रस्ता क्र. ०९ते रस्ता क्र. ०६ या भागातील वळण रस्ता. | १५०० | १८ | शिर्डीनगरपंचायतीमार्फत हस्तांतरीत करणेची कार्यवाही पूर्ण न झाल्याने रस्त्याचे काम सुरु करता आलेले नाही. |

ठेकेदार यांचे निविदेतील दर सन २००८-२००९ चे दरसुचीवर आधारीत आहेत. त्यामुळे ठेकेदार यांनी रस्ता क्र.०५ चे डांबरीकरणातील बाबींसाठी २०% दरवाढ व निविदेनुसार देय Price variation व काम पूर्ण करणेसाठी मुदतवाढ मागितल्याने मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी वेळोवेळी प्रस्ताव सादर करणेत आले आहेत.दरम्यानमा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेतील नि. क्र.६४४ खालीलप्रमाणे झाला.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना भूसंपादनासाठी रु.३०,७५,३३,१४५/- (+ प्रस्तावानुसार देय व्याजासह) मात्र वाढीव रक्कम देणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली. प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रस्ता क्र.५ विकसीत करणेसाठी भू-संपादन प्रक्रिया पुर्ण झालेली आहे, परंतु सदरहू कामाच्या खर्चाची रक्कम वाढलेली असल्याने संबंधीत ठेकेदार चालू डीएस.आर. प्रमाणे रस्त्याचे काम पुर्ण करतात का, याची विचारणा करण्यात यावी. तसेच ठेकेदाराने चालू डी.एस.आर. प्रमाणे काम करण्यास असमर्थतता दर्शविल्यास रस्ता क्र.५ सह शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेमधील ज्या रस्त्यांच्या भू-संपादनाची कार्यवाही पुर्ण झालेली आहे, असे सर्व रस्ते विकसीत करणेसाठी फेर ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले."

याबाबत ठेकेदार यांना इकडील दि.१०/१०/२०१६ राजीचे पत्रान्वये प्रचलित डी.एस.आर. प्रमाणे काम करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.१२/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये चालू डी. एस. आर. सन २०१६-१७ चे दराने काम करणेस सहमती दर्शविली असल्याने, *ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचे रनिंग बिल क्र.१० पोटी ॲडव्हान्स रु.१२,९९,८००/- मात्र अदा करणेस* लेखाशाखा विभागाकडे दि.०९/०२/२०१७ रोजी पाठविले असता, रोखपाल यांनी ठेकेदार यांचे बॅकेच्याखात्याबाबतचा अद्यावत तपशिल मागविला असता, ठेकेदार यांनी दि.२७/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये, खालीलप्रमाणे कळविले आहे.

'…we had requested you to release our all further payments through RTGS in our Account with Indian Bank, MARGO, Goa Branch as our account with other banks has been closed to this effect we are submitting the memorandum and articles of association which contains Gov. of India Ministry of Corporate Affairs Registrar of companies Maharashtra Mumbai's Certificate of change of our company name from *Roman Tarmat Limited to Tarmat Limited*.

ठेकेदार यांचे झालेले नांव बदलानुसार प्रशासकिय अधिकारी तथा मुख्यलेखाधिकारी यांचेकडे दि.२७/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी सादर केलेले नविन बॅंक खात्याबाबतचा तपशिल सादर केला असता, त्यावर त्यांनी "..कंपनीचे नांवात झालेले बदलाबाबत रजिष्ट्रार ऑफ कंपनीज्, महाराष्ट्र, मुंबई यांचे प्रमाणपत्राबाबत प्रत्यक्ष किंवा वेबसाईटवरुन खात्री करुन घेऊन कार्यवाही करता येईल असे निर्देश दिले. त्यानुसार वेबसाईटवरुन तसेच संस्थानचे मुंबई कार्यालयाचे प्रतिनीधी यांनी, भारत सरकार-कार्पोरेट कार्य मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयात समक्ष जाऊन माहिती घेतली आहे. त्याबाबत त्यांनी दि.११/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये कंपनीचे नांवात बदल झाला असल्याचे कळवून त्याची प्रमाणीत प्रत इकडील कार्यालयास सादर केली आहे."

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या प्रमाणीत प्रतीचे अवलोकन केले असता, Roman Tarmat Limited ऐवजी Tarmat Limited असा नांव बदल झाला असल्याने तसेच ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई यांनी सदरहू काम चालू डी. एस. आर. दराप्रमाणे काम करणेस सहमती दर्शविलेली असल्याने ली तरी त्यांचे विनंतीनुसार काम सुरु करणेपुर्वी खालील बाबींवर निर्णय होणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला.

१. कंपनीचे नाव रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि. करून टारमॅट लि. या नावाने सर्व बिले मिळावीत.
२. निविदेतील अट क्र.६०.२- बिलाची किमान रक्कम रु.२.५० कोटी असणेबाबतची अट शिथील करून रु. ३५ लक्ष करणे.
३. रनिंग बिलक्र.१० ची रक्कम रू.१७,३३,१४५/- लवकर अदा करणे.
४. दि.०१/०७/२०१४ ते १५/०८/२०१७ अखेर मुदतवाढ मिळणे.

त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील त्यावर निर्णय क्र.२५९ खालीप्रमाणे झाला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्ते विकसन करणे कामाचे ठेकेदार कंपनीचे नावात रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि. असा बदल झालेला असल्याने, त्यांचे विनंतीनुसार त्यांची देयके व अंतीम बीलाची रक्कम टारमॅट लि या नावाने आदा करणेत यावी. तसेच सदरहू ठेकेदाराने कंभमेळा-२०१५ चे कालावधीमध्ये वाहतुकीचे नियोजन व नियंत्रण करण्याच्या दृष्टीने रस्ता क्र.०५ चे काम केलेले असल्यामुळे त्यांना सदर कामासाठी दि.३१.०८.२०१५ अखेर मुदतवाढ देण्यात यावी व या रस्त्याचे (रस्ता क्र.०५) उर्वरीत काम समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर तातडीने करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने अल्प मुदतीच्या ई-निविदा मागविण्यात याव्यात."*

उपरोक्त निर्णयानुसार रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामासाठी ई-निविदा मागविण्यात येवून ठेकेदार अमोल कन्स्ट्रक्शन ॲड कं. देवळाली प्रवरा यांना कार्यादेश देण्यात आला होता. मात्र ठेकेदार यांनी अतिरिक्त जीएसटीची मागणी केल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००५(४) नुसार या कामासाठी दि.२२/११/२०१७ अखेर फेर निविदा मागविण्यात आल्या असुन ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयक्र.९७८ अन्वये खालीलप्रमाणे झाला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.१, २ व ४ या बांधकाम ठेकेदार यांची कामे पुर्ण झालेली असल्यामुळे त्यांच्या अंतीम बीलांची रक्कम संबंधीतांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच अ.नं.३ चे टारमॅट लि, नवी मुंबई या ठेकेदाराने काम पुर्ण करण्यास खुप विलंब केला आहे. त्यामुळे सदर विलंबाबाबत स्थानिक उपसमितीने छाननी करावी. त्यासाठी संबंधीत ठेकेदाराला उपसमिती सभेसमोर बोलवून त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे व स्थानिक उपसमितीच्या शिफारशीनंतर त्यांचे अंतीम बीलाबाबत पुढील व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल. "

**प्रस्ताव**: तरी ठेकेदार टारमॅट लि. (रोमन टारमॅट लि.) यांचेशी चर्चा होणेस तसेच भावफरक बिल रकमेसह अंतिम बिलाची रक्कम रु.२४,३३,५७,३५७/- मंजूर होवून यापुर्वी अदा करणेत आलेली रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम रु.२९,४१,६४४/- मात्र अदा करणेबाबत मा.उपसमितीचे सभेत निर्णय होऊन, मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेस निर्णयार्थ सादर.

**आजचे उपसमिती सभेत ठेकेदार टारमॅट लि., नवी मुंबई यांना देण्यात आलेली रस्त्यांची कामे पुर्ण करण्यात विलंब का झाला, याची माहिती घेण्यात आली. त्यामध्ये शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०६ रस्ते संस्थान निधीतुन ठेकेदार टारमॅट लि, नवीमुंबई यांचेमार्फत विकसित करणेत आलेले आहेत. ठेकेदार यांना देणेत आलेल्या एकूण सहा**

**रस्त्यांपैकी शिर्डी नगरपंचायतीने कामासाठी हस्तांतरीत केलेल्या चार रस्त्यांचे उपलब्ध रुंदीत ठेकेदार यांनी मार्च २०१४ पर्यत काम पूर्ण केलेले आहे. परंतु शिर्डी नगरपंचायतीकडून इतर ०२ रस्त्यांचे भूसंपादन होऊन, सदरहू रस्ते ठेकेदाराकडे उशीराने वर्ग केल्यामुळे ठेकेदारास या रस्त्यांची कामे करण्यास विलंब झाला. या इतर बाबींची उपसमितीने शहानिशा करुन वस्तुस्थिती समजून घेतली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्यगटातील सहा रस्ते विकसन करणे कामाचे ठेकेदार टारमॅट लि. (पुर्वीची रोमन टारमॅट लि.), नवी मुंबई यांचे भावफरक बिल रकमेसह अंतिम बिलाची रक्कम रु.२९,४१,६४४/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**१३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीमधील पार्ट-१९ मधील आयटमकरीता पुरवठाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेण्यास व उर्वरीत आयटमकरीता पुन्हा विहित पध्दतीने निविदा मागविणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीकामी दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०५/२०१७ पर्यंत निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन १४८ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या असून प्राप्त निम्नत्तम दरानुसार पुरवठा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले असून ज्या आयटमकरीता पुरेसे दर प्राप्त झालेले नाहीत, त्याकरीता दि.१४/०७/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.२४/०७/२०१७ ते १०/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. परंतु ब-याच निविदाधारकांनी दुध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदरहू ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१४/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून एकुण १६१ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या १६१ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यातील तांत्रिक बाबी वित्त विभागामार्फत तपासून घेण्यात आलेल्या असून त्यामधील पार्ट-१९ करीता एकुण प्राप्त ०७ निविदाधारकांपैकी खालीलप्रमाणे ०३ निविदाधारक पात्र होत आहेत–

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 01 | Cambindia Biotech Kits Pvt Ltd., Mumbai |
| 02 | Poly Medicure Ltd., Mumbai |
| 03 | Transasia Bio-Medicals Ltd.,Mumbai |

वरीलप्रमाणे उपरोक्त खरेदीमधील पार्ट-१९ करीता पात्र ०३ ऑनलाईन ई-निविदा दि.०६/०९/२०१७ रोजीचे मा.उपसमितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यामधील एकुण १६३ आयटमपैकी २० आयटमकरीता प्रत्येकी एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असून त्यामधील एका आयटमकरीता आपण केलेल्या मागणीमध्ये Strip ची मागणी असून निविदाधारकाने Liquid Form चे दर दिल्याने सदरहू आयटमचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत.

तथापि दि.१३/०९/२०१७ रोजी प्रशासकीय अधिकारी श्री.अशोक औटी व परचेस मॅनेजर श्री.कुणाल आभाळे व श्री.कपिल बालोटे, फार्मासिस्ट यांनी समक्ष DMER, Mumbai येथे जाऊन माहिती घेतलेली आहे, त्यामध्ये त्यांना खरेदीसंबंधी शंका विचारण्यात आल्या होत्या, त्यावर त्यांनी शंकाचे निरसन करुन खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे-

०१) खरेदीकामी जर एकच कोटेशन / निविदा / ई निविदा प्राप्त झाली तर काय करावे?-

- प्रथम निविदा प्रसिध्द करुन २१ दिवस निविदाधारकांना ई निविदा भरण्यासाठी मुदत देण्यात येऊन देखील जर तीन पेक्षा कमी निविदाधारकांनी निविदा अपलोड झालेल्या असल्यास एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात यावी

आणि तरी देखील तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात यावी आणि तरी देखील एकच निविदा प्राप्त झाली तर विभागाची (रुग्णालयाची) गरज पाहता एकच निविदा ग्राह्य धरुन तांत्रिक निविदा उघडण्यात येऊन खरेदीची कार्यवाही पूर्ण करावी असे त्यांनी सांगितले.

**विभागाचा अभिप्राय–** DMER, Mumbai यांचे कार्यपध्दतीनुसार ज्या ठिकाणी मुदतवाढ देऊनही एकच निविदा प्राप्त झालेली आहे, त्या ठिकाणी रुग्णालयाची सध्याची तातडीची गरज पाहता त्या स्विकारण्यात येऊन खरेदी करता येईल असे नम्र मत आहे. त्यामुळे DMER, Mumbai यांचेकडील कार्यपध्दतीनुसार पार्ट-१९ मधील १९ आयटमकरीता ई-निविदेतील प्राप्त दरानुसार खरेदीकामी पुरवठा आदेश देणेकामी संबंधित निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलवून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये सुट घेता येईल, तसेच उर्वरीत १४४ आयटमसाठी विहित पध्दतीने पुन्हा निविदा मागविता येतील.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक औषधे मधील पार्ट-१९ मधील १९ आयटमकरीता प्राप्त दरानुसार पुरवठा आदेश देणेकामी निविदाधारकांना आजचे समिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले असून चर्चा/ वाटाघाटी होऊन निर्णय होणेस व उर्वरीत १४४ आयटमसाठी पुन्हा विहित पध्दतीने निविदा मागविण्यास मान्यता असावी.

**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे/ सर्जिकल साहित्यातील पार्ट- १९ मधील आयटम खरेदीकरीता प्राप्त झालेल्या दरांमधील प्रस्तावात नमुद केलेल्या ०३ निम्नतम दरधारकांना आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. त्यामधील Cambindia Biotech Kits Pvt Ltd., Mumbai यांचे प्रतिनिधींबरोबर उपसमितीने दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी दर कमी न करता ०२ नग Blood Circulation Chair संस्थानला देणगी स्वरुपात देणार असल्याचे कळविले. Poly Medicure Ltd., Mumbai यांनी ते पुरवठा करणार असलेल्या आयटम्सच्या एकूण किमतीवर २% सुट देऊ केली व Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai हे पुरवठाधारक सभेसमोर अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे/ सर्जिकल साहित्यातील पार्ट- १९ मधील आयटम खरेदीकरीता Cambindia Biotech Kits Pvt Ltd., Mumbai यांनी निविदेमध्ये देऊ केलेले मुळ निम्नतम स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. Poly Medicure Ltd., Mumbai यांनी कोटेशनमध्ये दिलेल्या दरांवर २% कमी करुन, त्यांचे अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai यांना वैद्यकिय संचालक यांनी दर कमी करणेबाबत विचारणा करावी व त्याचेकडून प्राप्त होणारे अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये माहे डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमासाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

३) मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा अशी चर्चा झाली.

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९१५ खालीलप्रमाणे,

"उपरोक्त प्रस्तावातील कलाकारांबाबतच्या माहितीच्या तक्त्याचे अवलोकन करणेत आले व त्यामधील मोफत कार्यक्रम सादर करणा-या कलाकारांच्या कार्यक्रमांचा शताब्दी वर्षातील आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये समावेश करणेत यावा. तसेच ज्या कलाकारांनी मानधनाची रक्कम कळविलेली नाही, अशा कलाकारांचे मानधन शिफारस करणा-या समिती सदस्यांकडून माहिती घेऊन त्याचा खर्च तसेच इतर विनामुल्य पुरविणेत येणा-या सोयी-सुविधांवर होणारा खर्च याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा अशी चर्चा झाली.

त्यानुसार दि.१४/११/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय सादर करण्यात आले होते. यामध्ये दि.३१/१२/२०१७ साठी निर्णय क्र.९३७ अन्वये, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.३१/१२/२०१७ रोजी सायं.७ ते ९.३० पर्यंत श्री.रविंद्र साठे, मुंबई यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करुन त्यांना एकत्रित रु.२,००,०००/- मात्र मानधन देण्यात यावे व रात्री ९.३० ते १२ वाजेपर्यंत श्री.नीरज शर्मा, दिल्ली यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करुन त्यांना एकत्रित रु.५१,०००/- (सहयोगी कलाकारांचे मानधन व प्रवास खर्च) मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तथापि, श्री.रविंद्र साठे यांनी दि.२७/११/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे दि.३१/१२/२०१७ रोजी पुर्वनियोजित कार्यक्रमामुळे सदरचा कार्यक्रम घेऊ शकत नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदरच्या कार्यक्रमासाठी नव्याने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दि.२३/१२/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रत्येक दिवशी चार पर्याय खालील तक्त्यात नमूद केले आहेत. यामध्ये मानधन घेऊन सेवा देणारे व मोफत सेवा देणारे कलाकार यांची यादी नमूद केली आहे. या पर्यायांमधून प्रत्येक दिवसासाचे कार्यक्रमांसाठी एका कलाकारांची निवड करता येईल.

| अ. नं. | दिनांक | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | २३/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | रुपकुमार व सोनाली राठोड | मुंबई | 9004111102 श्री.जेनिश भट्ट | साईभजन संध्या | १० | - | स्वतंत्रपणे टिपणी सादर करण्यात आली आहे. |
| | | हमसर हयात निजामी | दिल्ली | 9818100108 | हिंदी साईभजन | १५ | ४,५०,०००/- | |
| | | कैलास हरे क्रिष्णा दास | नागपूर | 9545897308 | साईभजन | १२ | मोफत | |
| | | संजीव कुमार | दिल्ली | 7503766486 | साईभजन | १२ | मोफत | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | २४/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | अशोक हांडे | मुंबई | 9821082804 | हिंदी साईभजन | १५० | - | स्वतंत्रपणे टिपणी सादर करण्यात आली आहे. |
| | | दिपिका गील | दिल्ली | 9638951297 | साईभजन | १० | २१,०००/- | |
| | | मंगेश अमदूरकर | नागपूर | 8888111186 | साईभजन | २० | मोफत | |
| | | सचिन गुलाटी | खन्ना, पंजाब | 9780400417 | साईभजन | १० | मोफत | |
| ०३ | २५/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | साईलिला नाटक (हिंदी) मनोज शर्मा | बालाघाट (म.प्र.) | 9300984678 7000563395 | हिंदी नाटक | ४० | फक्त प्रवास खर्च १,२०,०००/- | |
| | | विशाखा पार्सेकर | मुंबई | 9820037478 | साई गितांजली | २५ | फक्त प्रवास खर्च १८,०००/- | |
| | | साबरी ब्रदर्स | बडोदा | 9974727852 | साई कव्वाली | १२ | मोफत | |
| | | पं. मनिष शर्मा | आग्रा | 9258023882 | साईभजन | ३० | मोफत | |
| ०४ | २६/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | आदीवासी कांबडवने व महिला फुगडी नृत्य मंडळ | शिंगणवाडी (लव्हाळ-वाडी) अकोले | 8600502580 | नृत्य व फुगडी | २० महिला व ३० पुरुष | फक्त प्रवास खर्च १५,०००/- | आदिवासी कलाकार असल्याने त्यांना कमीत-कमी प्रवास खर्च द्यावा असे वाटते. |
| | | डॉ.लक्ष्मीकांत सहकारी | गोवा | 7721020370 | शास्त्रीय गायन | १० | ४५,०००/- | |
| | | राजेश अय्यर | मुंबई | 9821562385 | भजन | २० | मोफत | |
| | | संजीव कुमार | दिल्ली | 7503766486 | साईभजन | १२ | मोफत | |
| ०५ | २७/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | अनंत पांचाळ | मुंबई | 9930126327 | हिंदी साईभजन | १५ | प्रवास खर्च २५,०००/- | |
| | | चामुंडेश्वरी फुगडी मंडळ | कुडाळ, जि.सिंधुदुर्ग | 9834604011 | लोकनृत्य | ५० | फक्त प्रवास खर्च ५०,०००/- | |
| | | धीरज पांडे | नागपूर | 9890071198 | हिंदी साईभजन | २० | मोफत | |
| | | दास अरुनी-माला मखीजानी | दिल्ली | 9899670465 | साईभजन | १० | मोफत | |
| ०६ | २८/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | हरिश ग्वाला | मुंबई | 9867491499 | हिंदी साईभजन | १० | प्रवास खर्च ४५,०००/- | |
| | | ओम श्री साईनाथ मराठी नाटक | मुंबई | 9820041182 | मराठी संगितमय नाटक | ५५ | १,२५,०००/- | |
| | | बादल बात्रा | नागपूर | 9579883339 | हिंदी साईभजन | १५ | मोफत | |
| | | शैला आचार्य | ठाणे | 9975731561 | भक्तीगीत | २५ | मोफत | |
| ०७ | २९/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | दिलीप शडंगी | रायपूर, छत्तीसगड | 7354454444 9437184763 | हिंदी साईभजन | २५ | फक्त प्रवास खर्च ३१,०००/- | |
| | | अनुपमा देशपांडे | मुंबई | 9820124795 | भजन | १२ | सहयोगी कलाकारांचा मानधन व प्रवास खर्च १,५०,०००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सप्तरंग चॅरीटेबल ट्रस्ट (डॉ.भारत जेठवाणी) | नांदेड | 9975025270 | लोकनृत्य | २० | मोफत | |
| | | सक्सेना बंधु | दिल्ली | 9810028192 | साईभजन | १० | मोफत | मा.विश्वस्त श्री.वाकचौरे सो. यांची शिफारस |
| ०८ | ३०/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | शुभदा बाम तांबट | नासिक | 9822281584 | सुगम संगित | १२ | २५,०००/- | |
| | | संदिप डांगे | मुंबई | 9833636657 | भक्तीगीत | १५ | ५०,०००/- | |
| | | श्री सच्चिदानंद आप्पा | मुंबई | 9820148678 | साईभजन | १० | मोफत | साईभक्त श्री.नारायण मुंदडा आयोजनाचा खर्च करणार आहेत. 9322114999 |
| | | साई आशिष | दिल्ली | 8800169694 | साईभजन | १० | मोफत | |
| ०९ | ३१/१२/२०१७ सायं.७ ते रा.९.३० | विजय साखरकर | मुंबई | 9821393323 9820215811 | साई-स्वर गीत संध्या | ३० | फक्त प्रवास खर्च ३५,०००/- | शालेय शिक्षणमंत्री मा.श्री.विनोद तावडे यांचे विकाअ श्री.सुनिल शिंदे यांची शिफारस |
| | | श्रावण (बाळा) झंगळे | मुंबई | 9664198852 | साई भजन | २५ | फक्त प्रवास खर्च २१,०००/- | |
| | | साई दृष्टी | मुंबई | 9867720308 | साईभजन | १२ | मोफत | |
| | | साई बंधु | लुधियाना | 8568951961 | साईभजन | १५ | मोफत | |

तरी माहे डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेत आले.**

| अ. नं. | दिनांक | प्राधान्य क्रम | प्रस्तावित कलाकाराचे नांव | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | २३/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | --- | रुपकुमार व सोनाली राठोड, मुंबई | साईभजन संध्या | १० | - |
| ०२ | २४/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | --- | अशोक हांडे, मुंबई | हिंदी साईभजन | १५० | - |
| ०३ | २५/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ०१ | विशाखा पार्सेकर, मुंबई | साई गितांजली | २५ | फक्त प्रवास खर्च १८,०००/- |
| | | ०२ | पं. मनिष शर्मा, आग्रा | साईभजन | ३० | मोफत |
| ०४ | २६/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ०१ | आदीवासी कांबडवने व महिला फुगडी नृत्य मंडळ, शिंगणवाडी, अकोले | नृत्य व फुगडी | २० महिला व ३० पुरुष | फक्त प्रवास खर्च १५,०००/- |
| | | ०२ | डॉ.लक्ष्मीकांत सहकारी, गोवा | शास्त्रीय गायन | १० | ४५,०००/- |
| ०५ | २७/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ०१ | चामुंडेश्वरी फुगडी मंडळ, कुडाळ, जि.सिंधुदुर्ग | लोकनृत्य | ५० | फक्त प्रवास खर्च ५०,०००/- |
| | | ०२ | धीरज पांडे, नागपुर | हिंदी साईभजन | २० | मोफत |
| ०६ | २८/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ०१ | शैला आचार्य, ठाणे | भक्तीगीत | २५ | मोफत |
| | | ०२ | बादल बात्रा, नागपुर | हिंदी साईभजन | १५ | मोफत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | २९/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ०१ | सक्सेना बंधु, दिल्ली | साईभजन | १० | मोफत |
| | | ०२ | सप्तरंग चॅरीटेबल ट्रस्ट (डॉ.भारत जेठवाणी), नांदेड | लोकनृत्य | २० | मोफत |
| ०८ | ३०/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ०१ | श्री सच्चिदानंद आप्पा, मुंबई | साईभजन | १० | मोफत |
| | | ०२ | साई आशिष, दिल्ली | साईभजन | १० | मोफत |
| ०९ | ३१/१२/२०१७ सायं.७ ते रा.९.३० | ०१ | विजय साखरकर, मुंबई | साई-स्वर गीत संध्या | ३० | फक्त प्रवास खर्च ३५,०००/- |
| | | ०२ | श्रावण (बाळा) झंळे, मुंबई | साई भजन | २५ | फक्त प्रवास खर्च २१,०००/- |

**उपरोक्त तक्त्यामधील तारखेनंतरच्या कॉलममध्ये नमुद केलेल्या प्राधान्यक्रमानुसार कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेत यावेत. प्राधान्यक्रमामधील नंबर ०१ चे कलाकार उपलब्ध नसल्यास नंबर ०२ चे कलाकारांचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा व दोन्हीही कलाकार उपस्थित नसल्यास प्राधान्यक्रमामधील इतर कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी कलाकारांनी मागणी केलेले मानधन/ प्रवास खर्च त्यांना आदा करणेस व या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे **.**

श्रीमती. योगिता अभय शेळके पा., नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी तथा विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी व चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांनी यापूर्वी सादर केलेल्या प्रस्तावांवर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २१२ अन्वये

“..शताब्दी वर्षाचे प्रसार व प्रचाराचे दृष्टीकोनातून शताब्दी वर्षात नगराध्यक्षा शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे प्रस्तावास अनुसरून दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करणेस व त्यासाठी संस्थानचा पाठिंबा असणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर स्पर्धेचे नियोजनासाठी चॅम्प एन्डयुरन्स पुणे, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व संस्थानची स्थानिक उपसमिती यांची साई मॅरेथॉन समिती स्थापन करण्यात यावी. या समितीने वेळोवेळी बैठका घेऊन स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी नियोजन करावे.”

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.१२/०५/२०१७ रोजी साई मॅरेथॉनसंबंधी संस्थानची स्थानिक उपसमिती व चॅम्प एन्डयुरन्स पुणे, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बैठक पार पडली. त्यात उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारस केली

"..दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित करावयाच्या साई आतंरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या अनुषंगाने चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचेबरोबर करावयाच्या करारनाम्यामध्ये मा. जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी सुचविलेल्या बाबींचा समावेश करणेत येऊन, सदरहू करारनाम्याचा मुसदा संस्थानचे विधि विभागाने अंतिम करावा.." असे ठरलेले आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.४१९ नुसार खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

" दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित करावयाच्या साई आतंरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या अनुषंगाने चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचेबरोबर करावयाच्या करारनाम्यामध्ये मा. जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी सुचविलेल्या बाबींचा समावेश करणेत येऊन, सदरहू करारनाम्याचा मुसदा संस्थानचे विधि विभागाने अंतिम करावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. त्याच बरोबर चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांनी इंटरनेट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे या कार्यक्रमाची जाहिरात करणेत यावी.

तसेच वेगवेगळया शहरांमध्ये प्रेस कॉन्फरन्स आयोजित करण्यात यावी व याबाबतची माहिति संस्थानला देत जावी. समाज विघातक जाहिरातीचा समावेश प्रायोजक म्हणून करणेत येऊ नये. तसेच चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांना नाव नोंदणीसाठी स्टॉल लावणेकामी संस्थान परिसरामध्ये (१६ गुंठे, प्रसादालय, निवास्थाने परिसर) जागेची पहाणी करून, तसा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांचे कडे सादर करावा व या स्पर्धेसाठी येणा-या स्पर्धकांना संस्थानच्या खोल्या सशुल्क राखीव ठेवायच्या असल्यास निर्धारित वेळेपूर्वी माहिती तंत्रज्ञान विभागास कळविण्यात यावे." असे ठरलेले होते.

तथापी दि.२०/०८/२०१७ रोजी चे मा.व्यस्थापन समितीचे बैठकीचे वेळी चॅम्प एन्डयुरन्स पुणे चे प्रतिनिधी श्री. रविंद्र वाणी तसेच श्री. अभय शळके पा. नगरसेवक यांनी मा. अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा. विश्वस्त यांचे सोबत झालेल्या चर्चेमध्ये दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेस प्रयोजक मिळत नसल्यामुळे जानेवारी किंवा फेब्रुवारी या महिन्यामध्ये या स्पर्धेच आयोजनासाठी प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले. तसेच मा. अध्यक्ष व मा. विश्वस्त यांनी याबाबत सदरहू साई मॅरेथॉन स्पर्धेस केंद्रीय मंत्री महोदय यांना निमंत्रीत करणेसाठी प्रयत्नकरावे. तसेच दुस-या आयोजकामार्फत मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करणेस संस्थानला मुभा राहील अशी सुचना मा. विश्वस्त श्री. माहेन जयकर सो. यांनी केलेली होती.

त्यानंतर आता चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांनी दि.०१ डिंसेबर, २०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषीत केलेल्या पत्रामध्ये दि.११ फेब्रुवारी, २०१८ रोजी साई मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन होणेस विनंती केलेली असून, या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून रिलायन्स जिओ हे घेत आहे. तसेच या स्पर्धेसाठी आतापर्यंत ८०० स्पर्धेकांनी रजिस्ट्रेशन केले असल्याचे नमूद केलेले आहे.

**प्रस्तावः-**

१) चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांनी उपरोक्त पत्रात विनंती केलेनूसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात साई मॅरेथॉन स्पर्धेचे दि.११ फेब्रुवारी, २०१८ रोजी शिर्डी येथे आयोजन होणेसाठी निर्णय होणेस विनंती.

२) मा. व्यस्थापन समितीने या स्पर्धेस मान्यता दिल्यास, यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे आयोजकांनी करारनामा तात्काळ अंतिम करणे व करारानामा केल्यानंतरच स्पर्धेचे पालकत्व संस्थान स्विकारणे यासाठी निर्णय होणेस विनंती.

३) चॅम्प एन्डुरन्स, पुणे यांनी दि.१०/०२/२०१८ ते ११/०२/२०१८ अखेर दोन दिवस व्दारावती भक्तनिवास मधील सर्व रुम सशुल्क मिळणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांनी दुरध्वनीद्वारे विनंती केलेली आहे. परंतू सदर रुम दि.१०/०२/२०१८ ते ११/०२/२०१८ रोजी द्यावयाचे झाल्यास यादिवशी शनिवार व रविवार येत आहे. त्यामुळे द्वारावती भक्तनिवास येथील रुम द्यावे किंवा साईआश्रम निवास्थान येथील रूम सशुल्क उपलब्ध करू दयावे याबाबत निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त बाबींचा साकल्याने विचार करता, चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचेमार्फत साई मॅरेथॉन स्पर्धेच दि. ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोजन होणेकरीता सदरहू प्रस्ताव मा. व्यस्थापन समितीचे सभेपूढे सादर.

**निर्णय क्र.१०५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्रबाबत उपराष्ट्रपती कार्यालयास मान्यतेसाठी पाठविणेकामी Dias Plan चा मसूदा अंतिम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी शताब्दी वर्षात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्ये एकाच वेळी राबविले जावेत तसेच संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे असा मा.व्यवस्थापन समितीचा मानस असलेने दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र साईनगर येथे आयोजित करणेत येत आहे.

त्यानुसार सदरहू चर्चासत्र कार्यक्रमाचे उदघाटन मा.उपराष्ट्रपती महोदय, भारत गणराज्य यांचे हस्ते आयोजित करणेत येत आहे. यास अनुसरुन डायस प्लॅनची माहिती उपराष्ट्रपती भवन यांना (ashok.dwan@nic.in) ई-मेल करावयाची आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**Proposed Dias Plan for the Stage Function of Hon'ble President of India.**

| D | C | B | A |
|---|---|---|---|

| 18 | 14 | 12 | 10 | 8 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 5 | 7 | 9 | 11 | 13 | 15 | 17 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**First Row**

1. Hon'ble Vice President
2. Hon.Special Invittee
3. Hon.Special Invittee
4. Hon.Special Invittee
5. Hon.Special Invittee
6. Hon.Special Invittee
7. Hon.Shri Suresh Haware, Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
8. Hon.Shri.Chandrashekhar Kadam, Vice Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
9. Hon.Smt.Yogita Shelke, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
10. Hon.Smt.Rubal Agarwal (IAS) CEO, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
11. Hon.Dr.Manisha Kayande, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
12. Hon.Shri Mohan Jaikar, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
13. Hon.Shri Pratap Bhosle, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
14. Hon.Shri Rajendra Singh, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
15. Hon.Shri Bhausaheb Wakchaure, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
16. Hon.Shri Bipindada Kolhe, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
17. Hon. Shri.Ravindra Mirlekar, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
18. Hon.Shri Amol Kirtikar, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.

**Second Row**

A) PSO to Hon. Vice President
B) ADC to Hon. Vice President
C) Secutrity Officer - 01
D) Secutrity Officer- 02

तरी, उपरोक्तप्रमाणे डायस प्लॅनचा मसूदा अंतिम करणेस व अंतिम झालेला मसूदा मा.उपराष्ट्रपती भवन यांना कळविणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित डायस प्लॅनचे अवलोकन करणेत आले व सर्व समिती सदस्यांना विचारणा करण्यात येऊन, जे समिती सदस्य उपस्थित राहू शकणार नाही, ते शेवटला ठेवण्यात यावे, त्याचबरोबर मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे हस्ते श्रींच्या टपाल तिकिटांचे प्रकाशन करावयाचे असल्यामुळे, मुख्य पोस्ट मास्तर जनरल, मुबई हे सदरहू कार्यक्रमास उपस्थित रहाणार आहेत, त्यांची डायसवर बैठकव्यवस्था करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्रबाबत उपराष्ट्रपती कार्यालयास मान्यतेसाठी पाठविणेकामी मिनिट टु मिनिट कार्यक्रमाचा मसूदा अंतिम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी शताब्दी वर्षात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्ये एकाच वेळी राबविले जावेत तसेच संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे असा मा.व्यवस्थापन समितीचा मानस असलेने दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र साईनगर येथे आयोजित करणेत येत आहे.

त्यानुसार सदरहू चर्चासत्र कार्यक्रमाचे उदघाटन मा.उपराष्ट्रपती महोदय, भारत गणराज्य यांचे हस्ते आयोजित करणेत येत आहे. यास अनुसरुन दि.२३ डिसेंबर २०१७ रोजीचा मिनिट टु मिनिट कार्यक्रमाची माहिती उपराष्ट्रपती भवन यांना (ashok.dwan@nic.in) ई-मेल करावयाची आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI.**
**Second Global Summit of Shri Sai Temple Trustees**
**Saturday 23 December, 2017**
**Minute to Minute Programme Schedule**
**Session –I**
**Inaugural Session**
**Time 11.00 am To 12.35 pm**

| Sr.No. | Programme | Participating Guest Speakers | Timings |
|---|---|---|---|
| Arrival and conduct towards dias | | | 11.00 to 11.02 am |
| 01 | Shri Sai Poojan & Deep Prajwalan | Hon'ble Guests | 11.02 to 11.07 am |
| 02 | Introductory Speech | Hon.Shri | 11.07 to 11.12 am |
| 03 | Felicitation | *01. Hon. Shri Venkayya Naidu<br>Vice President Republic of India<br>By<br>Hon.Shri Suresh Haware<br>Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 11.12 to 11.30 am |
| | | 02.Hon.Guest of Honour- 01<br>By<br>Hon.Shri.Chandrashekhar Kadam, Vice Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 03.Hon. Guest of Honour - 02<br>By<br>Hon.Shri Bhausaheb Wakchaure, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 04.Hon. Guest of Honour - 03<br>By<br>Hon.Shri Mohan Jaikar, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 05.Hon. Guest of Honour - 04<br>By | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Hon.Shri<br>Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 06.Hon. Guest of Honour - 05<br>By<br>Hon.Shri<br>Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| **05** | Speeches of Honble Guests | 01. Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 11.30 to 11.35 am |
| | | 02. | 11.35 to 11.40 am |
| | | 03. | 11.40 to 11.45 am |
| | | 04. | 11.45 to 11.50 am |
| | | 05. | 11.50 to 11.55 am |
| | | 06. Hon. Vice President Republic of India | 11.55 to 12.15 pm |
| **06** | Vote of Thanks | Hon. ----- | 12.15 to 12.20 pm |
| **07** | Departure | Shirdi Airport | |

तरी, उपरोक्तप्रमाणे मिनिट टु मिनिट कार्यक्रमाचा मसूदा अंतिम करणेस व अंतिम झालेला मसूदा मा.उपराष्ट्रपती भवन यांना कळविणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्रबाबत खालीलप्रमाणे मिनिट टु मिनिट कार्यक्रमाचा मसूदा अंतीम करण्यात येऊन, सदरहू मसुदा मा.उपराष्ट्रपती भवन यांना कळविणेस मान्यता देण्यात आली.**

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI.**
**Second Global Summit of Shri Sai Temple Trustees**
**Saturday 23 December, 2017**
**Minute to Minute Programme Schedule**
**Session –I**
**Inaugural Session**
**Time 11.00 am To 12.35 pm**

| Sr.No. | Programme | Participating Guest Speakers | Timings |
|---|---|---|---|
| Arrival and conduct towards dias | | | 11.00 to 11.02 am |
| **01** | Shri Sai Poojan & Deep Prajwalan | Hon'ble Guests | 11.02 to 11.07 am |
| **02** | Introductory Speech | Hon.Smt. Rubal Agarwal, IAS (CEO) | 11.07 to 11.12 am |
| **03** | Felicitation | *01. Hon. Shri Venkayya Naidu<br>Vice President Republic of India<br>By Hon.Shri Suresh Haware<br>Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 11.12 to 11.30 am |
| | | 02.Hon.Guest of Honour- 01<br>By Hon.Shri. Chandrashekhar Kadam, Vice Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 03.Hon. Guest of Honour - 02<br>By Hon.Shri Bhausaheb Wakchaure, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 04.Hon. Guest of Honour - 03<br>By Hon.Shri Mohan Jaikar, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| | | 05.Hon. Guest of Honour - 04<br>By Hon.Shri Bipindada Kolhe, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.<br>Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 06.Hon. Guest of Honour - 05<br>By Hon.Shri Pratap Bhosale, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.<br>Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | |
| **05** | Speeches of Honble Guests | 01. Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 11.30 to 11.35 am |
| | | 02. Hon. Leader of Opposition, Government of Maharashtra | 11.35 to 11.40 am |
| | | 03. Hon.Gaurdian Minister, Ahmednagar District | 11.40 to 11.45 am |
| | | 04. Hon.Chief Minister of Maharashtra State | 11.45 to 11.50 am |
| | | 05. Hon. Vice President Republic of India | 11.50 to 12.10 pm |
| **06** | Vote of Thanks | Hon.Shri.Chandrashekhar Kadam, Vice Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | 12.10 to 12.15 pm |
| **07** | Departure | Shirdi Airport | |

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **शिर्डी येथे दि.२३ डिसेंबर,२०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्राबाबत उपराष्ट्रपती कार्यालयास मान्यतेकामी पाठविणेकामी निमंत्रण पत्रिकेचा मसुदा अंतिम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी शताब्दी वर्षात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले आहेत. जगभरातील साई मंदीरामध्ये एकाच वेळी राबविले जावे तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवन कार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातारावरण राहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे असा मा. व्यवस्थापन समितीचा मानस असल्याने दि. २३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साई मंदीरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र साईनगर येथे आयोजित करणेत आले आहे. त्यानुसार सदर चर्चासत्र कार्यक्रमाचे उदघाटन मा. उपराष्ट्रपती महोदय, भारत गणराज्य यांचे हस्ते आयोजित करण्यात येत आहे. यास अनुसरुन दि. २३ डिसेंबर २०१७ रोजीचे कार्यक्रम पत्रिकेचा मसुदा खालील प्रमाणे.

**Invitaion**

Unforgettable and Memorable event of Shri Saibaba Mausoleum Centenary Festival is going to celebrate by Shirdi Villagers and Sai Devotees spread all over the world from 1st October 2017 to 18th October 2018. In this centenary year

various kind of Religious, Social and Cultural activities are organized by Shri Saibaba Sansthan, Trust, Shirdi. The Sansthan has organized The Global Temple Summit of the Chairman, Trustees and Officials of all the Sai Temples Worldwide on 23rd December 2017 to make them aware of all the activities going to happen in Shirdi throughout the year. The opening ceremony of the Global Temple Summit will be held in the presence of the following dignitaries. All of you are cordially invited for the opening ceremony.

**Second Global Summit of Saibaba Temple Trustees**

**Opening Ceremony**

**At the auspicious hands of**

**Hon.Shri.Venkaiah Naidu**

Vice-President India

**To be presided over by**

**Hon.----------------------**

**Guest Of Honour**

**Hon.---------------------** **Hon.---------------------**

| | |
|---|---|
| **Hon.---------------------** | **Hon.---------------------** |
| **Hon.---------------------** | **Hon.---------------------** |
| **Hon.---------------------** | **Hon.---------------------** |

On 23st December 2017 at 11.00 A.M.
At Sainagar Ground, Shirdi

**Organised by**

Shri Saibaba Sansthan, Trust, Shirdi.

| | |
|---|---|
| **Hon. Dr. Suresh Kashinath Haware**<br>Chairman | **Hon. Shri. Chandrashekhar Laxmanrao Kadam**<br>Vice-Chairman |
| **Hon. Dr. Manisha Shamsundar Kayande**<br>Member | **Hon.Adv. Mohan Motiram Jaikar**<br>Member |
| **Hon.Shri. Pratap Sakhahari Bhosle**<br>Member | **Hon. Shri. Rajendra Raja bali Singh**<br>Member |
| **Hon.Shri Bhausaheb Rajaram Wakchaure**<br>Member | **Hon. Shri. Bipindada Shankarrao Kolhe**<br>Member |
| **Hon.Shri, Riavndra Gajanan Mirlekar**<br>Member | **Hon. Shri. Amol Gajaanan Kirtikar**<br>Member |
| **SMT. Rubal Agarwal (I.A.S.)**<br>Chief Executive Officer | **Shri. Dhananjay Nikam**<br>Deputy Collector |
| **Shri. Manoj Ghode Patil**<br>Deputy Collector | **Dr. Sandip Aher**<br>Deputy Executive Officer |

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**निमंत्रण**

वैश्विक स्तरातील साईभक्तांना पुलकित करणारा व अविस्मरणीय असा श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत शिर्डी ग्रामस्थ व साई भक्तांच्या सहकार्याने साजरा केला जात आहे. या समाधी शताब्दी वर्षात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने देश विदेशातील सर्व साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांना वर्षभरातील कार्यक्रमांची माहिती होण्याच्या दृष्टीने दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. सदर चर्चासत्राच्या कार्यक्रमाचे उदघाटन खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे, या करिता हे आग्रहाचे निमंत्रण....!

**दुसरे जागतिक साई मंदीर विश्वस्त परिषद**

**उदघाटन समारंभ**

**शुभहस्ते**

**मा. श्री. व्यंकय्या नायडू**

उपराष्टपती भारत

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**मा.------------------**

**सन्माननीय उपस्थिती**

| | |
|---|---|
| **मा.------------------** | **मा.------------------** |
| **मा.------------------** | **मा.------------------** |
| **मा.------------------** | **मा.------------------** |
| **मा.------------------** | **मा.------------------** |

**दि. २३ डिसेंबर २०१७ रोजी सकाळी ११.०० वा.**

**स्थळ- साईनगर मैदान, शिर्डी**

**आयोजक**

**श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती, शिर्डी**

| | |
|---|---|
| **मा.डॉ. सुरेश काशिनाथ हावरे -** अध्यक्ष | **मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम-** उपाध्यक्ष |
| डॉ.मनीषा शामसुंदर कायंदे– सदस्य | ॲड. मोहन मोतीराम जयकर – सदस्य |
| श्री. प्रताप सखाहारी भोसले – सदस्य | डॉ. राजेंद्र राजा बली सिंह – सदस्य |
| श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे – सदस्य | श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे – सदस्य |
| श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर – सदस्य | श्री. अमोल गजानन कीर्तीकर – सदस्य |
| श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से. | श्री. धनंजय निकम- उपजिल्हाधिकारी |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, | श्री. मनोज घोडेपाटील- उपजिल्हाधिकारी |

डॉ. संदीप आहेर- उपकार्यकारी अधिकारी

तरी उपरोक्त प्रमाणे दि.२३ डिसेंबर २०१७ कार्यक्रमाचे पत्रिकेचा मसुदा अंतीम करणेस व अंतीम झालेला मसुदा मा. उपराष्ट्रपती यांना कळविणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे दि.२३ डिसेंबर,२०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्राबाबत उपराष्ट्रपती कार्यालयास मान्यतेकामी पाठविणेकामी प्रस्तावित निमंत्रण पत्रिकेमध्ये टपाल विभागाच्या विनंतीनुसार सन्मा. उपस्थितीमध्ये मुख्य पोस्ट मास्तर जनरल, मुंबई यांचा समावेश करणेत येऊन, पत्रिकेचा मसुदा अंतिम करणेत आला व राजशिष्टाचाराच्या नियमानुसार शासन स्तरावरुन पत्रिकेच्या मसुद्यामध्ये काही बदल सुचविल्यास तो सर्व समिती सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच सदरहू चर्चासत्र हे साईमंदिर प्रतिनिधींसाठी मर्यादित असल्यामुळे व त्यांनी कार्यक्रमात सहभागी होणेकामी विहीत नमुन्यामधील अर्ज दिलेला असल्यामुळे इतर मान्यवरांना पत्रिका देऊन निमंत्रीत करणेऐवजी केवळ १०० पत्रिका छापणेत येऊन, तेवढयाच मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **साईभक्त श्री. गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर यांना श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ निमित्ताने शिर्डी महोत्सव-२०१७ मध्ये ११ दिवस (दि.२३.१२.२०१७ ते दि.०२.०१.२०१८) या कालावधीत विनामुल्य विद्युत रोषणाई करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१७-१८ निमित्ताने शिर्डी महोत्सव-२०१७ मध्ये ११ दिवस (दि.२३-१२-२०१७ ते दि.०२-०१-२०१८) या कालावधीत भाडोत्री तत्त्वावर विद्युत रोषणाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२५-०७-२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५८१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार ई-निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahateders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. मात्र विहीत मुदतीत (दि.२१-११-२०१७ पर्यंत) एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे विद्युत विभागामार्फत दि.२२-११-२०१७ रोजी टिपणी सादर करुन भाडोत्री तत्त्वावर विद्युत रोषणाई करणेकामी Tender ID 2017_SAI_251330_1 या निविदेस प्रथम किमान एक आठवडयाची दि.२३-११-२०१७ ते दि. ०१-१२-२०१७ अखेर पहिल्या वेळेस मुदतवाढीस मान्यता घेण्यात आली आहे.

सदरील कामाकरीता जर पुन्हा एकही निविदा प्राप्त झाली नाही. तर ई-निविदा बोलावून, निविदा उघडणे, कार्यादेश देणे इ.कामाकरीता वेळ कमी असल्याने स्थानिक विद्युत रोषणाई करणारे डेकोरेटर्स यांचेकडून विनामुल्य स्वरुपात विद्युत रोषणाई करुन घेता येऊ शकते.

साईभक्त, श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर यांनी दि.१६-११-२०१७ रोजी संस्थानला पत्र पाठवून कळविले आहे की, शिर्डी महोत्सवामध्ये दि.२३-१२-२०१७ ते दि.०२-०१-२०१८ पर्यंत मंदिर व मंदिर परिसरामध्ये विनाशुल्क विद्युत रोषणाई करण्याची इच्छा असल्याने विद्युत रोषणाई करणेस परवानगी मिळावी.

**मागणी:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१७-१८ निमित्ताने शिर्डी महोत्सव-२०१७ मध्ये ११ दिवस (दि.२३-१२-२०१७ ते दि.०२-०१-२०१८) या कालावधीत श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर यांचेकडून मंदिर व मंदिर परिसरामध्ये विनाशुल्क विद्युत रोषणाई करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर यांना श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ निमित्ताने शिर्डी महोत्सव- २०१७ मध्ये ११ दिवस (दि.२३.१२.२०१७ ते दि.०२.०१.२०१८) या कालावधीसाठी विनामुल्य विद्युत रोषणाई करणेस परवानगी देणेत यावी. तसेच मंदिर परिसराच्या वॉल कंपाऊंडलाही साईभक्त श्री.गणेश शेटे यांचेमार्फत मोफत विद्युत रोषणाई करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **शिर्डी नगरपंचायत यांना देय असलेला सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(ज) मध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव–** शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना देय असलेला सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरणेबाबत.

**प्रस्तावना-** शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२८/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या एकूण १३४ मालमत्तेवरील संकलित कर,शिक्षण कर,रोजगार कर,वृक्ष कर व अग्निशमन कराची आकारणी मागणीची एकूण रक्कम रु.१,०२,६६,०७३/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख सहासष्ट हजार त्र्याहत्तर मात्र) इतकी कळविलेली आहे.

त्यानंतर शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०८/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर रक्कम १५ दिवसांचे आत नगरपंचायत कार्यालयास भरणा केल्यास नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम १५०(३) अन्वये १% सूट देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे संकलित करावर १% सूट रक्कम रु.५२,०१७/- इतकी वजा करुन एकूण रक्कम रु.१,०२,१४,०५७/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख चौदा हजार सत्तावन्न मात्र) चा भरणा नगरपंचायत कार्यालयात जमा करावा,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

सदर मालमत्ता कराची रक्कम नगरपंचायतला अदा करणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करण्यात आला. त्यावर निर्णय क्रं.७६७ प्रमाणे खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,असे ठरले की,संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस वेळोवेळी बराचसा निधी दिला जातो. याकरीता शिर्डी नगरपंचायतीने संस्थान इमारतींचा कर माफ करावा,असे त्यांना कळविणेत यावे."

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी,नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३६१४/ २०१७ दि.०५/१०/२०१७ अन्वये उक्त मालमत्ता कराची रक्कम माफ करणेबाबत कळविणेत आले. त्यास अनुसरुन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.नपं/टि.क्र./ ५/२४६/ २०१७ दि.१२/१०/२०१७ चे पत्रान्वये नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये नगरपंचायतीस कुठलाही कर माफ करता येत नाही. तरी नगरपंचायतीस त्वरीत सर्व कराचा भरणा करुन नगरपंचायतीस सहकार्य करावे, असे बाबत इकडेस कळविलेले आहे. त्यास अनुसरुन इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/ मालमत्ता/ ३९३९/ २०१७ दि.२७/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१७-१८ हे श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्ष असल्याने विशेष बाब म्हणून नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराची रक्कम माफ करावी, असेबाबत पुनश्च कळविलेले आहे. तरीदेखील मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नपं./ टे.क्रं ०५/२१०/२०१७ दि.०५/१२/२०१७ अन्वये नगरपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने महाराष्ट्र नगरपंचायती, नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये लागू केलेले कर हे शहरातील खाजगी,सहकारी यासोबतच केंद्र सरकारचे उपक्रम तसेच राज्य शासनाच्या मालमत्ता यांना देखील भरावे लागतात. शासनाद्वारे नगरपंचायतीला विकास कामासाठी भरीव निधी दिला जातो. या कारणास्तव शासनाला देखील स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर विशेष बाब म्हणून माफ होत नाहीत. यास्तव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना सदर करातून सूट देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. करामधून सूट देणेचा अधिकारच शिर्डी नगरपंचायतला नाही. संस्थानने कराची रक्कम विहित मुदतीत न भरल्याने महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषदांना व नगरपंचायतींना राज्यशासनाद्वारे पुरविण्यात आलेल्या संगणक प्रणालीमधील कमांडमुळे यापूर्वी संस्थानला दिलेल्या बीलामधील रकमेवर पुन्हा नव्याने व्याज आकारणी झालेली असून दि.०४/१२/२०१७ पर्यंत मालमत्ता व इतर करांची मुळ रक्कम रु.१,०२,६६,०७३/- ऐवजी रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची मुळ रक्कम रु,४,०७,२५३/- ऐवजी रु.४,११,३२६/- इतकी झालेली आहे. नगरपंचायत कराच्या रकमा विहित मुदतीत न भरल्यामुळे संगणक प्रणालीमध्ये या बीलामध्ये आपोआप व्याज व दंड व्याज रकमा वाढत जातात. सदर संगणक प्रणालीमध्ये कुठल्याही मानवी हस्तक्षेपाला वाव नाही व तसा अधिकारही शिर्डी नगरपंचायतीला नाही. सन २०१६-१७ पर्यंत संस्थानद्वारे नगरपंचायतीचे सर्व कर विहित वेळेत भरलेले आहेत. सबब या वर्षी संस्थानकडील संदर्भीय पत्रानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालमत्तांचा कुठलाही कर माफ करता येत नाही. आपण भरलेल्या सदर कर रकमांचा विनियोग शिर्डी नगरपंचायत शहरातील विकास कामांसाठीच करणार आहे यास्तव नगरपंचायत करांचा भरणा करुन किमान शिर्डी शहरातील विकास कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी योगदान देणे आवश्यक आहे, वगैरेबाबत नमूद केलेले आहे.

शिर्डी येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे मालकीची सर्वे नं१७१/१२ मधील संस्थानच्या ताब्यात असलेले भक्तनिवास इमारतीचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर व इतर कर शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी आकारणी करुन सदर मिळकत नं.बी १००१४९४ ची कराची रक्कम रु.४,०७,२५३/- इतकी बील नं.७४ दि.२२/०६/२०१७ अन्वये इकडेस कळविलेली आहे. सदर मिळकतीवर शिर्डी नगरपंचायतीने प्रथम कर निर्धारण केलेले असलेने सदर मिळकतीवर नगरपंचायतीने कोणत्या दराने व कोणत्या पध्दतीने कर आकारणी केलेली आहे,याबाबतची माहीती प्राप्त करुन घेणेकामी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/२६९९/२०१७ दि.१७/०८/२०१७ अन्वये कळविणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.वसुली/टिबल क्र.५/१८६/२०१७ दि.२२/०८/२०१७ अन्वये मालमत्ता आकारणी विवरणपत्र व मुल्य दरांचे तक्ते

अवलोकनार्थ सादर केलेले आहेत.सदर विवरणपत्राचे अवलोकन केले असता उपरोक्त मिळकतीचा वापर नगरपंचायतने वाणिज्य या कारणासाठी दर्शविलेला असून त्या दराने कर आकारणी केलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीची नगरपंचायत कराची रक्कम अवास्तव दिसून येते.

१) वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे मालकीचे सर्वे नं१७१/१२ मध्ये संस्थानचे निधीतून करणेत आलेले बांधकाम हे बसस्थानक व भक्तनिवास इमारतीसाठीचे आहे व सदर बांधकामाची परवानगी बसस्थानक व भक्तनिवास यासाठीच मिळालेली आहे. त्याप्रमाणे संस्थानने उक्त बांधकामातील भक्तनिवास हे भाडेपट्टयाने घेतलेले आहे. म्हणजेच संस्थानने भाडेपट्टयाने घेतलेल्या मिळकतीचे

प्रयोजन हे भक्तनिवास म्हणजेच रहिवास या कारणासाठीचे आहे. परिणामी सदर मिळकतीचा कर हा रहिवास कारणासाठी असलेल्या दरानेच कराची आकारणी करणे विधीग्राहय आहे.

२) महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ चे नियम १०(२) मध्ये जी कोणतीही इमारत किंवा जमीन निव्वळ शैक्षणिक किंवा धार्मिक कारणासाठी किंवा विनामुल्य वैद्यकिय कारणासाठी सेवा देण्यासाठी वापरण्यात येत आहे अशा इमारती किंवा जमीनींना नियम ४ व ५ नुसार असेल त्या कराच्या दराच्या निम्म्या दराने कर आकारणी होईल,अशी तरतुद आहे.

उक्त मिळकत ही भक्तनिवास या प्रयोजनासाठी म्हणजेच धार्मिक कारणासाठी वापरण्यात येणार आहे. यास्तव नियम ४ व ५ नुसार असेल त्या कराच्या दराच्या निम्म्या दराने कर आकारणी होणे आवश्यक आहे. तथापि नगरपंचायतीने या बाबीचा विचार केलेला दिसून येत नाही.

३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२७ भोगवटाखालील नसलेल्या मालमत्तेच्या बाबतीत अंशत: माफी (१) मध्ये कोणत्या इमारतीवर किंवा जमीनीवर वर्षावर्षाने कर द्यावयाचा असेल किंवा जिच्याबद्दल वर्षावर्षाने किंवा हप्त्याने विशेष स्वच्छता कर द्यावयाचा असेल अशी कोणतीही इमारत किंवा जमीन सबंध वर्षभर किंवा वर्षाच्या ज्या भागाबद्दल असा कर आकारणी योग्य असेल त्या भागाच्या कालावधीत किंवा ज्या कालावधीबद्दल असा हप्ता द्यावयाचा असेल त्या सबंध कालावधीत रिकामी राहीलेली असेल व तिच्यापासून भाडयाचे उत्पन्न मिळत नसेल तर नगरपालिकेने यथास्थिती अशा कराच्या किंवा कराच्या हप्त्याच्या रकमेच्या १/२ हून अधिक नसेल इतक्या रकमेची माफी किंवा परतावा दिला पाहीजे,अशी तरतूद आहे.

उक्त मिळकतीचा वापर अद्यापपावेतो सुरु करण्यात आलेला नाही. सदरची मिळकत ही सध्यस्थितीत रिकामीच आहे. नगरपंचायतीने सदरची बाब विचारात न घेता उपरोक्तप्रमाणे मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे.उपरोक्त तीनही मुद्यांबाबत नगरपंचायतीस इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३८८०/२०१७ दि.२५/१०/२०१७ अन्वये कळविणेत येवून मिळकत कराचे दुरुस्त बील इकडेस सादर करणेबाबत कळविलेले आहे. तथापि अद्यापपावेतो नगरपंचायतीने प्रस्तुत मिळकतीचे कराचे दुरुस्त बील इकडेस सादर केलेले नाही.

**विभागाचा अभिप्राय –** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६७ प्रमाणे संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस वेळोवेळी बराचसा निधी दिला जातो. याकरीता शिर्डी नगरपंचायतीने संस्थान इमारतींचा कर माफ करावा,असे त्यांना कळविणेत यावे,असेबाबत निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे नगरपंचायतबरोबर पत्रव्यव्हार केलेला आहे. तरीदेखील मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी उपरोक्त दि.०५/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मालमत्ता व इतर करांची मुळ रक्कम रु.१,०२,६६,०७३/- वरील व्याजासह होणारी रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची मुळ रक्कम रु,४,०७,२५३/- वरील व्याजासह होणारी रक्कम रु.४,११,३२६/- इतकी नगरपंचायतीकडे भरणा करणेबाबत कळविलेले आहे.

यास्तव उपरोक्त मालमत्ता कराची सन २०१७-१८ या वर्षाची व्याजासह होणारी कराची रक्कम रु.१,०३,६८,७३१/- इतकी व परिवहन महामंडळाचे इमारतीची व्याजासह होणारी कराची रक्कम रु.४,११,३२६/- इतकी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेकामीच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.१०५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या वर्षाच्या संस्थानच्या मालमत्ता कराची रु.१,०२,६६,०७३/- मात्र रक्कम व परिवहन महामंडळाचे इमारतीच्या मालमत्ता कराची रु,४,०७,२५३/- मात्र रक्कम शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या रकमांवरील दंडनीय व्याजाची आकारणी न करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **जय गुरु साई फाऊंडेशन यांना गणपती नवग्रह संहिता दत्त होम व सहस्त्र ज्योती लिंगार्चन पूजा कार्यक्रमाचे परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** जय गुरु साई फाऊंडेशन यांनी यापुर्वीही संस्थान हद्दीमध्ये सहस्त्र ज्योती लिंगार्चन पूजा कार्यक्रम व दिपोत्सव कार्यक्रम करणेबाबत परवानगी मागितली होती. त्यावेळी जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांचेमार्फत श्रीसाईबाबांची पालखी मिरवणूक कार्यक्रमास परवानगी दिल्यास शिर्डीत इतर हजारो पालख्या वर्षभर येत असतात. अशा कार्यक्रमास दुस-या पालख्याही परवानगी मागण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही एक प्रथा

पडेल व यामुळे संस्थान/ मंदिराच्या रुढी-परंपरांवर विपरीत परिणाम होतील, बंधने येतील. तसेच भक्तांच्या भावना दुखावल्या जातील, याचा विचार करता जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना पालखी मिरवणूकीस परवानगी देऊ नये, असे विधी विभागाने कळविले होते. त्यावेळी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१७चे सभेतील निर्णय क्र.९५० नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, जय गुरु फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना सहस्त्र लिंगार्चन पूजा कार्यक्रम करणेसाठी द्वारकामाई मंदिरासमोरील खुल्या नाट्यगृहाची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी असे ठरले होते.

**प्रस्ताव-** जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांनी दि.०७/१२/२०१७ चे पत्रान्वये दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी त्यांचेमार्फत १०० साईभक्त शिर्डी येथे शताब्दी महोत्सवानिमित्त गणपती नवग्रह संहिता दत्त होम व सहस्त्र ज्योती लिंगार्चनअसे धार्मिक कार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तरेकडील सारंजाम बागेच्या मोकळया जागेमध्ये करणेबाबत परवानगी मागितली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** अर्जदार जय गुरु फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांनी समाधी मंदिराचे उत्तरेकडील सारंजाम बागेच्या मोकळया जागेमध्ये श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्त दि.२३/१२/२०१७ रोजी गणपती नवग्रह संहिता दत्त होम व सहस्त्र ज्योती लिंगार्चन असे धार्मिक कार्यक्रम दुपारी १ ते रात्रौ ०९ या कालावधीमध्ये करणेकामी परवानगी मागितली आहे.

१. दि.२३/१२/२०१७ रोजी संस्थानमार्फत भारतातील व विदेशातील साईमंदिराचे प्रतिनिधी, विश्वस्त व अध्यक्ष यांचे संमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. याकरीता मा.उपराष्ट्रपती महोदय हे देखील कार्यक्रमासाठी व दर्शनासाठी उपस्थीत असणार आहेत. त्यामुळे त्यांचे संरक्षण व संस्थानचा कार्यक्रम याबाबत विचार करणे अत्यंत महत्वाचे आहे.

२. संस्थानचे हद्दीमध्ये संस्थानचे व्यतिरीक्त इतर कोणत्याही संस्थेस वैयक्तीक कारणास्तव पूजा करणेबाबत परवानगी देण्याची पद्धत नाही. अशा पद्धतीने परवानगी दिल्यास इतर साई मंदिरे अथवा संस्था अशाच पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करुन संस्थानकडे परवानगी मागतील. तरी त्याबाबत विचार होणेस विनंती.

३. दि.२३/१२/२०१७ पासुन नाताळ सुट्टी निमित्त सर्वत्र सुट्टीचा कालावधी आहे. त्यामुळे दि.२३/१२/२०१७ रोजी शिर्डी येथे गर्दीचे प्रमाण प्रचंड असणार आहे. त्याकरीता गर्दीचे कालावधीत कार्यक्रम देऊ नये असे नम्र मत आहे.

४. जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांनी नमूद केलेल्या कार्यक्रमामध्ये श्रीसाईबाबांचे संबंधी अथवा शताब्दीचे संदर्भात कोणताही उल्लेख अढळुन येत नाही. त्याबाबतही संबंधीतास परवानगी देतांना याबाबत विचार होणेस विनंती आहे.

५. तरी मंदिर परिसरा व्यतिरीक्त इतर ठिकाणी कार्यक्रमास परवानगी दिल्यास सोईचे होईल, असे नम्र मत आहे.

तरी जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना परवानगी देतांना उपरोक्त नमूद मुद्यांचा विचार व्हावा असे नम्र मत आहे. तरी सदर धार्मिक कार्यक्रमाकरीता परवानगी द्यावी किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना त्यांचे मागणीप्रमाणे दि.२३/१२/२०१७ रोजी गणपती नवग्रह संहिता दत्त होम व सहस्त्र ज्योती लिंगार्चन हे धार्मिक कार्यक्रम करणेसाठी, त्यांना १६ गुंठे जागेतील श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपामध्ये परवानगी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **भाडेतत्वावर घेतलेले सुरक्षा साहित्यास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सुरु झालेने होणारी संभाव्य साईभक्तांची गर्दी लक्षात घेता तातडीची गरज म्हणुन संरक्षण विभागाकडील जा.नं.६९१ दि.१८/०९/२०१७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये सुरक्षा साहित्य ०३ महिन्यांसाठी भाडे तत्वावर घेणेकामी पुरवठाधारकांकडून दरपत्रकासाठी विनंती (RFQ) टेंडार मागविणेस तसेच RFQ मसुद्याप्रमाणे अल्प कालावधीसाठी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर RFQ प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार सदरचे RFQ हे संस्थानचे संकेतस्थावर दि.२०/०९/२०१७ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. त्यानुसार खालील ०५ निवीदाधारकांचे दरपत्रक मुदतीत प्राप्त झाले होते.

| अ.नं. | पुरवठाधारक / कंपनीचे नांव, पत्ता |
|---|---|
| ०१ | **Detech Devices (P) ltd.,**<br>C-6, Mansarovar Garden, New Delhi-15. Ph- 4100 5111, 4100 5122 |
| ०२ | **Precision Operations Systems (I) Pvt. Ltd.,** Plot No.A/465, Road No.28, Wagle Industrial Estate, Thane-400 604.<br>Tel-91-022-61597100/101/102/ 67994014/ 25821808/25834005<br>Email- precision_o@vsnl.net |
| ०३ | **Evolve Technologies Services Pvt. Ltd,** J-531, MIDC Bhosari,<br>Pune-411 026. Mo.No.-9788417587/ 9922008555<br>Email- Rupali.pawar@evolve-india.co.in |
| ०४ | **Reliance Electronics,**<br>D-1/2, M.I.D.C., Ambad, Nashik-10. Ph.-0253-2384345/46 |
| ०५ | **SES (Special Equipments Service),** G-1 Plot No.134, Opp. Tivoli Garden, Chattarpur, New Delhi-110074<br>Mo.no.9999885828/9868176250 |

सदरचे दरपत्रक दि.२६/०९/२०१७ रोजी उघडण्यात आले. दरपत्रकामध्ये अ.नं.०५ चे पुरवठादार यांनी निवीदेत नमुद केलेनुसार प्रमाणपत्र सादर न केलयाने तसेच वार्षीक उलाढाल नसल्याने अपात्र ठरले. उर्वरीत अ.नं.०१ ते ०४ निवीदाधारकांचे Financial Bid हे "O" नंबर मिटींग हॉल येथे मा.उपाध्यक्ष साहेब व उपस्थित पुरवठाधारक यांचे समक्ष उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Vendor Name | 01 X-ray Baggage Scanner | 02 DFMD | 03 HHMD | 04 Bullet Proof Jackets | 05 Bomb Blanket | Total (Per Month) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Quantity:- | 04 Nos. | 09 Nos. | 15 Nos. | 10 Nos. | 01 No. | |
| 01 | **Detech Devices (P) ltd.,** Mansarovar, New Delhi | 10,62,000/- | **1,59,300/-** | **8,850/-** | **2,12,400/-** | **18,880/-** | 14,61,430/- |
| 02 | Precision Operations Systems (I) Pvt.Ltd., Thane | 13,45,200/- | 5,31,000/- | 1,68,150/- | 6,72,600/- | 53,100/- | 27,70,050/- |
| 03 | **Evolve Technologies Services Pvt. Ltd., Pune** | **4,62,560/-** | ---- | ---- | ---- | ---- | |
| 04 | **Reliance Electronics, Nashik** | ---- | **1,62,485/-** | **11,151/-** | ---- | ---- | |

उपरोक्त दर्शविलेल्या तक्यानुसार उघडण्यात आलेले फायनान्सीयल दरपत्रकानुसार अ.नं.१ हे डि.एफ.एम.डी., एच.एच.एम.डी., बुलेटप्रुफ जॅकेट व बॉम्ब ब्लॅकेट मध्ये निम्नतम तसेच अ.नं.०३ हे एक्स-रे बॅगेज स्कॅनर मध्ये निम्नतम आहे. परंतु मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे आदेशानुसार बुलेटप्रुफ जॅकेटचे दर जास्त असलेने सदरचे नग वगळून उपरोक्त नमुद निम्नतम असलेले अ.नं.१ व ३ यांना कार्यादेश (work order) देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली होती. परंतु अ.नं.०१ चे Detech Devices (P) ltd., New Delhi यांनी त्यांना दरपत्रकानुसार निविदेतील ५ सुरक्षा साहित्यांचा कार्यादेश न मिळालेने, दरपत्रकानुसार देण्यात आलेल्या ४ सुरक्षा साहित्य संस्थानला पुरविण्यास त्यांनी असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे दुसरे निम्नतम असलेले Reliance Electronics, Nashik यांना Detech Devices (P) ltd., New Delhi यांनी नमुद केलेल्या दरपत्रकानुसार दुध्वनीव्दारे विचारणा केली असता, त्यांनी उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१ चे दरानुसार डि.एफ.एम.डी., एच.एच.एम.डी. देण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे.

त्यानुसार RFQ टेंडर प्रसिध्द केल्यानंतर न्युनतम दर असलेले ठेकेदार यांना खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | साहित्याचा तपशिल | नग | दरमहा एकत्रित भाडे (GST सह) |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | रिलायंस इलेकट्रॉनिक, नाशिक | ३४६८ दि.२७/०९/२०१७ | डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर | ०९ | १,५९,३००/- |
| | | | हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर | १५ | ८,८५०/- |
| | | | | **एकूण =** | **१,६८,१५०/-** |
| ०२. | इव्हॉल टेक्नोलॉजीस सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे | ३४४९दि.२७/०९/२०१७ | बॅगेज स्कॅनर | ०४ | ४,६२,५६० |
| | | | | **एकूण =** | **४,६२,५६०** |

कार्यादेशानुसार संबंधीत पुरवठादार यांनी दि.२८/०९/२०१७ रोजी सुरक्षा साहित्य शिर्डी येथे पाहच करुन मंदिर परिसराचे प्रवेशद्वारावर उभारणी करुन सुरु करुन देण्यात आलेले आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०६/२०१६ चे सभेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने साईभक्तांचे व त्यांचे जवळील बॅगांची तपासणी करणेकामी खालीलप्रमाणे सुरक्षा साहित्य खरेदीकामी मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

| **Sr.No.** | **Item Description** | **Qty** |
|---|---|---|
| 01. | X-Ray baggage inspection systems | 08 |
| 02. | DFMD | 24 |
| 03. | Body Scanner | 02 |
| 04. | VHF Static base sets with antenna, battery and accessories | 12 |
| 05. | VHF hand set with accessories | 75 |
| 06. | HHMD (Hand Held Metal Detector) | 100 |

सदरचे प्रस्तावावर सविस्तार चर्चा होऊन निर्णय क्र.४९० नुसार असे ठरले की, प्रस्तावित सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी जास्त खर्च येत आहे. याकरीता उपरोक्त तक्त्यामधील अ.नं.०१ चे साहित्य ८ नगांऐवजी ०४ नग खरेदी करणेत येऊन, ते मंदिर परिसराचे प्रवेशद्वारांवर वापरणेत यावे. अ.नं.०२ चे साहित्य ४० नग खरेदी करणेत यावे. अ.नं.०३ चे साहित्य फक्त कॅश काऊंटींग हॉलसाठी ०१ नग खरेदी करणेत यावे. अ.नं.०४ चे ०२ नग, अ.नं.०५ चे ७५ नग व अ.नं.०६ चे ४० नग सुरक्षा साहित्य खरेदी करणेत यावे, असे ठरले. तसेच सदरहू सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निवीदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

| **Sr.No.** | **Item Description** | **Qty** |
|---|---|---|
| 01. | X-Ray baggage inspection systems | 04 |
| 02. | DFMD | 40 |
| 03. | Body Scanner | 01 |
| 04. | VHF Static base sets with antenna, battery and accessories | 02 |
| 05. | VHF hand set with accessories | 75 |
| 06. | HHMD (Hand Held Metal Detector) | 40 |

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वरीलप्रमाणे सुरक्षा साहित्य खरेदीकामी ई-निवीदा प्रक्रीया करणेत येत आहे. तथापी ई-निवीदा प्रक्रीया राबविणे व ई-निवीदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर सुरक्षा साहित्याचा पुरवठा करणे व कार्यान्वीत करणेकामी सुमारे ०२ महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. सध्या ०३ महिन्यांकरीता भाडोत्री तत्वावर घेतलेल्या सुरक्षा साहित्याचा ०३ महिन्याचा कालावधी दि.२८/१२/२०१७ अखेर अखेर संपृष्टात येत आहे. त्यामुळे नाताळ व नववर्षाचे निमीत्ताने होणारे गर्दीचे नियोजनकामी साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने सध्या भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या सुरक्षा साहित्याचे पुरवठादार यांना ०१ महिना मुदतवाढ द्यावी लागणार आहे.

तरी भाडोत्री तत्वावर घेण्यात आलेले सुरक्षा साहित्य पुरवठादार १) रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक यांना १) डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर ०९ नग व २) हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर १५ नग तसेच इव्होल टेक्नॉलॉजीस ॲण्ड सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांना ०४ नग बॅगेज स्कॅनर निवीदेतील मंजूर दराने दि.२९/१२/२०१७ ते

२८/०१/२०१८ या कालावधीकरीता भाडोत्री तत्वावर पुरविणेस मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रु.६,३०,७१०/- मासिक खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेकरीता उपरोक्तप्रमाणे भाडेतत्वावर घेतलेल्या सुरक्षा साहित्याची मुदत नाताळ व नववर्षाच्या निमित्ताने होणाऱ्या प्रचंड गर्दीच्या कालावधीमध्ये संपुष्टात येत आहे. त्यामुळे या गर्दीच्या कालावधीमध्ये साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रस्तावात नमुद केलेले सुरक्षा साहित्य पुरविणेकामी संबंधीत पुरवठाधारकांना, त्यांचे मंजुरदरानुसार मुदत संपुष्टात येत असलेचे दिनांकापासूनपुढे तूर्त १५ दिवसांची मुदतवाढ देणेत यावी व १५ दिवसानंतर पुढील मुदतवाढीबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **शिर्डी विमानतळाकरीता संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे कर्मचारी पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा सशुल्क पुरविणेबाबत मा.व्य.समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे निर्णय क्र.६५९ प्रमाणे ठरलेले आहे. श्री साईबाबा संस्थान व M.A.D.C यांचे शिर्डी विमानतळाकरीता संस्थानची अग्निशमन सेवा ०६ महिने पुरविणेबाबत करारनामा करणेत आलेला आहे. मा.व्य.समितीचे निर्णयानुसार व करारनाम्यानुसार शिर्डी एअरपोर्ट यांनी वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार संस्थानचे अग्निशमन वाहन कर्मचा-यांसह शिर्डी विमानतळावर पाठविण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान अग्निशमन वाहन वेळोवेळी पाठविलेले आहे. सदर अग्निशमन वाहनाचा चार्ज संस्थानचे खाती जमा करणेबाबत वेळोवेळी खालील प्रमाणे कळविणेत आलेले होते. परंतु अदयापपर्यंत महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हपलमेंट कंपनी यांनी थकीत बीलाची रक्कम जमा केलेली नाही.

| अ.नं. | पाठविणेत आलेले बिल , पत्र क्रमांक व दिनांक | बिलाची रक्कम |
|---|---|---|
| ०१ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/१९१७/२०१६ दि.१९/०७/२०१६ | २५,१०५/- |
| ०२ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/२६१९/२०१६ दि.२६/०८/२०१६ | ७,०००/- |
| ०३ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/४२०८/२०१६ दि.१०/११/२०१६ | ७,०००/- |
| ०४ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/४२०७/२०१६ दि.१०/११/२०१६ | ७,०००/- |
| ०५ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/४७१४/२०१६ दि.०७/१२/२०१६ | ८,०००/- |
| ०६ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/५०२४/२०१६ दि.२८/१२/२०१६ | ४,०००/- |
| ०७ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/५४४१/२०१६ दि.२३.०१.२०१७ | ६,०००/- |
| ०८ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/ ६३९२ /२०१७ दि.२१.०३.२०१७ | ८,०००/- |
| ०९ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/ २६९० /२०१७ दि.१७.०८.२०१७ | ९,०००/- |
| १० | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/३७६७ /२०१७ दि.१३.१०.२०१७ | ५३,०००/- |
| | **एकुण थकीत बाकी रुपये** | **१,३४,१०५/-** |

**अक्षरी– एक लाख चौतीस हजार एकशे पाच मात्र.**

मा.व्य.समितीचे निर्णयानुसार शिर्डी विमानतळावर संस्थानचे अग्निशमन वाहन कर्मचारी यांचेसह वेळोवेळी पाठविण्यात आलेले आहे. संस्थानचे अग्निशमन बिलाची रक्कम भरणेकामी वेळोवेळी पत्राव्दारे कळविणेत आलेले आहे. परंतु अदयापर्यंत M.A.D.C. यांचेकडुन संस्थानचे अग्निशमन वाहनाचे थकीत बिलाचा भरणा झालेला नाही.

आता M.A.D.C यांनी उपरोक्त संदर्भ क्रं. ०२ नुसार पत्र प्राप्त झालेले आहे त्यामध्ये असे नमुद केलेले आहे की शिर्डी विमानतळाकरीता संस्थानची अग्निशमन सेवा किंवा संस्थानचे ०५ प्रशिक्षीत (ज्यांनी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणामार्फत दिल्ली येथील संस्थान खर्चाने प्रशिक्षण पुर्ण केलेले) असे कर्मचारी फायर फायटींगकामी पुरविणेबाबत कळविलेले आहे. याबाबत मा.उपजिल्हाधिकारी तथा प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री धनंजय निकम यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत सांगितलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** M.A.D.C. यांनी संस्थानचे अग्निशमन वाहनाची वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार तसेच मा.व्य.समितीचे निर्णयानुसार शिर्डी विमानतळावर संस्थानचे अग्निशमन वाहन कर्मचारी यांचेसह वेळोवेळी पाठविण्यात आलेले आहे. परंतु संदर्भ क्रं. ०२ नुसार M.A.D.C. यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचेकडे दोन अग्निशमन वाहने उपलब्ध आहेत परंतु त्या वाहनांवर पुरेसे कर्मचारी नसलेमुळे त्यांनी संस्थानकडे

०५ प्रशिक्षीत कर्मचा-यांची मागणी केलेली आहे. त्यानुसार खालील मागणीनुसार दैनदिन ०३ प्रशिक्षीत कर्मचारी उपलब्ध करुन देता येईल असे नम्र मत आहे.

**मागणी-** शिर्डी विमानतळावर संस्थानचे फायर विभागाचे प्रशिक्षीत कर्मचारी पुरविणेकरीता M.A.D.C. यांनी संस्थान कर्मचारी यांना जाणे व येण्याची सुविधा, कर्मचारी यांचा प्रत्येकी रु.२५ लाखाचा अपघाती विमा तसेच कर्मचारी मानधन उपलब्ध करुन दिल्यास संस्थानचे प्रतिदिनी किमान ०३ प्रशिक्षीत कर्मचारी शताब्दी महोत्सवातील गर्दीचे कालावधी व्यतिरिक्त जनरल शिफ्टमध्ये उपलब्ध करुन देता येईल.

**करीता...**

अ. M.A.D.C. यांना केलेल्या विनंती नुसार ०३ प्रशिक्षीत कर्मचारी उपरोक्त संस्थान मागणी प्रमाणे पुरवावे किंवा कसे.

ब. M.A.D.C यांना सदर कालावधीत कर्मचारी पुरविलेस संस्थानचे इतर विभागातील फायर प्रशिक्षीत ०३ कायम कर्मचारी फायर विभागास पुरविणेस संस्थानचे आस्थापना विभागास कळविणेस मान्यता असाव..

तरी उपरोक्त **अ** आणि **ब** बाबत मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मंदिर व मंदिर परिसराची सुरक्षितता महत्वाची असूनशिर्डी विमानतळाकरीता फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे प्रशिक्षीत कर्मचारी पुरविल्यास मंदिर परिसरासाठी फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे प्रशिक्षीत कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे कॅम्प शिर्डी यांचे आऊटसोर्स कामगारांबाबत.**
**निर्णय क्र.१०६२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या Semi Automatic Rotary Microtome बाबत.**

**प्रस्ताव-** दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. २०४ (८) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता १ नग Semi Automatic Rotary Microtome हे M/s. Leica Microsystems, Germany यांचेकडून ७९०० इतक्या Euro मध्ये खरेदीस मान्यता मिळालेली आहे, तसेच दि.०५/०५/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. १४४ (१९) अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथ विभागाकरीता ०१ नग Semi Automatic Rotary Microtome श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या मशिनचे मंजूर दराने खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार M/s. Leica Microsystems, Germany यांना इकडील पत्र क्र.२११६ दि.०४/११/२०१५ अन्वये ०२ नग Semi Automatic Rotary Microtome करीता १५८०० इतक्या Euro चा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

M/s. Leica Microsystems, Germany यांचे नावाने L/C No.1781031 उघडण्यात आलेली असून त्यांचे Custome Duty मध्ये सूट मिळणेकामी Custom Office सोबत पत्रव्यवहार चालु आहे. तथापि नाशिक येथील Custom Office यांनी दि.१९/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात येऊन सदर प्रमाणपत्र Custom Office ला देण्यात यावे जेणेकरुन संस्थानची Custom Duty माफ करण्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल असे कळविले होते. तथापि यापुर्वी दि.१८/०१/२००७ रोजी जानकी अरुणकुमार, कमिशनर सेंट्रल एक्साईज ॲन्ड कस्टम, सिमाशुल्क कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

त्यानुसार इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/ वशी-स्टोअर (पी/एस)/ १६५०/ २०१६ दि.२२/१०/२०१६ अन्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र पाठविण्यात आले होते. त्यानंतर विधी व न्याय विभागातील खेडकर मॅडम यांनी दि.०७/११/२०१६ रोजी दुरध्वनीवरुन संस्थान मार्फत करण्यात आलेली मागील ३ वर्षाच्या चॅरीटीची माहिती मागविलेली होती ती देखील त्यांना दि.०७/११/२०१६ रोजी ई-मेल व्दारे पाठविण्यात आली होती.

तथापि महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी जाक्र.सासंकि-१०१६/प्र.क्र.१९३/का.१६ दि.११/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये –

(०१) कस्टम डयुटीमध्ये सुट मिळविण्याकरीता कस्टम कार्यालयास अर्ज करण्याबाबतचा व्यवस्थापन समितीच्या ठरावाची मागणी केलेली होती.

(०२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असून संस्थेकडून पुरविण्यात येणा-या सेवा मोफत/ ना नफा ना तोटा या तत्वावर पुरविण्यात येत असल्याबाबत व्यवस्थापन समितीच्या ठरावाची मागणी केलेली होती.

त्यास अनुसरुन विषय नं.३९ अन्वये दि.२२/१२/२०१६ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.९४३ अन्वये खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

"श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Semi Automatic Rotary Microtome खरेदी करतेवेळी Custom Duty मध्ये सुट मिळणेबाबतचा Custom Office ला अर्ज करणेस व प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानची दोन्हीही रुग्णालये ना नफा ना तोटा तत्वावर श्री साईबाबा रुग्णालय चालविणेत येत आहे, तसेच दि.०१ जानेवारी २०१७ पासुन गोरगरीब रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय पुर्णपणे मोफत करणेस सभेमध्ये मान्यता देण्यात आली आहे. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेस मान्यता देण्यात आली"

वरीलप्रमाणे ठरावानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनाइकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/वशी-स्टोअर(पी/एस)/१६५०/२०१७ दि.२२/१०/२०१६ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असलेबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक-सासंवि-१०१६/प्र.क्र.१९३/का.१६. दि.०७/०२/२०१७ अन्वये उपरोक्त प्रमाणपत्र पाठविलेले आहे. त्यानुसार शासनाकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र कमिशनर, कस्टम ऑफीस, नाशिक यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/वशी-स्टोअर(पी/एस)/२२८७/२०१७ दि.२८/०२/२०१७ अन्वये पाठविण्यात आलेले आहे.

तसेच त्यांना वेळोवेळी दुरध्वनीवरुन Exemption Certificate मिळणेकामी विचारणा करण्यात येत होते, त्यानंतर दोन वेळेस नाशिक कस्टम ऑफीस ला समक्ष जाऊन तेथील वरीष्ठ अधिकारी यांना भेटून Exemption Certificate लवकरात लवकर मिळणेबाबत विनंती करण्यात आली होती.

त्यानंतर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम हयांचे स्वाक्षरीने इकडील पत्र क्र.१३४८ दि.२७/०९/२०१७ अन्वये नाशिक कस्टम ऑफीसला स्मरणपत्र देण्यात आले होते.

दि.२५/१०/२०१७ रोजीचे Custom House Agent, K-Star, Mumbai यांचे ई-मेल व्दारे आजतगायत Rotary Microtome Machine चे Dambrage हे रु.६५,०००/- इतके झालेले आहे, असे कळविलेले आहे, त्याच बरोबर Custom Commissioner, Nhava Sena, Mumbai यांनी दिलेले नोटीसचे पत्र देखील पाठविले असून त्यामध्ये त्यांनी असे सुचित केले आहे कि, आपले कस्टम ऑफीसला पोहोच झालेले Semi Automatic Rotary Microtome Machine हे ई-मेल मिळाल्यापासुन पुढील पाच दिवसांच्या आत सोडवून घ्यावे, जर आपण पाच दिवसात Microtome Machine सोडवले नाही तर सदरहू मटेरीयलचा लिलाव करण्यात येईल.

तसेच सदरबाबत आपले Custom House Agent, K-Star, Mumbai यांचेशी चर्चा केली असता त्यांनी असे सुचविले कि, आपण Custom Commissioner, Nhava Sena, Mumbai यांचेकडून अजुन २ महिन्यांची मुदत मागवून घेऊ व त्यानुसार इकडील पत्र क्र.१५३३ दि.०४/११/२०१७ रोजी तसे पत्र पाठविण्यात आलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी दि.२८/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविलेले आहे कि, आपण मागविलेल्या २ नग Semi Automatic Rotary Microtome Machine ची किंमत ही रु.१२,२७,१७०/- व त्यावर लागू असलेली कस्टम डयुटी ही रु.३,२४,३२०/- इतकी आहे.

सदर मशिनच्या किंमतीवर बॉन्ड केल्याच्या तारखेपासून ९० दिवसानंतर व्याज (Interest) चालु होते आणि त्या व्याजाचा दर हा दि.३१/०३/२०१७ पर्यंत प्रतिवर्षी १८% व दि.३१/०३/२०१७ नंतर प्रतिवर्षी १५% आहे. त्यानुसार दि.३१/१२/२०१७ अखेर व्याजाची रक्कम रु.६४९६२/- इतके होत आहे.

जर पुढील दोन महिन्यात म्हणजेच दि.२८/१२/२०१७ पर्यंत Custom Duty Exemption Certificate मिळाले नाही तर Semi Automatic Rotary Microtome Machine च्या खरेदी किंमत रु.१२,२७,१७०/- या रक्कमेवर रु.३,२४,३२०/- इतकी कस्टम डयुटी व त्याचबरोबर दि.२५/१०/२०१७ पर्यंतचे

Dambrage Charges रु.६५०००/- तसेच दि.३१/१२/२०१७ पर्यंत मशिनच्या किंमतीवर झालेले व्याज रु.६४९६२/- इतकी रक्कम अदा करुन सदर दोन्हीही मशिन Nhava Sena, Mumbai यांचेकडून सोडवून घ्यावे लागतील, परंतु दि.३१/१२/२०१७ नंतर जर सदर मशिन सोडविल्यास सदर व्याज (Interest) हे त्या प्रमाणात वाढणार आहे व Dambrage Charges देखील वाढणार आहेत.

तथापि, कस्टम कमिशनर, दिल्ली यांचेकडून कस्टम डयुटीमध्ये आवश्यक असलेले Exemption Certificate मिळणे गरजेचे आहे, सदरहू सर्टीफिकेट जमा केल्याशिवाय Semi Automatic Rotary Microtome Machine चा आपणास ताबा मिळणार नाही.

त्यामुळे कस्टम ऑफीस, नाशिक यांना दि.२७/०९/२०१७ रोजी देण्यात आलेल्या स्मरणपत्राची प्रत दि.२७/१०/२०१७ रोजी पुन्हा कस्टम ऑफीस, नाशिक यांना ई-मेल व्दारे पाठविण्यात आलेली आहे. तसेच दुरध्वनीवरुन तगादा करण्यात येत आहे. जर

अ) ३१/१२/२०१७ रोजीच्या आत Custom Duty Exemption Certificate आपणास प्राप्त झाले व ते आपण Custom office ला submit करून आपले मशिन सोडवले तर आपली Custom Duty रककम रू.३,२४,०००/- माफ होऊन फक्त खरेदी किंमतीवरील व्याज रू.६४,९६२/- तसेच त्या दिवसापर्यंत झालेले Dambrage हे अदा करावे लागणार आहे.

ब) दि.३१/१२/२०१७ पर्यंत जर Custom Duty Exemption Certificate न मिळाल्यास व त्यानंतर आपण मशिन सोडवल्यास खरेदी किंमतीवर लागणारे Custom Duty रककम रू.३,२४,०००/- व खरेदी किंमतीवरील त्या दिवसापर्यत लागणारे व्याज व त्या दिवसापर्यंतचे Dambrage अशी सर्व रक्कम संस्थानमार्फत अदा करावी लागणार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे रक्कम अदा करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या Semi Automatic Rotary Microtome बाबत प्रस्तावात नमुद केलेल्या ब प्रमाणे कार्यवाही करणेस व त्याप्रमाणे येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच खरेदी व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांचे मार्गदर्शनाखाली Custom Duty साठीची आवश्यक कार्यपध्दती निश्चित करुन घ्यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **पुणे शहर/ जिल्हा येथील रुग्णालयांना तुर्त बंद असलेले वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

**प्रास्तविक:-** उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०४/२०१७, विषय नं.०१, दि.२७/०३/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे. यावर, निर्णय क्र.२७८. अन्वये,

**(२) निर्णय क्र.२११ (११),** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत रुग्णांना दिले जाणा-या वैद्यकिय अर्थिक अनुदानासाठीच्या सुधारित नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील अ.नं.१४ वगळता इतर नियमास मान्यता देण्यात आली.

अ.नं.१४ मध्ये अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्व कागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षकींत केलेली प्रतिलिपी ऐवजी स्वत: साक्षकिंत केलेली प्रमाणित प्रतिलिपी असावी, असा बदल करणेत यांवा.तसेच सदरहू नियमावलीची दि.०१ एप्रिल २०१७ पासुन अंमलबजावणी करणेत येऊन, महाराष्ट्र शासनास माहितीसाठी पाठविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत रुग्णांना दिले जाणा-या वैद्यकिय अर्थिक अनुदानाचा फायदा मोजक्याच रुग्णालयांमधील रुग्णांना होत आहे, असे निदर्शनास आले आहे., काही रुग्णांलयानी संस्थानमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान मंजुर करणेसाठी प्रतिनिधींची नेमणुक केली

असल्याचे कळत आहे. ही बाब गंभीर असुन समिती सदस्य मा.श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी सखोल चौकशी करावी व सदरहू चौकशी पुर्ण होईपर्यंत तुर्तास पुणे शहर/ जिल्हयामधील रुग्णालयातील रुग्णांना देण्यात येत असलेले वैद्यकीय आर्थिक अनुदान बंद करणेत यावे.

तसेच गरीब/ गरजु रुग्ण पैशाअभावी वैद्यकीय उपचारांपासुन वंचित राहु नयेत, याकरीता संस्थानमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी नविन रुग्णांलयाची यादी व वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली तयार करणेत येऊन, ती प्रथमत: रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावी.असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०४/२०१७, निर्णयास अनुसरुन, समिती सदस्य श्री वाकचौरे साहेब यांनी पुणे शहर/ जिल्हयातील रुग्णालयांना व रुग्णांना श्री साईबाबा संस्थान तर्फे देण्यात येणारे वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबतचा चौकशी अहवाल दि.१९/०८/२०१७ रोजी श्री साईनाथ रुग्णालयास प्राप्त झालेला चौकशी अहवाल खालीलप्रमाणे आहे.

त्यांनी पुणे येथील जास्तीतजास्त अनुदान दिलेल्या ०५ रुग्णालये व ३५ रुग्णं यांना पत्रव्यवहार करुन दिलेल्या अनुदानाचा कशाप्रकारे विनियोग करणेत आला याबाबतची माहिती घेणेबाबत सुचविले होते.त्याप्रमाणे पुणे येथील ०५ रुग्णालय

१) ग्रॅन्ट मेडिकल फाउंडेशन रुबी हॉल क्लिनिक,पुणे,

२) इनलॅक्स ॲण्ड बुधराणी हॉस्पीटल,पुणे,

३) कोकण मित्रमंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेसेलिटी हॉस्पीटल ,पुणे

४) किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल ,पुणे (के.ई.एम.),

५) दिनानाथ मंगेशकर, हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर,पुणे व याच रुग्णालयातील ३५ रुग्णांना दि.२९/०६/२०१७ रोजी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. पैकी दि.२९/०७/२०१७ पर्यंत ०२ रुग्णालय व १५ रुग्ण यांचेकडुन माहिती प्राप्त झाली असुन उर्वरित २० रुग्ण यांनी माहिती दिलेली नवहती व ३ रुग्णालयांना दि.१२/०८/२०१७ माहिती देणेबाबत दुध्वनी केला असता, ०३ रुग्णालयानी मेलद्वारे माहिती दिलेली आहे.तिचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१) ग्रॅन्ट मेडिकल फाउंडेशन रुबी हॉल क्लिनिक,पुणे या रुग्णालयाकडुन मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**अ)** ग्रॅन्ट मेडिकल फाउंडेशन रुबी हॉल क्लिनिक,पुणे यांना जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ ६९३/ २०१७, दि.२९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संस्थान तर्फे देण्यात आलेल्या अनुदानाचा विनियोग खालील ०५ रुग्णांना कशाप्रकारे केला याबाबतची माहिती सादर करणेस कळविण्यात आले होते. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| **अ.नं.** | **रुग्णाचे नाव** | **रुग्णास दिलेल्या अनुदानाबाबत रुग्णालयाने दिलेली माहिती** |
|---|---|---|
| १. | घोलप मिनाक्षी संदिप, मु.पो. कोकण नगर, कोकण सागर बिल्डिंग ५वा माळा रुम.नं.५०२ जोगेश्वरी ईस्ट.मुंबई-४०००६० | रुग्णाचे टोटल बील, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| २. | सुर्यवंशी पांडुरंग पुंडलिक, मु.पो.तोंडार, ता.उदगिर, जि.लातुर. | रुग्णाचे टोटल बील, स्टॅम्प रिसिट, पाठविलेली आहे. |
| ३. | रमावत शांताबाई कन्हैय्यालाल, मु.पो.शनिपेठ, २३१ दत्तमंदिरजवळ ता.जि. जळगाव, ४२५००१. | रुग्णाचे टोटल बील, स्टॅम्प रिसिट, पाठविलेली आहे. |
| ४. | अतुल पाटिल ईश्वर, मु.पो.कैलासनगर, मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक. | रक्कम रिर्जव्ह आहे. |
| ५. | स्वाराली संदिप कदम, मु.पो.तळेगाव दाभाडे स्टेशन विठ्ठलवाडी ता.मावळ, जि.पुणे. | चेक नं.३२९६१० दि.१४/०७/२०१७ अन्वये अनुदान रक्कम परत पाठविली.संस्थान खाती जमा. |

**ब) ग्रॅन्ट मेडिकल फाउंडेशन रुबी हॉल क्लिनिक, पुणे या रुग्णालयात उपचार घेतलेल्या ०५ रुग्णांपैकी ०१ रुग्णाकडुन मिळालेला विनियोग तपशिल खालील प्रमाणे.**

| **अ.नं.** | **रुग्णाचे नाव** | **जा.नं. दिनांक** | **प्राप्त तपशिल दिनांक** | **अनुदान विनियोगाबाबत रुग्णांने दिलेली माहिती.** |
|---|---|---|---|---|
| १. | सुमित विलियम आढाव, बी १/२१ | ७२३/१७ | २८/०७/२०१७ | मा.महोदय,<br>आपले दि.२९/०६/२०१७ चे पत्र दि.१९/०७/२०१७ ला सर्व प्रथम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सनी सेंटर बीसादेवी रोड जाधववाडी, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद. | | | मी विल्यम जोसेफ आढाव व कुंटुंब आपल्या मदतीसाठी मना पासुन आभारी आहोत. चि.सुमितला दि.०५/०६/२०१७ रोजी पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक येथे ॲडमिट करणेत आले होते.व१४/०७/२०१७ ला हॉस्पीटलमधुन डिसचार्ज देण्यात आला. दरम्यान सुमितचे दि.०९/०६/२०१७, २०/०६/२०१७ आणि दि.१२/०७/२०१७ ला ऑपरेशन करण्यात आले.<br>डॉक्टरने सांगितलेप्रमाणे घरी रोज दोन तासानी ऑपरेशन झालेल्या मुत्राशयाचे ड्रेन, प्लेन, ड्रेसिंगइत्यादी करणे व पुढिल महिन्यात परत तपासासाठी परत तपासासाठी पुणे येथे दाखविणे, दवाखान्याचा खर्च ८.५० लाख (आठ लाख पन्नास हजार) इतका झाला आहे.<br>पुढे सुमितचे वय २१ वर्ष पुर्ण झाल्यावर पोटामध्ये वॉल (ए.एस.) बसावयाचे आहे. व तो मल मुत्र स्वत: करु शकेल त्यांचा अंदाजे खर्च ११.०० अकरा लाख इतका झाला आहे. साहेब साई संस्थान आमच्या मदतीला पुढे आले त्याबद्दल माझे कुंटुंब आपले व संस्थानचे ऋणी आहोत. तसेच भविष्यात आपल्या मदतीची अपेक्षा आहे |

**२) इनलॅक्स ॲण्ड बुधराणी हॉस्पीटल, पुणे या रुग्णालयाकडुन मिळालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**अ)** इनलॅक्स ॲण्ड बुधराणी हॉस्पीटल,पुणे यांनी जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/६९२/२०१७, दि.२९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संस्थान तर्फे देण्यात आलेल्या अनुदानाचा विनियोग खालील १० रुग्णांना कशाप्रकारे केला याबाबतची माहिती सादर करणेस कळविण्यात आले होते. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | रुग्णाचे नाव | रुग्णास दिलेल्या अनुदानाबाबत रुग्णालयाने दिलेली माहिती |
|---|---|---|
| १. | ओमप्रकाश ताराचंद अग्रवाल, मु.पो.भजिया गल्ली, चोथमल धर्मशाला जवळ, भुसावळ ता.भुसावळ, जि.जळगाव ४२५२०१ | ऑपरेशन तारीख - २५/०४/२०१७ फायनल बील रक्कम - २,४६,८३५/-<br>पेशंटनी भरलेली रक्कम - ६५,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- ७४,३३५/-<br>संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - ११, ५००/-<br>बाकी रक्कम - ७१,०००/- UTR NO. 1464061851600018 |
| २. | ओसवाल मिठालाल हेमराज, मु.पो. ३९६ मधली आळी, वाई, ता.वाई, जि.सातारा -४१२८०३. | ऑपरेशन तारीख - ३१/०३/२०१७ फायनल बील रक्कम - १,६०,०००/-<br>पेशंटनी भरलेली रक्कम - १,६०,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- ४६,११३/-<br>संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - १०,०००/-<br>बाकी रक्कम - ----------- UTR NO. 1464063051600069 |
| ३. | लाहा बेला प्रदिप, मु.पो.प्लॅट.नं.१०५ ए विंग, साईदिप साईबाबा नगर, भाईदर ईस्ट,जि.ठाणे. मुंबई-४०११०५ | ऑपरेशन तारीख - १२/०४/२०१६ फायनल बील रक्कम - २,८२,८८१/-<br>पेशंटनी भरलेली रक्कम - १,००,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- ७२,१८१/-<br>संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - १६, ५००/-<br>बाकी रक्कम - ६९,२००/- UTR NO. 1464063051600061 |
| ४. | राजश्री रामचंद्र सुतार, मु.पो.ता.तुळजापुर खुर्द जि.उस्मनाबाद.-४१३६०१. | ऑपरेशन तारीख - ११/०६/२०१६ फायनल बील रक्कम - २,१२,७२३/-<br>पेशंटनी भरलेली रक्कम - ---------- साधु मिशनने भरलेली रक्कम- ३०,१२३/-<br>संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - १,०२,०००/-<br>बाकी रक्कम - ५५,६००/- UTR NO. 1464061271600032 |
| ५. | गोविंद हरप्रसाद गजभाये, मु.पो. तापडियानगर, ता.अकोला. जि.अकोला-४४४००१. | ऑपरेशन तारीख - १७/०४/२०१६ फायनल बील रक्कम - ३,३०,२६३/-<br>पेशंटनी भरलेली रक्कम - १,३०,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- -----------<br>संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - १,१२, ०००/-<br>बाकी रक्कम - ६३,२६३/- UTR NO. 1464062671600025 |
| ६. | हेमानी पुनम इंद्रलाल, मु.पो. उल्हासनगर, सुविधा अपार्टमेन्ट, प्लॅट नं.२०१ दुसरा मजला, भाटिया ॲटोस्टॅड जवळ, ता. उल्हासनगर जि.ठाणे–५. | ऑपरेशन तारीख - २९/०६/२०१६ फायनल बील रक्कम - १,९१,७२४/-पेशंटनी भरलेली रक्कम- १,११,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- ----<br>संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - १०, ०००/-<br>बाकी रक्कम - ----------- UTR NO. 1464061881600022 |

| | | |
|---|---|---|
| ७. | ज्योती गौतम कांबळे, मु.पो.कडेर, ता.उमरगा, जि.उस्मनाबाद.४१३६०६. | ऑपरेशन तारीख - २५/१०/२०१६ फायनल बील रक्कम - ३,२३,१२४/- पेशंटनी भरलेली रक्कम -------------- साधु मिशनने भरलेली रक्कम- ८५,०००/- संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - ४०, ०००/- बाकी रक्कम - ७३,१२४/- UTR NO. 14640630131600020 |
| ८. | सुभाष विठ्ठल कोंडे मु.पो.कासुर्डी, खेडेबारे, ता.भोर, जि.पुणे-४१२२०५. | ऑपरेशन तारीख - २३/११/२०१६ फायनल बील रक्कम - २,७०,०२१/- पेशंटनी भरलेली रक्कम - ६०,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- ८५,०००/- संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - २०, ०००/- बाकी रक्कम - ८०,०२१/- UTR NO. 1464061311700069 |
| ९. | रंजना रामचंद्र राणे, मु.पो.कोळकेवाडी, ता.चिपळुन, जि.रत्नागिरी-४१५६०३. | ऑपरेशन तारीख - १५/०२/२०१७ फायनल बील रक्कम - १,८५,५८९/-पेशंटनी भरलेली रक्कम - -------- साधु मिशनने भरलेली रक्कम- ५०,५८९/- संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - १,१०, ०००/- बाकी रक्कम - UTR NO. 14640660921700011 |
| १०. | दशरथ अर्जुनराव साबळे. मु.पो.सर्व्हे नं. १० अशोकनगर, एरवडा, ता.जि.पुणे-४११००६. | ऑपरेशन तारीख - ०७/०२/२०१७ फायनल बील रक्कम - ३,४६,३५९/- पेशंटनी भरलेली रक्कम - ९०,०००/- साधु मिशनने भरलेली रक्कम- ८५,०००/- संस्थानची भरलेली रक्कम - २५,०००/- विश्वस्त निधी - ४७, ०००/- बाकी रक्कम - ७१,०००/- UTR NO. 1464061851600018 |

**ब) इनलॅक्स अ‍ॅण्ड बुधराणी हॉस्पीटल,पुणे या रुग्णालयात उपचार घेतलेल्या १० रुग्णांपैकी ०४ रुग्णांकडुन मिळालेला विनियोग तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.नं. | रुग्णाचे नाव | जा.नं. दिनांक | प्राप्त तपशिल दिनांक | अनुदान विनियोगाबाबत रुग्णांने दिलेली माहिती. |
|---|---|---|---|---|
| १. | माधव दशरथ नरोडे मु.पो.अस्तगाव, ता.राहाता, जि.अहमदनगर. | ७१६/१७ | ०७/०७/२०१७ | सदर इसम मयत सबब पत्र परत, एस.टी.नळे, अस्तगाव |
| २. | रजनी कन्हैयालाल गोधवाणी, मु.पो.भवानीपेठ, पुणे. | ७०७/१७ | २४/०४/२०१७ | पत्र परत. |
| ३. | राजु बाबुभाई शेख, रुम.नं.३८८८३ नागरे गल्ली अहमदनगर. | ७१५/१७ | २४/०७/२०१७ | Add raffle absent information paid. |
| ४. | संगिता अर्जुन साबळे, मु.पो.बहुल, ता. खेड, जि.पुणे. | ७३०/१७ | २९/०७/२०१७ | मी संगिता अर्जुन साबळे, मला रु.२५,०००/- हजार हॉस्पीटल नावाने मिळाले त्याचा आम्हाला रेडीशन केमोथेरपी साठी उपयोग झाला. आपले शिर्डी संस्थानचे आम्ही आभारी आहोत. |

**३) कोकण मित्रमंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेसेलिटी हॉस्पीटल, पुणे या रुग्णालयाकडुन मिळालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. अ)**कोकण मित्रमंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेसेलिटी हॉस्पीटल, पुणे यांनी जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/६९४/२०१७, दि.२९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संस्थान तर्फे देण्यात आलेल्या अनुदानाचा विनियोग खालील ०५ रुग्णांना कशाप्रकारे केला याबाबतची माहिती सादर करणेस कळविण्यात आले होते. दि.१२/०८/२०१७ अखेर माहिती उपलब्ध झालेली नसल्याने, याबाबत त्यांना दुरध्वनी केला असता त्यांनी मेलद्वारे माहिती दिलेली आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | रुग्णाचे नाव | रुग्णास दिलेल्या अनुदानाबाबत रुग्णालयाने दिलेली माहिती |
|---|---|---|
| १. | एडके अभिजित तुकाराम,मु.पो. सर्व्हे नं.१८/२/१०/११ कमल पॅराडाईज, सुखसागर नगर,कात्रज, ता.हवेली, जि.पुणे -४११०४६. | उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| २. | एडवडकर उत्तम मनोहर,मु.पो. ताराबाद कॉलानी, नगरपुणे रोड, प्लाट नं.९२, केडगाव, ता.जि.अहमदनगर. | उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३. | सिंग मनोरमा विजय,मु. भुवनेश्वर, श्रीकृष्णनगर, पो.वस्से, ता.रोहा. जि.रायगड. | उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ४. | पाटिल जान्हवी पकंज,मु.पो. बलवंड, ता.जि.नंदुरबार-४२५४०८. | उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ५. | कामटे नंदीनी सचिन,मु.पो. शिवरी, ता.पुरंदर, जि.पुणे.-४१२३०१. | उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |

**ब) कोकण मित्रमंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेसेलिटी हॉस्पीटल,पुणे या रुग्णालयात उपचार घेतलेल्या ०५ रुग्णांपैकी ०३ रुग्णांकडुन मिळालेला विनियोग तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.नं. | रुग्णाचे नाव | जा.नं. दिनांक | प्राप्त तपशिल दिनांक | अनुदान विनियोगाबाबत रुग्णांने दिलेली माहिती. |
|---|---|---|---|---|
| १. | सचिन सदाशिव शिन्दे, मु.पो.अस्तगाव, ता.राहाता, जि.अ.नगर | ७१७/१७ | १३/०७/२०१७ | पत्र परत |
| २. | शिव लक्ष्मण हिपरकर, मु.बिरवली पो.शिपला ता.औसा, जि.लातुर. | ७२१/१७ | १८/०७/२०१७ | सदर इसम मयत सबब पत्र परत. |
| ३. | विश्वनाथ बापुराव माळवदकर, मु.पो. बाभुळगाव (दुमाला) ता.कर्जत, जि.अ.नगर. | ७१८/१७ | ११/०७/२०१७ | सदर मालक मयत पाठविणारास परत रवाना. |

**४) किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल ,पुणे (के.ई.एम.) या रुग्णालयाकडुन मिळालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**अ)** किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल,पुणे (के.ई.एम.) यांनी जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ ६९५/२०१७, दि.२९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संस्थान तर्फे देण्यात आलेल्या अनुदानाचा विनियोग खालील ०५ रुग्णांना कशाप्रकारे केला. याबाबतची माहिती सादर करणेस कळविण्यात आले होते. दि.१२/०८/२०१७ अखेर माहिती उपलब्ध झालेली नसल्याने, याबाबत त्यांना दुरध्वनी केला असता किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल,पुणे यांचे समाजसेविका श्रीमती ज्योती पिल्ले यांनी आपण दिलेल्या रुग्णाची माहिती आम्ही यापुर्वीच आपणाला दिलेली आहे, असे सांगितले. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | रुग्णाचे नाव | रुग्णास दिलेल्या अनुदानाबाबत रुग्णालयाने दिलेली माहिती |
|---|---|---|
| १. | क्रिष्णकांत राजेंद्र पिपंळे | स्टॅम्प रिसिट, पाठविलेले आहे. |
| २. | सिध्दांत भारत शिंदे | स्टॅम्प रिसिट, पाठविलेले आहे. |
| ३. | संस्कृती प्रसाद मालपोटे | स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र व फायनल बील पाठविलेले आहे. |
| ४. | पार्थ प्रमोद चौघुले | स्टॅम्प रिसिट, पाठविलेले आहे. |
| ५. | अलिझा मोबिन शेख | स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र व फायनल बील पाठविलेले आहे. |

**ब) किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल,पुणे या रुग्णालयात उपचार घेतलेल्या ०५ रुग्णांपैकी ०२ रुग्णांकडुन मिळालेला विनियोग तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.नं. | रुग्णाचे नाव | जा.नं. दिनांक | प्राप्त तपशिल दिनांक | अनुदान विनियोगाबाबत रुग्णांने दिलेली माहिती. |
|---|---|---|---|---|
| १. | सानवी संतोष भोरे, मु.पो.वसद, ता.सांगोला, जि.सोलापुर | ७३१/१७ | १०/०७/२०१७ | आपल्या संस्थानकडुन मिळालेली आर्थिक मदत ही आमच्या रुग्णाच्या औषध उपचारासाठी करण्यात आली तसेच अदयाप औषध उपचार चालु आहे. |
| २. | प्राची प्रभाकर राणे, मु.पो.कामशेत, ता.मावळ, जि.पुणे. | ७२७/१७ | १५/०७/२०१७ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडुन आम्हांस रु.२५,०००/- मंजुर होऊन आले. आपला खुप आभारी आहे आपण पाठविण्यात आलेली रक्कम के.एम.हॉस्पीटल,पुणे मध्ये मदत निधी म्हणुन आम्हास मिळाली त्या रकमेचा आम्हास केमो थेरपीमध्ये मदत झाली. आमचे बील रक्कम त्या मदत निधीमधुन फिरवण्यात येत होती. सदर रकमेची आम्हास अशा प्रकारे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | मदत झाली. आपण दिलेल्या रकमेतुन माझ्या मुलीच्या उपचारासाठी खुप मोठया प्रकारची मदत झाली. मी आपला खुप ऋणी राहिलो. आपला खुप आभारी आहोत. |

**५) दिनानाथ मंगेशकर, हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर,पुणे या रुग्णालयाकडुन मिळालेली माहिती पुढील प्रमाणे आह अ)** दिनानाथ मंगेशकर, हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, पुणे यांनी जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/६९६/२०१७, दि.२९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संस्थान तर्फे देण्यात आलेल्या अनुदानाचा विनियोग खालील १० रुग्णांना कशाप्रकारे केला याबाबतची माहिती सादर करणेस कळविण्यात आले होते. दि.१२/०८/२०१७ अखेर माहिती उपलब्ध झालेली नसल्याने, याबाबत त्यांना दुध्वनी केला असता त्यांनी मेलद्वारे माहिती दिलेली आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | रुग्णाचे नाव | रुग्णास दिलेल्या अनुदानाबाबत रुगणालयाने दिलेली माहिती |
|---|---|---|
| १. | आरोही संतोष माने,<br>मु.पो.गायकवाड वस्ती, सर्व्हे नं. १५६ औंध पुणे- ७. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| २. | अपुर्वा उत्तम मगदुम,<br>मु.पो.संभाजीनगर ७१० बी वॉर्ड, पाडळकर वसाहत, करविर रेसकोर्स नाका, ताराराणी चौक कोल्हापुर. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ३. | ज्ञानदेव रामराव गिरमकर,<br>मु.पो.आनंदवाडी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ४. | पांडुरंग चिमाजी केंद्रे,<br>मु.पो.पांगरी, ता,परळी, जि.बीड-४११५३०. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ५. | मयुर श्याम मोकळ,<br>मु.पो.रुम.नं.१४१६, न्यु टोनी गारमेन्टस् शेजारी, गांधी रोड, पंढरपुर.ता.पढरपुर, जि.सोलापुर-४१३३०४. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ६. | मंगेश अविनाश जोशी,<br>मु.पो.आनंत सखाराम कोळी चाळ, मीठ बंदर रोड चेदनी कोळीवाडा, ठाणे पुर्व.ता.जि.ठाणे. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ७. | शारदा अनिल टाकसाळ,<br>मु.केसापुर पो.अंबी, ता.राहुरी, जि.अहमदनगर. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ८. | योगेश शिवाजी मसळकर,<br>मु.पो.सावळेश्वर, ता.माहोळ, जि.सोलापुर. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| ९. | कैलास अशोक चव्हाण,<br>मु.पो.गोटुंबे आखाडा, राहुरी खुर्द, ता.राहुरी, जि.अहमदनगर. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |
| १०. | सुनिल रामनारायण बिर्ला,<br>मु.पो.पिंपराळा, गुजराल पेट्रोलपंपा मागे, ता.जि.जळगाव. | रुग्णाचे टोटल बील रक्कम, स्टॅम्प रिसिट, उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. |

**ब) किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल,पुणे या रुग्णालयात उपचार घेतलेल्या १० रुग्णांपैकी ०५ रुग्णांकडुन मिळालेला विनियोग तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.नं. | रुग्णाचे नाव | जा.नं. दिनांक | प्राप्त तपशिल दिनांक | अनुदान विनियोगाबाबत रुग्णांने दिलेली माहिती. |
|---|---|---|---|---|
| १. | माधुरी कृष्णदेव वाघमारे | ७०६/१७ | १५/०७/२०१७ | मी श्री कृष्णदेव ज्ञानोबा वाघमारे आपणास नम्रपणे कळवितो की, मी सौ माधुरी वाघमारे यांचा पती असुन यापत्राद्वारे सर्वप्रथम आपणास म्हणजेच आपणा सर्व विश्‍वस्तास खुपखुप धन्यवाद देतो आणि आपणास उदंड आयुष्य लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. कारण आपण माझ्या पत्नीच्या आजाराच्या उपचारासाठी जी काही मदत केलीत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | त्यामुळे माझ्या पत्नीचे प्राण वाचुन ती आज आमच्या कुंटुबामध्ये आनंदाने जीवन जगत आहे.<br>आपण दिलेल्या रुपये २५,०००/- या रकमेची किमंत करता येत नाही. माझ्या जवळ एखादा रुपया सुध्दा बॅक बॅलन्स नसताना ही माझ्या पत्नीला मी त्या आजारातुन वाचवु शकलो. हे केवळ आपणासारख्या दात्यामुळेच घडले आहे.<br>अदयापी आजाराचा धोका टळला नाही पण सध्या आजार पुर्णपणे नियंत्रणात आहे.त्यामुळे माझी पत्नी घरातील सर्व कामे अगदी व्यवस्थीत करत आहे.यांचे सर्व श्रेय आपण केलेल्या मदतीलाच आहे. पुन्हा एकदा आपणा सर्वाना खुपखुप धन्यवाद देतो. |
| २. | म्हेत्रे व्यंकट एकनाथ | ७०२/१७ | १८/०७/२०१७ | पत्र परत. |
| ३. | बडे प्रकाश मानिकराव | ७०४/१७ | २२/०७/२०१७ | विषयांकीत संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सादर करण्यात येते की आपले संस्थानकडुन मला वैद्यकीय उपचारार्थ देण्यात आलेल्या रु.२५,०००/- अनुदान बाबत श्री साईबाबा संस्थानचे आपले प्रथमत: खुप खुप आभार व शतश: धन्यवाद<br>सदर अनुदान रकमेचा रुग्णालयाकडुन घेण्यात आलेल्या औषधावर खर्च करण्यात आलेला आहे. माझे अल्पशा उत्पन्नातुन एवढा मोठा खर्च करणे अशक्य होते. परंतु आपले संस्थानकडुन मिळालेल्या आर्थिकमदतीचा बराच आधार मिळाला. त्याबद्दल आपल्या संस्थानचा मी पुन्हा आभार व धन्यवाद मानतो.<br>तसेच पकृती स्वास्थ ठिक नसल्यामुळे आपले पत्रास उत्तर देण्यास उशीर झाला त्याबद्दल क्षमा. |
| ४. | समर्थ अमोल मोहिते | ७०१/१७ | ११/०७/२०१७ | पत्र परत. |
| ५. | ऋतुराज विजय कंक्राळे | - | २४/०७/२०१७ | चि. ऋतुराज<br>यांच्या वैद्यकीय इलाजासाठी आपण जी आर्थिक मदत केलीत त्या मदतीमुळेच माझ्या मुलाचे आयुष्यामध्ये मला उद्याचा आशेचा एक नवा किरण येतांना जाणवतोय खर तर आपल्या मदतीमुळेच माझ्या मुलाच्या थांबलेल्या आयुष्याला एक नवी दिशा मिळाली, त्यामुळे मी, माझी पत्नी सौ.अमृता आणि माझे चिमुकले चि.ऋतुराज व ऋग्वेद आम्ही सर्व आयुष्यभर आपल्या ऋणात राहू इच्छितोय आपल्या मदतीबद्दल शतशं: आभार ! .ईश्वर आपणास उदंड आयुष्य देवो ! हि ईश्वर चरणी प्रार्थना ! कळावे, आपला ऋणी श्री विजय तुळशीराम कंक्राळे. |

उपरोक्त प्रमाणे पुणे येथिल, रुग्णालय व रुग्ण यांनी सादर केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, रुग्णांना वैद्यकीय आर्थिक अनुदानचा चांगल्याप्रकारे लाभ होत असल्याचे दिसुन येत आहे.

पुणे शहर / जिल्हयातील रुग्णालयांत उपचार घेणारे गरीब व गरजु रुग्ण हे पुणे शहर / जिल्हयातील व महाराष्ट्राचे इतर जिल्हयातील तसेच इतर राज्यातील असतात. वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबत, रुग्ण स्वत: तसेच लोक प्रतिनिधीमार्फत श्री साईबाबा संस्थानकडे वारंवार दुरध्वनी करुन विचारणा करत आहेत.

पुणे येथिल दि.२४/०४/२०१७ ते दि.१६/०८/२०१७ अखेर श्री साईबाबा संस्थानकडे खालिल प्रमाणे प्रकरणे प्रलंबित आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|
| १. | इनलॅक्स ॲण्ड बुधराणी हॉस्पीटल,पुणे. | ९६ |
| २. | ग्रॅन्ट मेडिकल फाउंडेशन रुबी हॉल क्लिनिक,पुणे. | ४६ |
| ३. | कोकण मित्रमंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेसेलिटी हॉस्पीटल,पुणे. | १२ |
| ४. | किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल,पुणे (के.ई.एम.) | १८ |
| ५. | दिनानाथ मंगेशकर, हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, पुणे. | ५५ |
| ६. | जहॉगिर हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर.पुणे. | १० |
| ७. | सुशृत मेडिकल केअर रिसर्च सोसायटी हारर्दीकर हॉस्पिटल,पुणे. | ०८ |
| ८. | पुणा हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर. पुणे. | ०५ |
| ९. | एन.एम.वाडिया इनस्टुट ऑफ कार्डिओलॉजी पुणे. | ०३ |
| १०. | भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टस् आयुर्वेदिक हॉस्पिटल सेंटर, पुणे. | ०१ |
| | **एकुण-** | **२५४** |

तरी, नियमावलीतील गंभीर आजाराचे स्वरुप पाहता, वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी करण्यात येत असलेल्या रुग्णांचे जिवीताचा प्रश्न असल्याने, पुणे शहर/ जिल्हयातील, वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येत असलेल्या रुग्णालयांचे तुर्त बंद करण्यात आलेले वैद्यकीय आर्थिक अनुदान चालु ठेवता येईल.असे नमुद केले होते.सदर अहवालावर दि.२०/०८/२०१७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन, मा.अध्यक्ष साहेब यांनी संबंधीत रुग्णालयांना मागील तीन वर्षात दिलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबतचा तपशील मा.व्यवस्थापन समितीचे पुढील बैठकीत सादर करावा असे निर्देश दिले होते.

परंतु तदनंतर मा.अध्यक्ष साहेब यांनी,दि.०१/०९/२०१७ रोजी मुंबई येथे मिटिंग आयोजित करुन, श्री साईबाबा संस्थान तर्फे देणेत येणारे वैद्यकीय आरृथिक अनुदान नियमावली, नियमावलीनुसार कागदपत्राची छाणनी केली जाते का, नियमावलीतील रुग्णालय, आजार याबाबत समक्ष खात्री केली. सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात पुणे येथिल ज्याज्या रुग्णालयांना वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात आलेले आहे

त्या रुग्णालयांबरोबर पत्रव्यवहार करुन, खालील प्रमाणे माहिती मागविणेबाबत व नियमावलीतील ८५ रुग्णालया पैकी, ज्या रुग्णांलयाचे वैद्यकीय आर्थिक अनुदानसाठी प्रस्ताव येत नाही. अशा रुग्णालयाचे प्रतिनिधीना बोलावुन सदर योजनेबाबतची संपुर्ण माहिती देऊन त्यांना गरीब व गरजु रुग्णांचे प्रस्ताव, श्री साईबाबा संस्थानकडे पाठविणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

मा.अध्यक्ष साहेब यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आर्थिक वर्ष सन २०१६-२०१७ या कालावधीत पुणे येथिल वैद्यकीय आर्थिक अनुदान दिलेल्या खालील रुग्णालयांना दि.०९/०९/२०१७ रोजी पत्रव्यवहार करणेत आला होता.

| अं.नं. | रुग्णालयाचे नाव | लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | इनलॅक्स ॲन्ड बुधराणी हॉस्पिटल, पुणे | २३३ | ५५,८९,७८०/- |
| २ | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर,पुणे | १४६ | ३५,४४,२७५/- |
| ३ | किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल, पुणे | ६३ | १५,७२,५००/- |
| ४ | कोंकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, पुणे | ५८ | १३,८३,६२७/- |
| ५ | ग्रॅन्ट मेडिकल फौंउडेशन रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४९ | ११,९१,५००/- |
| ६ | जहॉगीर हॉस्पिटल, पुणे | १२ | ३,००,०००/- |
| ७ | पुणा हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे | १० | २,४७,५००/- |
| ८ | अमेय चॅरिटेबल ट्रस्ट , ए सी ई हॉस्पिटल, पुणे | ०५ | १,२५,०००/- |
| ९ | एन एम वाडीया इन्स्टियुट ऑफ कार्डियोलॉजी, पुणे | ०१ | २५,०००/- |
| १० | आर टी भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठाण गिरीराज हॉस्पिटल, पुणे | ०१ | २५,०००/- |
| | **एकुण** | **५७८** | **१,४०,०४,१८२/-** |

उपरोक्त रुग्णांलयांना पत्र पाठवुन खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन, याबाबतचा तपशिल पुराव्याचे कागदपत्रासह, पत्र मिळालेपासुन सात दिवसाचे आत इकडील कार्यालयात पाठविणेतबाबत कळविण्यात आले होते.

१) रुग्णाची एकुण बीलाची रक्कम.
२) आजाराचे स्वरुप
३) ऑपरेशन तारीख/ उपचार कालावधी.
४) संस्थान व्यतिरिक्त इतर ज्या संस्थांकडुन सदर रुग्णास मदत उपलब्ध करणेत आली, अशा संस्थांकडुन आलेली मदत चेक/ आरटीजीएस द्वारे आलेली असल्यास चेक नंबर, UTR NO. व रकमेचा तपशील.
५) रुग्णांने भरलेली रक्कम रोख, चेक/ आरटीजीएस द्वारे भरलेली असल्यास चेक नंबर UTR NO. याबाबतचा तपशील.
६) सदर रुग्णाने राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ घेतलेला असल्यास याबाबतचा तपशील.
७) आपले रुग्णालय राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत नोंदणीकृत आहे का? नसल्यास का नाही?.

**याबाबत १० रुग्णालयापैकी ०२ रुग्णालयाने माहिती दिलेली आहे. तपशिल खालील प्रमाणे दिलेला आहे.**

**१) इनलॅक्स अ‍ॅन्ड बुधराणी हॉस्पिटल, पुणे २३३ रुग्ण.**

| अ.नं. | रुग्णालयाचे नाव | दिलेली आहे/नाही. |
|---|---|---|
| १. | रुग्णांची एकुण बीलाची रक्कम. | दिलेली आहे |
| २. | आजाराचे स्वरुप | दिलेले आहे |
| ३. | ऑपरेशन तारीख / उपचार कालावधी. | दिलेली आहे |
| ४. | संस्थान व्यतिरिक्त इतर ज्या संस्थांकडुन सदर रुग्णास मदत उपलब्ध करणेत आली, अशा संस्थांकडुन आलेली मदत चेक / आरटीजीएस द्वारे आलेली असल्यास चेक नंबर UTR NO. व रकमेचा तपशील. | इतर संस्थांपैकी साधु वासवाणी मिशन, ट्रस्ट / फंड याप्रमाणे माहिती दिलेली आहे.<br>आरटीजीएस, चेक नंबर, UTR NO. दिलेला नाही. |
| ५. | रुग्णांने भरलेली रक्कम रोख, चेक / आरटीजीएस द्वारे भरलेली असल्यास चेक नंबर UTR NO. याबाबतचा तपशील. | रुग्णांने भरलेल्या रक्कमेचा तपशिल दिलेला आहे परंतु सदर रक्कम रोख, चेक/ आरटीजीएस याबाबतचा तपशील दिलेला नाही. |
| ६. | सदर रुग्णाने राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ घेतलेला असल्यास याबाबतचा तपशील. | सदर रुग्णालयात शासनाची राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना चालु नाही. |
| ७. | आपले रुग्णालय राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत नोंदणीकृत आहे का? नसल्यास का नाही?. | राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना नोंदणीकृत नाही. याबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिलेले नाही. |

**२) एन एम वाडीया इन्स्टियुट ऑफ कार्डियोलॉजी, पुणे ०१ रुग्ण.**

| अ.नं. | रुग्णालयाचे नाव | दिलेली आहे/नाही. |
|---|---|---|
| १. | रुग्णांची एकुण बीलाची रक्कम. | दिलेली आहे |
| २. | आजाराचे स्वरुप | दिलेले आहे |
| ३. | ऑपरेशन तारीख / उपचार कालावधी. | दिलेली आहे |
| ४. | संस्थान व्यतिरिक्त इतर ज्या संस्थांकडुन सदर रुग्णास मदत उपलब्ध करणेत आली, अशा संस्थांकडुन आलेली मदत चेक / आरटीजीएस द्वारे आलेली असल्यास चेक नंबर UTR NO. व रकमेचा तपशील. | मदत उपलब्धीबाबत व आरटीजीएस, चेक नंबर, UTR NO. दिलेला नाही. |
| ५. | रुग्णांने भरलेली रक्कम रोख, चेक/ आरटीजीएस द्वारे भरलेली असल्यास चेक नंबर UTR NO. याबाबतचा तपशील. | रुग्णांने भरलेल्या रक्कमेचा तपशिल दिलेला आहे परंतु सदर रक्कम रोख, चेक/ आरटीजीएस याबाबतचा तपशील दिलेला नाही. |
| ६. | सदर रुग्णाने राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ घेतलेला असल्यास याबाबतचा तपशील. | सदर रुग्णालयात शासनाची राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना चालु नाही. |

| | | |
|---|---|---|
| ७. | आपले रुग्णालय राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत नोंदणीकृत आहे का? नसल्यास का नाही?. | राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना नोंदणीकृत नाही. याबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिलेले नाही. |

तसेच, जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/१४०३/२०१७,दि.०५/१०/२०१७.अन्वये,नियमावलीतील ८५ रुग्णालयांना पत्र पाठवुन, दुरध्वनीद्वारे व मेल करुन दि.११/१०/२०१७ रोजी, मिटिंग आयोजित करणेत येऊन, नियमावलीबाबत चर्चा करणेत आली. सदर मिटिंगकामी १७ रुग्णालयाचे २३ प्रतिनिधी व रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक, डॉ. नरोडे सर, वैद्यकीय अधिक्षिका डॉ.पितांबरे मॅडम, प्र.कार्यालय अधिक्षक श्री धनेश्वर साहेब व सहा.मेट्रॅन श्रीमती नजमा सय्यद उपस्थित होते. श्रींच्या प्रतिमेचे दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात करणेत आली. चर्चासत्रासाठी आलेल्या रुग्णालय प्रतिनिधिंची ओळख करुन घेणेत आली. श्री साईनाथ रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ.पितांबरे मॅडम यांनी रुग्णालय प्रतिनिधीना वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत माहिती दिली. श्री साईबाबा संस्थानच्या नियमावलीत ८५ रुग्णालयांचा समावेश असुन, गरीब व गरजु रुग्णांना या योजनेचा जास्तीत जास्त फायदा कसा देता येईल, असा संस्थानचे अध्यक्ष, मा. श्री हावरे साहेब यांचा मानस आहे. याकरीता मा.अध्यक्षसाहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार, आपण ही मिटिंग आयोजित केलेली आहे. श्री साईबाबा संस्थानच्या नियमावलीचे वाचन करुन, नियमावलीबाबत माहिती व रुग्णालय प्रतिनिधीबरोबर चर्चा केली.

२) वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबत चर्चा करताना, नियमावलीत नव्याने सामाविष्ट झालेल्या, डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी, डॉ. सोपान कदम यांनी कॉक्लीअर इम्प्लांट हा आजार, लहान मुलांमध्ये होत असल्याचे नमुद केले. या ऑपरेशनचा एकुण खर्च हा ६ ते ७ लाख रु.पर्यंत आहे. संस्थानकडुन दिले जाणारे अनुदान हे या खर्चाचे मानाने फार कमी प्रमाणात आहे, तरी, संस्थानने किमान या शस्त्रक्रियेसाठी अनुदानाची रक्कम वाढवावी अशी विनंती केली. यापुढे गरीब व गरजु रुग्णांना मदत करणेकामी संस्थान नियमावलीनुसार कागदपत्रांची पुर्तता करुन कागदपत्र पाठविण्यात येतील असे सांगीतले.

३) वैद्यकीय आर्थिक अनुदान मिटींगकामी ग्रॅन्ट मेडिकल फौंडेशन रुबी हॉल क्लिनिक पुणे, यांचे २ प्रतिनिधी श्रीमती सुरेखा जोशी व श्रीमती लोचना जाधव उपस्थित होत्या. समाजसेविका सुरेखा जोशी यांनी वैद्यकीय आर्थिक अनुदानाचे कामाबाबत, श्री साईबाबा संस्थानचे आभार व्यक्त केले. श्री साईबाबा संस्थान ज्या आजाराकरीता अनुदान देते त्यातील ५० टक्के आजारांचा समावेश राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत (महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत) आहे. त्यामुळे संस्थान मार्फत देण्यात येत असलेल्या अनुदानाचा वापर हा सर्व गरीब व गरजु रुग्णांना घेता येत नाही. तसेच संस्थानच्या अनुदान नियमावलीत फक्त किडनी प्रत्यारोपनचा समावेश असुन, -ह्दय प्रत्यारोपन व लिव्हर प्रत्यारोपण या आजाराचा देखिल समावेश संस्थानचे आजारांचे यादीत करावा, अनुदानचे रक्कमेत देखिल वाढ करणेत यावी. तसेच माहे मे २०१७ पासुन पुणे येथील रुबी हॉल क्लिनीकला अनुदान देणे बंद

करणेत आलेले आहे. तरी यांवर सकारात्मक निर्णय घेऊन लवकरात लवकर अनुदान चालु करावे व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व मा.अध्यक्ष साहेब यांनी आजारांची संख्याही वाढवावी अशी विनंती केलेली आहे.

४) वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबत चर्चा करताना,आनंदऋषीजी हार्ट केअर व आनंदऋषीजी हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर अहमदनगर हॉस्पिटलचे ॲडमिनिस्ट्रेटर डॉ.श्री आशिष भंडारी यांनी सर्वात अगोदर, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदानकामी आयोजीत केलेल्या मिटींगबाबत सर्वानुमते आभार व्यक्त केले. यांवर सविस्तर चर्चा करतानी डॉ.भंडारी यांनी ज्या आजारांसाठी श्री साईबाबा संस्थान अनुदान देते त्यातील ५० टक्के आजारांचा समावेश हा राजीव गांधी जीवनदायी आरोग्ययोजने अंतर्गत (महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत) आहे. त्यामुळे संस्थान मार्फत देण्यात येत असलेल्या अनुदानाचा उपयोग हा सर्व गरीब व गरजु रुग्णांना घेता येत नाही. तसेच अपघात झालेल्या व पॅरालिसेस झालेल्या रुग्णांना अनुदान देणेबाबत विचार व्हावा. याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व मा.अध्यक्ष साहेब यांनी आजारांची संख्यावाढवावी ही विनंती केलेली आहे.

५) वैद्यकीय आर्थिक अनुदान मिटींगकामी छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर (सीपीआर रुग्णालय ) यांचे प्रतिनिधी श्री अशोक कदम (समाजसेवा अधिक्षक) उपस्थित होते. त्यांनी असे सांगीतले की मी या पदावर गेल्या १ ते दिड वर्षापासुन काम करित असुन आमचे रुग्णालय संस्थान पॅनलवर आहे हे मला माहीतच नव्हते. आपले पत्र मिळालेनंतर मला याची माहीती मिळाली त्याबद्दल मी आपला आभारी आहेत. यापुढे गरीब व

गरजु रुग्णांना मदत करणेकामी संस्थान नियमावलीनुसार कागदपत्रांची पुर्तता करुन कागदपत्र पाठविण्यात येतील असे सांगीतले.

६) वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबत चर्चा करताना, नव्याने सामाविष्ट झालेल्या संस्थान पॅनलवरील श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री अमृत देशपांडे यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदानकामी आयोजित केलेल्या मिटींगबाबत आभार व्यक्त केले. यापुढे गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त मदत करणेकामी संस्थान नियमावलीनुसार कागदपत्रांची पुर्तता करुन कागदपत्र पाठविण्यात येतील असे सांगीतले.

७) वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबत चर्चा करताना, संत लुक हॉस्पिटल, श्रीरामपुर यांचे प्रतिनिधी सिस्टर स्टेवीया आल्मेडा म्हणाल्या की, आमचे रुग्णालय संस्थान पॅनलवर आहे हे मला माहीतच नव्हते. आपले पत्र मिळालेनंतर मला याची माहीती मिळाली त्याबद्दल मी आपली आभारी आहेत. यापुढे गरीब व गरजु रुग्णांना मदत करणेकामी संस्थान नियमावलीनुसार कागदपत्रांची पुर्तता करुन कागदपत्र पाठविण्यात येतील असे सांगीतले.

८) वैद्यकीय आर्थिक अनुदानबाबत चर्चा करताना, भक्ती वेदांत हॉस्पिटल, ठाणे यांचे २ प्रतिनिधी श्री के व्यंकटरमण (निधी विभाग) व श्रीमती हेतल वर्मा (समाजसेविका) उपस्थित होते. त्यांनी आमच्या रुग्णालयामध्ये उपचार घेणारे रुग्ण हे आदिवासी भागातील जास्त असतात. त्यामुळे त्यांना अपुर्ण कागदपत्रांबाबत पत्रव्यवहार केल्यानंतर, त्यांचेकडुन कागदपत्रांची पुर्तता होईलच असे नाही असे सांगीतलेसंस्थान व्यवस्थापनाला व मा.अध्यक्ष साहेब यांना विनंती की, यापुढे रुग्णाबरोबर अपुर्ण कागदपत्राबाबत पत्रव्यवहार केल्यास रुग्णालयांनादेखील अपुर्ण कागदपत्रे पुर्तता करणेकामी एक पत्र दिले जावे. जेणेकरुन गरीब व गरजु रुग्णांना संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ देता येईल.रुग्णांसी पत्रव्यवहार केलेनंतर, रुग्णालयांशी देखील पत्रव्यवहार करावा, अशा सुचना उपस्थित रुग्णालयांचे प्रतिनिधीनी केल्या.

९) ज्या रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते अशा रुग्णायांना दुरध्वनीद्वारे माहिती उपलब्ध करुन देणेत आली.

पुणे येथिल रुग्णांलयाचे बंद असलेले वैद्यकीय आर्थिक अनुदान सुरु करणेकामी इनलॅक्स अॅन्ड बुधराणी हॉस्पिटल, पुणे यांचे प्रतिनिधी लाछमी साधवाणी, अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, डॉ.गुप्ता, कार्डियाक सर्जन यांनी दि. १४/११/२०१७ रोजी शिर्डी येथे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मा.अध्यक्ष साहेब यांना भेटुन अनुदान चालु करणेबाबत विनंती केली.

मा.अध्यक्ष साहेब यांनी प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिल्या.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-** श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार/ शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८५ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय :-** सध्या पुणे येथिल दि.२४/०४/२०१७ ते दि.१८/११/२०१७ अखेर श्री साईबाबा संस्थानकडे खालिल प्रमाणे प्रकरणे प्रलंबित आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|
| १. | इनलॅक्स अॅण्ड बुधराणी हॉस्पीटल,पुणे. | १४६ |
| २. | ग्रॅन्ट मेडिकल फाउंडेशन रुबी हॉल क्लिनिक,पुणे. | ६६ |
| ३. | कोकण मित्रमंडळ मेडिकल ट्रस्ट सहयाद्री स्पेसेलिटी हॉस्पीटल,पुणे. | १९ |
| ४. | किंग एडवर्ड मेमोरियल, हॉस्पीटल,पुणे (के.ई.एम.) | २९ |
| ५. | दिनानाथ मंगेशकर, हॉस्पीटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, पुणे. | ८७ |
| ६. | जहॉगिर हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर.पुणे. | २० |
| ७. | सुश्रृत मेडिकल केअर रिसर्च सोसायटी हारर्दीकर हॉस्पिटल,पुणे. | २४ |
| ८. | पुणा हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर. पुणे. | ०८ |
| ९. | एन.एम.वाडिया इनस्टुट ऑफ कार्डिओलॉजी पुणे. | ०४ |

| | | |
|---|---|---|
| १०. | भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टस् आयुर्वेदिक हॉस्पिटल सेंटर, पुणे. | ०१ |
| | **एकुण-** | **४०४** |

उपरोक्त प्रमाणे प्रकरणे प्रलंबित असुन, सदर रुग्णांना वैद्यकीय आर्थिक अनुदान द्यावयाचे झाल्यास, नियमावलीतील नियम अ.नं. ९, रुग्णांची शस्त्रक्रिया ज्या तारखेस आहे तत्पुर्वी अगर जास्तीत जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही.मात्र अर्ज अपुर्ण असल्यास कागदपत्राची पुर्तता करण्यासंबंधी रुग्णांस पत्र पाठविल्यास, असे पत्र पाठविल्यापासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णांस सर्व आवश्यक कागदपत्रंची पुर्तता करणेकामी देणेत येईल, त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. व नियम अ.नं. १० अर्जदाराने अनुदान मागणीचा अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर केल्यास शस्त्रक्रियेपुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इमर्जन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालय खाते (अकौंट) बंद होणेचे आत अर्जदाराने सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन अर्ज सादर करावा, जेणेकरुन त्यास संस्थानने पाठविलेल्या रकमेचा उपयोग होईल. नियमावलीचा विचार करता ज्या रुग्णांचे, रुग्णालय खाते (अकौंट)/ उपचार चालु आहे. अशा रुग्णांना अनुदान देता येईल, तरी अशा रुग्णांलय/ रुग्णांनकडुन पुन्हा नव्याने प्रस्ताव घेऊन, वैद्यकीय आर्थिक अनुदान देता येईल.

वैद्यकीय आर्थिक अनुदानासाठी आर्थिक वर्षात रु.१५ कोटी अंदाजपत्रकीय तरतुद आहे. दि.०१ मार्च २०१७ ते दि ३० सप्टेंबर २०१७ अखेर १९४ रुग्णाना अनुदान रक्कमेपोटी रु.४६,०९,३०२/- (शेहेचाळीस लाख नऊ हजार तीनशे दोन) मात्र खर्च झालेला आहे.

पुणे शहर/ जिल्हयातील रुग्णालयांत उपचार घेणारे गरीब व गरजु रुग्ण हे पुणे शहर / जिल्हयातील व महाराष्ट्राचे इतर जिल्हयातील तसेच इतर राज्यातील असतात. वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबत, रुग्ण स्वत: तसेच लोक प्रतिनिधीमार्फत, श्री साईबाबा संस्थानकडे वारंवार दुरध्वनी करुन विचारणा करत आहेत. नियमावलीतील गंभीर आजाराचे स्वरुप पाहता, वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी करण्यात येत असलेल्या रुग्णांचे जिवीताचा प्रश्न असल्याने, पुणे शहर/ जिल्हयातील, रुग्णालयांचे तुर्त बंद करण्यात आलेले वैद्यकीय आर्थिक अनुदान चालु करणेबाबत, मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन, निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आर्थिक अनुदानाअभावी गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता उपरोक्त विभागाच्या अभिप्रायामधील तक्त्यात नमुद केलेल्या रुग्णालयांपैकी अ.नं.१, २ व ५ रुग्णालये वगळता उर्वरित रुग्णालयांमधील प्रस्तावित प्रलंबीत प्रकरणांपैकी पात्र प्रकरणांचे वैद्यकिय आर्थिक अनुदान देण्यात यावे.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, ब-याचशा आजारांसाठी राजीवगांधी जीवनदायी योजनेमार्फत रुग्णांना वैद्यकिय आर्थिक अनुदान मिळत असते. त्यामुळे ज्या आजारांचा राजीवगांधी जीवनदायी योजनेमध्ये समावेश नाही, फक्त अशा आजारांसाठी संस्थानमार्फत वैद्यकिय आर्थिक अनुदान दिले जावे, असे समितीचे मत झाले व याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.वैद्यकीय अधिक्षीका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालयात प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u> –** कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**<u>व्यवस्थापन समिती ठराव क्र.</u> –** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्र.६८२.

**<u>प्रास्ताविक</u>-** महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर,२०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपूर्ण जगभरात विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्यादवारे साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची शंभरावी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरी न करता शंभराव्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,

२०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असुन हे संपुर्ण वर्ष उत्सावी वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे. हा उत्सव फक्त संस्थानपुरता मर्यादित नसुन जगभरातल्या समस्त साईभक्तांचा उत्सव आहे. प्रत्येक साईभक्ताच्या उपास्य दैवताच्या स्मरणाची ही महापर्वणी आहे. आपण सर्व साईच्या १०० व्या पुण्यतिथीचे साक्षीदारच नव्हे तर ती साजरी करणारे त्यांचे अनुयायी आहेत. हे आपणा सर्वांचे महदभाग्य आहे.

साईसमाधी शताब्दी सोहळा अधिक संस्मरणीय आणि अर्थपुर्ण व्हावा या उद्देशाने श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालये विभागाने शताब्दी वर्षात मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला आहे. तरी यानिमित्ताने दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ या कालावधीत शिर्डी येथे सदरहु शिबीर घेणेचे नियोजन आहे. प्लॅस्टिक सर्जिरी शिबीरासाठी विविध ०८ देशातुन १० प्लॅसिटक सर्जन सहभाग नोंदविणार आहे. श्री साईनाथ रुग्णालयांत जनरल ओटी असुन त्यामध्ये ३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. प्लास्टीक सर्जरी वेळी (गायनिक इमर्जन्सी सोडून) इतर सर्व सर्जरी बंद ठेवुन प्लास्टीक सर्जरीसाठी जनरल ऑपरेशन थिएटरमधील तीनही टेबल सुसज्ज ठेवावेत.

डॉ. राम चिलगर, प्लास्टीक सर्जन, औरंगाबाद यांनी मा.उपसमिती सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी येथे प्लास्टिक सर्जरी शिबीर घेण्याचा मानस व्यक्त केलेला आहे. त्यांनी याबाबत सभेसमोर संदर्भ क्रं.३ ने लेखी पत्र दिले. त्यानुसार सविस्तर चर्चा होऊन, 'डॉ.राम चिलगर,प्लास्टिक सर्जन, औरंगाबाद यांचे सहयोगाने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे प्लास्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेकामी येणा-या खर्चाचा सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा', असा निर्णय झाला.

मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर पार पाडण्यासाठी बांधकाम विभाग, विदयुत विभाग, मेकॅनिकल विभाग, जनसंपर्क कार्यालय, आय.टी.विभाग, कॅन्टीन विभाग, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, वाहन, साईआश्रम-१, श्री साईप्रसादालय, साईभक्त निवासस्थान, कामगार विभाग, मध्यवर्ती औषध भांडार, बगीचा विभाग, मंदीर विभाग, बी.व्ही.जी.इंडीया लि., प्रकाशने विभाग,इ. विभागांनामार्फत संबंधीत कामे करुन घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्र.६८२.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ अखेर मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीरासाठी संदर्भ क्र.०३ अन्वये डॉ.राम चिलगर, प्लास्टिक सर्जन, एलरीओ कॉस्मेटीक ॲण्ड प्लास्टिक सर्जरी क्लिनीक, औरंगाबाद यांचे दि१०/११/२०१७ रोजीचे पत्राने शिबीर घेण्याबाबत परवानगी मागितलेली आहे.

डॉ.राम चिलगर यांच्या मार्फत शिबीरासाठी प्रसिध्दी, नाव नोंदणी, नाकाची प्लास्टिक सर्जरी , जळीत रुग्णांवर शस्त्रक्रिया (बर्न कॉन्ट्रॅक्टर) हत्ती रोगावर शस्त्रक्रिया असे विविध अजारांवर शस्त्रक्रिया व्दारे उपचार करणार आहेत. तसेच अशा प्रकारचे शस्त्रक्रियेसाठी खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया नुसार जास्तीचा खर्च आकारणी करण्यात येतो. ग्रामीण भागातील रुग्णांना अशा प्रकारचे शस्त्रक्रिया करण्यापासुन वंचित राहतात. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत आयोजित करणे आवश्यक वाटते. ज्यामुळे जास्तीत जास्त गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होईल.

मोफत प्लॅस्टिक शिबीरामध्ये किमान १०० रुग्णांना लाभ देण्याचा मानस दर्शविलेला आहे. सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांची योग्य ती चाचणी स्वतः डॉ. राम चिलगर यांचेकडून करण्यात येणार असुन त्यानंतर निवड करण्यात आलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेत येणार आहेत.

मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीरामध्ये खुर्च्या, जाहिरातीसाठी फ्लेक्स बोर्ड, वृत्तवाहीनीवरील बातम्या, वृत्तपत्रात जाहिराती व येणा-या मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्या साठी वाहन व्यवस्था, व्हि.आय.पी. भोजन व्यवस्था, दर्शन व्यवस्था, निवास व्यवस्था, औषध व्यवस्था इत्यादीची संस्थान मार्फत मोफत व्यवस्था करण्यात यावी लागणार आहे. तसेच शिबीरासाठी येणारे डॉक्टर्स हे परदेशी असलेमुळे त्यांची जेवणाची व नाष्टयाची सोय बाहेरील हॉटेलमध्ये करणे गरजेचे आहे. तसेच शिबीरकामी एकुण ३ ऑपरेशन थिएटरची आवश्यकता असलेमुळे गायनिक विभागातील इमर्जन्सी केसेस सोडून इतर सर्व ऑपरेशन थिएटर (इ.एन.टी व ऑप्थल सोडून) प्लॅस्टिक सर्जरी शिबीरकामी वापरणेस व रुग्णालयांतील कन्सलटंन्ट डॉक्टरांची देखील शिबीरकामी डयुटी लावणेस मान्यता असावी.

तसेच शिबीरासाठी इत्यादी अनुषंगीक बाबींसाठी अंदाजे रक्कम रु. १० लाख मात्र खर्च अपेक्षित आहे. करीता उपरोक्त प्रस्तावास मान्यता असावी.

सदर शिबीर प्रसंगी खालील विषयांवर मार्गदर्शन मिळणे आवश्यक वाटते.

१) सदर शिबीराचा उद्घाटन तथा समारोप कार्यक्रम आयोजित करावा किंवा कसे

२) उद्घाटन कार्यक्रम आयोजित करणे झालेस दि. १८/०३/२०१८ ते दि. २२/०३/२०१८ अखेर कोणतीही एक तारीख व वेळ निश्चित करुन मिळावे.

३) सदर उद्घाटन तथा समारोप कार्यक्रमाचे स्वरुप कसे असावे.

तसेच संस्थानच्या इतर विभागांकडुन शिबीरासाठी लागणाऱ्या अनुषंगिक बाबींची पुर्तता होणेस व त्या अनुषंगाने रु.१० लाख रुपये खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१०६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने डॉ.राम चिलगर, प्लास्टीक सर्जन, औरंगाबाद यांचे सहयोगाने संस्थानचेश्री साईनाथ रुग्णालयामध्ये प्लास्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू शिबीराच्या नियोजनाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.वैद्यकिय अधिक्षीका, साईनाथ रुग्णालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **शिर्डी येथिल सर्व्हे नं.१ पै.,२/४, ३/१, ३/७ मधिल नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे बांधकामासाठी येणारे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उदिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील," अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये," भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे"

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६२.

" .... वर नमूद जनसेट व इतर काही बाबींचा अपेक्षित खर्च कमी होत असल्याने त्यानुसार आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस् यांनी सादर केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार सदर प्रकल्पासाठी खालिलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| *अ)* | Civil, Electrical, HVAC, Auditorium / VIP Interior and Allied Works. | Rs.98,88,92,656/- |
| *ब)* | Auditorium Interior Work and AV Equipment Work. | Rs.4,99,28,030/- |
| | **Total -** | **Rs.103,88,20,686/-** |

वरीलप्रमाणे एकूण रु.१०३,८८,२०,६८६/- इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली. सदर प्रकल्प संस्थानतर्फे हाती घेणेसाठी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेकरीता, तसेच शिर्डी नगरपंचायत यांचे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा. दरम्यान प्रकल्प लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने वरीलपैकी (अ) मधील कामे प्राधान्याने हाती घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी प्रथम ई – निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. त्याचप्रमाणे वरील (ब) मधिल कामे ही सिव्हील वर्कचे प्रगतीनुसार पुढील टप्प्यावर हाती घेता येणार असल्याने त्यासाठी स्वतंत्ररित्या ई – निविदा मागविणेची प्रक्रिया राबविणेत यावी,असे ठरले."

२) मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१४.११.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०२१.

"श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारतीचे बांधकामास परवानगी देण्यासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी विकास शुल्क, उपकर, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव मिळून एकूण रु.४,२९,३२,१६८/- मात्र रक्कम जमा करणेस कळविले आहे.

याबाबत चर्चा करणेसाठी या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री उदय काप्रे हे आजचे सभेपुढे उपस्थीत होते. त्यावेळी सदर प्रकल्पाचे आराखडयांबाबत सविस्तर चर्चा करणेत येऊन, असे ठरले की, नियोजित इमारतीचे दुस-या मजल्यावर प्रस्तावित करण्यात आलेले ऑडीटोरीअम वगळणेत यावे व त्या ठिकाणी दर्शन रांग हॉल प्रस्तावीत करण्यात यावेत. तसेच पहिल्या व दुस-या मजल्यावर दर्शविणेत आलेल्या ए.सी. प्लान्ट रुम हया बांधकाम विकास आणि प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार बांधीव क्षेत्रातुन (For FSI Calculation) वगळणेत याव्यात. त्यामुळे आता प्रस्तावीत बांधीव क्षेत्र कमी होणार असल्याने प्रिमिअम चार्जेस पडणार नाहीत. तरी याप्रमाणे सुधारीत नकाशांनुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी घेणेसाठी नियमाप्रमाणे आवश्यक विकास शुल्क, उपकर व सुरक्षा ठेव रक्कम अदा करणेत यावी. तसेच नकाशांमध्ये झालेल्या बदलांनुसार प्रकल्पाचे अंदाजपत्रकात सुधारणा करुन प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता घेणेसाठी आवश्यक कार्यवाही करणेत यावी."

**शासन मान्यताः-** मा.व्यवस्थापन समितीचे वर नमूद निर्णय क्र.१०२१ नुसार प्रकल्पाचे वास्तुविशारद आर्कि. उदय काप्रे यांनी सुधारीत नकाशे तयार केले आहेत. सदर सुधारीत नकाशे शिर्डी नगरपंचायत यांचेकडे बांधकाम परवानगीसाठी सादर करणेत आले. शिर्डी नगरपंचायत यांनी कळविल्यानुसार २००८२ चौ.मी. इतक्या प्रस्तावीत बांधिव क्षेत्रासाठी विकास शुल्क रक्कम रु.९३,९८,३७६/- व सुरक्षा ठेव रक्कम रु.८,०३,२८०/- शिर्डी नगरपंचायत यांचेकडे जमा करणेत आली आहे तसेच उपकर रक्कम रु.३५,७८,६१२/- शासनाचे खात्यावर जमा करणेत आली आहे. सुधारीत नकाशांनुसार प्रस्तावीत बांधीव क्षेत्र हे अनुज्ञेय बांधीव क्षेत्राचे मर्यादेत असल्याने प्रिमियम चार्जेस आकारण्यात आलेले नाहीत.

वरीलप्रमणे सादर करणेत आलेल्या सुधारीत नकाशांनुसार शिर्डी नगरपंचायत यांनी पत्र क्र.नं.प./बांध/टिक्रं- ८/२/२९९५/२१७. दि.२९.११.२०१७ अन्वये विषयांकीत प्रकल्पासाठी बांधकाम परवाना मंजुरी प्रदान केलेली आहे. त्याची प्रत व मंजूर नकाशांच्या प्रती इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ बांधकाम/ ४६३४/ २०१७, दि.०४.१२.२०१७ द्वारे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ यांचेकडे मान्यतेसाठी सादर केल्या आहेत.

**प्रस्तावः-** वर नमूद व्यवस्थापन समिती निर्णय क्र.१०२१ नुसार आर्कि. उदय काप्रे यांनी तयार केलेले प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक दि.०८/१२/२०१७ रोजीचे ईपत्राद्वारे सादर केले असून त्याची प्रत या टिपणीसोबत जोडली आहे. त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description | Revised Estimated Amount (Rs) |
|---|---|---|
| 1. | Civil, Electrical, HVAC, VIP & Ohter Interior works and Allied Works. | 97,06,41,416.00 |
| 2. | GST (12% on Civil works and 18% on interior works) | 9,00,42,998.00 |
| | **Total:-** | **106,06,84,414.00** |
| 3. | **Add Contingencies @ 5%** | **5,30,34,221.00** |
| 4. | **Development Charges and Sub –tax paid for Building permission** | **1,29,76,988.00** |
| | **GRAND TOTAL: PROJECT ESTIMATED COST:-** | **Rs.112,66,95,623.00** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे विषयांकीत प्रकल्पासाठी रु.११२.६७ कोटी इतका अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित आहे. तरी सदर सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास व सुधारीत अंदाजपत्रक राज्य शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथिल सर्व्हे नं.१ पै.,२/४, ३/१, ३/७ मधिल नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे बांधकामासाठी येणारे सुधारीत रु.११२.६७ कोटी मात्रच्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च व अंदाजपत्रक राज्यशासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत यावे. तसेच या प्रकल्पाच्या ई-निविदा प्रसिध्द करतेवेळी अंदाजपत्रकीय रकमेच्या २०% कमी दाखविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त ठेकेदारांचा वाणिज्यीक लिफाफा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधिल तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम-१७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधरण किंवा विशेष आदेशास अधीनराहून संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिकविधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे,भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमांचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ड) अन्वये, श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

दि.१४/११/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यमवस्थासपन समिती सभेत निर्णय क्र.९३१ अन्वये, “यावर सविस्तर चर्चा होऊन, देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी साईनगर मैदान येथे उपरोक्त प्रस्तावातील व्यवस्थेच्या तपशीलामधील पर्याय २ मध्ये नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. याचबरोबर स्टेजशेजारी २ ग्रीन रुमही तयार करणेत याव्यात. सदरहू मंडप व स्टेज १० व ग्रीन रुम २ दिवस ठेवण्यात यावा. तसेच त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास व मा.उपराष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे राजशिष्टाचारानुसार ऐनवेळी आवश्यक ती अतिरिक्त कामे याच मंजुर दराने करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना**: मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची मूदत दि.०५/१२/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत खालील ०७ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** |
|---|---|
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर |
| ०२ | काळे ॲण्ड सन्स, पुणे |
| ०३ | निकिता एस.बी.एस.को.ऑप . सोसायटी. लि., औरंगाबाद |
| ०४ | आर.एम.बी. इव्हेन्ट मॅनेजमेंट प्रा.लि., मुंबई |
| ०५ | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०६ | विजय मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,औरंगाबाद |
| ०७ | वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.०७/१२/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त पैकी खालील ०५ ठेकेदार पात्र झाले आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** |
|---|---|
| ०१ | काळे ॲण्ड सन्स, पुणे |
| ०२ | निकिता एस.बी.एस.को.ऑप . सोसायटी. लि., औरंगाबाद |
| ०३ | आर.एम.बी. इव्हेन्ट मॅनेजमेंट प्रा.लि., मुंबई |
| ०४ | विजय मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,औरंगाबाद |
| ०५ | वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा |

उपरोक्त ०५ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई-निविदांचा लिफाफा क्र.०२ (वाणिज्यिक निविदा) दि.०८/१२/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव / गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | काळे ॲण्ड सन्स, पुणे | १८,१६,४५०/- | |
| ०२ | निकिता एस.बी.एस.को.ऑप . सोसायटी. लि., औरंगाबाद | १८,४४,६८५/- | |
| ०३ | आर.एम.बी. इव्हेन्ट मॅनेजमेंट प्रा.लि., मुंबई | ३४,१५,७२५/- | |
| ०४ | विजय मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,औरंगाबाद | २७,५१,३७५/- | |
| ०५ | **वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा** | **१७,९४,५००/-** | **निम्नतम** |

उपरोक्त तपशिलानुसार ०५ निविदाधारकांपैकी ठेकेदार वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा यांचे दर निम्नतम आहेत. तरी सदर काम तातडीचे असल्याने याकामी निम्नतम दराचे ठेकेदार वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा यांची रु.१७,९४,५००/- मात्र रकमेची निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०६७ देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी साईनगर मैदान येथे मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा हे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी मुळ दरांवर रु.१४,५००/- मात्र सुट देऊ केली. ती मान्य करण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा यांचे चर्चेअंतीचे रु.१७,८०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८ "अगाध महिमा साईचा" या मराठी नाटकाचे शिर्डी येथे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,
"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री.अशोक परब, उपसंचालक, कला आणि संस्कृती, कला आणि संस्कृती संचालनालय, पट्टो, पणजी, गोवा यांनी दि.१४/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात, "मा.श्री.गोविंद एस. गावडे, कला आणि संस्कृती मंत्री यांना त्यांचे शिर्डी भेटीत संस्थानतर्फे शिर्डी येथे आपल्या विभागामार्फत विशेषतः गोवा येथील नाट्यप्रयोग कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शिर्डी येथे "अगाध महिमा साईचा" या मराठी नाटकाचे आयोजन करण्यात येऊन संस्थानने नाटकासाठीच्या तारखा, वेळ व ठिकाण कळवावे. तसेच त्यांचे विभागामार्फत नाट्यप्रयोगासाठीचे मानधन, प्रवास खर्च करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. तथापि, स्थानिक वाहतूक, निवासव्यवस्था, जेवणव्यवस्था, स्टेज, लाईट व साऊंड व्यवस्था, जाहीरात इ. व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात यावी," असे कळविले होते.

त्यावर संस्थानकडून दि.१६/११/२०१७ रोजीचे पत्रानुसार श्री.अशोक परब यांना प्रस्तावाचे अनुषंगाने नाटकाचे आयोजनासाठी खालील मुद्दयांवरील माहिती इकडील विभागाकडे पाठविणेची विनंती करण्यात आली होती.

१) "अगाध महिमा साईचा" या नाटकाची स्क्रिप्ट उपलब्ध असल्यास.
२) "अगाध महिमा साईचा" या नाटकाचा कालावधी.
३) नाटकाच्या प्रयोगासाठी जानेवारी २०१८ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीतील आपल्या पसंतीच्या तारखा.
४) नाटकाच्या प्रयोगासाठी कलाकार संख्या.
५) आपणास अपेक्षित असलेल्या निवासव्यवस्थेचा प्रकार व संख्या.
६) स्टेज, लाईट आणि साऊंड सिस्टीमचा तांत्रिक तपशिल (Minimum Requirement).

उपरोक्त तपशिल प्राप्त झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात येईल, असे कळविले होते.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्या वतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री.अशोक परब यांनी दि.२७/११/२०१७ रोजीचे पत्रानुसार, "अगाध महिमा साईचा" नाट्यप्रयोगाचा ग्रुप दि.०६/०१/२०१८ रोजी सादरीकरणासाठी तयार असल्याचे कळविले आहे. परंतु मंदिर विभागाचे माहे जानेवारी २०१८ रोजीचे वेळापत्रकानुसार सदर दिवशी श्री शिर्डी साई मंदिर, पंजाब यांचा साईभजन कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. सदर बाबत श्री.अशोक परब यांना दुरध्वनीवरुन संपर्क साधला असता दि.१३/०१/२०१८ रोजी त्यांचा नाट्यप्रयोगाचा ग्रुप सादरीकरण करण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. तसेच नाट्यप्रयोगासाठी खालील बाबी कळविल्या आहेत.

१) "अगाध महिमा साईचा" या नाट्यप्रयोगाची स्क्रीप्ट
२) "अगाध महिमा साईचा" नाट्यप्रयोगाचा कालावधी – २ तास ३० मिनिटे
३) "अगाध महिमा साईचा" नाट्यप्रयोगाची तारीख – १३/०१/२०१८
४) "अगाध महिमा साईचा" नाटकाच्या प्रयोगासाठी एकुण ४० कलाकारांचा समावेश (कलाकार व तंत्रज्ञांसह)
५) कलाकारांसाठी आवश्यक निवासव्यवस्था - एकुण २० रुम
६) स्टेज, लाईट व साऊंड व्यवस्था (Annexure B)

नाट्यप्रयोगासाठीचे मानधन व प्रवास खर्च कला आणि संस्कृती संचालनालय, गोवा यांचेमार्फत करण्यात येणार आहे. तथापि, उपरोक्तप्रमाणे "अगाध महिमा साईचा" या नाट्यप्रयोगासाठी संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबी कळविल्या आहेत. त्यानुसार सदर बाबींसाठी संस्थानकडून होणा-या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

“अगाध महिमा साईचा” कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा खर्च:-

| Sr.No. | Particulars | Rent Per Day Rs. | Nos. | Approximate Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Speakers (200 watts) | | 04 | 17,500/- (Including GST) |
| 02 | Monitor (100 watts) | | 02 | |
| 03 | Collar Mike OR | | 10 | |
| | Sure Mike | | 08 | |
| 04 | Mike Stand | | 03 (big) & 03 (small) | |
| 05 | Amplifier | | 03 | |
| 06 | Sound Mixer | | 01 | |
| 07 | Halogen - (available to Sansthan) | | 01 | - |
| 08 | Bulb - (available to Sansthan) | | 02 | - |
| 09 | Parcan (1000 watts) | 350/- | 10 | 3,500/- |
| 10 | Dimmer | 500/- | 04 | 2,000/- |
| 11 | Light Mixer | 125/- | 01 | 125/- |
| 12 | Spot Light | 1,500/- | 01 | 1,500/- |
| 13 | Bamboo (7 Mts) | 10/- | 20 | 200/- |
| 14 | Stage (available to Sansthan – Shri Saibaba Samadhi Mandir Shatabdi Mandap) | | 24 x 20 | - |
| 15 | Side Wings (Dark Blue) | 1,000/- | 08 | 8,000/- |
| 16 | Platform (on stage) – (by Sansthan) | | 8 x 4 | - |
| 17 | 3 Phase connection with Board - (available to Sansthan) | | 01 | - |
| 18 | Front Curtain | | | 1,000/- |
| 19 | Back Curtain | | | 1,000/- |
| 20 | Green Rooms (Gents & Ladies) - (available to Sansthan – at Shri Saibaba Samadhi Mandir Shatabdi Mandap) | | | - |
| | **Total :-** | | | **34,825/-** |

तरी “अगाध महिमा साईचा” या नाट्यप्रयोगाचे आयोजन करावयाचा झाल्यास खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) “अगाध महिमा साईचा” या नाट्प्रयोगाचे दि.१३/०१/२०१८ रोजी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे सायं.७ ते ९.३० या वेळेत आयोजन करणे.

२) “अगाध महिमा साईचा” कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत होणा-या अंदाजे रक्कम रु.३४,८२५/- मात्रचे खर्चास मान्यता देणे.

३) संस्थानमार्फत कार्यक्रमासाठी आलेल्या कलाकारांची मोफत दर्शन, निवास, स्थानिक वाहन व्यवस्था, चहा, पाणी, नाष्टा, प्रसादभोजन व्यवस्था करणे.

४) “अगाध महिमा साईचा” या नाट्यप्रयोगासाठी पाठविलेली स्क्रिप्ट तपासणे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात “अगाध महिमा साईचा” या नाट्यप्रयोगाचे आयोजनाचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अशोक परब, उपसंचालक, कला आणि संस्कृती, कला आणि संस्कृती संचालनालय, पट्टो, पणजी, गोवा यांचे विनंतीनुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात दि.१३/०१/२०१८ रोजी “अगाध महिमा साईचा” या कार्यक्रमाचे आयोजन करणेस परवानगी देण्यात यावी. याकरीता साईचरित्राचा अभ्यास असणारे संस्थानमधील कायम कर्मचारी श्री.मोहन यादव,**

**जनसंपर्क अधिकारी व श्री.नवेंदू मराठे, लिपीक यांचेकडून सदरहू नाटकाची स्क्रिप्ट तपासून घेण्यात यावी. त्यांचे मागणीनुसार स्थानिक वाहतूक, निवासव्यवस्था, जेवणव्यवस्था, स्टेज, लाईट व साऊंड व्यवस्था, जाहीरात इ. व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३४,८२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.१०६९** संस्थानसाठी आवश्यक असलेले गाईचे शुध्द तुप खरेदी करणेसाठीची निविदा प्रक्रिया चालू असून , सदर निविदा सादर करण्याची शेवटची मुदत दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ असून शुध्द तुपाचे नमुने सादर करणेची मुदत दिनांक ०९ डिसेंबर, २०१७ अशी आहे. सध्या गर्दीचे दिवस असल्यामुळे तुपाची निकड लक्षात घेता, गाईचे शुध्द तुप खरेदी करणेकामीची निविदा प्रकिया विहीत पध्दतीने पुर्ण करणेत येऊन, व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम व इतर इच्छुक समिती सदस्य यांनी या प्रक्रियेमध्ये येणाऱ्या निम्नतम दरधारकाच्या प्लँटची पहाणी करुन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा व या सर्व प्रक्रियेस व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**निर्णय क्र.१०७०** श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी सोहळयाच्या अनुषंगाने देश-विदेशामध्ये आयोजित करावयाच्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत शिर्डी ग्रामस्थांशी झालेल्या चर्चेमध्ये व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम, समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर व मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करुन व्यवस्थापन समितीसमोर आपला अहवाल सादर करावा, असे निश्चित झाले होते. त्यानुसार आजचे सभेत उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम यांनी माहिती दिली की, शिर्डी ग्रामस्थांबरोबर वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार श्रींच्या मुळ पादुकांच्या ०३ सेटपैकी एक पादुकांचा सेट शिर्डी येथे दर्शनासाठी ठेवावा व एक पादुकांचा सेट, पादुका दर्शन सोहळयासाठी आयोजकांना उपलब्ध करुन देण्यात यावा. पादुका दर्शन सोहळयाचे वेळी ग्रामस्थांनी निश्चित करुन दिलेल्या ३ ते ४ गावकऱ्यांनाही सोबत घेण्यात यावे. तसेच ज्या व्यक्ती/ संस्था श्रीच्या खोटया पादुका/ नाणी दर्शनासाठी फिरवून भक्तांची फसवणूक करत आहेत, अशांवर कायदेशीर कार्यवाही करावी, अशा मागण्या समोर आल्या व त्या मान्य करण्याची शिफारस पादुका दर्शन सोहळा समितीने केली.

यावर चर्चा होऊन, गावकऱ्यांबरोबर वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार व त्रीसदस्य समितीच्या दि.०३.१२.२०१७ रोजीचे बैठकीमध्ये ठरलेनुसार संस्थानकडील उपलब्ध श्रींच्या मुळ पादुकांच्या सेटमधील एक सेट, समाधी मंदिरामध्ये साईभक्तांच्या दर्शनासाठी ठेवण्यात यावा व एक सेट पुर्वी ठरलेप्रमाणे पादुका दर्शन सोहळयासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच शताब्दी वर्षाच्या कालावधीमध्ये पादुका दर्शन सोहळयापुर्वी समिती सदस्यांसह संस्थान अधिकाऱ्यांनी सदरहू ठिकाणांची पाहणी करावी व पादुका दर्शन सोहळयासाठी जाणाऱ्या संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांच्या पथकामध्ये ३ ते ४ गावकऱ्यांचाही समावेश करणेत यावा. तसेच खोटी नाणी व पादुका दर्शनासाठी फिरवून भक्तांची फसवणुक करणाऱ्या व्यक्ती/ संस्था व संस्थानशी नामसाधर्म्य ठेवून भक्तांची फसवणुक करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांचेवर कायदेशीर कारवाई करणेत यावी. त्याचप्रमाणे भविष्यात समाधी शताब्दी कालावधीमध्ये पादुका दर्शन सोहळयाबाबत काही मुद्दा उपस्थित झाल्यास उपरोक्त त्रीसदस्य समितीने, त्याबाबत चर्चा/ विचार विनिमय करुन समितीस अवगत करावे, असे ठरले.

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ मंदिर विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**निर्णय क्र.१०७१** श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने साईभक्तांचे स्वागत करणेकामी शिर्डी शहरामध्ये येणाऱ्या रस्त्यांवर स्वागत कमानी उभारणेसाठी शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात शिर्डी शहरामध्ये येणाऱ्या रस्त्यांवर आकर्षक स्वागत कमानी उभाराव्यात. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**निर्णय क्र.१०७२** श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने दि.३१ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजित कार्यक्रमांमध्ये साईभक्त सिनेअभिनेते श्री.मनोजकुमार गोस्वामी यांचा संस्थानमार्फत सत्कार करणेत यावा. तसेच समाधी शताब्दी निमित्ताने संस्थानमार्फत मोठ-मोठया कलाकारांचे व स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत आहे या कार्यक्रमांची फिरते अनौंसमेंटद्वारे (रिक्षा/ मोटरसायकल) शिर्डी व शिर्डी परिसरामध्ये या कार्यक्रमांची विस्तृत प्रसिध्दी करणेत यावी. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.१०७३** दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या चर्चासत्रास उपस्थित रहाणेसाठी, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या फॉर्ममधील अटींमुळे अनेक साई मंदिराच्या प्रतिनिधींना नाव नोंदणी करणेस अडचण येत आहे. सदरहू चर्चासत्रासाठी जास्तीत-जास्त साईमंदिरांच्या प्रतिनिधींनी उपस्थित रहावे याकरीता नाव नोंदणी फॉर्ममध्ये फक्त संबंधीत मंदिरामध्ये श्रींच्या समाधीची प्रतिकृती आहे का, याची माहिती घेण्यासाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश करणेत यावा व चर्चासाठी उपस्थित रहाणाऱ्या सर्व साईमंदिरांच्या प्रतिनिधींची निवास, भोजन व फक्त दर्शनाची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी, असे ठरले.
(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.१०७४** संस्थानच्या देणगी काऊंटरवर अमेरीकन एक्सप्रेस कार्ड स्विकारले जात नाही, त्यामुळे विदेशातील साईभक्तांना देणगी देण्यास अडचण येते, याकरीता सर्व देणगी काऊंटर्सवर अमेरीकन एक्सप्रेस कार्ड स्विकारणेबाबतची संबंधीत बँकांमार्फत कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**निर्णय क्र.१०७५** श्री साईबाबा संस्थानमध्ये विविध कामांसाठी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या ईनिविदा सुचनांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळावा, याकरीता या निविदा सुचना मंदिर परिसरामध्ये, प्रसादालय व सर्व निवासस्थानाच्या दर्शनी भागामध्ये प्रसिध्द करणेत याव्यात. ज्या विभागांच्या कामांसाठी शासनाच्या DSR नुसार अंदाजपत्रकीय खर्च दाखवावा लागतो, अशा कामाचे अंदाजपत्रक DSR/ CSR नुसार करावे. मात्र अंदाजपत्रकीय रकमेच्या २०% कमी दराने ई-निविदा प्रसिध्द करणेत यावी. तसेच आपले विभागामार्फत सुरु असलेल्या कामांच्या प्रगतीचा अहवालसंबंधीत विभागाने प्रत्येक व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करावा. टेंडर डॉक्युमेंट व टेंडर नोटीस सर्व समिती सदस्यांना ईमेलद्वारे पाठविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे दि.२३.१०.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५०(२) अन्वये संस्थान संबंधीत वेळोवेळी शासनामार्फत प्रसिध्द होणारे शासन निर्णय ई-मेलद्वारे सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी पाठविणेत यावेत व त्याचबरोबर व्यवस्थापन समिती सभेसमोरही सादर करणेत यावे, असे ठरलेले आहे, त्याची तात्काळ अंमलबजावणी करणेत यावी.
(कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.१०७६** दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५३० अन्वये श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यांपासून अगरबत्ती तयार करणेकामी सदरहू निर्माल्य जनसेवा फाऊंडेशन या बचत गटास देणेबाबत ठरले होते व त्यांना दि.०९ नोव्हेंबर, २०१७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार जनसेवा फाऊंडेशन बचत गट गेल्या एक महिन्यांपासुन समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य घेऊन जात आहेत, परंतु आजपर्यंत त्यांनी अगरबत्ती तयार केली किंवा नाही, तसेच या निर्माल्याचे काय केले याबाबत कोणतीही माहिती संस्थानला दिलेली नाही. त्यामुळे बगीचा विभागाने या बचतगटाच्या प्लँटची प्रत्यक्ष पहाणी करुन त्याचा अहवाल सभेसमोर सादर करावा व जनसेवा फाऊंडेशन बचत गटास देण्यात येत असलेल्या निर्माल्य त्वरीत बंद करणेत येऊन, सदरहू निर्माल्यांची लिलावाद्वारे विक्री करणेकामीचाही प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.
(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.१०७७** नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांनी आजचे सभेमध्ये पत्रान्वये कळविले की, दि.३०.११.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६१ अन्वये स्वच्छ शिर्डी अभियान अंतर्गत ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांनी, शिर्डी शहरातील रस्त्यांचे सौंदर्यीकरणासाठी, या रस्त्यांलगत वृक्षारोपन करावे व त्यांचे संगोपन श्री साईबाबा संस्थानमार्फत करणेत यावे, असे ठरलेले आहे. त्यानुसार याकामी आवश्यक टँकर, ट्रॅक्टर ड्रायव्हर, पाणी देण्यासाठी कर्मचारी व झाडांची देखभाल करणेसाठी अन्य बाबींची व्यवस्था करणेत संस्थानमार्फत करणेत यावी.

यावर चर्चा होऊन, झाडांच्या देखभालीसाठी उपरोक्तप्रमाणे संस्थानमार्फत व्यवस्था करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**निर्णय क्र.१०७८** नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांनी आजचे सभेमध्ये पत्रान्वये कळविले की, समाधी मंदिरामध्ये गुलाबपुष्प घेऊन जाण्यास बंदी घातल्यामुळे, जवळपास २०० ते ३०० फुल विक्रेत्यांवर मोठे आर्थिक संकट आलेले आहे. हे सर्व फुल विक्रेते स्थानिक रहिवासी आहेत, तरी समाधी मंदिरामध्ये गुलाबपुष्प घेऊन जाणेची बंदी उठवावी

यावर चर्चा होऊन असे ठरले की, समाधी मंदिरामध्ये गुलाबपुष्प सुरु करावे अथवा कसे, याबाबत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांच्या १० दिवस कालावधीमध्ये सुचना/ हरकती मागविण्यात याव्यात. सदर सुचना/ हरकतींचा अभ्यास करुन व त्याबाबत व्यापक सहमती करणेसाठी व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष, समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले यांची समिती गठीत करणेत आली. या समितीने अभ्यासपुर्वक चर्चा करुन त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा. तसेच याबाबत फुल विक्रत्यांसाठी 'काय करावे' व 'काय करुन नये' याची नियमावली तयार करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- मंदिर विभाग प्रमुख)

---

**निर्णय क्र.१०७९** श्री साईप्रसादालयावरील शिवसृष्टी संग्रहालयाचे चालक श्री.अभिजीत शिंदे यांनी आजचे सभेसमोर येऊन, खालील मागण्या मान्य करणेबाबत लेखी पत्राद्वारे विनंती केली. त्यांच्या मागण्या-

१) सदर हॉलमध्ये ज्या काचेच्या आहेत त्यांना लोखंडीग्रील संस्थानकडून बसवून मिळावी. (कलादालनात अत्यंत मौल्यवान अशी ऐतिहासिक शस्त्र आहेत.)

२) फायरबरचा हत्ती बसविणेकामी जागा मिळावी. (सदर जागा हि बुंदी गाळप ठिकाण व बांधकाम विभाग यांचेमध्ये बसलेली रिकामी जागा.)

३) त्याच शेजारी तिकीट विक्रीसाठी रिकामी खोली आहे. ती मिळाली तर भाविकांच्या सोयीचे होईल.

४) साईभक्तांना शिवसृष्टीबाबत माहिती मिळावी, म्हणून जिन्याजवळ किंवा हत्तीजवळ साऊंड रेकॉर्डींग वाजवण्याची परवानगी मिळावी.

५) साईभक्तांना शिवसृष्टी या उपक्रमाबाबत माहिती मिळावी यासाठी २०० रुम, ५०० रुम, १००० रुम, श्रींच्या प्रसादालयात जातानाची प्रतिक्षा रांगे शेजारी तसेच मंदिर परिसरात व प्रसादालय येथे व्हि.आय.पी. प्रसाद कडे जाताना ८/१२ च्या मापाची flexboard लावण्याची जागा व परवानगी मिळावी, तो खर्च आम्ही स्वत: करु.

६) आत्ता सध्या प्रसादालय मधून बाहेर पडण्यासाठी जो एकच दरवाजा वापरला जात आहे (प्रसादालयामधून बाहेर पडण्यासाठीचे गेट हे शिवसृष्टीच्या बाजूनेच असावे) तोच चालू ठेवावा, ही विनंती.

७) शिवसृष्टी या उपक्रमाचे सामाजिक योगदान म्हणून विशेष बाब ग्राहय धरुन व त्यासाठी मोठया प्रमाणात झालेला खर्च लक्ष्यात घेता जागेचे करार हा सध्या ११ महिन्याचा आहे. तो ११ वर्ष करावा तसेच पुर्वी ठरलेल्या ठरावाप्रमाणे जागेच्या भाडयापोटी व वीज बिल व इतर इमारत दुरुस्ती खर्चापोटी रु.१०,०००/- दरमहा भाडे घ्यावे. (सध्याच्या कराराची मुदत पुढील महिन्यामध्ये संपत आहे.)

८) दि.१८.०७.२०१७ चे भाडे मागणी पत्र सोबत जोडत आहे. ते भरलेले आहे पण करारात ठरल्याप्रमाणे शिवसृष्टी चालू झाल्यावर भाडे आकारले जाईल, असे ठरले होते त्याप्रमाणेच भाडे घ्यावे व आता जे भाडे भरले आहे ते पुढील भाडयापोटी घ्यावे, मागील भाडे माफी करुन मिळावी, ही विनंती.

९) श्री साईबाबा संस्थानच्या संकेतस्थळावर शिवसृष्टी या उपक्रमाची माहिती दिल्यास श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना शिवसृष्टी या उपक्रमाची माहिती मिळेल.

१०) शिवसृष्टी व आय.टी. विभाग यांचेसमोर जी मोकळी जागा आहे, त्या जागेत भाविक जाऊन दुर्घटना होऊ शकते. कारण या जागेतील छत डोम कमकुवत झाले आहेत. त्यातून मोठी दुर्घटना होऊ नये, यासाठी आय.टी. विभागासमोर जो सुरक्षारक्षक आहे, त्यावर जबाबदारी द्यावी.

११) सध्या संस्थानमार्फत वीज पुरवठा भेटत आहे, तो मिळावाच पण इलेक्ट्रिक बोर्ड यांचेकडून विजेचे नवीन कनेक्शन घेण्यासाठी परवानगी मिळावी, त्याचा दर कमी आहे युनिटचा.

वरील विनंतीनुसार नवीन ज्या जागा संस्थान देणार आहे, त्यांचे भाडे आकारण्यात येऊ नये.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिवसृष्टी प्रकल्प हा बी.ओ. तत्वावर श्री.अभिजीत शिंदे यांना चालविण्यास दिलेला असल्यामुळे, श्री.अभिजीत शिंदे यांच्या उपरोक्त मागण्या मंजुर करणेत येऊन, त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. श्री.अभिजीत शिंदे यांना शिवसृष्टी संग्रहालयासाठी दिलेल्या जागेची मुदत संपुष्टात येत असल्यामुळे त्यांचे मागणीनुसार पुढे ११ वर्षे मुदतवाढ देण्यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र

शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा. शिवसृष्टी व आय.टी. विभाग यांचेसमोरील जागेतील डोमची दुरुस्ती करणेत यावी. तसेच त्यांना संस्थानच्या वीजपुरवठयासोबतच महाराष्ट्र शासनाचा वीजपुरवठा घेण्यासाठी एनओसी देणेबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही- प्र. अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**निर्णय क्र.१०८०** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी जा.क्र.नपं/ टे.क्र.७/ २९१७/ २०१७, दि.२०.११.२०१७ रोजीचे पत्रान्वये, त्यांच्या साठवण तलावास जीओ मेमरेन शिट टाकणेचे काम सुरु करावयाचे असून, सदरचे काम करणेचे कालावधीत कनकुरी रस्त्यालगत नगपंचायत जलशुध्दीकरण केंद्राच्या समोरुन गेलेल्या संस्थानचे मेन पाईपलाईनमधून शिर्डी शहरासाठी ३ महिन्यांसाठी दररोज ३० लाख लिटर पाणी मिळणेची मागणी केलेली आहे. या संबंधात चर्चा करणेसाठी आजचे सभेत श्री.अभय शेळके, नगरसेवक, शिर्डी नगरपंचायत हे उपस्थित होते, सभेने त्यांचेबरोबर याबाबत सविस्तर चर्चा केली.

या चर्चेअंती असे ठरले की, संस्थानला प्रतिमाह अंदाजे १५ ते १८ कोटी लिटर पाण्याची आवश्यकता असते. उपलब्ध पाणी साठयामधून संस्थानसाठी आवश्यक असलेले १८ कोटी लिटर पाणी राखीव ठेवणेत येऊन, उर्वरित पाणी साठयामधून शिर्डी नगरपंचायतीस, गर्दीचे दिवस संपल्यानंतर दिनांक ०२ जानेवारी पासून कॅनॉलचे पुढील रोटेशन येईपर्यंत अंदाजे १ महिना कालावधीसाठी रॉ-वॉटर देण्यात यावे. यासाठीची सर्व व्यवस्था (आवश्यक पंपसेट, पाईपलाईन, विजेचा पुरवठा इ.) शिर्डी नगपंचायतीने करावी, असे ठरले व त्यास उपस्थितांनी सहमती दर्शविली.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.१०८१** व्यवस्थापन समितीच्या कामकाजाचा वार्षिक कार्यअहवाल प्रसिध्द करणेत यावा, असे ठरले व त्याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.१०२३ ते १०८१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (धनंजय निकम) | (सुरेश हावरे) |
| उपजिल्हाधिकारी व प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**